म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ... निबंध ...
ग्रं. क. ३८४०

प्राचीन मराठी गद्य

प्रेरणा आणि परंपरा

डॉ. श्री. रं. कुलकर्णी



REFBK-0026427

सूचना :—खाली दिलल्या तारखपर्यंत पुस्तक तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार जादा वर्गणी भरावी लागेल.

25 JAN 1992
13 NOV 1993
23 MAR 1996

(क्र. मा. पहा)
२०००-१२-८८

संदर्भ
निबंध
३४४०
२६४२७
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



प्राचीन मराठी गद्य

प्रेरणा आणि परंपरा

श्रीधर रंगनाथ कुलकर्णी
भूतपूर्व प्रमुख, मराठी विभाग
उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद.

REFBK-0026427

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

प्रकाशक :
अनिल मेहता,
मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६ सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

मुद्रक :
ज. ता. गायकवाड,
मायबोली प्रिंटर्स,
४०५/९ नारायण पेठ,
पुणे ४११०३०

© सौ. सुमित्रा कुलकर्णी,
२-१-५१२/४ नल्लाकुंटा,
हैदराबाद ५०००१४
(आंध्र प्रदेश)

द्वितीयावृत्ती :
१९९१

मूल्य :
६५ रुपये

मुखपृष्ठ :
दीपक संकपाळ

ISBN 81-7161-136-6

'ज्ञानसंग्रह आणि ज्ञानदान हेच ईश्वराराधन'
या श्रद्धेने विद्यादान करणारे
माझे गुरुवर्य
कै. प्रा. विष्णु मोरेश्वर कुलकर्णी
यांच्या पवित्र स्मृतीस

-श्रीधर

दुसऱ्या आवृत्तीसंबंधी

या पुस्तकाची पहिली आवृत्ती १९७० साली प्रसिद्ध झाली. हे प्रकाशन मुंबईच्या सिंधू प्रकाशन या संस्थेने केले होते. पहिली आवृत्ती दोन वर्षांतच संपली. गेली सुमारे २० वर्षे हे पुस्तक दुर्मिळ झाले होते. दुसरी आवृत्ती काढावी अशा सूचना अनेक अभ्यासकांकडून येत होत्या. मनात असूनही प्रकाशकाच्या अभावी दुसरी आवृत्ती काढणे आजवर जमले नाही. आज तो योग येत आहे याचे समाधान वाटते.

या दुसऱ्या आवृत्तीत काही भागांचे पुनर्लेखन झाले आहे, तसेच 'आज्ञापत्रा'-संबंधीचे नवे प्रकरणही समाविष्ट करण्यात आले आहे. पहिल्या आवृत्तीच्या प्रकाशनानंतर मी धर्मशास्त्राच्या अध्ययनाकडे वळलो. राजनीतिशास्त्र हे व्यापक अर्थाने धर्मशास्त्राचेच एक अंग असल्याने तेही अभ्यासले. या अभ्यासानंतर "आज्ञापत्र" एका निराळ्या स्वरूपात दिसू लागले. या लहानशा प्रकरणाच्या पाठीशी एक मोठी परंपरा आहे, याचा बोध झाला. इतकेच नव्हे तर परंपरेचा आधार असूनही 'आज्ञापत्र' ही एक नवनिर्मिती आहे याचा प्रत्यय आला. तो लक्षात घेऊन आज्ञापत्रासंबंधीच्या प्रकरणाचा समावेश या आवृत्तीत करण्यात आला आहे.

वस्तुतः भारतीय राजनीतिशास्त्राचा इतिहास आणि स्वरूप हा स्वतंत्र ग्रंथाचा विषय आहे. असा ग्रंथ केव्हातरी प्रसिद्ध होईल. सध्या मात्र 'आज्ञापत्रा'चे आकलन योग्य रीतीने होण्यास आवश्यक असलेली पार्श्वभूमी देऊन आज्ञापत्राचे विवेचन केले आहे. परंपरेच्या प्रकाशात 'आज्ञापत्रा'संबंधीचे हे पहिलेच विवेचन असावे. परंपरेवर आधारलेली असूनही 'आज्ञापत्र' ही एक स्वतंत्र निर्मिती आहे, याचे अत्यंत संक्षेपाने विवेचन या प्रकरणात करण्यात आले आहे. पत्रसाहित्याच्या प्रकरणातही काही नवी पत्रे या आवृत्तीत देण्यात आली आहेत. 'आज्ञापत्राचे' प्रकरण आणि काही नवी पत्रे यांच्या योगाने पुस्तकातील प्रतिपादनाच्या मध्यवर्ती सूत्रास पुष्टीच मिळते, हे वाचकांच्या निदर्शनास येईल.

काही नामवंत समीक्षकांनी या पुस्तकाचे आस्थेने समालोचन केले आहे. या समीक्षकांचा मी ऋणी आहे. द्वितीयावृत्तीचे पुनर्लेखन करताना शक्य आणि आवश्यक त्या स्थळी समीक्षकांच्या मतांचा आदर करण्यात आला आहे. विशेष समाधानाची बाब म्हणजे प्रतिपादनास आधारभूत असलेल्या मध्यवर्ती सूत्रासंबंधी समीक्षकांनी मतभेद व्यक्त केले नाहीत. त्यामुळे या सूत्राचा पुनर्विचार करण्याचा प्रश्न उद्भवला नाही.

स्वतंत्र अभ्यासक, संशोधक आणि महाराष्ट्रातील विद्यापीठे या सर्वांनी दर्शविलेल्या आस्थेमुळे द्वितीयावृत्ती काढणे शक्य झाले. महाराष्ट्र शासनानेही १९७१ चा राज्यपुरस्कार देऊन प्रोत्साहन दिले आहे. या सर्वांची कृतज्ञतापूर्वक नोंद घेतली पाहिजे.

माझे तरुण मित्र डॉ. दत्तात्रय पुंडे साहित्य संशोधनाच्या क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी करीत आहेत. परंतु, "प्रकाशकाचे संशोधन" हाही त्यांच्या कर्तृत्वाचा एक पैलू आहे, हे या दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने माझ्या प्रत्ययास आले त्यांनी पुढाकार घेऊन प्रकाशनाचा हा योग जुळवून आणला. या सन्मित्राचे आभार न मानता त्यांचा ऋणानुबंध असाच पुढे रहावा ही मनीषा व्यक्त करतो.

माझे दुसरे स्नेही आणि एकेकाळचे सहकारी डॉ. व. दा. कुलकर्णी यांच्या सहकार्यामुळे अनेक दुर्मिळ ग्रंथ अभ्यासास उपलब्ध झाले. दुसऱ्या आवृत्तीसंबंधी काही उपयुक्त सूचनाही त्यांनी केल्या. डॉ. कुलकर्णी यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

चाकोरीबाहेरचा ग्रंथ आणि तोही दुसऱ्या आवृत्तीसाठी प्रकाशनार्थ घेण्याचे धाडस मेहता पब्लिशिंग हाऊसचे श्री. अनिल मेहता यांनी केले, याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

प्रथमावृत्तीप्रमाणेच या परिवर्धित आवृत्तीचे स्वागत अभ्यासक करतील असा विश्वास वाटतो.

२-१-५१२/४ नल्लाकुंटा, हैदराबाद
चैत्र शु. प्रतिपदा शके १९१३
मार्च १७, १९९१

श्री. रं. कुलकर्णी

....सहा....

ऋणानुबंध

[पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना]

अनपेक्षित योग केवळ कादंबऱ्यांतील पात्रांच्याच जीवनात येतात असे नाही. प्रत्यक्षातदेखील असे योग कधी कधी येतात. तसे नसते तर एका प्राचीन गद्य ग्रंथाच्या संपादित आवृत्तीस प्रस्तावनेदाखल लिहिलेला एक लहानसा निबंध आज पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याचा योग आलाच नसता. 'सुगमबोध' हा गद्य ग्रंथ संपादून झाल्यावर प्राचीन मराठी गद्याच्या पंडिती परंपरेचा आढावा घेणारा निबंध मी लिहिला. उस्मानिया विद्यापीठाच्या मराठी स्वाध्याय-संशोधन-मंडळाच्या बैठकीत तोच निबंध मी वाचला. माझ्या सहकाऱ्यांना तो आवडला आणि 'सुगम-बोधाच्या' ऊर्वरित कामाला मी लागलो.

या कालावधीत माझे एक जुने स्नेही श्री. दिनकर साक्रीकर पंचवीस वर्षांनंतर अकस्मात मला हैदराबादी भेटले. एकमेकांची गेल्या दोन तपांची वाटचाल आम्ही सांगत असताना सहज या निबंधाचा विषय निघाला. श्री. साक्रीकर यांनी लगेच त्या विषयावर पुस्तक लिहिण्यास मला सांगितले. इतकेच नव्हे तर प्रकाशनाची सर्व जबाबदारी घेण्याची तयारी त्यांनी दर्शविली. चांगल्या गोष्टी इतक्या सहज आणि अनपेक्षित रीतीने घडत नसतात. परंतु, जे घडले ते सत्य होते असे श्री. साक्रीकर यांच्या वारंवार येणाऱ्या पत्रांनी बजावले आणि त्यांच्याच चिकाटीमुळे एका निबंधाचे रूपांतर पुस्तकात झाले. दुर्मिळ आणि निरपेक्ष अशा सौहार्दाच्या ऋणातून मुक्त होण्याची माझी इच्छा नसल्यामुळे श्री. साक्रीकर यांचे आभार वगैरे मानण्याच्या खटाटोपात मी पडत नाही.

दुसराही अनपेक्षित योग याच सुमारासचा. प्रथितयश साहित्यिक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचा माझा परिचय केवळ योगायोगाने हैदराबादच्या त्यांच्या मुक्कामात झाला. प्रथमभेटीतच त्यांनी एवढी आत्मीयता दर्शविली की, या व्यक्तीचा आणि आपला हा पहिलाच परिचय आहे, हे माझे मलाच खरे वाटेना. त्यांनी माझ्या लेखनाची चौकशी केली आणि झालेल्या लेखनाचा काही भाग वाचून काढण्याचे व आवश्यक त्या सूचना देण्याचे प्रायश्चित्त त्यांना घ्यावे लागले ! अनेक महत्त्वाची कामे दूर सारून श्री. माडखोलकर यांनी हे कार्य अत्यंत जिव्हाळ्याने केले आणि काही महत्त्वाच्या सूचनाही केल्या. या सूचनांबरोबरच 'आगे बढो' असा इशाराही मिळाला. साहित्याच्या क्षेत्रात नावाजलेल्या व्यक्तींचा इशारा मिळताच लेखन वेगाने झाले आणि पुस्तकाचे हस्तलिखित मी प्रकाशकांच्या स्वाधीन केले.

श्री. माडखोलकर यांच्या या आत्मीयतेबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. एक ज्येष्ठ ऋणानुबंधी श्री. दिगंबरराव बिंदू यांनी वेळोवेळी लिहून झालेला भाग वाचून प्रोत्साहन दिले याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला पाहिजे.

हे लेखन चालू असताना माझे सहकारी प्रा. भा. शं. कहाळेकर आणि प्रा. व. दा. कुलकर्णी यांनी वेळोवेळी चर्चा केली आणि आवश्यक त्या सूचनाही केल्या. या सहकार्याबद्दल मी या उभयतांचा आभारी आहे. उस्मानिया विद्यापीठाचे ग्रंथपाल आणि त्यांचे सहकारी, संस्कृत अकादमीचे श्री. पाध्ये आणि अकादमीचे अन्य अधिकारी या सर्वांनी आपापल्या संग्रहातील ग्रंथांचा आणि हस्तलिखितांचा भरपूर उपयोग करण्यास अनुमती दिली, याबद्दल या सर्वांचा मी आभारी आहे.

प्रकाशक सिंधु प्रकाशन (प्रा.) लि. यांनी मराठी ग्रंथांच्या प्रकाशनाचे कार्य हाती घेतल्यानंतर अगदी प्रारंभीच्या प्रकाशनात प्रस्तुत प्रकाशनाचा अंतर्भाव केला. या बहुमानाबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

'श्रीसदन', नल्लाकुंटा,
हैदराबाद, आंध्रप्रदेश
पौष शु. ८, शके १८९०
डिसेंबर २७, १९६८.

श्री. रं. कुलकर्णी

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे पत्र

[प्रथित यश साहित्यिक (कै.] ग. त्र्यं. माडखोलकर यांनी 'प्राचीन मराठी गद्य : प्रेरणा आणि परंपरा' या पुस्तकातील बखर–वाङ्मया-संबंधीचे प्रकरण वाचल्यानंतर एका पत्राद्वारे लेखकास आपला अभिप्राय कळविला. या पत्रातील काही भाग.]

" आज आपल्या लेखासोबत माझा अभिप्राय थोडक्यात कळवीत आहे. कारण सध्या अनेक निकडीच्या कामांमुळे विस्ताराने लिहिण्याइतका निवांतपणा नाही.

आपल्या या लेखात बखर-वाङ्मयासंबंधी आपण केलेले विवेचन मौलिक असून अनेक पूर्वग्रह आणि दुर्ग्रह यांचा त्यामुळे निरास होऊन जाईल व बखरींचा अगदी निराळ्या दृष्टीने विचार करण्याची गरज संशोधक आणि अभ्यासक यांना वाटेल.

आपण बखर या शब्दाविषयी दिलेली नवीन उपपत्ती चिंतनीय आहे. त्याच-प्रमाणे बखरींचे वाङ्मयीन आणि ऐतिहासिक मूल्य, त्यांची काही मर्यादेपर्यंत असलेली अधिकृतता आणि विश्वसनीयता, मुसलमानी तवारिखांपेक्षा पुराणांशी असलेले त्यांचे साधर्म्य, तवारिखांच्या आणि बखरींच्या लेखनोद्देशात असलेला मूलभूत फरक इत्यादि मुद्यांची आपण केलेली सोदाहरण चर्चा संशोधकांच्या आणि अभ्यास-कांच्या विचारांना चालना देईल.

बखरींचे पुराणांशी असलेले साधर्म्य जसे आपण उदाहरणे आणि उतारे देऊन सिद्ध केले आहे तसा समकालीन इतिहासाशी त्यांचा असलेला संबंध मात्र उदाहरणे देऊन विशद केला नाही. असे सोदाहरण विवेचन उपयुक्त ठरले असते....

आपल्या या लेखावरून माझी अशी समजूत झाली आहे की, आपला हा ग्रंथ केवळ बखर-वाङ्मयाकडे नव्हे तर मराठ्यांच्या इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टी संशोधकांना, अभ्यासकांना आणि वाचकांना देईल....कृपालोभ असावा.

आपला,

ग. त्र्यं. माडखोलकर

विषयानुक्रम

१. भूमिका १ ते १२

(१) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : १ (२) गद्य साहित्याची उपेक्षा : २ (३) गद्याचा समाजजीवनाशी ऋणानुबंध : २ (४) प्राचीन गद्याची कालमर्यादा : २ (५) महाराष्ट्राचा इस्लामी संस्कृतीशी संबंध : ३ (६) इस्लामी आक्रमणाची द्विविध प्रतिक्रिया : ३ (७) 'धर्ममूलमिदं सर्वम् : ४ (८) प्राकृत भाषा आणि संस्कृत ज्ञान : ५ (९) 'अध्यात्म-विद्या विद्यानाम्' : ५ (१०) समाज-जीवन आणि साहित्याचे वळण : ६ (११) नवे प्रवाह आणि जुनी परंपरा : ७ (१२) 'इवलेसे रोप लाविलें द्वारीं' : ८ (१३) 'शकावली' : एक परंपरा : ९ (१४) मराठी गद्याच्या त्रिविध प्रेरणा : ११.

२. मराठी गद्याची पंडिती परंपरा १३ ते ६२

(१) शिलालेख आणि लोकवाङ्मय : १३ (२) मराठी साहित्याचा प्रारंभ : १४ (३) गद्यसाहित्याचे सातत्य : १५ (४) पहिला गद्यग्रंथ : 'ज्योतिष-रत्नमाला' : १६ (५) या ग्रंथाचे स्वरूप : १९ (६) ज्योतिषरत्नमालेची प्रेरणा : २१ (७) उत्तरकालीन ग्रंथांवर झालेला परिणाम : २१ (८) मराठी गद्याची पंडिती परंपरा २२ (९) गद्यसाहित्यास आलेला बहर : २३ (१०) महानु-भावीय गद्य साहित्य : २४ (११) बोधभाषा आणि पंथभाषा : २४ (१२) वैद्यक ग्रंथ : २५ (१३) 'रसरत्नदीपात' आलेल्या वंशावळी : २७ (१४) महानुभावाचे श्रुति-स्मृति वाङ्मय : २८ (१५) श्रीचक्रधरसूत्रे आणि दृष्टान्तपाठ : २९ (१६) 'प्रतिलोम' टीकापद्धती : ३१ (१७) अर्थनिर्णयाचे महानुभावीय शास्त्र : ३२ (१८) चौपद्यांतील भाषा : ३३ (१९) जैन ग्रंथांची मराठी परंपरा : ३४ (२०) मराठी गद्याचे सुवर्णयुग : ३५ (२१) धर्मरक्षणाची प्रेरणा : ३६ (२२) 'क्रिस्त पुराण' : ३६ (२३) तेलुगू ग्रंथाचा मराठी अवतार : ३८ (२४) वेदांतपर स्वतंत्र ग्रंथ : ३९ (२५) वैद्यक व इतर शास्त्रांवरील ग्रंथ : ४२ (२६) संगीत शास्त्रावरील पहिला ग्रंथ : ४४ (२७) महाराष्ट्राची संगीत-परंपरा : ४६ (२८) नृत्याचे शास्त्रोक्त विवरण : ४६ (२९) 'टीप ग्रंथ' : ४९ (३०) अन्य टीका-ग्रंथ : ५१ (३१) पंडिती परंपरेतील भाषेचे वैशिष्ट्य : ५१ (३२) अव्वल इंग्रजी अमदानीतील ग्रांथिक भाषा : ५२ (३३) मराठी गद्याच्या प्रेरणा : ५३ (३४) ग्रांथिक भाषेचे शुद्ध स्वरूप : ५६ (३५) समारोप : ५६.

३ कथाप्रधान साहित्य ६३ ते ८५

(१) लोकसाहित्याची परंपरा : ६३ (२) अद्‌भुताचे आकर्षण : ६४ (३) संस्कारित लोककथा : ६५ (४) मराठी कथांची प्राकृत परंपरा : ६६ (५) लोकसाहित्याची उपेक्षा : ६९ (६) मराठी पंचतंत्र : ६९ (७) लीळा-चरित्रातील दृष्टान्तकथा : ७१ (८) व्रतकथा : ७२ (९) रामायण-महाभारतातील कथा, आख्याने : ७३ (१०) महानुभाव चरित्रपर कथा, आख्याने : ७४ (११) कथात्मक साहित्याचे महानुभावीय वर्गीकरण : ७४ (१२) चरित्रग्रंथांची भाषा : ७५ (१३) चरित्रग्रंथांची प्रेरणा : ७६ (१४) जैन परंपरेचा कथात्मक आदर्श : ७९ (१५) एका अपवादाची मीमांसा : ८० (१६) कथात्मक साहित्याची विविध वळणे : ८२.

४. मराठी गद्याची पौराणिक परंपरा ८६ ते १२०

(१) साहित्याचा समाजजीवनाशी संबंध : ८६ (२) बखरसाहित्य : संशोधन आणि संपादन : ८७ (३) अखबारनवीस आणि बखरकार : ८९ (४) बखर-नव्हे चरित्र-आख्यान : ९० (५) बखर शब्दाची व्युत्पत्ती : ९१ (६) बखर वाङ्मयाचे वर्गीकरण : ९३ (७) बखर : चरित्र-आख्यान : ९५ (८) पुराणे आणि बखरी : ९७ (९) धर्मरक्षणाची कालसापेक्ष जाणीव : ९९ (१०) धर्मसंस्थापनेचे नर : तेही ईश्वरी अवतार : १०० (११) बखरीतील वंशावळी : १०१ (१२) धर्मरक्षण : बखरींची प्रेरणा : १०२ (१३) पुराणवाङ्मयाचा ठसा : १०३ (१४) ध्येय नवे-घाट नवा : १०७ (१५) धर्मावतारांच्या पराक्रमाच्या गाथा : १०८ (१६) भाषा आणि शैली : १०८ (१७) पांडित्य आणि कथात्मकता यांचा समन्वय : ११० (१८) बखर-साहित्याचा उत्कर्ष : भाऊसाहेबांची बखर : १११ (१९) क्षीणतेज बखर-साहित्य : ११४ (२०) बखरींचे इतिहास-प्रामाण्य : ११४ (२१) युगधर्म आणि प्राचीन काव्य : ११५ (२२) विविध प्रेरणांचे सहजीवन : ११६ (२३) साहित्यातील प्रवाह आणि सामाजिक जाणीव : ११६.

५. आज्ञापत्र : पौराणिक परंपरेचा वेगळा आविष्कार १२१ ते १३४

(१) प्राचीन मराठी वाङ्मयातील राजनीतिपर साहित्य : १२१ (२) आज्ञा-पत्र आणि सप्तांग राज्य : १२३ (३) भारतीय परंपरेतील राजा : १२४ (४) धर्मदंड आणि राजदंड : १२५ (५) आरमारी बळाचे महत्त्व : १२७ (६) पौराणिक परंपरेतील पुनर्निमिती : १२८ □ परिशिष्ट : छत्रपती शिवाजी राजे यांचे मालोजी घोरपडे यास पत्र : १३१.

६ पत्रसाहित्य १३५ ते १५०

(१) कागदपत्र आणि पत्रव्यवहार : १३५ (२) स्वराज्य देवब्राह्मणांचे विश्राम : १३६ (३) पेशवेकुळात पुराणांचा व्यासंग : १३८ (४) राज्यशासन आणि धर्मशासन : १३९ (५) सीतेप्रमाणे 'गंगेवर 'ही अग्निदिव्याचा प्रसंग : १४० (६) पत्रांतून घडणारे व्यक्तिदर्शन : १४० (७) सत्तास्पर्धेचे बळी : १४२ (८) सामान्यांचे असामान्य शौर्य : १४३ (९) वीरांगनादेखील आघाडीवर : १४४ (१०) पत्रातील भाषेचे दुहेरी वळण : १४५ (११) पत्रसाहित्यातील 'विश्वरूप-दर्शन : १४७ (१२) समाज-जीवनाचे प्रतिबिंब : १४८

७ समारोप १५१ ते १५८

(१) साहित्य-निर्मितीच्या प्रेरणा आणि साहित्याचा घाट : १५१ (२) साहित्य-प्रवाहांचे उगमस्थान : पंडिती परंपरा : १५३ (३) कथात्मक साहित्याची भिन्न प्रेरणा : १५४ (४) युगपुरुषांचे चरित्र-आख्यान : १५५ (५) आज्ञापत्र आणि पत्र साहित्य : १५५ (६) गद्य साहित्यातील भाषेचे स्वरूप : १५६ (७) गद्य सारस्वताची वैभवशाली परंपरा : १५८

प्रमुख आधारग्रंथ १६० ते १६३

निर्देश-सूची १६४ ते १७१

१. भूमिका

१. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास २. गद्य साहित्याची उपेक्षा ३. गद्याचा समाजजीवनाशी ऋणानुबंध ४. प्राचीन गद्याची कालमर्यादा ५. महाराष्ट्राचा इस्लामी संस्कृतीशी संबंध ६. इस्लामी आक्रमणाची द्विविध प्रतिक्रिया ७. 'धर्ममूलं इदं सर्वम्' ८. प्राकृत भाषा आणि संस्कृत ज्ञान ९. 'अध्यात्मविद्या विद्यानाम्' १०. समाजजीवन आणि साहित्याचे वळण ११. नवे प्रवाह आणि जुनी परंपरा १२. 'इवलेसे रोप लावियेलें दारीं' १३. 'शकावली' : एक परंपरा १४. मराठी गद्याच्या विविध प्रेरणा.

१. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास 'महाराष्ट्र सारस्वत' या नावाने प्रथम कै. वि. ल. भावे यांनी लिहिला. त्यानंतरचा उल्लेखनीय प्रयत्न म्हणजे ल. रा. पांगारकर यांचा त्रिखंडात्मक प्राचीन 'मराठी वाङ्मयाचा इतिहास.' 'महाराष्ट्र सारस्वता'च्या सुधारलेल्या आवृत्तींचे प्रकाशन स्वतः वि. ल. भावे यांनी प्रथम केले आणि या क्षेत्रात नंतर झालेल्या संशोधनांचा समावेश करणारी 'पुरवणी' शं. गो. तुळपुळे यांनी 'महाराष्ट्र सारस्वतास' जोडली. डॉ. य. खु. देशपांडे यांनी महानुभावीय मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिला. या ग्रंथांची दुसरी आवृत्तीही त्यांनी प्रकाशित केली. हे प्रयत्न चालू असतानाच वाङ्मयेतिहासाशी संबंधित असलेल्या विषयांवर अनेकांनी लेखन केले. प्राचीन मराठी वाङ्मयाचा 'परामर्श' कोणी घेतला तर कोणी 'समालोचन' केले. स्वतःच्या विशिष्ट सामाजिक दृष्टीस अनुसरून प्राचीन मराठी साहित्याच्या निर्मितीचा अन्वयार्थ लावणारे प्रयत्नही काही लेखकांनी केले आहेत. प्राचीन कवींचे विशेषतः संत-कवींचे कार्य प्रतिगामी की पुरोगामी या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करणारांनीदेखील आपल्या पद्धतीने या साहित्याचा इतिहास मांडला आहे. अशा

लेखकांचे दृष्टिकोन भिन्न असल्यामुळे त्यांच्या विवेचनातून निघालेले निष्कर्षदेखील वेगवेगळे आहेत.[१]

२. या इतिहासग्रंथांत व समालोचनांत या ना त्या कारणाने पद्यवाङ्मयाला महत्त्व मिळाले आहे. पद्यसाहित्याचा विस्तार आणि या साहित्याशी असलेला निरनिराळ्या परंपरांचा संबंध लक्षात घेता असे होणे स्वाभाविक होते, परंतु त्यांचा दुसराही एक परिणाम नकळत झाला आहे. तो म्हणजे मराठी गद्य साहित्याची उपेक्षा. गद्य साहित्याचा पूर्णपणे अनुल्लेख झाला आहे असे नाही. परंतु महानुभाव पंथाचे गद्यवाङ्मय आणि बखर साहित्य यांच्या व्यतिरिक्त अन्य साहित्याची दखल इतिहास-समालोचनांत फारशी घेण्यात आलेली नाही. मराठी गद्यसाहित्याचा संकलित इतिहास लिहिण्याचे प्रयत्नही मर्यादित स्वरूपात झाले आहेत. प्राचीन गद्य म्हणजे प्रारंभीच्या काळातील महानुभाव पंथाचे गद्य ग्रंथ आणि शेवटच्या कालखंडातील बखरसाहित्य एवढ्यापुरतीच मराठी गद्याची कल्पना मर्यादित राहिली आहे. अर्वाचीन गद्याची पूर्वपीठिका लिहिणाऱ्या लेखकांनीदेखील केवळ या दोन श्रेणींतील प्राचीन गद्याचा उल्लेख करून 'आधुनिक गद्याच्या इंग्रजी अवताराचा' प्रपंच केला आहे. त्यामुळे 'प्राचीन गद्याची परंपरा' हा शब्दप्रयोगदेखील कित्येकांना वदतोव्याघातासारखा वाटण्याचा संभव आहे.

३. मराठी पद्यवाङ्मयाच्या तुलनेने गद्य साहित्याची निर्मिती अल्पप्रमाणात झालेली दिसत असली तरी या साहित्याला मराठी वाङ्मयाच्या प्रारंभकाळापासून ते अव्वल ब्रिटिश आमदानीपर्यंतची परंपरा आहे ही वस्तुस्थिती आहे. प्राचीन गद्याच्या विकासाला एक दिशाही आहे हे अभ्यासांती निदर्शनास येते. भाषेचा प्रारंभच मुळात गद्याने होतो. शिलालेख, ताम्रपट ही प्रारंभ काळातील सामग्रीदेखील गद्यातच असते. पद्य प्रथम लोकगीतांत आणि नंतर साहित्यात कालांतराने रूढ होते. सर्वच भाषांच्या बाबतीत आढळून येणारा हा नियम आहे. मराठी भाषेचे वैशिष्ट्य असे की या भाषेतला प्राचीनतम लिखित ग्रंथदेखील गद्यात आहे. मराठी गद्यात आढळून येणारे विभिन्न प्रवाह आणि परंपरा एका दृष्टीने सामाजिक स्थित्यंतराशी समांतर आहेत. या प्रवाहांना कारणीभूत ठरलेल्या प्रेरणा आणि कालगतीनुसार झालेली सामाजिक जीवनाची वाटचाल यांचा अगदी जवळचा ऋणानुबंध दिसून येत असल्याकारणाने या साहित्यातील प्रवाहांचे समालोचन अनेक दृष्टींनी उद्बोधक ठरणारे आहे.

४. शालिवाहन शकाच्या दहाव्या शतकापासून ते अठराव्या शतकाच्या अंतापर्यंत सुमारे आठ-नऊ शतकांतील मराठी गद्यसाहित्याची प्रेरणा आणि परंपरा याचा शोध घेण्याचा प्रयत्न पुढील प्रकरणांतून करण्यात आला आहे. ब्रिटिश सत्तेच्या आगमनापूर्वी महाराष्ट्रात अनेक स्थित्यंतरे झालेली असली तरी जीवनमूल्यांत क्रांतिकारक बदल घडवून आणण्यात ब्रिटिश सत्ता कारणीभूत ठरली. जित या नात्याने इंग्रजांशी व पर्यायाने पाश्चिमात्य संस्कृतीशी महाराष्ट्राचा संबंध आल्यानंतर महाराष्ट्रातील सामाजिक जीवन व जीवनविषयक मूल्ये यांत क्रमाक्रमाने पण निश्चित दिशेने परिवर्तन

घडण्याची प्रक्रिया सुरू झाली. ब्रिटिश सत्तेपूर्वी मुसलमानी राज्यकर्ते या भागावर दीर्घकाळ राज्य करीत होते. त्यांच्या संस्कृतीचे व राजवटीचे महाराष्ट्रावर अनेकविध परिणाम झाले असले तरी मराठी भाषिकांच्या जीवनमूल्यांत आमूलाग्र बदल घडवून आणणे इस्लामी संस्कृती आणि सत्ता यांना शक्य झाले नाही. ब्रिटिश राजवटीनंतरच्या साहित्याचा विचार म्हणूनच वेगळ्या भूमिकेतून करावा लागतो.

५. राजसत्तेच्या आधाराने आपल्या धर्माचा आणि संस्कृतीचा प्रसार मुसलमानांनी केला नाही असे नाही. इस्लाम आणि इस्लामी सत्ता हे एकमेकांना सोडून कोणत्याही काळात राहिले नाहीत. दक्षिणेतील काही मुस्लिम घराणी यावाबत अपवाद असल्याचे दृश्य दिसते. परंतु त्यात मुत्सद्देगिरीचा भाग अधिक होता. अन्यथा विजयनगरच्या हिंदू साम्राज्याचा अंत करण्यासाठी ही घराणी राक्षसतागडीच्या लढाईत एकत्र आली नसती. परस्परांशी सतत भांडणारे 'कन्नड पातशाह' (आदिलशाह), 'तैलंग पादशाह' (कुतुबशाह), 'मन्हाट पादशाह' (निजामशाह) आणि 'वराड देश पादशाह' राक्षसतागडीच्या रणक्षेत्रावर संघटित झाले ते स्वधर्मीय नसलेल्या सत्तेचा अंत घडवून आणण्यासाठी. या एका घटनेवरून दक्षिणेतील इस्लामी सत्तांच्या धर्म व राज्यनीतिविषयक दृष्टिकोनाची कल्पना करता येते.[२]

राज्यकर्त्यांच्या विशिष्ट धार्मिक दृष्टिकोनामुळेच मुस्लिम राजवटीत वावरणाऱ्या मुसलमानेतर समाजास शासक केवळ परकीय नसून ते परधर्मीयही आहेत याची जाणीव एकाच वेळी होत असे. या जाणिवेतून प्रतिकाराचे असंघटित प्रयत्न झाले असतीलही. ते असफल ठरल्यामुळे इतिहासात त्याची नोंद नसावी. महाराष्ट्र या अतिक्रमणाला निमूटपणे शरण गेला असता तर चौदाव्या शतकानंतर धर्मपर व अध्यात्मविषयक साहित्य मराठी भाषेत निर्माण होण्याचे कारण नव्हते. त्याचप्रमाणे प्रतिकाराची भावना कालांतराने 'हिंदूपदपातशाहीत' फलद्रूप झाली तीही तशा स्वरूपात आकारास आली नसती.

६. दक्षिणेवरील इस्लामी आक्रमणाची प्रतिक्रिया द्विविध होती : एक तात्कालिक आणि दुसरी दीर्घकालीन स्वरूपाची. दक्षिणदेशावरील मुसलमानांची पकड सैल होताच 'धर्मरक्षणार्थ' स्थापण्यात आलेले विजयनगरचे राज्य ही तात्कालिक प्रतिक्रिया होती. (याच राज्याचा अंत इ. स. १५६५ च्या राक्षसतागडीच्या लढाईत संघटित मुसलमानी राजघराण्यांनी घडवून आणला.) दुसरी प्रतिक्रिया वैचारिक स्वरूपाची. धर्मरक्षणाची समाजव्यापी जाणीव या प्रतिक्रियेतून निर्माण झाली. अगोदरच्या साधुसंतांनी धर्मज्ञान समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोचविले होतेच. धर्मविषयक जाणिवांचे प्रभुत्व जनमानसावर होते म्हणूनच विजयनगर साम्राज्याच्या अस्तानंतर उण्या पुऱ्या पाऊण शतकाच्या कालावधीत महाराष्ट्रात स्वराज्याची स्थापना होऊ शकली. धर्मरक्षणाच्या जाणिवेचा वैचारिक जागृतीतून झालेला आविष्कार ही इस्लामी आक्रमणाची दीर्घकालानंतर प्रकट झालेली प्रतिक्रिया म्हणता येईल.

परधर्मीय शासनाच्या योगाने स्वधर्माचा संकोच झाल्याची भावना मुस्लिम राजवटीच्या काळात दृढमूल झालेली होती. सत्ता आणि स्वार्थ यांच्या प्रलोभनापायी काही कर्तबगार लोकांनी आपली धर्मभावना गुंडाळून ठेवली होती तर प्राप्त परिस्थितीशी असहाय तडजोड करण्याचा प्रयत्न बहुजनसमाज करीत राहिला. आपद्धर्माचा स्वीकार करूनही धर्म हाच जीवनाचा आधार आहे ही श्रद्धा शिवकालापर्यंत टिकून होती. स्वराज्याच्या वैभवकाली मात्र या श्रद्धेस ओहोटी लागल्याचे दृश्य दिसते. जीवितसाफल्याच्या कल्पना धर्माशी निगडित असल्यामुळे राजकीय स्थित्यंतराचा अनुभव घेत असतानाही धर्माधिष्ठित जीवनमूल्ये महाराष्ट्रात कायम होती. ब्रिटिश राजवटीत ही मूल्येच मुळात शंकास्पद ठरली. त्यामुळे साहित्य आणि समाज यांची उभारणी निराळ्या मूल्यांचा शोध घेत घेत होत राहिली.

७. प्राचीन गद्याचाच नव्हे तर सर्वच मराठी वाङ्मयाचा कालखंड वाङ्मयारंभापासून ते शके १७४० पर्यंत का मानावयाचा हे आता स्पष्ट होईल. शके १७४० मध्ये मराठयांच्या सत्तेचा अस्त झाला आणि महाराष्ट्रात ब्रिटिश राजसत्ता रूढ झाली आणि एकंदरीत जीवनमूल्ये आणि समाजाची घडण यांच्यात प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिवर्तनास प्रारंभ झाला. शके १७४० पर्यंतच्या कालखंडात राजकीय स्थित्यंतरे अनेक झालेली असली, वेगवेगळ्या पंथोपपंथांनी आपल्या मतांचा प्रसार केलेला असला तरी जीवन हे धर्ममूलक आहे ही व्यापक धारणा या कालखंडात नांदत होती. साहित्यनिर्मितीही तदनुषंगाने होत असे. या कालखंडात व्यक्ती आणि समाज यांचे जीवन या ना त्या परीने धर्मकल्पनांशी संबद्ध झालेले होते. राजकीय, सामाजिक, कौटुंबिक आणि व्यक्तिगत अशा सर्वच कर्तव्यांचा आणि जबाबदारीचा समावेश त्या त्या संदर्भातील धर्मविषयक कल्पनांत करण्यात येत असे. पारलौकिक कल्याणाचा मार्ग ही आजची धर्मविषयक धारणा आहे. या मार्गाचे अनुसरण म्हणजेच धर्माचरण अशी आजची समजूत आहे. वस्तुतः धर्माच्या अनेक अंगोपैकी हे एक आहे. समग्र धर्म त्यात साठविलेला नाही. आज कायद्याने निर्धारित होणारे सामाजिक संबंध पूर्वी धर्माज्ञेने नियमित होत असत. त्याचे शास्त्र ते धर्मशास्त्र. आणि व्यक्तीची निरनिराळ्या क्षेत्रांतील कर्तव्ये तोही धर्मच. राजाचे कर्तव्य तो राजधर्म. इहलौकिक कर्तव्य आणि पारलौकिक कल्याणाची साधना या दोहोंचा मार्ग धर्मच निश्चित करीत असे.

धर्मसंस्था परिवर्तनशील नसते असा आग्रह धरणारे धुरीण सर्व काळात आणि सर्व समाजांत असतात. मूळ धर्मग्रंथांवर निरनिराळ्या काळांत झालेली भाष्ये त्या त्या काळास आवश्यक असलेल्या परिवर्तनास कधी 'धर्म्य' समजून मान्यता देतात तर कधी आपद्धर्मात त्याचा अंतर्भाव करतात. निर्बंधांचे बांध फोडून वाहणे हा जीवनाचा प्रकृतिधर्म आहे. सर्वच प्राकृतिक धर्मास धर्म्य समजणे समाजाच्या दृष्टीने इष्ट नसते. तथापि, कालपरिस्थित्यनुसार पूर्वापार चालत आलेल्या निर्बंधांचा फेरविचार आवश्यक ठरतो. असा विचार सुटला म्हणजे परंपरा आणि पुरोगामी वृत्ती यांचा

संघर्ष सुरू होतो. नवे पंथ आणि नव्या विचारधारा त्यांतून उदय पावतात आणि एकंदरीत समाजधारणेवर आपला ठसा उमटवून जातात.

८. विद्यमान भारतीय भाषांतील साहित्याचा उगम अशाच संघर्षातून झालेला आहे. मराठी भाषांतील साहित्यापुरताच विचार करावयाचा झाल्यास प्रारंभ अगदी साधासुधा झालेला दिसतो. तरी त्यात संघर्षाचे बीज आहेच. धर्मविषयक साहित्य आणि शास्त्रीय वाङ्मय संस्कृत भाषेत दीर्घकाळ चालत आलेले. कालांतराने लोकभाषा उदयास आल्या, वाढल्या, प्रौढ झाल्या तरी धर्म व शास्त्र यांच्यासंबंधीचे साहित्य संस्कृत भाषेतच असावे हा प्रतिष्ठितांचा आग्रह. त्यामुळे या भाषेचे ज्ञान नसणारांना संस्कृत ग्रंथातील ज्ञानभांडार अप्राप्य ठरले. ज्ञानाचा असा 'कोंडमारा' समाजहितास विरोधी असल्याची जाणीव साधुसंत व इतरांनाही होत राहिली. तथापि, धर्मज्ञान व शास्त्रज्ञान प्राकृतांच्या भाषेत ग्रथित करणे म्हणजे प्रस्थापित धर्मसंस्थेस आव्हान देणारे आहे, असा 'धर्ममार्तंडां'चा समज होता. उलट, धर्म आणि शास्त्रे हा लोकजीवनाचा आधार असल्याने प्राकृतांच्या भाषेत त्यांचे निरूपण हे लोककल्याणप्रद ठरते ही पुरोगामी वृत्तीची धारणा. ज्ञानाचा ठेवा आशूद्रचांडाल सर्वांना प्राप्त व्हावा या तळमळीने परंपरेवर विजय मिळविला आणि लिखित मराठी साहित्याचा उदय झाला.

९. मराठी साहित्यातील पहिल्या लिखित ग्रंथाने संघर्षाची तीव्रता कमी व्हावी या हेतूने मध्यम मार्ग स्वीकारलेला दिसतो. श्रीपतिभट्टाने मूळ ग्रंथ संस्कृत भाषेत रचला आणि स्वतःच्याच ग्रंथावर मराठी भाषेत टीका लिहून एकाच वेळी दोन्ही भाषांतून ग्रंथरचना केल्याचे श्रेय मिळविले. मराठी 'ज्योतिषरत्नमालेचे' अनुसरण वैद्यकादी शास्त्रग्रंथांनी केले. या ग्रंथांच्या योगाने पारंपरिकतेची द्वारे थोडी किलकिली झाली.[३] ज्योतिष, वैद्यक इत्यादी शास्त्रांचे ज्ञान जीवनास उपयुक्त होते. तेवढ्याने मराठी ग्रंथकाराचे समाधान होणे शक्य नव्हते. जीवनाचे साफल्य ज्या अध्यात्मविद्येत आहे ती विद्या मराठी ग्रंथांतून अद्याप प्रगट झालेली नव्हती. अध्यात्मविद्या ही तर सर्व विद्यांची साम्राज्ञी. ती प्राकृतांना उपलब्ध करून देण्यात समाजाची आणि लेखकांचीही कृतार्थता सामावलेली होती. मुकुंदराजांनी ते धाडस केले आणि 'विवेकसिंधू'च्या रूपाने ही ज्ञानगंगा मराठी धरतीवर अवतीर्ण झाली. मराठीच्या नगरीत येथून पुढे ब्रह्मविद्येचा सुकाळ झाला. परंपरेच्या रक्षकांना तो एक 'राहुकाल' वाटला असणार हे निश्चित.

तसे नसते तर मुकुंदराजांना मराठी रचनेचे समर्थन करण्याचे कारण नव्हते, ज्ञानेश्वरांना अमृताशी 'पैज' लावण्याची गरज नव्हती, विनयशील एकनाथांना 'प्राकृत काय चोरापासून झाली?' असा कठोर सवाल करण्याची आवश्यकता नव्हती. अध्यात्मविद्येच्या योगाने मराठी भाषा पावन झाली की मराठी भाषेमुळे अध्यात्म अधिक 'चोख' झाले हा प्रश्न सोडून दिला तरी मराठी भाषेच्या पात्रातून वाहणाऱ्या अध्यात्मविद्येने मराठी साहित्य पुष्ट आणि समृद्ध झाले एवढे मात्र खरे.

पारंपरिकतेला प्रदक्षिणा घालून अवतीर्ण झालेल्या मराठी मापेतील साहित्य-प्रवाहाने मूळ धर्मसंस्थेचा अनादर मात्र केला नाही. जड आणि अर्थशून्य बंधनांचा विच्छेद करून धर्माचा आत्मा मुक्त करण्याचे कार्य या साहित्यप्रवाहाने साधले. धर्म-संस्थेचे बंधन झुगारून देणे हा या प्राकृत साहित्याचा हेतू नव्हता. बहुजन समाजाला धर्माचा मार्ग सुलभ व्हावा या उद्देशाने ही साहित्यनिर्मिती झाली होती. मराठी साहित्याची वाढ पुढच्या काळात जन-जीवनाशी संवादी राहिली, त्याचे कारण समाजधारणेच्या मूलभूत तत्त्वांकडे प्राचीन मराठी साहित्याने लक्ष पुरविले होते हे देता येईल.

प्राचीन साहित्य धर्मपर असल्याने त्याने फार तर धर्म जागविला असे म्हणता येईल, समाजजीवनाशी त्याचा संबंध जोडण्याचे कारण नाही अशी शंका या ठिकाणी उपस्थित होण्याचा संभव आहे. आजच्या युगात झालेला धर्मकल्पनेचा संकोच दूर सारून धर्म या संज्ञेचा व्यापक अर्थ लक्षात घेतला तर प्राचीन मराठी साहित्य धर्मपर आहे तसेच ते सामाजिक जीवनाशी संबंधित आहे असे निःसंकोचपणे म्हणता येईल. समाजाच्या वाटचालीच्या पार्श्वभूमीवर या साहित्याचा अभ्यास केला असता या साहित्याने स्वीकारलेल्या व्यापक भूमिकेचा प्रत्यय येईल. केवळ पारंपरिक आणि अनुकरणजन्य साहित्य प्राचीन मराठी वाङ्मयात आढळत नाही असे नाही. सामान्य बुद्धिमत्तेचे लेखक अशा प्रकारची निर्मिती सर्वच काळात आणि सर्व भाषांतील साहित्यात करीत असतात. ती प्रसंगी उदंड असतेही. तशी ती प्राचीन मराठी वाङ्मयातही आढळेल. तथापि, मराठी साहित्यात सर्वकालात एकच प्रवाह टिकून राहिला आहे असे दिसून येत नाही. जुन्या प्रवाहांना नवे वळण मिळत गेले आहे तर नवे प्रवाह जुन्यांचा तोंडवळा घेऊन वावरू लागले आहेत असेही दृश्य आढळते. रात्रीत दिवस विरावा किंवा रात्रीने दिवसाला जन्म द्यावा असा चक्रनेमिक्रम साहित्यात आढळतो. या क्रमात अनेक तरंग प्राचीन मराठी साहित्यावर आले, उसळले, ओसरले आणि पांगलेदेखील. प्रश्न असा उद्भवतो की, हे तरंग आणि वळणे विशिष्ट रूप घेऊन विशिष्ट काळातच का यावीत ? आली आहेत हे दिसते. का आली याचे उत्तर वाङ्मये-तिहासात सापडत नाही ते शोधावे लागते, समाजेतिहासात. समाजाच्या कालसापेक्ष गरजांनी साहित्याला प्रेरणा दिली आहे, घाट दिला आहे आणि आकारही आणला आहे. या ऋणानुबंधांचा अर्थ लागतो तो साहित्य आणि समाजजीवन यांच्या परस्पर-पूरक अभ्यासाने.

प्राचीन मराठी गद्याच्या विकासात आढळून येणाऱ्या या प्रेरणांचा व त्यांच्या मुळाशी असलेल्या कार्यकारणसंबंधांचा शोध पुढील प्रकरणांतून घ्यावयाचा आहे.

१०. अशा प्रकारचा शोध साहित्याच्या मूल्यमापनाच्या दृष्टीने आवश्यक ठरतो अथवा नाही हा प्रश्न विवाद्य होऊ शकतो. परंतु, साहित्याचे बदलत्या काळा-तील स्वरूप आणि साहित्यकृतीचे आकृतिबंध यांची मीमांसा या ऋणानुबंधांच्या

आधाराने करता यावी, या दिशेने केलेला हा प्रथम प्रयत्न आहे हे नमूद करताना कोणत्याही प्रकारची आत्मप्रौढी प्रकट करावयाची हा हेतू नसून या प्रयत्नांना असलेल्या मर्यादा लक्षात याव्यात या हेतूने हा उल्लेख केला आहे. साहित्यातील घडामोडींचा आढावा घेताना कित्येक समालोचकांनी तत्कालीन परिस्थितीचा 'पट' मांडला आहे, नाही असे नाही. परंतु, या परिस्थितीचा तत्कालीन साहित्याशी, विशेषतः साहित्यातील अंतःप्रवाहांशी असलेला अनुबंध विशद करण्याचे प्रयत्न मात्र झाले नाहीत. त्यामुळे एखाद्या 'राजकीय' कादंबरीत अधूनमधून 'राजकारणविषयक' बातम्या याव्यात तसा तत्कालीन परिस्थितीचा संदर्भ अशा लेखनातून येत असतो.

प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात फार मोठी उणीव जाणवते ती संकलित दृष्टिकोनातून केलेल्या अभ्यासाची. गद्य आणि पद्य, महानुभाव आणि वारकरी, संत आणि पंत, शाहीर आणि बखरकार अशा प्रकारचे उभे-आडवे वर्गीकरण त्या त्या वर्गातील साहित्याचा आढावा घेण्यात येत असते. त्यामुळे एखाद्या काळातील समग्र साहित्य कोणत्या प्रकारचे होते याचा फारसा बोध होत नाही. एखाद्या काळातील गुणधर्म लक्षात घ्यावयाचे मनात आणले तरी वरील प्रकारचे वर्गवाद व भेदवाद आड येतात.

साहित्याचे संशोधन साहित्यनिर्मितीच्या कालक्रमानुसार कधीच होत नसते. संशोधकांच्या हाती साधने जसजशी लागतात तसतशी ती संशोधनपूर्वक प्रकाशात येतात. महानुभाव पंथाचे साहित्य यादवकाळाइतके पुरातन असूनही या साहित्याचे संशोधन गेल्या ६०–७० वर्षांतले आहे. तत्पूर्वी या साहित्याचे अस्तित्व देखील महानुभावेतरांच्या गावी नव्हते, जैनपंथाच्या मराठी साहित्यासंबंधी पुढे-मागे असेच काही तरी घडण्याची शक्यता दृष्टीआड करता येत नाही. प्रकाशात आलेल्या साहित्याचे वर्गीकरण आणि समालोचन साहित्याचे काल व साहित्यातील प्रवृत्ती यांच्या अनुसंधानाने अभ्यासक करीत असतात. असे समालोचन केवळ एकदा करून भागत नाही. दर पावशतकाने झालेल्या अभ्यासाचा पुनर्विचार आवश्यक ठरतो. कारण, दरम्यानच्या काळात प्रकाशात आलेल्या संशोधनाने अगोदरचे निष्कर्ष परिणामित होत असतात. नव्या संशोधनाचा केवळ उल्लेख अशा आढाव्यात अपर्याप्त ठरतो. काही नव्या प्रवाहांचे मूळ अशा संशोधनात असू शकते तेही विचारात घेतले पाहिजे. कारण, साहित्यातील कोणताही प्रवाह केवळ योगायोगाने उदयास येत नसतो. सभोवतालच्या परिस्थितीत त्याची कारणे असण्याशी शक्यता असते. गारुडयाच्या खेळात आंब्याच्या कोईतून पाहता पाहता आम्रवृक्ष दिसू लागतो तसा चमत्कार साहित्याच्या क्षेत्रात कधीच घडत नसतो.

११. साहित्यात नव्याने उदय पावणाऱ्या प्रवाहांचे मूळ कोणत्यातरी भूतकालीन इतिहासात वा परंपरेत असते. वर्तमानकालीन एखादी असाधारण घटनादेखील त्याच्या उद्भवास कारणीभूत ठरू शकते. विशिष्ट सामाजिक व वैचारिक अनुकूलता लाभताच

बीजभूत प्रवृत्तींचा विकास झपाट्याने होत असतो. अशा आंदोलनांचा भर ओसरला की त्यातून उद्भवलेला प्रवाहदेखील क्षीण होत जातो व कालांतराने त्याचा लयही होतो. वखरसाहित्याचा उदयास्त या दृष्टीने उद्बोधक ठरतो. महाराष्ट्रावरील यवनांच्या आक्रमणानंतर विशिष्ट विचारधारेस वाट देणारे हे साहित्य शिवकालानंतर वरेच फोफावले. स्वराज्याची भावना मंदावत चालल्यानंतर मात्र क्षीणतेज होत होत ते लोप पावले.

वाङ्मय-निर्मितीच्या मुळाशी असलेली प्रेरणा व निर्मितीतून निर्माण झालेली परंपरा यांचा शोध समग्र प्राचीन मराठी साहित्याच्या संदर्भात घेता येण्यासारखा आहे. अशा अभ्यासातून मराठी साहित्य आणि समाज यांचे एक आगळेवेगळे दर्शन घडण्याची शक्यता आहे. हे कार्य वरेच व्यापक असल्याने या विवेचनात केवळ गद्य साहित्याचाच परामर्श घेतला आहे. आवश्यक त्या स्थळी पद्यसाहित्याचे संदर्भही दिले आहेत. प्राचीन गद्य आजवर उपेक्षित राहिले हे या क्षेत्रमर्यादेचे एक कारण. शिवाय मराठी मनाच्या व महाराष्ट्रातील समाजजीवनाच्या वाटचालीशी गद्याचा संबंध अधिक जिव्हाळ्याचा आहे हेही या क्षेत्रमर्यादेच्या निश्चितीस कारणीभूत ठरले आहे. सुमारे आठ शतकांच्या कालावधीत मराठी मानस आणि महाराष्ट्रातील जनजीवन यांत घडलेल्या स्थित्यंतरांचे साक्षीदार प्राचीन मराठी गद्याने मागे ठेवलेले असल्याने हा अभ्यास उपयुक्त ठरावा.

१२. मराठी गद्याचा प्रारंभ झाला शिलालेख-ताम्रपटांनी. हे कोरीव लेख समाजजीवनाच्या केवळ एकाच अंगाचे निदर्शक आहेत. धार्मिक भावनेने दिलेली दान-पत्रे, पंडितांच्या योगक्षेमासाठी देण्यात आलेले ताम्रपट, विजयाचे स्मारक स्तंभ अथवा धारातीर्थी पडलेल्या वीरांच्या स्मृतिशीला अशा या दगडा-तांब्यावरील रेषा समाजाचे समग्र जीवनदर्शन घडविण्यास असमर्थ ठरतात. सांस्कृतिक चिन्हे आणि भाषेचे विश्वसनीय स्वरूप यांच्या दृष्टीने शिलालेख-ताम्रपटांचे महत्त्व वादातीत आहे. साहित्य-निर्मितीच्या प्रेरणांशी या साधनांचा संबंध येत नसल्याने त्यांचा विचार या विवेचनातून वगळण्यात आला आहे.

गद्यसाहित्याच्या उगमस्थानावर उभे राहून त्याच्या विस्ताराचे अवलोकन करीत असताना 'इवलेसें रोप लाविलें द्वारी' या संतवचनाचे स्मरण होते. शके ९६१ मधील 'ज्योतिषरत्नमालेवरील' श्रीपतिभट्टाची मराठी टीका ही मराठी साहित्याची गंगोत्री. संस्कृत साहित्याच्या गिरिवरातून ही गंगोत्री खवली आणि अनेक वळणे वाकणे घेत घेत हा सूक्ष्मप्रवाह आठ-नऊ शतकांत विशाल पात्र असलेल्या महानदीत विस्तार पावला. मुहूर्त हा स्वतंत्र स्कंध प्रस्थापित करणारी 'ज्योतिषरत्नमाला' पंडिताप्रमाणेच अपंडितांच्याही जीवनात महत्त्वाची होती. म्हणून आपल्या अन्य संस्कृत ग्रंथांवर मराठी टीका न रचता श्रीपतिभट्टाने 'ज्योतिषरत्नमालेची 'च निवड मराठी टीकेसाठी केलेली दिसते. सामान्यांच्या जीवनपद्धतीतही त्या वेळी मुहूर्तास महत्त्वाचे स्थान होते.

सामान्यांना दैनंदिन जीवनात उपयुक्त ठरणारे शास्त्र त्यांच्या भाषेतून समजून घेता यावे ही या मराठी टीकेच्या निर्मितीमागील प्रेरणा स्पष्ट दिसते. पुढे आयुर्वेद, संगीत, अध्यात्म इत्यादी क्षेत्रांतील शास्त्रेदेखील कधी मराठी टीकेच्या स्वरूपात तर कधी संकलनात्मक स्वतंत्र ग्रंथांच्या रूपात मराठी भाषेतून होऊ लागली. या प्रवृत्तीची पायाभरणी करणाऱ्या श्रीपतिभट्टाचे कार्य म्हणूनच असाधारण ठरते. कालांतराने अध्यात्मशास्त्राचे विवेचन करणारे ग्रंथही मराठी गद्य-पद्याच्या रूपात निर्माण झाले. संस्कृत भाषेचा व्यासंग गाढा असूनही मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथादी संतांनी मराठी भाषेतून केलेली साहित्यनिर्मिती सामान्यांना प्रज्ञावंत करण्याच्या हेतूने झाली. अशा रीतीने शकाच्या दहाव्या शतकापासून गद्य-पद्य साहित्याची वाढ होत गेली.

श्रीपतिभट्टांच्या मराठी टीकेतील भाषेला संस्कृत भाषेतील टीकाभाष्याचे वळण आहे. मूळ श्लोकांचे अर्थ कधी पदशः देऊन तर कधी कथेप्रमाणे सारांश देऊन त्याने स्पष्ट केले आहेत. मौखिक परंपरेने चालत आलेल्या लोककथांतील निवेदनशैलीचा उपयोगही श्रीपतिभट्टाने आपल्या मराठी टीकेत केला आहे. ही कथात्मक निवेदनपद्धती पुढे विस्तार पावलेल्या एका प्रवाहाच्या मूलस्थानी असल्याचे प्रत्ययास येते. याच लोक-कथांतील निवेदनशैलीचे अस्तित्व 'लीळाचरित्रादी' महानुभाव पंथाच्या चरित्र-ग्रथांतून आढळून येते.

१३. काळावरोबर समाजाच्या आवडी-निवडी बदलतात तशाच त्याच्या गरजा-देखील. महाराष्ट्रातील यावनी आक्रमणाने एकीकडे धर्मपर विद्येचा व्यासंग खंडित झाला तर दुसरीकडे शासकांचे वाढते राजकीय आणि धार्मिक आक्रमण थोपविण्याची आवश्यकता निर्माण झाली. साधुसंत आणि पंथोपपंथ आपल्या परीने परिस्थितीशी झुंजत होतेच. त्यांच्या प्रयत्नांस पूरक असे कार्य पंडितांनी केले. ते कार्य म्हणजे पुराणोक्त धर्माचा प्रसार. तशी पुराणश्रवणाची परंपरा जुनीच. कालपरिस्थितीमुळे तत्कालीन पुराणिकांकडून पुराणोक्त धर्माचा प्रसार विशेष आस्थेने होणे क्रमप्राप्त होते. याच पुराणोक्त धर्मांच्या धाटणीतून पुढे बखरसाहित्य आकारास आले. पौराणिक कथांस कालसापेक्ष उजाळा देण्याचे कार्य या कथाप्रधान साहित्याने केले. हा साहित्य-प्रकार महाराष्ट्रावरील यावनी आक्रमणांची धामधूम स्थिरावल्यानंतर अस्तित्वात आला हे लक्षात ठेवण्याजोगे आहे. शके १३७० च्या सुमारास या साहित्यप्रकारास प्रारंभ झालेला दिसतो.

पौराणिक स्वरूपाची राजांची वंशावळ आणि शकावली महाराष्ट्रात पुरातन काळापासून होती. ती बखरींपेक्षाही पुरातन आहे असे इतिहासाचार्य राजवाडे यांचे मत आहे :

> " काशीस पराडकर यांच्या येथें एक वाडवजा वही सापडली. तीत भविष्योत्तर पुराण म्हणजे भविष्यकालीन राजांची यादी दिली आहे.

यांपैकी एक कथा बरीच ऐतिहासिक आहे. ही कथा उर्फ टिपण यादवं राजांच्या राज्यभ्रंशासंबंधी असून ते येणेंप्रमाणें :
' इतुकियांत तुरकान आलें तं सकु १६, फाल्गुन मास सुध पक्ष अष्टमी शनिवार रामदेरायाचें राज्य गेलें पाहिलें घटिका ४ '
आतापर्यंत मराठ्यांच्या इतिहासासंबंधाने जी टिपणें व कागदपत्र मला सापडले त्या सर्वांत हे टिपण अत्यंत प्राचीन होय. "[४]

या शकावल्या एकीकडे पुराणांतील वंशावळींशी आपले नाते जोडतात तर दुसरीकडे बखरसाहित्याशी असलेला त्यांचा सोयरसंबंध सूचित होतो. अशा शकावल्यांच्या पाठीशी निश्चित परंपरा असली पाहिजे. त्यांची गणना केवळ भाकडकथा अथवा निरर्थक नोंदी यात करण्याचे कारण नाही. इतिहाससंशोधकांनी शकावल्यांचे महत्त्व आणि प्रामाण्य या दोहोंसही मान्यता दिली आहे.[५] अशा शकावल्या केवळ एका पिढीत पूर्ण होणे शक्य नसते. प्रत्येक पिढी पूर्वीच्या नोंदीस अनुलक्षून स्वतःच्या काळातील नोंदींची भर घालीत असावी. अशा रीतीने नोंदी अद्ययावत होत असाव्यात. अशाच प्रकारची एक शकावली हैदराबाद येथील दफ्तरखान्यात आढळली. ती अत्यंत महत्त्वाची असली तरी अद्याप अप्रकाशित आहे. विशेष आश्चर्य म्हणजे ही शकावली ' मराठे राजियांची ' असून निजामाच्या मुलखातील किमान तीन पिढ्यांनी तिचे लेखन केलेले दिसते. या शकावलीस शिवराज्याभिषेकापासून प्रारंभ झाला असून शेवटचा ' प्रधान ' अल्लिपस्टन साहेब याच्या राजवटीवर ती संपते.

१४३ वर्षांची नोंद घेणाऱ्या या शकावलीचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे मराठी छत्रपती आणि त्यांचे प्रधान यांच्याबरोबरीने दक्षिणेत निजाम व उत्तरेत मोगल आणि कलकत्ता येथील ' कंपनी बहादूर ' यांच्या नोंदीही आल्या आहेत. वर्षगणना शालिवाहन शक, विक्रमसंवत्, शिवराज्याभिषेक शक, अरबी-फारसी सन फसली आणि इसवी सन या कालगणनांतून अचूक दिली आहे. पहिला भाग शिवराज्याभिषेकानंतरच्या १०४ वर्षांचा आहे. या भागाचे लेखन शके १७०० मध्ये पूर्ण झाल्याची नोंद आहे. नंतरच्या ३९ वर्षांच्या नोंदीचा दुसरा भाग असून त्याचे लेखन शके १७३० साली झाल्याची नोंद आहे. अंतिम प्रतलेखन शके १७७४ त (फेब्रुवारी २१, इ.स. १८५२) झालेले आहे. शकावलीत आलेले तिथी, वार, संवत्सर यांचे उल्लेख पिल्ले जंत्रीप्रमाणे बरोबर जुळतात.

छत्रपती शिवाजी महाराज यांची जन्मतिथी आणि राज्याभिषेकाचा दिवस यांच्यासंबंधी निर्णायक माहिती या शकावलीत आहे हे विशेष. या नोंदीप्रमाणे शिवछत्रपतींची जन्मतिथी वैशाख शुद्ध ७, गुरुवार शके १५४९ असून महाराजांना राज्याभिषेक झाला तो चैत्र शुद्ध १ शके १५९६ (मार्च २८, इ. स. १६७४)[६]

शकावल्यांसंबंधीचा हा विस्तार हेतूपूर्वक केला आहे. या शकावल्यांच्या लेखनाच्या मुळाशी असलेली प्रेरणाच मराठी साहित्यातील एका वैभवशाली आकृतिबंधाच्या निर्मितीस कारणीभूत ठरली आहे. मराठी बखरसाहित्य हे शकावल्यांच्या परंपरेचे अपत्य आहे. पुराणांतील 'वंशानुचरितांचे' पाठबळ या साहित्यास असून पुराणवाङ्मयाचे अन्य विशेषही या आकृतिबंधात आढळतात. 'प्राचीन गद्याची पौराणिक परंपरा' या प्रकरणात यासंबंधीचे सविस्तर विवेचन आले आहे.

१४. संकलितदृष्ट्या विचार केला असता प्राचीन मराठी गद्याचा इतिहास त्रिविध प्रेरणांनी घडविला आहे असे दिसून येईल :

१. जनसामान्यांत ज्ञानाचा प्रसार व्हावा या हेतूने संस्कृत साहित्याच्या आधाराने –टीका-भाष्यात्मक अथवा संकलन स्वरूपाचे– निर्माण झालेले साहित्य हीच मराठी गद्याची पंडिती परंपरा.

२. लोककथात्मक साहित्याचा आधार घेऊन धर्म प्रसाराच्या प्रेरणेने निर्माण झालेले कथाप्रधान साहित्य, आणि

३. धर्मरक्षणाच्या प्रेरणेतून पुराणोक्त धर्माचा प्रसार करणारे विशिष्ट आकृतिबंध असलेले साहित्य. मराठी गद्याची ही पौराणिक परंपरा.

गद्याच्या क्षेत्रात एकाच काळी एकच प्रेरणा कार्यरत होती असे समजण्याचे कारण नाही. भिन्न प्रवृत्ती आणि प्रवाह वेगवेगळ्या काळात उदयास आले हे खरे असले तरी पहिल्याचा लोप आणि दुसऱ्याचा उदय असा प्रकार मुळीच घडला नाही. काल–परिस्थितीच्या मानाने त्रिविध प्रेरणा उदय पावल्या व साहित्यनिर्मितीस प्रेरक ठरल्या. प्राचीन गद्याच्या शेवटच्या कालखंडात तर या तिन्ही प्रेरणांतून निर्माण झालेले साहित्य प्रचलित होते. आपापल्या प्रकृतिधर्मप्रमाणे आणि ध्येयवादास अनुसरून त्या काळातील लेखकांनी साहित्य-निर्मिती केली आहे. प्रेरणांच्या त्रिविधतेमुळे साहित्याच्या सातत्यात विक्षेप निर्माण झाला नाही.

महाराष्ट्रात ब्रिटिश राजवट रुढ होऊन सामाजिक मूल्यांत स्थित्यंतर घडेपर्यंत गद्यसाहित्याला समृद्ध करणाऱ्या या तिन्ही प्रवाहांचे विवरण पुढील प्रकरणांतून करण्यात आले आहे.

□

टीपा

१. महाराष्ट्र साहित्य परिषदेने प्रसिद्ध केलेल्या वाङ्मयेतिहासाचे खंड या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीनंतर प्रकाशित झाले आहेत. डॉ. अ. ना. देशपांडे यांनी लिहिलेल्या प्राचीन वाङ्मयाचे खंडही नंतर प्रसिद्ध झाले आहेत. अलिकडे

प्रसिद्ध झालेल्या मराठी वाङ्मयाच्या इतिहासातून वाङ्मयेतिहासविषयक नव्या जाणिवांचे प्रतिबिंब उमटलेले आढळते. 'वाङ्मयेतिहास कसा लिहावा' या विषयावर चर्चासत्रेही झाली आहेत. त्यावरून या विषयाचे महत्त्व अभ्यासकांच्या निदर्शनास येत आहे, असा निष्कर्ष काढता येतो.

२. महाराष्ट्र साहित्य परिषदेने प्रसिद्ध केलेला मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ भाग १ या ग्रंथात प्रस्तुत लेखकाने इ. स. १३५० ते १६८० या कालखंडातील राजकीय व सांस्कृतिक परिस्थितीचे सविस्तर विवेचन केले आहे. इस्लामी आक्रमणाची प्रतिक्रिया तत्कालीन साहित्य आणि सांस्कृतिक जीवन यांवर कोणत्या प्रकारे घडली यांचे दिग्दर्शनही उपरोक्त लेखात आले आहे.

३. श्रीपतिभट्टाच्या 'ज्योतिषरत्नमाले'च्या कालासंबंधी फारसे मतभद नसले तरी या ग्रंथावरील मराठी टीकेचा काल आणि कर्ता यासंबंधी दोन मते आढळतात. मराठी टीका स्वतः श्रीपतिभट्टाची हे एक आणि ती दुसऱ्या कोणीतरी मागाहून रचली हे दुसरे. पुढील प्रकरणी या मतांची चर्चा करण्यात आली आहे. तूर्त 'ज्योतिषरत्नमाला' हा मराठी भाषेतला पहिला ग्रंथ आहे असे गृहीत धरून चालू.

४. **माई** शके १८३४, पृ. १३५; राजवाडे, **ऐतिहासिक प्रस्तावना**, पृ. २२२.

५. 'शकावल्यांच्या मजकुरावरून असे स्पष्ट दिसून येते की, कोणीही आपल्या कौटुंबिक कागदपत्रावरून अगर माहितीवरून अशा शकावल्या तयार करू शकणार नाही. शकावल्यांतील तपशील सरकारी दप्तरांतून मिळाल्याखेरीज ते तसे एकत्रित आणणे त्या काळी अशक्य होते.' – वेंद्रे वा. सी., **महाराष्ट्रेतिहासाची साधने** : भाग १, पृ. २३.

'शकावल्यांचें मूळ सरकारी दप्तरातील निरनिराळी कुटुंबे आपापल्यापुरत्या म्हणजे तकरीर, करीने करण्यास पुरेशा नोंदी घेतात व त्यात आपल्या कुटुंबाची माहिती घालून या शकावल्या संदर्भार्थ ठेवतात. त्यामुळे साहजिकच हा अव्वल दर्जाचा पुरावा असल्याची खात्री पटते.' – वेंद्रे वा. सी., **शिवाजी महाराज यांचे चिकित्सक चरित्र**, पूर्वार्ध पृ. २०.

६. हैदराबाद येथील दफ्तरखान्यात क्र. ९०, ३८१, १२९६, ११६०, १५६ या बाडांतून ही शकावली आली आहे. या शकावलीच्या शेवटी १४३ वर्षांतील राजवटींचा ताळेबंद आला आहे. त्यात प्रत्येक छत्रपतीचा शासनकाळ, प्रधानाची कारकीर्द व मोगल, निजाम आणि 'कंपनी बहादूर' यांच्याही कार्यकाळाचा उल्लेख आहे.

□

२. मराठी गद्याची पंडिती परंपरा

१. शिलालेख आणि लोकवाङ्मय २. मराठी साहित्याचा प्रारंभ ३. गद्यसाहित्याचे सातत्य ४. पहिला गद्यग्रंथ : 'ज्योतिषरत्नमाला' ५. या ग्रंथाचे स्वरूप ६. ज्योतिषरत्नमालेची प्रेरणा ७ उत्तरकालीन ग्रंथांवर झालेला परिणाम ८. मराठी गद्याची पंडिती परंपरा ९. गद्यसाहित्यास आलेला बहर १०. महानुभावीय गद्यसाहित्य ११. बोधभाषा नि ग्रंथभाषा १२. वैद्यक ग्रंथ १३ 'रसरत्नदीपा 'त आलेल्या वंशावळी १४. महानुभाव पंथाचे श्रुति-स्मृति वाङ्मय १५. श्रीचक्रधरसूत्रे आणि दृष्टांतपाठ १६. 'प्रतिलोम' टीकापद्धती १७. अर्थनिर्णयाचे महानुभावीय शास्त्र १८. चौपद्यांवरील भाष्य १९. जैन पंथाची मराठी परंपरा २०. मराठी गद्याचे सुवर्णयुग (शके १५०० ते १७४०) २१. धर्मरक्षणाची प्रेरणा २२. 'क्रिस्तपुराण' २३. तेलुगू ग्रंथाचा मराठी अवतार २४. वेदांतपर स्वतंत्र ग्रंथ २५. वैद्यक व इतर शास्त्रांवरील ग्रंथ २६. संगीत शास्त्रावरील पहिला ग्रंथ २७. महाराष्ट्राची ग्रंथपरंपरा २८. नृत्याचे शास्त्रोक्त विवरण २९. टीप ग्रंथ ३०. अन्य टीका ग्रंथ ३१. पंडिती परंपरेतील भाषेचे वैशिष्ट्य ३२. अव्वल इंग्रजी आमदानीतील भाषा ३३. मराठी गद्याच्या प्रेरणा ३४. ग्रांथिक भाषेचे शुद्ध स्वरूप ३५. समारोप

१. मराठी भाषा आणि मराठी गद्य यांचा प्रारंभ एकाच काळात झाला असे गृहीत धरणे अनैतिहासिक ठरण्याचे कारण नाही. परंतु या दोहोंचा काळ मात्र निश्चित करता येत नाही. साहित्याची प्रतिष्ठा प्राप्त होण्यापूर्वी मराठी भाषा बोलीच्या रूपात

वावरत होती. त्याचप्रमाणे लिखित साहित्य अस्तित्वात येण्यापूर्वी मौखिक परंपरेने चालत आलेले लोकवाङ्मय प्रचलित होते. आज मुद्रित स्वरूपात उपलब्ध असलेले लोकसाहित्याचे संग्रह कोणत्या एका कालखंडाची निर्मिती आहे असे सांगता येत नाही. प्रत्येक पिढीने आपापल्या काळातील भाषेचा संस्कार या साहित्यावर केला आहे, तशीच प्रत्येक पिढीची भरही त्यात पडली आहे. अशा साहित्याचा कालनिर्णय करणे आणि पाण्यावर महाल बांधणे सारखेच फलप्रद ठरणारे आहे.

शिलालेख आणि ताम्रपट मात्र भाषेच्या कालनिर्णयास आवश्यक असलेले साधन पुरवू शकतात. संशोधकांनी निश्चित केलेला प्राचीनतम लेख शके ९३४ च्या पूर्वीचा आहे. अर्थात् हाच मराठी भाषेचा प्रारंभकाल मानणे चुकीचे ठरेल. संस्कृत व प्राकृत शिलालेखांची पाहणी करता असे निदर्शनास येते की, शके ९३४ च्या संस्कृत व प्राकृत शिलालेखांतून मराठी वळणाचे शब्द आणि वाक्ये डोकावतात. ख्रिस्तपूर्व ३०० ते इ. स. १३०० या सोळाशे वर्षांतील दक्षिणेतील शिलालेखांचे अध्ययन केल्यानंतर श्री. नाईक यांनी मराठी भाषेच्या संदर्भात पुढील निष्कर्ष काढला आहे :

> "बदामी चालुक्यांच्या काळात प्रचलित असलेली मराठी बोली त्या वेळच्या 'अधिकृत' लेखांतून प्रवेश मिळविण्यासाठी धडपडत होती."[१]

बदामी चालुक्यांचा काळ इ. स. ५०० ते ७०० असा मानण्यात येतो. त्यावरून शके ९३४ च्या पहिल्या लेखापूर्वी किमान चार शतके तरी मराठी भाषा बोलीच्या रूपात नांदत होती असे निष्पन्न होते. साहजिकच मराठी भाषेचे आणि मराठी लोक-साहित्याच्या परंपरेचे अस्तित्व ६ व्या शतकाइतके पुरातन ठरते. मराठी भाषेतले लिखित वाङ्मय यानंतरच्या काळात अस्तित्वात आले हे उघड आहे.

२. मराठी वाङ्मयाची परंपरा लिखित साहित्याच्या उपलब्धीपासूनच गृहीत धरली पाहिजे आजवरच्या संशोधनाच्या आधाराने 'ज्योतिषरत्नमाला' या संस्कृत ग्रंथावरील मराठी टीका हा मराठी साहित्याचा प्रारंभ ठरतो. मूळ संस्कृत ग्रंथाचा कवी श्रीपतिभट्ट हा असून त्याने शके ९६१ च्या सुमारास अनेक ज्योतिषविषयक ग्रंथ रचले आहेत. 'ज्योतिषरत्नमाला' हा ग्रंथ या सुमाराचा असून मराठी टीका स्वतः ग्रंथकाराने लिहिलेली असल्याने शके ९६१ हा या टीकाग्रंथाचा काळ मानता येतो. 'ज्योतिषरत्नमाला' या ग्रंथावरील मराठी टीकेने मराठी वाङ्मयास (लिखित स्वरूपातल्या) प्रारंभ झाला असून मराठी भाषेतला पहिला गद्यग्रंथदेखील तोच ठरतो.

ज्योतिषरत्नमालेवरील टीकाग्रंथानंतर मात्र दीर्घकाळपर्यंत साहित्यनिर्मिती झाल्याचे पुरावे आढळत नाहीत. नंतरच्या काळात साहित्यनिर्मिती खंडित झाली असावी अथवा निर्माण झालेले साहित्य आजच्या काळापर्यंत सुरक्षित राहिले नसावे अशी या अभावाची दोन कारणे संभवतात. दुसराच प्रकार अधिक संभवनीय वाटतो. तेराव्या

शतकात रचण्यात आलेल्या व आज उपलब्ध असलेल्या गद्य-पद्य साहित्याचे प्रौढ स्वरूप लक्षात घेता मध्यंतरीच्या काळात साहित्य-निर्मितीत खंड पडला होता असे वाटत नाही. तेराव्या शतकात निर्माण झालेले जे साहित्य आज उपलब्ध आहे ते एक तर महानुभाव पंथातील लेखकांचे आहे अथवा वारकरी संतांचे. त्यावरून दुसराही विचार स्पर्श करून जातो, हे साहित्य विशिष्ट संप्रदायचे असल्याने संप्रदायाच्याद्वारे त्याचे संरक्षण झाले असावे. कोणत्याही संप्रदायाचे पाठबळ नसलेले साहित्य मात्र आजच्या युगापर्यंत सुरक्षित राहिले नाही. 'ज्योतिषरत्नमाले'नंतरच्या काळातील साहित्याच्या अभावाचे हे एक कारण संभवते. भावी काळात या काळातील साहित्याची उपलब्धी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३. महानुभाव आणि वारकरी या दोन पथांनी केलेल्या साहित्यनिर्मितीत वारकरी पंथाचे साहित्य पद्यप्रधान असून महानुभाव पंथात मात्र पद्यग्रंथांप्रमाणेच गद्यसाहित्याचीही निर्मिती झाली आहे. लीळाचरित्र हा कथाप्रधान ग्रंथ, सूत्रग्रंथ, या सूत्रांवरील व अन्य ग्रंथांवरील भाष्ये आणि टीकाग्रंथ अशा वेगवेगळ्या प्रकारात बसणारे साहित्य महानुभाव पंथाच्या अनुयायांनी निर्माण केले आहे. गद्यग्रंथांच्या तुलनेने पद्यवाङ्मयाचे प्रमाण अधिक आहे. गद्यग्रंथांचा साकल्याने विचार केला असता या ग्रंथांच्या काळात महानुभाव पंथाबाहेरदेखील गद्यसाहित्याची निर्मिती झाली असावी असे अनुमान करता येते. कोणत्या ना कोणत्या प्रकारचे गद्यसाहित्य मुळातच प्रचलित नसते तर या पंथातील ग्रंथकारांना गद्यातून लेखन करण्याची आवश्यकता भासली नसती.

हा पंथ समाजापासून अलिप्त असल्याने रूढ परंपरेशी त्यांना कर्तव्य नव्हते असा युक्तिवाद करता येण्यासारखा आहे. परंतु, महानुभावपंथीय आणि त्यांचे साहित्य एकंदरीत समाजापासून अलिप्त राहिल्याचा काळ प्रमाणतः अर्वाचीन आहे. त्यामुळे या पंथाचा व त्याच्या साहित्याचा समकालीन समाज आणि साहित्य यांच्याशी संबंध आला नाही असे मानणे ऐतिहासिकदृष्ट्या योग्य ठरणार नाही. महानुभावीय साहित्यातील प्रवृत्ती समकालीन साहित्यप्रवाहांतून उदयास आलेल्या आहेत असे गृहीत धरणेच श्रेयस्कर ठरेल. पंथाचे पाठबळ असल्याने महानुभाव-साहित्य तेवढे आजच्या काळास उपलब्ध झाले. अशा पाठबळाच्या अभावी अन्य साहित्य कालौघात नष्ट झाले असावे अथवा कुठे तरी कडीकपारीत, कोन्या-कोपऱ्यात संशोधनाची प्रतीक्षा करीत असावे.

जे थोडेफार साहित्य उपलब्ध आहे त्याच्या आधाराने दहाव्या शतकापासून ते एकोणिसाव्या शतकापर्यंत मराठी गद्याला परंपरा होती, असे मानता येते. या आठनऊ शतकांच्या कालावधीत मराठी गद्यात कालपरत्वे, संप्रदायभेदाने व व्यक्तिप्रकृतींच्या अनुसंधानाने विविध प्रवाह निर्माण झाले आहेत. नवनवीन प्रेरणांच्या योगाने या प्रवाहांना वळण मिळाले आहे. त्यांतून काही परंपराही निर्माण झाल्या आहेत.

अशा प्रेरणा आणि परंपरा यांचा परामर्श पुढील प्रकरणांतून घ्यावयाचा आहे.

आपल्या संग्रहातील गद्यग्रंथांची माहिती देताना इतिहासाचार्य राजवाडे यांनी एकूण ग्रंथसामग्रीचे विषयवार वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले आहे :

१. वैद्यक, २. वेदांत, ३. भारतादि इतिहास, ४. गणित-ज्योतिष, ५. फल-ज्योतिष, ६. धर्मशास्त्र, ७. बखरी साहित्य, ८. हिशेब-वारावर्दी, ९. भूगोल, १०. राजकीय व खाजगीपत्रे, ११. ताम्रपट व शिलालेख आणि १२. यात्रा व प्रवास.

या सामग्रीच्या काळासंबंधी इतिहासाचार्य राजवाडे यांनी पुढील विधान केले आहे :

"पैकीं मराठी गद्य व पद्य या लेखांपैकी सर्वांत प्राचीन म्हटले म्हणजे मराठी गद्य लेखच होत. **शके ५०० पासून मराठी गद्य लेख सापडतात. मराठी पद्य शक शतक ११०० पासून सापडते.**"[२]

दुर्दैवाने ही सर्व साधने कै. राजवाडे यांना प्रकाशित करता आली नाहीत. ही सामग्री प्रसिद्ध झाली असती तर पद्याचा प्रारंभ काळ फारसा मागे गेला नसता. पण, गद्य साहित्याचे परातनत्व आणि मातत्य मात्र प्रस्थापित झाले असते. आज प्रकाशात आलेल्या साहित्यात शके ५०० ते शके ९६१ या कालाखंडातील एकही साधन नाही. त्याचप्रमाणे ९६१ नंतर तेराव्या शतकापर्यंतच्या गद्यसाहित्याची नोंदही आढळत नाही. नाही म्हणावयास शके ७०० मधील 'कुवलयमाला' या प्राकृत ग्रंथात मराठी माणूस आणि त्याची भाषा यांच्या स्वरूपविशेषांचे वर्णन आढळते. त्यावरून या काळात व तत्पूर्वी मराठी भाषा अस्तित्वात असल्याची माहिती मिळते.[३] अकराव्या शतकात कोरलेल्या धार शिलालेखातील एका काव्यात सात भाषांतील रचना आली असून दुसऱ्या कडव्यात मराठी भाषिक नायिकेचे वर्णन तिच्या भाषेत आले आहे.[४] महाराष्ट्राबाहेर आढळलेली मराठी भाषेची ही निशाणी या भाषेच्या प्रसाराच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. परप्रांतात आढळणारा आणखी एक पुरावा तेराव्या शतकातला. पालकुरि सोमनाथ या कवीच्या 'पंडिताराध्य-चरित्र' या तेलगू ग्रंथात आलेल्या एका मराठी पदाचा.[५] 'रंभामंजरी' या चौदाव्या शतकातील प्राकृत ग्रंथातही एक मराठी पद असल्याची माहिती मिळते.[६] भिन्न भाषा आणि प्रांतांतील हे आधार मराठी भाषा आठव्या शतकापासून प्रौढ आणि कीर्तिमती झाली असल्याचे सुचवितात. 'त्यामुळे शके ५०० पासून गद्यलेख आढळतात' हे कै. राजवाडे यांचे विधान अगदीच असंभवनीय मानण्याचे कारण नाही.

४. ही संभवनीयता गृहीत धरूनही मराठी गद्यसाहित्याच्या लिखित वाङ्मयाचा प्रारंभकाल प्रत्यक्ष प्रमाणाच्या आधाराने निर्धारित करावा लागतो. हे प्रमाण लाभते 'ज्योतिषरत्नमाले'वरील मराठी टीकेच्या रूपात. हा ग्रंथ मूळ संस्कृत भाषेत रचण्यात

आलेला असून स्वतः ग्रंथकर्त्यानेच आपल्या संस्कृत ग्रंथावर मराठी टीका लिहिली आहे. ग्रंथकर्ता श्रीपतिभट्ट याच्या नावावर 'धिकोटीकरण' आणि 'ध्रुवमानसकरण' हे इतर दोन ग्रंथ असून त्यांचा काळ अनुक्रमे शके ९६१ (इ.स. १०३९) व शके ९७५ (इ. स. १०५३) असा आहे. याच काळात 'ज्योतिषरत्नमालेची' रचना झाली असावी. स्थूलमानाने शके ९६१ हा 'ज्योतिषरत्नमालेचा' काळ गृहीत धरण्यास हरकत नसावी. तदनुसार मराठी गद्यसाहित्याचा आणि लिखित स्वरूपातील मराठी वाङ्मयाचा प्रारंभकाळ शके ९६१ ठरतो.

या ग्रंथाचा शोध प्रथम इतिहासाचार्य राजवाडे यांनी लावला. त्यांच्या हाती आलेला ग्रंथ अपूर्ण असूनही तो त्यांनी आपल्या प्रस्तावनेसह भारत इतिहास संशोधक मंडळाच्या शके १७३६ च्या वार्षिकात प्रसिद्ध केला. संपूर्ण मराठी टीका डॉ. मु. ग. पानसे यांनी इंग्रजी प्रस्तावनेसह प्रसिद्ध केली १९५७ त. अशा रीतीने मराठी भाषेतला हा आद्य ग्रंथ चार दशकांनंतर मराठी वाचकांस उपलब्ध झाला. तरीही ग्रंथ तसा अपूर्णच राहिला. कारण, डॉ. पानसे यांनी मूळ संस्कृत न देताच केवळ मराठी टीका आपल्या संहितेत दिली आहे.

मूळ संस्कृत ग्रंथावरील मराठी टीका 'सोत्पज्ञ' आहे म्हणजे स्वतः ग्रंथकाराने ती रचलेली आहे असा निर्वाळा कै. राजवाडे आणि कै. पानसे यांनी दिला आहे.[७] तथापि हे मत डॉ. वि. भि. कोलते यांना मान्य नाही. त्यांच्या मते मराठी टीका नंतरच्या काळातली आहे. त्यामुळे 'ज्योतिषरत्नमाला' हा मराठी भाषेतला पहिला ग्रंथ ठरत नाही. मराठी टीकेत येणारे 'मी श्रीपतिभट्ट' हे उल्लेख मूळ संस्कृताचा अनुवाद असल्याने टीकेचा कर्ता श्रीपतिभट्ट ठरत नाही, असा डॉ. कोलते यांचा युक्तिवाद आहे.

पानसे संपादित ग्रंथ संस्कृतविरहित असल्याने डॉ. कोलते यांच्या मताची शहानिशा करण्यासाठी राजवाडे यांची मुद्रित प्रत आणि डॉ. पानसे यांनी ज्या हस्तलिखितावरून संहिता सिद्ध केली ते हस्तलिखित यांचा मागोवा घेणे क्रमप्राप्त ठरते. पानसे प्रतीत चार स्थळी– पृ. ५३, ५४, ९९ व १०५–'मी श्रीपतिभट्ट' असा टीकाकाराने स्वतःचा उल्लेख प्रथमपुरुषी केला आहे. ही चार स्थळे मूळ संस्कृत व मराठी टीका यांसह पुढे उद्धृत करण्यात येत आहेत. या उद्धरणांवरून मराठी टीकेचे कर्तृत्व नक्की कोणाकडे जाते याचा उलगडा करता येतो :

१. प्रभवविरतिमध्यज्ञानवन्ध्या नितान्तं
विदित परभ....न्नतं योगिनोऽपि ।
तमहमिह निमित्तं विश्वजन्मात्यनामा
नु शि....वन्दे भग्रहैः कालमीशम् ॥ १ ॥

॥ टीका ॥ तेया ईश्वररूपा कालांना **ग्रंथकर्ता श्रीपति** नमस्कारी ॥ तो ग्रंथ समाप्ति यावेयाकारणें ॥ १ ॥ [**पानसेप्रत** पृ. ५३, मूळ **हस्तलिखित** पान २].

२. ॥ श्लोक ॥ विलोक्य गर्गादिमुनिप्रणीतं वराहमल्लादिकृतं च शास्त्रम्
दैवज्ञकण्ठाभरणार्थमेषा विरच्यते ज्योतिषरत्नमाला ॥ २ ॥
॥ टीका ॥ गर्गादि मुनीश्वरीं केलीं तिये शास्त्रें आणिक वराहमिहरूललादिकीं आचार्यीं तेहीं केलीं तिये समस्तें अवलोकूनि **मग मी श्रीपति** रत्नाची माला रचिते । वोविते । ज्योतिष नांवें रत्नें तयांची माला दैवज्ञ जे ज्योतिषी तयांचेया कंठीं घालावेया कारणें ॥ ६ ॥
[**पानसेप्रत**, पृ. ५४, मूळ **हस्तलिखित** पान ३].

३. ॥ श्लोक ॥ यो वसिष्ठच्यवनादिसूरिभिर्भाषितः खगोचरव्यधः
गोपनीय इह देवविदितां प्रस्फुटं स च मया प्रकाशितम् ॥ २० ॥
॥ टीका ॥ वसिष्ट च्यवन आदिकरुन बोलिले गोचरवेधु ग्रहांचा तो ज्योतिषिचिया योग्यु ॥ **म्यां श्रीपतीनें** येथें स्पष्ट केला ॥ ६ ॥
[**पानसेप्रत**, पृ. ९९, मूळ **हस्तलिखित**, पान १६–१७].

४. ॥ श्लोक ॥ धर्मो गृहस्तपरुतो न परोस्ति कश्चित्
तस्माश्रितं तदपि योषि शीलवत्याम्
तस्याः सुलग्नवशातः खलु शीललब्धिश्चातः
प्रवचित चिरेण विलग्नशुद्धिम् ॥
॥ टीका ॥ गृहस्थपणापरता धर्म नाहीं । तोचि जरि साधे सगुण स्त्री होय ॥ जरि विवाह शुद्ध लग्नीं बहुतीं गुणीं परिपूर्ण होय तरिचि सुष्टा गुणा स्त्रीसि बुद्धि लागे तो **मी श्रीप** [**ति**] सांघैन ॥ ६ ॥
[**पानसेप्रत**, पृ. १२५, मूळ **हस्तलिखित** पान १९९].

ग्रंथकार आणि टीकाकार भिन्न असतात तेव्हा मूळ ग्रंथातील प्रथय पुरुषी प्रयोगांवर टीका लिहिताना प्रथम पुरुषी प्रयोग कायम न ठेवता 'सांगताहेत,' 'कथन करताहेत' यांसारखे अध्याहृत (तृतीय पुरुषी अनेकवचनी) प्रयोग टीकाकार करतात. कित्येक स्थळी 'ग्रंथकार सांगताहेत', 'ग्रंथकार स्पष्ट करताहेत' असेही प्रयोग आढळतात. प्रसिद्ध झालेल्या कोणत्याही मराठी टीकाग्रंथावरून याचा पडताळा घेता येईल. वरील चार उताऱ्यांतील मूळ संस्कृत आणि मराठी टीका यांचा अभ्यास या दृष्टीने केला पाहिजे. मूळ संस्कृत-संहितेत या चारही स्थळी प्रथम पुरुषी प्रयोग असला तरी 'मी श्रीपति', असा उल्लेख एकाही ठिकाणी नाही. मराठी टीकेत मात्र अनुक्रमे 'मी ग्रंथकार श्रीपति', 'मी श्रीपति', 'म्यां श्रीपतीनें' आणि 'मी श्रीपति'

असे उल्लेख आले आहेत. 'मराठी टीकेचाही कर्ता मी श्रीपति आहे' असे टीकाकारास आवर्जून सांगावयाचे असल्याने मुळात श्रीपती या नावाचा उल्लेख नसताही तो टीकेत आला आहे. यावरून मराठी टीकाही श्रीपतिभट्टाची आहे असे निष्पन्न होते व 'ज्योतिषरत्नमाला' या संस्कृत ग्रंथाचा आणि त्यावरील मराठी टीकेचा काळ एकच ठरतो. मराठी गद्यसाहित्याचा प्रारंभकाळ अशा रीतीने शके ९६१ हा ठरतो.

या ग्रंथातील मराठी भाषेचे स्वरूप काळाशी संवादी आहे किंवा नाही असा प्रश्न या संदर्भात उपस्थित होऊ शकतो. या ग्रंथाचे आज उपलब्ध असलेले हस्तलिखित शके १६४३ साली नकलण्यात आले आहे हे प्रथम लक्षात ठेवले पाहिजे. शिवाय, टीकाभाष्यात्मक ग्रंथाचा एक विशेषदेखील जमेस धरावयास पाहिजे. (या विशेषाचे विवेचन पुढे विस्ताराने येणार आहे). तो म्हणजे टीकाभाष्यपर ग्रंथांची भाषापद्धती काळाच्या ओघात अल्प प्रमाणात बदललेली आहे. वेगवेगळ्या काळांतील टीकाग्रंथांतील उद्धरणे पुढे आलीं आहेत त्यावरून या विधानास सहजच पुष्टी मिळेल. या बाबी लक्षात घेता भाषेच्या स्वरूपावरून 'ज्योतिषरत्नमाले'च्या काळाचा शोध घेण्याचा प्रयत्न फारसा लाभप्रद ठरेल असे वाटत नाही.

प्राचीन मराठी साहित्याचा विशेषतः गद्य साहित्याचा प्रारंभकाळ निश्चित करावयाचा असल्याने 'ज्योतिषरत्नमाला' हा ग्रंथ आणि त्यावरील मराठी टीका यांच्या संबंधी अधिक विस्ताराने चर्चा करावी लागली. मराठी भाषेतल्या या पहिल्या ग्रंथाचे दुर्दैव असे की, तो ग्रंथ अद्यापही अपूर्ण स्वरूपातच वाचकांच्यापुढे आहे. कै. राजवाडे यांना मूळ प्रतच अपूर्ण मिळाली होती. कै. पानसे यांना पूर्ण प्रत मिळूनही त्यांनी मूळ हस्तलिखितातला संस्कृत भाग वगळून केवळ मराठी टीका संपादित केली आहे. संस्कृत भाग वगळण्यासंबंधी त्यांनी इंग्रजी भाषेतील प्रस्तावनेत व 'नवभारत'तील' एका लेखात दिलेली कारणे फारशी पटण्यासारखी नाहीत. त्यांनी संपादिलेली मराठी टीका संपूर्ण असली तरी ग्रंथ मात्र अपूर्ण आहे. त्यामुळे टीकाकाराने कोणते श्लोक वगळले आहेत, कोणते सारांशाने घेतले आहेत, पदशः टीका कोणत्या श्लोकांवर केली आहे, मूळ श्लोकाच्या स्पष्टीकरणार्थ अधिक विशदीकरण कोठे झाले आहे हे समजण्यास मार्ग नाही. थोडक्यात म्हणजे या टीकेचे मूल्यमापन करण्यास आवश्यक असलेली सामग्री पानसे प्रतीत आढळत नाही.

५. श्रीपतिभट्टाच्या टीकेचे वैशिष्ट्य समजून घेण्यासाठी शेवटी राजावडे यांनी संपादिलेल्या त्रुटित प्रतीचाच आधार घ्यावा लागतो. या प्रतीचे अध्ययन करताना असे ध्यानात येते की, टीकाकाराने सर्वच श्लोकांवर टीका लिहिलेली नाही. त्याच्या दृष्टीने सुगम असलेला भाग त्याने मराठीतून वगळलेला दिसतो. काही श्लोकांचे मराठी अर्थ देताना त्याने संस्कृत भाषेत रूढ असलेल्या टीका भाष्य पद्धतीचा अवलंब केला आहे तर काही संस्कृत श्लोकांचे पदशः अर्थ न देता व्याख्यानपद्धतीने स्पष्टीकरण करण्यात आले आहे. पुढील उद्धरणात टीका भाष्य पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे :

॥श्लोक ॥ " दिनकरहिमरश्मैर्दृष्टिसंपात जन्मा ।
भवति विकृतमूर्तिः कोऽपि रूद्रो मनुष्यः ।
पतित भुवनमध्ये मंगलानां विनष्टे ।
ज्वलन कपिलदृष्ट्या निर्दहन्त्या जगन्ति ॥

॥ टीका ॥ सूर्य-चंद्राचिये दृष्टिपासौनि कव्हणि एकु पुरुषु उपजे । भयानक मूर्ति अति रौद्र । मग त्रिभुवनामध्यें पडे मंगळासि ॥ न्यसावियासि ॥ जळता अग्निसरिपि दृष्टि । तियाचि त्रिगति ते जालि । तो एकार्नळु म्हणिजे ॥"[८]

पाचव्या अध्यायातील १३ वा श्लोक आणि मराठी टीका पुढे देण्यात येत आहे. या स्थळी टीकाकार कथाकथनपद्धतीचा अवलंब करतो :

॥ श्लोक ॥ दैत्येंन्द्रैः समरेषु विजितेष्विदं क्रुधो दृष्टवान्
स्वां कार्यं किल निर्गता परमुपि लांगूलनिंच त्रिपाद्
विष्टि सप्तभुजेंद्रगलका क्षाभोदरी प्रेतगा
दैत्याघ्निः मुदितैः सुरैस्तु करणां प्रान्तेन युक्ता सदा ॥

॥ टीका ॥ पूर्वि समरांगणि दैत्यें देव जिंतले । मग ईश्वरा जवळि आलि । तेव्हळि शंभु कोपला । रोषें आपुला शरीरू पाहिला । तेथौनु भद्रा जन्मलि । गाढवाचें ऐसें मुष । विस्तीर्ण पुंसा । तिन्ही पाए । सात भुजा । सिंहाचा सरिषा गळा । पांदि केस । सरस पाटि पोट एकत्र । असे प्रेतासमान । मग अशेष दैत्य मारिले । तेव्हळि देव तोषले । मग करणाचा अंतिं स्थापिलि । अचळपद दिधलें । ते भद्रा म्हणिजे ॥[९]

मराठी पंचतंत्र आणि महानुभावीय चरित्रग्रंथ यांसारख्या साहित्यात चपलख बसेल अशी ही भद्रेची कथा आहे. ही कथात्मकता प्रचलित असलेल्या लोककथांच्या शैलीचा प्रभाव दर्शविते. मूळ ग्रंथ संस्कृत भाषेत अर्थात विद्वानांसाठी रचलेला. विषय मात्र सामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनाशी जिव्हाळ्याचे संबंध असलेला. विषय प्राकृतांच्या आटोक्यात यावा या तळमळीने मराठी टीका झालेली. साहजिकच सामान्यांना परिचित असलेल्या कथात्मक शैलीतून या श्लोकाचे स्पष्टीकरण झालेले दिसते.

' ज्योतिषरत्नमाले 'च्या स्वरूपावरून निघणाऱ्या निष्कर्षांचा विचार करण्यापूर्वी आणखी काही उदाहरणे आवश्यक वाटतात.

राशि-नक्षत्रे शुभाशुभ फळ देणारी असली तरी चित्तशुद्धी महत्त्वाची असते हा भाग पुढील टीकेत आला आहे :

" शकुन-निमित्तांचि राशि येकीकडे आणिक येकलें मन येकीकडे । या दोंमध्यें जाणतां मनशुद्धि विशेषिलि ॥ जैसें चित्त तैसेंचि सिद्धि ॥"[१०]

वैवाहिक जीवनाचे साफल्य श्रीपतिभट्ट पुढीलप्रमाणे वर्णितो :

> " ग्रहस्तपणापरता धर्म नाहीं। तोचि जरि साधे सगुणि स्त्री होय। जरि विवाह शुद्ध लग्नीं बहुतीं गुणीं परिपूर्ण होय तरिचि सुष्टा गुणा स्त्रीसि बुद्धि लागे तो मी श्रीपति सांघेन ॥ "[११]

६. विषय कोणताही असो, ग्रंथरचना संस्कृत भाषेतून झाली पाहिजे हा वैदिक परंपरेतील विद्वानांचा आग्रह विख्यात आहे. मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर यांच्यासारख्या संत-पंडितांना आपल्या प्राकृत कवित्वाचे करावे लागलेले समर्थन ही या आग्रहाचीच एक प्रतिक्रिया. श्रीपतिभट्ट हा थोर संस्कृत पंडित होता, याची साक्ष त्याचे ग्रंथ देतात. प्रतिष्ठित पंडितांच्या आग्रही वृत्तीची बाधा सोळाव्या शतकातील एकनाथी भागवताला झाली. श्रीपतिभट्ट तर त्यापूर्वी ६०० वर्षे होऊन गेलेला. त्याला ही बाधा अधिकच जाणवलेली असणार; म्हणून त्याने सुवर्णमध्य काढलेला दिसतो. स्वतःच्याच संस्कृत ग्रंथाला त्याने मराठी टीकेची झालर लावली आणि प्रतिष्ठितांच्या आग्रही वृत्तीची धार थोड्याफार प्रमाणात बोथट केली. 'धिकोटिकरण' आणि 'ध्रुवमानस-करण' या ग्रंथांची मराठी टीकेसाठी निवड न करता 'ज्योतिषरत्नमाला' हा ग्रंथ मराठी टीकेसाठी निश्चित करावा, यात औचित्य दिसून येते. या ग्रंथात 'मुहूर्त' हा विषय आलेला आहे. त्या काळातल्या समजुतीप्रमाणे मुहूर्तासारखा विषय हा पंडित व अपंडित या सर्वांना सारखाच महत्त्वाचा होता. दैनंदिन जीवनात जिव्हाळ्याचा असलेला हा विषय सामान्य जनांस समजावा या हेतूने श्रीपतिभट्टाने आपल्या इतर ग्रंथांची निवड मराठी टीकेसाठी न करता 'ज्योतिषरत्नमाले'चीच निवड केलेली दिसते. गहन विषयावरील ज्ञान संपादन करण्यासाठी तर संस्कृत ग्रंथांकडे धाव घ्यावीच लागते. नित्य नैमित्तिक आचारधर्मातील शुभाशुभांचा निर्णय तरी प्राकृतांना आपल्या भाषेतून विदित व्हावा हीच भावना या मराठी टीकेच्या मुळाशी असली पाहिजे. ही प्रेरणा साकार करण्यासाठी मराठी भाषेच्या या आद्य ग्रंथकाराला मराठी टीकेच्या रूपाने मार्ग काढावा लागला असे दिसून येते.

७. विद्या सामान्य माणसाच्या आटोक्यात यावी ही श्रीपतिभट्टास मराठी टीका लिहिण्यास प्रवृत्त करणारी प्रेरणा पुढच्या काळात द्विविध स्वरूपात विकास पावलेली आढळून येते : टीका-भाष्यपद्धतीची परंपरा चालविणारे गद्य-साहित्य आणि संस्कृतभाषेतले ज्ञान विशेषतः अध्यात्म ज्ञान मराठीतून सांगण्यासाठी निर्माण झालेले गद्यपद्य ग्रंथ. टीका-भाष्य परंपरेतच अनेक संस्कृत ग्रंथांच्या आधाराने रचण्यात आलेले मराठी ग्रंथ पुढच्या काळात रचण्यात आले तर अध्यात्मज्ञानाचे स्वतंत्रपणे व संप्रदायानुसार विवेचन करणारे साहित्य महानुभाव व वारकरी या संप्रदायांत वाढीस लागले. ही धारा पद्याच्या माध्यमातून वाढली. मुकुंदराज, ज्ञानेश्वर प्रभृती या परंपरेतून उदयास आले. श्रीपति-भट्टाने आपल्या भाष्यात अवलंबिलेल्या कथात्मक शैलीची परिणती तिसऱ्या एका प्रवाहात

झाली : ' लीळाचरित्रादी ' महानुभाव पंथाच्या चरित्र-ग्रंथांत या प्रवृत्तीचा विकास पुढच्या काळात झालेला दिसून येतो. अशा रीतीने श्रीपतिभट्टाची ' ज्योतिषरत्नमाले '-वरील मराठी टीका प्राचीन मराठी साहित्यात विकास पावलेल्या तीन प्रवृत्तींच्या उगमस्थानी असल्याचे आढळून येईल :

१. टीकाभाष्यपद्धतीचे गद्यग्रंथ.
२. अध्यात्मपर स्वतंत्र ग्रंथ-गद्य आणि पद्य.
३. कथाप्रधान साहित्य.

या विविध प्रवाहांपैकी प्राचीन मराठी काव्यांचा विचार या विवेचनाच्या कक्षेत येत नसल्याने तो वगळण्यात आला आहे. कथाप्रधान साहित्याचा विचार पुढच्या प्रकरणात करण्यात आला असून टीकाभाष्यपद्धतीचे गद्य हा प्रस्तुत प्रकरणाचा विषय आहे.

८. टीकाभाष्यात्मक गद्यासच " मराठी गद्याची पंडिती परंपरा " असे नाव मी देतो. प्राचीन मराठी काव्याच्या विवरणात ' पंडिती काव्या 'चा एक वेगळा वर्ग मानण्यात येतो. संतकाव्याहून निराळे आणि विशिष्ट काव्यलक्षणांनी युक्त असे काव्य ' पंडिती काव्य ' या नावाने संबोधण्यात येते. काव्यकलेची बूज राखणारे साहित्य या दृष्टीने या वर्गातील काव्याकडे पाहण्यात येते. " मराठी गद्याच्या पंडिती परंपरेत " योजण्यात आलेल्या ' पंडिती ' या शब्दाला उपरोक्त वर्गीकरणाचा संदर्भ नाही. ' संस्कृत भाषेत पांडित्य संपादन करूनही या भाषेतले ज्ञान टीकाभाष्यरूपाने वा स्वतंत्र ग्रंथरचना करून गद्यप्रबंधांच्या द्वारे मराठीत निबद्ध करणाऱ्या गद्यलेखकांचे साहित्य ' या अभिप्रेत अर्थाने मराठी गद्याच्या पंडिती परंपरेचे विवेचन करण्यात येणार आहे हे प्रारंभी नमूद केले पाहिजे.

या पंडिती परंपरेत ' ज्योतिषरत्नमाले 'नंतर सुमारे दोन-अडीच शतकांत झालेली ग्रंथनिर्मिती उपलब्ध नाही. ' करणप्रकाश ' हा ग्रंथ मानला तर अपवाद म्हणता येईल. मूळ संस्कृत ग्रंथ शके १०१४ मध्ये रचण्यात आला. ब्रह्मदत्ता हा ज्योतिषशास्त्रावरील या ग्रंथाचा कर्ता. " मराठी टीका त्यानेच (ब्रह्मदत्ताने) लिहिली असल्यास हे शके १०१४ चे गद्य म्हणावे लागेल " असे संदिग्ध विधान कै. राजवाडे यांनी केले आहे.[१२] मराठी टीकेसह या ग्रंथाचे हस्तलिखित मात्र शके १५४१ चे आहे. ' भाषेच्या स्वरूपावरूनही मराठी टीका शक १३०० ची असावी ' असे गोगटे यांचे मत आहे.[१३] इतर पुराव्यांच्या अभावी केवळ भाषेचा पुरावा किती मर्यादेपर्यंत निर्णायक मानावयाचा हा प्रश्नच आहे. या टीकाग्रंथातील मराठी गद्याच्या स्वरूपाची कल्पना पुढील उतारा देऊ शकेल :

" असमेति ॥ आतां दोही ग्रहांचा विक्षेप भिन्न दिसेचा, तरि दक्षिण दिसेच्या विक्षेपाचा ग्रहानें हरविलें ॥ उत्तर किंवा विक्षेपाचा ग्रहानें जिंतिलें ॥ आणि

दोहीचा विक्षेपु एक दिसा तरि उणा विक्षेपाचा ग्रहानें हारविलें ॥ येणें प्रकारें ग्रहांची हारजिती जाणिजे ॥ "१४

वरील उताऱ्यातील भाषा जुनी वाटत असली तरी ती अमुक एका काळातली आहे असा निर्वाळा देणे कठीण आहे. शिवाय, टीकाग्रंथात्मक साहित्याचा एक विशेषही विसरता येत नाही. या वाङ्मयप्रकारात कालगतीचा भाषेच्या स्वरूपावर फारसा परिणाम झाल्याचे आढळून येत नाही. नाहीतरी ग्रंथव्यवहारासाठी योजण्यात येणारी 'प्रमाण' भाषा आपले स्वरूप दीर्घकाळ सारखेच ठेवते. टीका-भाष्याच्या भाषेला असेच प्रमाण भाषेचे रूप प्राप्त झाले होते. म्हणूनच कदाचित या वाङ्मयप्रकाराच्या भाषेत दीर्घकाळपर्यंत कोणत्याही प्रकारचे परिवर्तन झाल्याचे आढळत नाही. केवळ भाषेच्या स्वरूपावरून एखाद्या साहित्यकृतीचा कालनिर्णय मुळातच अवघड असतो. त्यातून या वाङ्मयप्रकाराची भाषा दीर्घकाळ सारखीच राहिलेली असल्याने 'करणप्रकाश' च्या भाषेवरून या ग्रंथाच्या कालाचा अंदाज बांधणे सयुक्तिक ठरणार नाही. या ग्रंथाची नक्कल शके १५४१ त झाली असल्याने हा ग्रंथ तत्पूर्वी रचण्यात आला एवढे मात्र निश्चितपणे सांगता येते.

'लीळाचरित्राचा' सांप्रदायिक काल शके १२०६ मानलेला आहे. शके ९६१ ते शके १२०६ या कालखंडात झालेली गद्यसाहित्याची निर्मिती उपलब्ध नाही. या अडीच शतकात साहित्य-निर्मितीत खंड पडला नसावा. पुढच्या काळात गद्यपद्य परंपरांचा झालेला विकास ध्यानात घेता हे अनुमान करता येते. वाङ्मयातील कोणतीही परंपरा जशी केवळ योगायोगाने अस्तित्वात येत नाही त्याचप्रमाणे ती अकारण लुप्तही होत नसते. त्यामुळे या अडीच शतकांतील गद्यसाहित्य अनुपलब्ध असले तरी त्याचे अस्तित्व गृहीत धरता येते.

९. शके १२०० ते १४०० या दोन शतकांच्या कालखंडात मात्र मराठी गद्य बहरास आलेले दिसून येते. पद्य आणि गद्य या दोन्ही क्षेत्रांत व महानुभाव आणि वारकरी या दोन्ही संप्रदायांत या काळात मोलाची साहित्यनिर्मिती झाली आहे. या कालखंडातील महानुभाव पंथीयांची गद्य-साहित्य रचना लक्षणीय असून या पंथाबाहेर मात्र गद्यवाङ्मयाचे प्रमाण अत्यल्प आहे. गेल्या शतकात महानुभाव पंथीय साहित्य प्रकाशात येण्यापूर्वी महानुभाव आणि तदितर समाज यांत जी तटबंदी होती ती बारा ते चवदा या दोन शतकांत होती असे मानण्यास महानुभाव ग्रंथांतही आधार सापडत नाही. त्यामुळे या पंथाचे या कालखंडातील साहित्य समकालीन वाङ्मयीन प्रवाहांपासून अलिप्त होते असे समजण्याचे कारण नाही.

इतर लहान-मोठ्या पंथांप्रमाणेच महानुभाव पंथ या प्रारंभीच्या काळात महाराष्ट्रात नांदत होता. ठिकठिकाणच्या देवालयांत श्रीचक्रधरांचे 'अवस्थान' झाल्याचे उल्लेख 'लीळाचरित्रात' विपुल आहेत. संस्कृत पंडित आणि जोगी-वैरागी यांच्याशी

श्रीचक्रधर आणि त्यांचे शिष्य-प्रशिष्य यांनी वाद घातल्याचे समकालीन दाखले महानुभाव पंथाच्या साहित्यात पुष्कळ मिळतात. भिन्न मतांच्या अनुयायांवरोवर झालेल्या शास्त्रचर्चा आणि 'उघाणी' यांचे वर्णन महानुभाव-ग्रंथकार करतात. त्यामुळे निदान या दोन शतकांच्या काळात तरी महानुभाव पंथ इतर समाज व प्रचलित साहित्य यांच्यापासून सर्वस्वी अलिप्त होता, असे मानता येत नाही. ही परिस्थिती लक्षात घेता साहित्याच्या क्षेत्रात असलेल्या समकालीन वाङ्मयप्रवाहांचा महानुभाव पंथाच्या साहित्यावर मुळीच परिणाम झाला नाही असे मानणे निराधार ठरेल.[१५]

१०. कोणत्याही प्रकारची पूर्वपरंपरा नसताना गद्याच्या क्षेत्रात महानुभाव पंथाच्या लेखकांनी अगदी 'नूतन सृष्टी' निर्माण केली हा रूढ समज वरील पार्श्वभूमीवर तपासून घेतला पाहिजे. एवढे मात्र खरे की, महानुभाव ग्रंथकारांनी आपल्या कर्तृत्वाने मराठी गद्याचे भरणपोषण उत्तम रीतीने केले आहे. गद्यसाहित्याचे विविध आकृतिबंध महानुभाव साहित्यात आढळतात. तर्कन्यायादि शास्त्रांच्या विवरणार्थ मराठी गद्याचा प्रथम उपयोग केला तो या पंथाच्या लेखकांनी. पंथाबाहेरचे चौदाव्या शतकापर्यंतचे गद्यसाहित्य ज्योतिष व वैद्यक या लोकोपयोगी शास्त्रांपुरतेच मर्यादित राहिले. अध्यात्मविद्येचा प्रसार मुकुंदराज-ज्ञानेश्वरादिकांनी मराठी भाषेतून केलेला असला तरी त्यासाठी त्यांनी पद्याचे माध्यम वापरले. महानुभावांनी अध्यात्म विवरणदेखील गद्यातून केले आहे.

महानुभाव पंथात मराठी भाषेचे स्थान असाधारण आहे. मराठी ही या पंथाची धर्मभाषा आहे. या पंथाच्या वाहेर मराठी बोधभाषा या नात्याने वावरत होती. कारण, धर्मभाषेच्या स्थानावर संस्कृत भाषा आरूढ झालेली होती; त्यामुळे संस्कृत भाषेतील ज्ञान सामान्यांपर्यंत पोहोचवणे एवढीच निकड महानुभावेतर ग्रंथकारांना जाणवत नव्हती. तदनुसार या ग्रंथकारांनी धर्म व अध्यात्म यांच्याविषयीच्या अज्ञानाचे निराकरण करण्याचा प्रयत्न आपल्या मराठी कृतींद्वारे केला. महानुभावेतर साहित्य अध्यात्मबोध करण्याच्या हेतूनेच प्रामुख्याने निर्माण होत गेले.

११. महानुभाव पंथाचे तसे नव्हते. या पंथाला आपला आचार, विचार समाजापुढे नव्याने मांडावयाचा होता. अस्तित्वात असलेल्या संस्कृत ग्रंथांचा अनुवाद करून अथवा भावार्थ सांगून त्यांचे कार्य भागण्यासारखे नव्हते. कारण, या पंथाच्या धर्म आणि अध्यात्म यांच्याविषयीच्या धारणा भिन्न होत्या. हे विषय पंथीय दृष्टिकोनातून मराठी भाषेत मांडताना त्यांची दृष्टी अशा प्रकारच्या संस्कृत ग्रंथाकडे जाणे अपरिहार्य होते. शिवाय प्रारंभीचे ग्रंथकार 'संस्कृत भाषेतून शास्त्र पढलेले होते'. महानुभावीय धर्मग्रंथांतून संस्कृत पद्धतीच्या टीकाभाष्यादिकांचे अनुकरण घडले ते यामुळेच. सूत्रग्रंथ, भाष्य, महाभाष्य, लापणिका, साहित्यशास्त्रविषयक चर्चा, व्याकरणविषयक ग्रंथ, तर्कन्यायादि शास्त्रांची परिभाषा या सर्वांचा विनियोग महानुभाव तत्त्वज्ञानास आवश्यक असलेली वैठक सिद्ध करण्यासाठी या ग्रंथकारांनी केला. सांप्रदायिक तत्त्वज्ञान आणि

साहित्य यांच्या सिद्धीसाठी महानुभावपंडितांनी बरेच परिश्रम केले आहेत, असे या साहित्याचे अध्ययन केले असता निदर्शनास येते.

एकाच काळात आणि एकाच भाषेत भिन्न प्रेरणांनी होणारी साहित्यनिर्मिती हे या दोन शतकांतील साहित्यनिर्मितीचे वैशिष्ट्य आहे. महानुभाव पंथातील वाङ्मयात आढळून येणारे गद्याचे निरनिराळे आकृतिबंध कोणत्या धडपडीतून निर्माण झाले याची कल्पना वरील विवेचनावरून यावी. या गद्याचा विस्ताराने परामर्श घेण्यापूर्वी महानुभाव पंथाबाहेर अल्प प्रमाणात निर्माण झालेल्या गद्य साहित्याचा परिचय करून घेतला पाहिजे.

१२. या दोन शतकांत श्रीपतिभट्टाच्या 'स्वोपज्ञ' टीकेची परंपरा पुढे चालवणारा निदान एक तरी ग्रंथकार महानुभावेतर साहित्यिकांत आढळतो. संस्कृत आणि मराठी या दोन्ही भाषांत आणि गद्य व पद्य या दोन्ही माध्यमांतून ग्रंथरचना करणारा एक ग्रंथकार या काळात होऊन गेला. विठ्ठल गलंड हा आयुर्वेदशास्त्रावर मराठी भाषेतून ग्रंथ लिहिणारा पहिला ग्रंथकार. या विषयावर त्याने संस्कृत भाषेतूनही रचना केली आहे. 'रसराजलक्ष्मी' आणि 'वैद्यवल्लभसंहिता' या आपल्या संस्कृत ग्रंथावर मराठी टीका लिहून त्याने श्रीपतिभट्टाशी आपले नाते जोडले आहे. 'रसकौमोदि' हा त्याचा ग्रंथ मराठी पद्यात असून तो प्रस्तुत लेखकाने संपादून प्रसिद्ध केला आहे. 'रसराजलक्ष्मी' या ग्रंथाचा रचना काळ शके १२२२ आहे. मराठी भाषेतला आद्य चरित्र-ग्रंथ लीळाचरित्र याचा काळ संशोधकांनी शके १२०० मानला आहे. तदनुसार लीळाचरित्रानंतर २२ वर्षांनी या ग्रंथाची निर्मिती झाली असे म्हणता येईल. 'लीळाचरित्रकार' माहीमभट्ट, 'सिद्धांतसूत्रा'चा संकलक केशोबास आणि 'लक्षणरत्नाकर' या ग्रंथाचा कर्ता अनेराज बास या महानुभावीय ग्रंथकारांचा समकालीन विठ्ठल गलंड ठरतो.

आयुर्वेदावर पहिली गद्य व पद्य रचना करणारा ग्रंथकार या दृष्टीने मराठी वाङ्मयाच्या इतिहासात विठ्ठल गलंड याचे स्थान महत्त्वाचे ठरते. 'रससिंधू' हा त्याचा संस्कृत ग्रंथ भारतभर मान्यता पावलेला होता असे दिसून येते. कारण, उत्तर-कालीन आयुर्वेदशास्त्रकारांनी त्याचे आधार घेतले आहेत. दक्षिणेत आणि उत्तरेत रचण्यात आलेल्या रसवैद्यकविषयक ग्रंथात 'रससिंधू'चे निर्देश निरनिराळ्या संदर्भात आले आहेत. याच ग्रंथकाराचे 'हितोपदेश' हे प्रकरण गद्यात असून ते अद्याप अप्रकाशित आहे. वैद्यवल्लभसंहितेचा फक्त एकच भाग उस्मानिया विद्यापीठाच्या वतीने १९८७ साली प्रसिद्ध झाला आहे. तत्पूर्वी 'रसराजलक्ष्मी' हा मराठी टीका असलेला ग्रंथ सोलापूरचे वैद्य गायकवाड यांनी 'जीवक' मासिकातून क्रमशः प्रसिद्ध केला होता. विजयनगर साम्राज्याचा संस्थापक बुकराय हा नेल्लोर (आंध्रप्रदेश) येथे सामंत असताना विठ्ठल गलंड त्याच्या आश्रयास होता, अशी नोंद त्याच्या एका ग्रंथात आढळते.[१६]

या ग्रंथकाराच्या 'रसराजलक्ष्मी' या ग्रंथाचा प्रारंभ काव्यमय आहे. मूळ श्लोक आणि मराठी टीका पुढीलप्रमाणे :

यस्येच्छाङ्कुरवल्लरी सुफलिता नानाकलाकौतुकै-
श्चातुर्यैक विलोल पल्लववती कीर्तिप्रसूनप्रसूः ।
संनिर्वापयति ज्वरत्रयमहो छायाकलापैर्नृणाम्
सोयं पातु विचारमूर्तिरखिलं कालावलीढं जगत् ॥

कार्यारंभे निर्विघ्न ग्रंथसमाप्ती लागीं ग्रंथकर्ता अभीष्ट देवतेसी नमस्कार करोनि जगासि आसीर्वाद येणें श्लोकें देतसे ॥ जगासि निकें चिंतलेया जें पुण्य होईल तेणें पुण्यें करुनि हे ग्रंथसमाप्ति निर्विघ्न होआवी ऐसा अभिप्राय- ॥
आतां प्रथम श्लोकाचा अर्थु ॥ सदसद्विवेकाते करिता विचारमूर्ति ईश्वर । तो कालें ग्रसमाना जगातें समस्तांसरे रक्षो ॥ जेयाची इच्छारूपा अंकुराची वाढतली वल्ली । कीर्तिकुसुमिं फुलली । विचित्र प्रपंच रचनारूप जें चातुर्य । तद्लक्षण जे चंचल मुख पल्लव । त्या पल्लवी पाल्हैली । नानाविधिं कलाकौतुकिं फलली । ते वल्ली आपलां छायासमूहीं करूनि लोकांचेया ज्वरत्रयातें नाशिति असे । तो ज्वरत्रय द्विविध (त्रिविध ?) एक आधिदैविक । एक आधिभूतिक । अध्यात्मिक । एक वातपित्तश्लेष्मज इत्यादी ॥

मूळ संस्कृत श्लोकातील प्रत्येक पदाचे स्पष्टीकरण करून सांगण्याची पद्धती विठ्ठल आपल्या मराठी टीकेत अवलंबिती. याच ग्रंथातील दुसरा श्लोक आणि त्यावरील मराठी टीका पुढे दिली आहे. त्यावरूनही विठ्ठलाच्या टीकापद्धतीचा बोध होईल. या श्लोकात ग्रंथकर्त्याच्या नावाचाही उल्लेख आला आहे :

स्येशेमुषी मन्थनीमंथनेन
स्फुरद्रसाम्भोधिगंभीर गर्भात्
श्रीविष्णुदेवो लभत प्रयत्ना-
च्छ्री विष्णुवट सद्रसराजलक्ष्मीम् ॥

गलांडेया महादेवपंडिताचा पुत्र वैद्यकादि कलिं निपुण । विष्णुदेव । रसराजलक्ष्मी एते लाहतां जाला ॥ रसराज पारज । तेयाची लक्ष्मी संपत्ति । ते मतिचेनि माथुलेनि निर्मथन करितां रससागरापासोनि श्रीमहाविष्णुचिया परि लाहतां जाला ॥ येथून टीका अधिक । सद्रसु म्हणिजे अमृत । जग जिववितें आणिक लक्ष्मी आपुलेया बुद्धिमंथाचलाचेनि मथनें फुराणी दे । तेया क्षीर समुद्रापासोनि प्रयत्नें करुनि पातला । तैसाचि ग्रंथकर्ता विष्णु रसराजलक्ष्मीयेतें पातला ॥

याच ग्रंथकाराचा हितोपदेशनामक गद्य ग्रंथ कै. मुकुंदराव गायकवाड यांच्या संग्रहात आहे. निरनिराळ्या रोगांची लक्षणे आणि त्यावर औषधी योजना असे या

ग्रंथाचे स्वरूप आहे. संस्कृत शास्त्रग्रंथातील ज्ञान प्राकृतांना सहजगत्या ग्रहण करता यावे असे या ग्रंथाचे उद्दिष्ट दिसते. प्रसंगोपात्त वैद्यांनाही उपदेश करण्यात आला आहे :

> अभिमानी, कृतघ्न, वैद्याचा द्वेष करी तो रोगी वर्जिजे ।। ऐसा विचार वैद्य न करि रोगियातें उपचार करि तरि व्याघ्र भक्षिलिया परि दोष वैद्या लागे ॥ .... शास्त्रचिकित्सा पाहिजे । न कळे तरी गुरुमुखें श्रवण कीजे । अन्यथा उपचार केलिया दोष लागे वैद्या ॥
>
> कुशल, कर्कश स्तब्ध स्वयें रोगि, अतिकृश ऐसा वैद्य पुजु नये॥

महानुभावेतर ग्रंथकाराची ही गद्य टीका व स्वतंत्र संकलन श्रीपतिभट्टाच्या परंपरेचे सातत्य दर्शविणारे आहे. समकालीन महानुभाव पंडितांनी स्वीकारलेली टीकापद्धती रूढ वाङ्मयीन प्रवृत्तीचाच आविष्कार होय, असेही या टीकेवरून सूचित होते.

१३. 'रसरत्नदीप' या रामदासकृत संस्कृत ग्रंथावर विठ्ठलाने टीका लिहिली आहे, असे कै. राजवाडे नमूद करतात. मराठी टीकेचे स्वरूप अगदी अप्रगल्भ असल्याने हा मराठी टीकाकार विठ्ठल गलंड नसावा असे मत बनते. हा ग्रंथ शके १३०० ते १४०० या कालखंडातला आहे, असे कै. राजवाडे यांचे मत आहे. 'रसरत्नदीप' या ग्रंथास मराठी गद्याच्या दृष्टीने महत्त्व नसले तरी तो दुसऱ्या एका कारणासाठी विचारात घ्यावा लागतो. पौराणिक ग्रंथांत असतात तशा वंशावळी आणि कलियुगातील राजवंश व भविष्यकथन या ग्रंथात आढळते. 'दैत्यांच्या त्रासाने दगदगिली वसुंधरा' म्हणून देवांनी चार अवतार घेतल्याचीही माहिती या ग्रंथात आली आहे[१७]

रसशास्त्राच्या विवरणात वंशावळी अप्रस्तुत वाटतात. तथापि, मराठी गद्यात पुढच्या काळात जी पौराणिक परंपरा अस्तित्वात आली ती बीजरूपाने वंशावळीच्या स्वरूपात या ग्रंथात आल्याने महत्त्वाची ठरते. या परंपरेचे सविस्तर विवेचन स्वतंत्र प्रकरणात पुढे आले आहे. धर्मरक्षणाच्या प्रेरणेतून ही परंपरा उदयास आली असा निष्कर्ष या प्रकरणी दिलेला आहे. रसरत्नदीपातील वंशावळी देण्याच्या मुळाशी ग्रंथकाराचा हाच हेतू होता, हे पुढील उदाहरणावरून ध्यानात येईल :

> 'प्रथम आदिची अनादि, अनादिचा वोंकारू, वोंकाराचा वेदु । वेदाचें हव्य, हव्याचा धर्मु, धर्माचा मेघु । मेघाचें उदक । तें उदक एकविसावें ब्रह्मांडिं वाजितलें : ते समयिं आदिनारायण विष्णु जलशयनि पहुडले होते॥ पहुडलियावरि अनेक सहस्र वरूषें जालीं । तेया योगाविना प्रथम तृतीय योग । १ : मदयोग : बुद्धयोग : ३ : बुदबुदकार योग : मनयोग : ६ : मन्वंतर योग : ७ : धर्मयोग : ८ : दमदमाकार योग : ९ : तारका योग : १० : ....ऐसि चौदा योगें जालिं ॥ तेयें आदि नाहिं : पृथ्वी नाहिं : अग्नि नाहिं : एकतत्त्व नाहिं : तेजवायो नाहिं : आकास नाहिं : चंद्रसूर्यो नाहिं : ते समै आदिविष्णु नारायणें तेज उपजविलें :— '

यानंतर सृष्टी व सृष्टीवरील प्राण्यांची उत्पत्ती कशी झाली याचे वर्णन आले आहे. देवदैत्यांच्या उत्पत्तीकथेनंतर कृतयुगातील राजांच्या व देव आणि दैत्य यांच्या वंशावळी देण्यात आल्या आहेत. कृतयुगाचे स्वरूप पुढीलप्रमाणे दिले आहे :

> ' धर्म मूर्तिमंत होता । विप्रासि वेचावयाचि चिंता न होति । पृथ्वी सदा धान्यवंत असे । वनस्पति सदा फलत असें । .... तै मनुष्यासि लक्ष वरूषें आयुष्य होतें ॥ '–**रसरत्नदीप**

विठ्ठल गलंड यांचा समकालीन केशिराजबास अथवा केशोबास या नावाचा पंडित महानुभाव पंथात होता. लीळाचरित्रातील श्रीचक्रधरांची वचने वेगळी काढून व त्यांचे वर्गीकरण करून त्याने ' सूत्रपाठ ' हा महानुभावपंथाचा तत्त्वज्ञानपर ग्रंथ संकलित केला. त्याचप्रमाणे ' दृष्टांतपाठा 'चे संकलनदेखील याच पंडिताने केले. लीळाचरित्रात श्रीचक्रधरोक्त दृष्टांत प्रसंगोपात्त आले आहेत. त्याचे संकलन ' दृष्टांतपाठात ' झाले आहे. हे दोन्ही ग्रंथ आपल्या परीने वैशिष्टपूर्ण आहेत. महानुभाव पंथातील गद्यनिर्मितीचा आढावा घेण्यापूर्वी काही मूलभूत बाबींचे स्पष्टीकरण आवश्यक वाटते.

१४. आतापर्यंत मराठी टीकाग्रंथाचा जो परामर्श घेण्यात आला आहे त्यातील टीकाग्रंथ म्हणजे संस्कृत ग्रंथावरील मराठी टीकेच्या स्वरूपाचे होते. महानुभाव पंथाच्या बाबतीत आधारभूत असे संस्कृत ग्रंथ असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. वैदिक परंपरेत ' श्रुतिस्तु वेदो विज्ञेयो धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः ' अशी धारणा आहे. श्रुति आणि स्मृती हे धर्मास आधारभूत असलेले वैदिक परंपरेतील ग्रंथ मराठी भाषेत नाहीत. महानुभाव पंथातही ' श्रुति ' आहेत तशाच ' स्मृती ' देखील, परंतु या पंथाच्या स्मृतिस्मृती मराठी भाषेत आहेत. ' श्रीमुखिचें वाक्य ते श्रुति '. श्रीचक्रधरांच्या मुखीचे वचन श्रुतीप्रमाणे प्रमाण मानण्याची प्रथा आहे. हे लक्षात घेतले म्हणजे या पंथात झालेली टीकाभाष्ये ही मराठी ग्रंथांवरच झालेली आहेत हे लक्षात येईल. ' लक्षणरत्नाकरावरील ' बत्तीस लक्षणी टीपेत महानुभावांच्या धर्मपर वाङ्मयाचे लक्षण आणि वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे :

> ' आतां श्रुतीचें लक्षण : परमेश्वरोक्त सूत्र मात्र अधिकरणासि श्रूत जालें : मणौनि परमेश्वरोक्त सूत्रमात्र श्रुति शब्दें बोलिजे : आतां स्मृतिचें लक्षण : परमेश्वराचें विहरण वर्तन देखिलें तैसें स्मरोनि अधिकरणें साधिकरणाप्रति निरूपिलें जें लीळाचरित्र ते स्मृति बोलिजे : ....आतां वृद्धाचाराचें लक्षण : परमेश्वराचा आणि अधिकरणाचा वृत्तांतु, विचारू, व्यवहारू तो साधिकरणीं केशवादि महानुभावीं बंधीं लिहिला : तो वृद्धाचारू : ऐसे श्रुति, स्मृति, वृद्धाचारभेदे त्रिविध प्रमाण जाणावें : ऐसें प्रमाण लक्षण तें वस्तुज्ञानासि साधन : तया ज्ञानाचें ऐसें लक्षण : जें ज्ञेय जैसें असे : तें तैसें जेणेकरूनि पुरूषें आयकिजे....तैं ज्ञान. ॥ ' **लक्षणरत्नाकर.**

वैदिक परंपरेत श्रुति. स्मृति आणि सदाचार हे धर्माचे प्रमाण मानले आहेत. महानुभाव पंथात देखील ही प्रमाणे श्रुति, स्मृति आणि वृद्धाचार या स्वरूपांची आहेत. फरक एवढाच हे प्रमाण ग्रंथ महानुभावांच्या बाबतीत मराठी भाषेतच रचण्यात आले आहेत. वेदांवरील भाष्यांप्रमाणेच महानुभाव श्रुतीवर अनेक भाष्ये झाली आहेत. श्रुतींचा अर्थ-निर्णय व्हावा यासाठी न्यायमीमांसादी शास्त्रे अस्तित्वात आली त्याचप्रमाणे या पंथातदेखील अर्थनिर्णयपर सूत्रवाङ्मय निर्माण झाले. विश्वामित्राने प्रतिसृष्टी निर्माण केली. तद्वतच धर्मवाङ्मयाच्या क्षेत्रात महानुभावपंथात नवी सृष्टी उदयास आली. चंदनाच्या मूर्तीचे हात आणि पाय हे दोन्ही चंदनाचे असावेत तद्वत् हे मूळ ग्रंथ आणि त्यावरील भाष्ये दोन्ही मराठी भाषेतूनच झाली आहेत. या मराठी ग्रंथांपुढे असलेले आदर्श मात्र संस्कृत भाषेतील धार्मिक ग्रंथांचे होते. त्यामुळे भाषा आणि आकृतिबंध यांच्या बाबतीत महानुभाव धर्मग्रंथांवर संस्कृत भाषेतील त्या त्या वर्गात मोडणाऱ्या ग्रंथांनी दाट सावली धरलेली दिसून येईल. ही निर्मिती श्रीचक्रधरांनी प्रवर्तित केलेल्या नव्या पंथाचे तत्त्वज्ञान व आचारधर्म यांचा प्रसार व्हावा या हेतूने झाली हे निराळे सांगण्याची आवश्यकता नसावी.

१५. महानुभाव पंथाची तात्त्विक बैठक आणि आचारधर्म यांचे निरूपण करणाऱ्या साहित्याची निर्मिती धर्मप्रसाराच्या प्रेरणेतून झाली. श्रीचक्रधरोक्त 'सिद्धांत सूत्रे' हा या संप्रदायाचा आद्य श्रुतिग्रंथ. अगोदर नमूद केल्याप्रमाणे श्रीचक्रधरोक्त वाक्यांचे हे संकलन आहे. ही वाक्ये सूत्रात्मक आहेत. विद्यमान सूत्रपाठात १६ प्रकरणे असली तरी संप्रदायात मात्र १२ प्रकरणांचा सूत्रपाठ प्रमाण मानण्यात येतो. पहिली चार प्रकरणे प्रास्ताविक स्वरूपाची असल्याकारणाने संप्रदायात त्यांचा विचार होत नसावा. या सूत्रांवर उत्तरकालीनांनी स्थल, बंध, हेतुस्थळ अशा नावांनी ओळखली जाणारी अनेक परीची भाष्ये व विवरणे रचली आहेत. ही सर्व गद्यात आहेत. या सूत्रांचा अर्थनिर्णय कसा लावावयाचा यासंबंधी श्रीचक्रधरांनी सांगितलेली अर्थनिर्णय पद्धती अनेराजवास याने संस्कृत भाषेत लिहिली आहे.[१८] अनेराज हा केशवबासाचा वडील भाऊ आणि पंथातील एक मान्यवर पंडित. 'लक्षणरत्नाकर' या नावाने विख्यात असलेल्या या ग्रंथावर पुढे अनेक टीपा-भाष्ये मराठी भाषेतून लिहिण्यात आली. श्रुतीच्या अर्थ-निर्णयार्थ वैषयिक आणि मीमांसक यांनी सूत्रबद्ध रचना केली. त्याच प्रमाणे महानुभाव श्रुतींचा अर्थ लावण्याची ३२ लक्षणे 'लक्षणरत्नाकर' या संस्कृत ग्रंथात आली आहेत. या लक्षणातील परिभाषा मीमांसकाची असून काही लक्षणे गौतमधर्मसूत्रे व जैन सूत्रग्रंथ यांतून घेतलेली आढळून येतात.[१९]

श्रीचक्रधरोक्त सूत्रांपैकी लक्षण, आचार आणि विचार या तीन प्रकरणांची "बांधणी" मूळ सूत्रे व भाष्य यांसह सिद्धांते हरिव्यास याने शके १३२५ त केली. या त्रिस्थळांवर देखील 'लापिका', 'प्रकरणवश', 'वचनसंबंध' आणि 'आचार' अशा स्वरूपाची भाष्ये आढळतात. मूळ तत्त्वज्ञानाची बैठक ढळू न देता अनेक पंडितांनी

आपल्या पांडित्याचा आणि मराठी भाषेच्या वैभवाचाही आविष्कार या टीका-भाष्य-विवरणपर ग्रंथांतून केला आहे. उदाहरणादाखल सूत्रपाठातील 'महावाक्य' हे प्रकरण घेऊ :

> 'जीव प्रपंचाव्यतिरिक्त सच्चिदानंदरूप परमेश्वरू एकु आति। तो सर्वशक्ति-युक्त ॥ १ ॥ नित्य : केवळ : अनादि अविधायुक्त वस्तु एकु आति : ते जीव शब्दें बोलिजे ॥ २ ॥ विश्वरूपाचिये ठाउनि मुक्तिकापर्यंत प्रपंचु बोलिजे ॥ ३ ॥ व्यतिरिक्त म्हणिजे वेगळा ॥ ४ ॥ सत् शब्दें ब्रह्म बोलिजे : चित् शब्दें माया बोलिजे : आनंद शब्दें ईश्वरू बोलिजे : ब्रह्म, माया, ईश्वरू ऐसा त्र्यंशु परमेश्वरू : अेकु अति ॥ ५ ॥ शक्ति शब्दें सकळहि देवता : सकळहि धर्म : ज्ञान : विज्ञान : हे सर्व शक्ति शब्दें बोलिजेति ॥ ६ ॥ युक्त म्हणिजे म्हणिजे एतत्सहित ॥ ७ ॥'[१०]

महावाक्य प्रकरणातील या सात सूत्रांचे निरीक्षण केले असता असे आढळून येईल की, पहिल्या तीन सूत्रांत ईश्वर, जीव आणि प्रपंच यांचे सूत्रात्मक निरूपण असून नंतरच्या चार सूत्रांत पहिल्या तीन सूत्रांचे जवळपास भाष्य आहे. शेवटची चार सूत्रे पदशः टीका केल्यासारखी वाटतात संप्रदायाचे तत्त्वज्ञान नव्याने मांडावयाचे असल्याने अशा सूत्र-भाष्यांची मांडणी अपरिहार्य होती.

सूत्रांशी संबंधित असलेले दुसरे संकलन दृष्टांतपाठाचे. पंथाचा तत्त्वविचार चक्रधरांनी प्रसंगी गोष्टीरूपाने सांगितला आहे. हेच ते लीळाचरित्रात आलेले दृष्टांत. ते कधी संपूर्ण गोष्टीच्या रूपात तर कधी केवळ नाममात्र उल्लेख करून आले आहेत. हे दृष्टांत एकत्रित करून व नाममात्र उल्लेखातील गोष्टी पूर्णपणे देऊन त्यांस आधारभूत असलेल्या सूत्रांचा संदर्भ कसा लागू पडतो याचे स्पष्टीकरण दृष्टांतपाठात आढळते. पुढील उदाहरणावरून ग्रंथाचे स्वरूप स्पष्ट होईल.

> **स्वप्नांचा दृष्टांत** ॥ सूत्र ॥ चेइलेया स्वप्न लटिका : तैसा अपरोक्षज्ञानी प्रपंचु मिथ्या ॥ ॥ **दृष्टांतु** ॥ कव्हणी ऐकु निजैला असे : तो स्वप्न देखे : म्हणे मी वाघें खादिला : ऐसें दुःख भोगी : हस्ती वोळघला : ऐसें दुःख भोगी : चेवो ये तो दोन्ही नाहीं : परि सुख-दुःख भोगिलें ते काइ लटिके : ना : सुख-दुःख भोगिलें ते काइ लटिकें : ना : सुख-दुःख भोगिलें ते सत्य : तर वाघें खादिला हें लटिकें : हस्ती वोलघला हें लटिकें : परि सुख - दुःख भोगिलें तें साचचि ॥
>
> ॥ **दार्ष्टान्तिक** ॥ तैसें बाई प्रपंच लटिका : ना : तेणें करूनि क्रिया करिजत असिजे ते साचचि : तरि प्रपंचु साच : ना : तो अपरोक्षज्ञानीं जाणिजे : प्रपंचु लटिका म्हणौनि ॥ [११]

वरील उताऱ्यातील दार्ष्टांतिक केशोबासाचे, प्रारंभीचे सूत्र श्रीचक्रधरोक्त व मध्यंतरी आलेला दृष्टांत कधी पूर्ण रूपात तर कधी सूचक स्वरूपात श्रीचक्रधरांनी

सांगितलेला. सूत्र आणि दृष्टांत हे 'लीळाचरित्रात' येऊन गेले आहेत. सूत्रांची बांधणी त्रिस्थळात झाल्याचा उल्लेख येऊन गेला आहे. या त्रिस्थळीद्वारे महानुभाव पंथाच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार कसा होता असे हे पाहणेही उद्‌बोधक ठरते. मूळ सूत्र (श्रीचक्रधरोक्त), लापिका, आचार, वचनबंध आणि आचारस्थळ असा विवरणाचा क्रम असतो. 'कानडदेशा तैलंगदेशा न वचावें : महाराष्ट्रीं असावें' ही चक्रधरांची विख्यात सूत्रे. यांतील 'महाराष्ट्रीं असावें' या सूत्रावरील हे विवरण पहा :

> '**लापिका** तदि विषयदोष असे तयासि न वचावें : ना महाराष्ट्रावांचौनि भलतैयाहि न वचावें ॥ **आचार** ॥ येथें महाराष्ट्रीं वसविलें येणें करूनि कण्हणाचि देशा न वचावें ॥ **वचनसंबंध** ॥ मा तरि कानडदेशा तैलंगदेशा न वचावें ऐसें म्हणितलें तरि एणें करूनि जेतुले कर्मभूमिमध्ये देश असत : तेतुलेया देशासि असावें ऐसा संकल्प संचार होत असे : म्हणौनि तत्परिहारार्थी सर्वज्ञें भणितेलें : महाराष्ट्रीं असावें.... ''
>
> **आचारस्थळ** ॥ [या भाष्यात महाराष्ट्राचे थोरपण अनेक प्रकारे सांगण्यात आले आहे. महाराष्ट्रातील अन्नोदक आणि पाऊस व वनस्पती देखील सात्त्विक आहेत. वर्णन करून शेवटी—]
>
> धर्म सिद्धी जाए तें महाराष्ट्र ॥ '' २२

१६. या ठिकाणी महानुभाव पंथाच्या साहित्यातील एका प्रवृत्तीचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. ही प्रवृत्ती आहे मराठी ग्रंथांचे संस्कृत रूपांतर करण्याची. वस्तुतः मराठी हीच आपल्या पंथाची भाषा आहे असे श्रीचक्रधर आणि पहिले आचार्य नागदेव यांनी आवर्जून सांगितले आहे. तरीही केशिराज बास आणि अनेराज बास यांनी संस्कृत भाषेतून रचना केली आहे. केशिराज बासांनी लीळाचरित्राचा काही भाग 'रत्नमाला-स्तोत्र' या नावाने संस्कृत भाषेत रूपांतरित केला आहे तर अनेराज बासांनी श्रीचक्रधरांनी निरुपिलेले अर्थनिर्णयविषयक शास्त्र संस्कृत भाषेत ग्रंथित केले. हे ग्रंथकार संस्कृत भाषेचे थोर पंडित होते म्हणून हे सहजगत्या घडले की शास्त्रीय ग्रंथ संस्कृत भाषेत असल्याविना ग्रंथाला आणि शास्त्रालाही प्रतिष्ठा लाभत नाही या समजुतीने हे प्रयत्न झाले ?

दुसराच पर्याय अधिक संभवनीय वाटतो. पूर्वेतिहासात त्याला आधारही सापडतो. प्राचीन काळातील जैन आणि बौद्ध या दोन्ही पंथांनी प्राकृत भाषा हीच आपल्या पंथाची भाषा मानली होती. तदनुसार निरनिराळ्या काळांत व प्रदेशांत रूढ असलेल्या प्राकृतांतून जैनांचे व बौद्धांचे धर्मविषयक साहित्य निर्माण झाले. तथापि या पंथांच्या अनुयायांनी संस्कृत भाषेतदेखील बरीच ग्रंथसंपत्ती निर्माण केली आहे.[२३] ग्रंथ संस्कृत भाषेत असल्याविना त्यास प्रतिष्ठा लाभत नाही याच समजुतीतून ही निर्मिती झाली

आहे. हीच धारणा महानुभाव पंथीयांच्या संस्कृत ग्रंथरचनेस प्रेरक ठरली असावी. अशा प्रयत्नांस एका परीने 'प्रतिलोम' टीकापद्धती असेच म्हटले पाहिजे २४

१७. 'लक्षणरत्नाकर' अथवा 'द्वात्रिंशल्लक्षण' हा ग्रंथ कोणत्याही कारणांमुळे का असेना संस्कृत भाषेत रचण्यात आला. अर्थनिर्णयासारखे महत्त्वाचे शास्त्र आणि तेही श्रीचक्रधरांच्या मुखातून प्रकट झालेले असल्याने या संस्कृत ग्रंथावर अनेक टीका-भाष्ये मराठीतून होणे अपरिहार्य होते. या ग्रंथाच्या काही भागावर असलेले पंडित भीष्माचार्य यांचे 'पंचवार्तिक' हे मराठी भाष्य प्राचीनतम असून ते तेराव्या शतकातले आहे. दुसरी 'बत्तीसलक्षणी टीप' ज्ञानेश्वरोत्तरकालीन आहे, असे कै. नेने यांचे मत आहे.२५ याच प्रकरणावर लिहिलेली 'बालबोधिनी' टीका शके १६६४ त लिहिलेली आहे. या तिन्ही टीकांतून एकाच लक्षणावर करण्यात आलेले भाष्य पुढे देण्यात येत आहे. भिन्नकाळातील टीका-भाष्यपद्धती कोणत्या प्रकारची होती याचा तुलनात्मक अभ्यास तेणेकरून सुलभ व्हावा. शिवाय तेराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंतचे टीका-भाष्यात्मक गद्य कसे विकसत गेले याचीही कल्पना येईल.

लक्षणरत्नाकरातील मूळ सूत्र : काकुलक्षण

" शब्दोत्सर्गात अन्यथा करणोक्तः काकुः । यथा सामान्याभ्यर्थनेन निमंत्रणे नोक्तम् । द्वितीयं वेश्यागृहपरिहासम् ॥ १३ ॥ "२६

या लक्षणावर **पंचवार्तिकात** आलेली टीका अशी :

'शब्दाचेनि उत्कर्षे मुख्यार्थासी त्याजौनि अन्यथा कारणालागीं जे उक्ति उच्चारिजे तेयातें काकुसूत्र बोलिजे : यथा ऐसा विखा बापुडा तो सेविला सातां आपुलिया मोहरा न करी : ना मोहरा करी : अन्यथाकरण असे भणौनि । यातें काकुसूत्र बोलिजे ॥ "२७

याच सूत्रावरील **'बत्तीसलक्षणी टीप'** :

प्रतिज्ञा प्रमाणीं कदाचित् शब्दासारिखा अर्थ बुझे, न लभे, हें काकुलक्षण ॥ ज्ञानें जाणिजें : भणौनि : तयातें ज्ञान होआवेसि लागे : भणौनि : विरोध परिहारा अनंतरें काकुलक्षण : शब्दाचेनि उत्कर्षें कां उत्सर्गें यथार्थातें त्यजुनि : अन्यथाकरणालागिं जे उक्ति विचारिजे ते काकुसूत्र बोलिजे ॥ तथाहि संनिधानि शब्दाचेनि उत्सर्गें परमेश्वरासि एकु बोलतां जीवें आणिक बुझावें लागे : ते काकुसूत्र : नेत्रमुखकरानुकारसहित हर्षे का विषादें शब्दाचें जें दीर्घत्व तें शब्दोत्कर्ष बोलिजे : जैसा परमेश्वरें शब्दु उच्चारिला तैसा अर्थु तेथ न लभे : भणौनि तो उच्छेदौनि : आनिकु कीजे । ते उत्सर्गु बोलिजे ॥ "२८

'बालबोधिनी' या टीकेतील स्पष्टीकरण असे :

'अथ काकुलक्षण : अगाध : स्वरूपींचें ईश्वरीं प्रतिबिंबलें : यातें अंतरचक्र

बोलिजे : ब्रह्मतें नित्य, सत, शाश्वत : सर्वधर्मशून्य : तरि त्याचा ठायिं होणें : जरि कर्तृत्व वर्त्ते : तें कां पां : ब्रह्म सत्य : नित्य शाश्वतकर्त्ते यातव विरोध परिहार : कैसें तें काकु : यथा भणिजे : प्रार्थन असता निमंत्रणोक्ति : एक सत्य नसता सत्यासारिखें बोलिलें : तें काकु : तथा उत्कर्षण तें शब्दें आलविजे तें काकु ॥ '२९

एकाच लक्षणावरील भिन्न कालांतील भाष्यांवरून महानुभावीय साहित्यात पंडिती परंपरेचा विकास कसा घडत गेला हे निदर्शनास येईल. संस्कृत टीकाभाष्यांतून आढळून येणारे युक्तिवाद, अर्थनिर्णयपद्धतीच्या तर्कन्यायादिकांचा केलेला अवलंब, पदांचे भिन्नार्थ, भिन्न वचनांची संगती, संदर्भ आणि संकेत यांचा पांडित्यपूर्ण उकल, पद पदार्थांचा केलेला विचार इत्यादी विशेष या भाष्यकारांनी कसे आत्मसात केले होते याची कल्पना या भाष्यांवरून येईल. मराठी धाटणीच्या पडद्यातूनही या भाष्यकारांचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व आणि शास्त्रज्ञान यांचा परिचय घडतो.

१८. दामोदर पंडिताच्या चौपद्यांवरील मराठी भाष्यातही भाष्यकारांनी अशाच प्रकारचे पांडित्य दाखविले आहे. दामोदर पंडिताचे 'वछाहरण' हे काव्य शके १२३८ त रचलेले. याच सुमारास त्याने साठ चौपद्या हिंदी व मराठी या दोन्ही भाषांतून रचल्या. या रचनेस पंथात 'स्मृतितुल्य' मान्यता आहे. या चौपद्यांवरील भाष्ये अद्याप अप्रकाशित आहेत.[३०] भाष्यपद्धतीची कल्पना यावी या हेतूने एका चौपदीवरील तीन भाष्ये पुढे देण्यात येत आहेत. त्यांपैकी पहिले शके १४०० च्या सुमाराचे व दुसरे १६ व्या शतकातले असून तिसऱ्या भाष्याचा काल आणि कर्ता मात्र अज्ञात आहेत.

दामोदर पंडित विरचित पुढील चौपदी भैरव रागातली असून ती हिंदी भाषेत रचण्यात आली आहे. या कवीच्या मराठी भाषेतील चौपद्या उपलब्ध असताना हिंदी भाषेतील रचनेची निवड हेतुपूर्वक करण्यात आली आहे. प्राचीन मराठी कवींनी हिंदी भाषेत रचना करून फार मोठे सांस्कृतिक कार्य केले आहे. हिंदी भाषेतल्या अगदी पहिल्या कवींत नामदेव-दामोदर पंडित यांची गणना होते. हिंदी काव्याची धारा महाराष्ट्राच्या क्षेत्रात उगम पावली हे अभिमानास्पद सत्य निदर्शनास यावे, या हेतूने ही निवड झाली असली तरी मुख्य उद्दिष्ट टीकाभाष्यपद्धतीचे गद्य लक्षात घ्यावे हे आहे.

नवनाथ कहे सो नाथपंथी : जुगति कहे सो जोगी : विश्व कहे सो बैरागी : कही जे ज्ञान बुझे सो योगी ॥ ध्रु० ॥ तुम्हे सुने हो सिधांत गुरुवा : सारा ग्यानपंथ हमारा : सून्य निरसून्य काहु कें कहिजति : ब्रह्मादि न जाणती पारा ॥ १ ॥

या चौपदीवरील भीष्माचार्यांची मराठी टीका अशी (शके १४००) :

महावाक्ये निरूपणिं प्रथम चौपदार्थाचिये व्यवस्थेचें ज्ञान होआवें भणौनि

'नवनाथ कहे सो नाथपंथी' या चौपदिया निरुपिताती : तुम्हे सुनो हो....अहो गुरुराया भणिजे अहो गुर्विदवादी हो तुम्हे सारा सिद्धांत सुनो : आन हमारा ज्ञानपंथ सुनो : भणिजे आमचा अवघा सिद्धांत आयिका : आन हो, भणिजे अहो गुरुराया; तुम्ही ऐसे भणा जे नीरशुन्यापासुनि शून्य जालें : शुन्यापासुनि अवघें रचिलें : तरि सुन्य आणि निरशुन्ये एसें कहुकु म्हणजे कासियासि म्हणिजे : आन अहो गुरुवा, तुम्ही ऐसे म्हणाल जे शून्यवादाचें प्रतिपादक योगशास्त्र तें ब्रह्मादिकीं निरुपिलें : तर तयासि काही आन नाहीं; तर तो ब्रह्मादिक पारा : भणिजे तेतुकीये मर्यादेसि न जाणंति भणिजे नेणति : तथाच – [एक संस्कृत श्लोक यानंतर आला असून तो अत्यंत अशुद्ध असल्याने देण्यात आला नाही.]

चौपदीच्या पहिल्या कडव्यावरील उपरोक्त भाष्य केवळ पदपदार्थावर केलेली टीका नसून भाष्यकार भावार्थही देतो. सोळाव्या शतकातील पुढील टीका पदपदार्थांवर भर न देता भावार्थ सांगणारी आहे. या भावार्थात मूळ चौपदीतील पुढची तीन कडवी (ही चौपदी एकूण चार कडव्यांची आहे) येऊन जातात :

'सुमोहो : आयिक : सिद्धांत गुरुवा : स्वसिद्धांताचे आचार्य हो : मुख्य ज्ञानपंथ तो आमुचाचि : सकळहि पंडित म्हणति...शिव तो आनंदस्वरूप ईश्वर : शकति : मायासम युकति : जेथ अंश समवाय : – मा तुज पुसतो : श्रुत शास्त्रपंडित असति तरि प्रतिसृष्टि : भावें फलच्युतित्वें इंद्र किती वेळ आला : आन वतिस मुख का कवण जुग तुमे पाया : अग्नि : प्रजापतिश्चैव भौतिको दिव्य भौतिकाः । हिरण्यगर्भो विरंचिस्त्वव्यक्त : सर्व वो [+ +] तथा....

मुळात चौपद्यांची रचना नाथपंथीय तत्त्वज्ञानाचे खंडन करण्याच्या हेतूने झाली आहे. या दुसऱ्या टीकेत ही धारणा स्पष्ट दिसते. पांडित्यप्रदर्शन त्यामुळे सोपे झाले आहे. या टीकेत भावार्थ तरी आला आहे. पुढील अनाम टीकेत तर केवळ पहिल्या कडव्याचा पदपदार्थ आढळेल.

'नाथ ह्याचें नाम खंडन : आन जयांसि नवाही नाथांचें ज्ञान : असे : नवाही खापणियाचें : जुगति : यक्ति जाणे तो योगी : विस्व : विस्व जें चराचर : यावर विरमता तो वैरागी : ऐसे अवघे ते आम्हीचि : येरू नेणति तयासि : ज्ञान नाहिं म्हणोनि ॥

१९. शके १२०० ते १४०० या कालखंडातील गद्याचे स्वरूप विवेचन करीत असताना पुढच्या काळातील गद्याचेही अंशदर्शन घडले. महानुभाव पंथाच्या साहित्यात तेराव्या शतकापासून सोळाव्या शतकापर्यंत टीकाभाष्यांची परंपरा चालू होती हे या निमित्ताने सहजच निदर्शनास आले. काळाचा अनुक्रम चालू ठेवावयाचा म्हणजे शके १४०० नंतरच्या गद्याचा परामर्श घेतला पाहिजे. शके १४०० नंतर शंभर-दीडशे वर्षे



गद्य साहित्यात विशेष भर पडली आहे, असे दिसून येत नाही. अस्थिर राजकीय वातावरणाचा तो परिणाम असण्याची शक्यता आहे. शके १५१४ च्या सुमारास रचण्यात आलेल्या एका जैनपंथीय ग्रंथाचा उल्लेख मात्र महाराष्ट्र सारस्वताच्या पुरवणीत आला आहे. मराठी साहित्यातील जैनपंथीय प्रवाहाचे संशोधन अद्यापही पूर्णपणे झालेले नाही. डॉ. अक्कोळे यांचा ग्रंथ आणि इतरही काही साहित्य अलीकडे प्रसिद्ध झाले आहे. त्यावरून तर या प्रवाहाचे मूलगामी संशोधन अधिक व्हावयास पाहिजे हे जाणवते. या पंथातल्या कवि-लेखकांच्या प्राचीन संहिताही फार थोड्या प्रसिद्ध झाल्या आहेत. ही परिस्थिती लक्षात घेता शके १५१४ हा जैनसाहित्याचा प्रारंभकाळ आहे, असे गृहीत धरता येत नाही. मराठी भाषेच्या गर्भावस्थेपासून महाराष्ट्रात जैनपंथ नांदत होता. मराठी भाषेच्या पहिल्यावहिल्या जन्मखुणा प्राकृत भाषेतील जैनसाहित्याने सुरक्षित ठेवल्या आहेत. मराठी भाषा साहित्यात प्रतिष्ठित होण्यापूर्वी शेजारच्या कन्नड भाषेत जैनपंथीय साहित्याची निर्मिती विपुल प्रमाणात झालेली होती. या बाबी लक्षात घेता व महानुभाव पंथाच्या स्थापनेपूर्वी महाराष्ट्रात जैनपंथ नांदत होता हे सत्य ध्यानात ठेवून या पंथात मराठी वाङ्मय सिद्ध झाले असले पाहिजे, असे अनुमान करता येते. आज ते साहित्य उपलब्ध नाही एवढेच. म्हणूनच शके १५१५ मधील गुणकीर्तीचा 'धर्मामृत' हा ग्रंथ जैनपरंपरेतील पहिला मराठी ग्रंथ आहे, असे मानता येत नाही.

'धर्मामृत' हा ग्रंथ सूत्रात्मक असून जैनपंथाच्या आचारधर्माचे विवरण करणारा आहे.[३१] 'परमहंसकथा' हा चंपू पद्धतीने रचलेला दुसरा एक ग्रंथ शके १५४९ त रचल्याची नोंद आढळते. गुजराथी ग्रंथाच्या आधाराने हा ग्रंथ लिहिण्यात आला आहे, अशी माहिती 'सारस्वतकार' देतात.[३२] हे दोन ग्रंथ अनुक्रमे सूत्रात्मक व कथात्मक गद्यपरंपरेचे शके १५०० च्या आसपासचे अस्तित्व पटवितात.

२०. पुढच्या दोन-अडीचशे वर्षांचा म्हणजे शके १५०० ते १७४० पर्यंतचा कालखंड मराठी गद्याचे सुवर्णयुग म्हणून नोंदविता येण्यासारखा आहे. या कालखंडात महानुभाव आणि तदितर या दोन्ही पंथांतील लेखकांनी गद्यसाहित्य समृद्ध केले आहे. महानुभावपंथीयांनी प्रारंभापासून भौतिकशास्त्रांकडे लक्ष पुरविले नाही. त्यांचा भर अध्यात्म आणि आचारधर्म यांवरच होता. महानुभावेतर गद्य साहित्यात मात्र या कालखंडात विषयाची व्यापकता आणि आकृतिबंधाची विविधता आढळून येते. यापूर्वी वैद्यक आणि ज्योतिष या शास्त्रांवरच महानुभावेतर साहित्यात ग्रंथरचना झालेली होती. अध्यात्मपर लेखन पद्यातूनच व्हावयाचे असा जणू संकेतच रूढ झालेला होता. महानुभावपंथातील साहित्यात प्रारंभ काळापासूनच अध्यात्मशास्त्रावर गद्यग्रंथ रचण्यात आले होते. महानुभावेतर साहित्यात या कालखंडात अध्यात्मसाहित्य मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. ही निर्मिती टीकाभाष्यात्मक तशीच स्वतंत्र विवेचनाच्या रूपात झाली आहे. अध्यात्मपर पद्य साहित्य प्रचलित असतानाही या विषयाच्या विवरणार्थ गद्याच्या माध्यमाचा उपयोग व्हावा, ही या कालखंडातील महत्त्वाची प्रवृत्ती आहे. गद्याच्या

माध्यमातून तत्त्वचर्चेची आवश्यकता भासावी एवढे महत्त्व अध्यात्मविद्येस या काळात आले होते असा त्याचा अर्थ होतो. संस्कृत विद्येचा लोप या काळात झाला असे मात्र नव्हे. केवळ पंडितांनाच रस वाटावा अशी अध्यात्म विषयावरील चर्चा समजून घेण्याची प्रवृत्ती आणि जाण साधारण समाजातदेखील उत्पन्न झाल्याचे ते लक्षण वाटते. या विषयाची चर्चा मराठीतून व्हावी अशी आवश्यकताही पंडितांना वाटत असल्याची ही निशाणी मानता येईल. साधुसंतांच्या साहित्याचा प्रसार दीर्घकाळ झालेला होता. ज्ञानपूर्वक कर्म आणि भक्ती या तत्त्वांचा प्रसार संतसाहित्यातून झालेला असल्याने अध्यात्मशास्त्र तसे अपरिचित राहिलेले नव्हते. संतवाङ्मयाच्या संस्कारांमुळे संस्कृत भाषेचे ज्ञान नसणारांचाही अध्यात्मविद्येत प्रवेश झालेला होता. या जागृतीमुळेच कदाचित अध्यात्मशास्त्राच्या तत्त्वचर्चेस चालना मिळून गद्यसाहित्याच्या निर्मितीत त्याची परिणती झाली असावी.

२१. तसे पाहिले तर हा कालखंड महाराष्ट्राच्या इतिहासात अनेक कारणांनी कसोटीचा बनलेला होता. परधर्म आणि त्याचे राजकीय आक्रमण यांच्या आघातामुळे निर्माण झालेली स्तिमितता हळूहळू ओसरत चाललेली होती. प्राप्त परिस्थितीत समाधान मानणारा वर्ग सर्वच काळात मोठा असतो. तसा तो या कालातही होता. मुसलमानी दरबाराची इमाने-इतबारे सेवा करणारे पराक्रमी मराठे सरदार आणि कारकुनी पेशा स्वीकारून उदरभरण करणारा पांढरपेशा वर्ग परिस्थितीशी मिळते घेण्याचा प्रयत्न कसोशीने करीत होते. तरीही स्वधर्मावरील श्रद्धेमुळे त्यांना या वातावरणात मानसिक स्वास्थ्य लाभणे शक्य नव्हते. धर्म आणि जीवितसाफल्य यांची अभेद्य सांगड पारंपरिक श्रद्धेने घालून दिलेली असल्याने धर्माचरणाच्या आड येणारे अडसर दूर कसे सारावेत याची चिंता करणारे त्या काळात अगदीच अपवादात्मक नसावेत. त्यामुळे धर्माचरण आणि धर्मरक्षण परस्परसंलग्न असण्याची जाणीव वाढीस लागणे स्वाभाविक ठरते. या कालखंडात रचण्यात आलेल्या आख्यानांतून या जाणिवेचा ध्वनी कलात्मक पद्धतीने सूचित झालेला आढळतो. संत एकनाथ, मुक्तेश्वर आणि समर्थ रामदास यांच्या काव्याचा अभ्यास या दृष्टीने उद्बोधक ठरेल.

केवळ अपंडितांना बोध करणे हे मराठी साहित्याचे उद्दिष्ट कालाच्या निकडीने अपर्याप्त ठरविले. त्यातून धर्मरक्षणाची जाणीव जागृत करणारे साहित्य उदयास आले. महाभारतातील आख्याने आणि रामायणाचे निरनिराळे अवतार मराठी पद्यात याच कालात आढळावेत हा केवळ योगायोग म्हणता येणार नाही. याच प्रवृत्तीचा आविष्कार बखरसाहित्याच्या रूपात गद्यातूनही झालेला आहे. या साहित्याची प्रेरणा आणि स्वरूप पुढे स्वतंत्र प्रकरणात विवेचावयाचे असल्याने या स्थळी केवळ युगधर्माचा साहित्यावर होणाऱ्या परिणामाची परिणती बखरसाहित्यात कशी झाली एवढे ध्यानात यावे एवढ्यापुरता हा उल्लेख केला आहे.

२२. धर्मरक्षणाची प्रेरणा घेऊन गद्य व पद्य साहित्याची निर्मिती हा या कालखंडाचा विशेष आहे, तसाच आणखी एक विक्रम या काळात घडला आहे त्याची नोंद

घेतली पाहिजे. पाश्चात्य राष्ट्रातील विद्या आणि भाषा यांच्याकडे आमचे लक्ष ब्रिटिश राजवटीनंतर गेलेले असले तरी भारतीय भाषा आणि संस्कृती यांच्याकडे पाश्चात्य राष्ट्रातील पंडितांनी फार अगोदरपासून लक्ष पुरविले होते. आपल्या धर्माचा आणि संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी त्यांनी भारतीय भाषांचा अभ्यास केलेला असला तरी भारतीय भाषांतील साहित्यात लक्षणीय भर घालण्याचे कार्य या प्रयत्नांतून घडले आहे हे नाकारता येत नाही. फादर स्टिफेन याने रचलेले 'क्रिस्तपुराण' याच दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. हे पुराण ओवीबद्ध असल्याने त्याचा विचार या ग्रंथात अप्रस्तुत ठरेल. तथापि, या पुराणास त्याने लिहिलेली गद्य प्रस्तावना भाषेच्या आणि तत्कालीन वाङ्मयीन प्रवृत्तीच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. या वाङ्मयीन प्रवृत्तीची दखल घेतलीच पाहिजे. संत एकनाथ यांच्या निर्वाणानंतर वीस वर्षांनी ख्रिस्तवासी झालेला हा ग्रंथकार या पुराणात योजलेल्या भाषेसंबंधाने पुढील माहिती देतो :

> 'हें सर्व मराठी भासेन लिहिलें आहे. हेया देसीचिया भासांभीतुर ही भास परमेस्वराचेया वस्तुनिरोपूसि योग्य ऐसी दिसलि म्हणउनु पण सुध मराठी महिमा लोकांसि न कळे देखुनु हेया पुराणाचा फळु बहुतां जनांसि सुफुलु होउंसि, काये केले, मागिलेया कवीस्वरांची बहुतेकें अवघडें उत्तरें सांडुनि सांपुचेया कवीस्वराचिये रितु प्रमाणें आणियेकें सोपी ब्राह्मणाचे भासेचिं उत्तरे ठाइं ठाइं मिसरित करूनु कवित्व सोपें केलें. याउपरि परमेस्वराचिये कृपेतव उदंडा लोकाचे आरत पूर्ण होइल; आणि जे केवळ येखादे वेळां पुर्विलेला कवित्वाचा स्लुंगारू वा बरवी भास अद्यापी आठवताती ते हे कवित्व वाचुनु संतोसु मानिति आणि फावे तो फवु मागिती, कां मागितलेया कवित्वाचेआं स्थानीं आणि येक कवित्व देतो तेया होउनु फलस्त सुफल....'[३३]

मूळ 'क्रिस्तपुराणात' योजण्यात आलेली मराठी भाषा आणि प्रस्तावनेतील गद्य यात बरेच अंतर आहे. 'क्रिस्तपुराण' प्राचीन मराठी काव्याच्या भाषेचा स्वीकार करते, तर ही प्रस्तावना मात्र तत्कालीन बोलीत लिहिलेली दिसते. हे गद्य पंडिती वळणापेक्षा निराळे आहे. एकनाथकालीन बोलीचे स्वरूप अधिक स्पष्ट व्हावे या हेतूने याच प्रस्तावनेतून आणखी एक उतारा उद्धृत करण्यात येत आहे :

> 'जैसें रात्रिचे प्राहार सरलेया सूर्यु उदेवो करूनु आपुलीं किरणें दाहीं दिसां विस्तारिताये तंव काळोखाहोउनु उजवाडु वरवा काये ऐसें कवणुइ न पुसे, मनीं दुभावो न धरी, तैसेंचि सातां बांजेलाचा उजुवाडु समस्ताचे दुस्टी फुडां ऐसा निटळु, झगमगितु निस्कलंकु दिसताये कीं, जो कवणु तेयाचे तेज न देखावेया आपुले डोळे बळिवाडे ढांपित नाहीं तो साद्रुस्ट देखैल. आणि मुखें उच्चारेल, तेयाचे उपमेन आणियेकी वस्तु ऐसि बरवी, निर्मळी, पवित्री, उतमी, संसारांतु न मेळे. म्हणउनु येरिकडे कोणुइ प्राणी केवडाइ नेणारू मुर्खु अल्पमतीचा

जाहाला तरि तेणें हेया पुराणांतु जिया अवघी, लटिकी वस्तु लिहिलेआ हाति तिया येकीवेले आइकिलेयावरि कवण मुळाचेआ निपजलिया तेया निवट्टूंसि अवघड नव्हेल.'[३४]

केवळ निर्मिती-प्रेरणेचा विचार केला तर संताचे साहित्य आणि उपरोक्त क्रिस्तपुराण एकाच धर्मप्रसाराच्या उद्दिष्टातून रचण्यात आले आहेत हे प्रत्ययास येईल. परभाषेतील ग्रंथावर आधारलेली आणि परभाषिक कवीने रचलेली कृती हा या काळातील साहित्यप्रवाहाचा विशेष या पुराणाच्या निमित्ताने लक्षात येतो. प्रस्तावनेतील गद्य आणि ग्रंथातील पद्य निराळे असल्याने एकनाथकालीन बोलीभाषेचे रूप समजून घेण्यास हे उतारे उपयुक्त ठरतील.

२३. 'क्रिस्तपुराणाने' निर्माण केलेली ही परभाषेतील ग्रंथावर मराठी रचना करण्याची परंपरा या ग्रंथानंतर सुमारे ५० वर्षांनी रचण्यात आलेल्या एका गद्य ग्रंथानेही चालविलेली दिसते. 'विवेकसार उर्फ मननग्रंथ' ही रचना 'यथा तैलंग' मराठी भाषेत झाली आहे. या ग्रंथाचा प्रथम परिचय कै. द. वा. पोतदार यांनी शके १६८९ मधील हस्तलिखित प्रतीच्या आधाराने करून दिला.[३५] शके १६२१ त या ग्रंथाचे लेखन झाले असावे असे त्यांचे मत आहे. राजवाडे संशोधन मंडळाने पुढे हा समग्र ग्रंथ प्रकाशित केला. संपादक श्री. गोगटे यांनी या ग्रंथाचा लेखनकाल शके १५५० ते १५६० असा मानला आहे.[३६] एका संस्कृत ग्रंथाच्या तेलुगू भाषेतील अनुवादावरून त्याचा मराठी अनुवाद झाला आहे हे या ग्रंथाचे असाधारण वैशिष्ट्य ठरते. प्राचीन काळात मराठी कवींनी हिंदी कवने रचल्याचे अनेक उल्लेख आढळतात. काही संतांनी एखाददुसरे पद तेलुगू-कन्नड या भाषांतून रचल्याचीही माहिती मिळते. परंतु परभाषेतील ग्रंथाचा मराठी अनुवाद हा प्रथमच या ग्रंथाच्या रूपाने आढळतो. यावरून स्वेतर भाषेचे प्रमुख प्राचीन कालखंडात अपवादात्मक का होईना अस्तित्वात होते असा निष्कर्ष निघतो. या अनुवादासंबंधाने सविस्तर माहिती या ग्रंथाच्या शेवटी आलेली असून ती टीपांत देण्यात आली आहे.[३७]

१६ वर्णकांच्या या ग्रंथात शांकर मतानुसार वेदांताचे विवरण आले आहे. वेदोपनिषदांचे आणि अन्य प्रमाण संस्कृत ग्रंथांचे आधार जागोजाग देण्यात आले आहेत. शंकराचार्यांच्या प्रतिपादन-पद्धतीप्रमाणे या ग्रंथात पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष करण्यात आले आहेत. मांडणी मात्र अत्यंत सुबोध आहे. वेदांतासारखा जटिल विषय अतिशय सोप्या भाषेत विवरण्यात आला आहे. त्यामुळे लेखकाच्या भाषाशैलीविषयी आदर वाटू लागतो. परिभाषेपासून ते विषयस्वरूपापर्यंत कोणतीही पूर्वतयारी वा गती नसलेल्या वाचकास विषय सहजगत्या ग्रहण करता येईल एवढे सुबोध विवरण या ग्रंथात आढळेल. 'संस्कृत अनधिकारी त्यास वेदांतशास्त्रानुसार अभिनिवेश होऊन' अशी लेखकाने केलेली प्रतिज्ञा खरोखरच यथार्थ वाटते. विवरण सुबोध झाल्याने पांडित्याची

उपेक्षा झाली असे मात्र समजण्याचे कारण नाही. काही उदाहरणांवरून या विशेषांचा बोध होऊ शकेल.

पांचभौतिक शरीराच्या घडणीत पंचकोश हा विषय येतो. आत्मा या पंचकोशाहून निराळा आहे असे वेदांत शास्त्र मानते. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि ज्ञानमय असे हे पाच कोश आहेत. यांना कोश का म्हणावयाचे याचे स्पष्टीकरण असे आले आहे :

> 'यास कोश म्हणून नाम किं निमित्त आलें म्हणून म्हणाल तरि कोशासारिखे आत्मा जो त्यातें न जाणणें ऐसें केलें म्हणून....तें कैसें म्हणाल तरि....दिले जें तिनें तरवार जें तीतें जैसें झाकिलें; गवसणीनें तंबुरियास जैसें झांकिलें; अग्यानें पुरूषास जैसें झांकिलें; तैसें पंचकोश जे तेही आत्म्यास झांकिलें म्हणून यास कोशनाम म्हणून आलें.... '[३८]

आत्मा निराळा असूनही या पाच कोशांशी एकरूप झाल्यासारखा का दिसतो याचे उत्तर 'अन्योन्याध्यास' या परिभाषिक संज्ञेच्या द्वारे देण्यात येत असते. या संज्ञेचे स्पष्टीकरण 'मननग्रंथात' पुढीलप्रमाणे मिळते :

> 'अन्योन्याध्यास कोणता म्हणाल तरि या वस्तूचे धर्म त्या वस्तूचे ठाईं आणि त्या वस्तूचे धर्म या वस्तूचे ठाईं भासणें, अन्योन्याध्यास. तो कैसा म्हणाल तरि.... मी मनुष्य, मी स्त्री, मी पुरुष, मी जन्मलों, मी आहे, मी वाढतो....मी संन्यासी, मी वानप्रस्थ, मी तैलंग, मी महाराष्ट्र, मी खानदेशीचा, मी वऱ्हाडिचा....हे आदिकरून अन्नमयकोशनिष्ठ धर्म अवघे आत्म्याच्या ठाईं भासताहेत म्हणून आत्मधर्म सच्चिदानंद जें तें माझें स्थूल शरीर वरवें भासताहे म्हणून अन्नकोशाच्या ठाईं आत्मधर्म दिसतो. या करितां अन्नकोशासि आणि आत्म्यासि अन्योन्याध्यास घडला. '[३९]

'विवेकसार ऊर्फ मननग्रंथ' या ग्रंथाचे संपूर्ण हस्तलिखित रामदासी मठात सापडले, ही संपादकांनी नमूद केलेली बाब विशेष लक्षात घेण्याजोगी आहे. समर्थांना वुटे टेकडीवर अंबेजोगाई येथे मुकुंदराजांचे दर्शन झाले आणि प्रसाद म्हणून मुकुंदराजांनी 'विवेकसिंधू' हा आपला ग्रंथ समर्थांना दिला व त्याचा प्रसार करण्याची आज्ञा केली, अशी कथा 'दासविश्रामधामात' येते. मुकुंदराज शांकरमतानुयायी, दासपंचायतनातील केशवस्वामी भागानगरकर हे मुकुंदराजांच्या शिष्यपरंपरेतले. हा इतिहास लक्षात घेता मुकुंदराजांनी चालविलेली शांकरमताची परंपरा रामदासी मठांतून सुरक्षित रहावी यात ऐतिहासिकदृष्ट्या सुसंगतीच दिसून येते.

२४. शांकर वेदांताचे प्रतिपादन करणारे एक गद्य प्रकरण शके १६६८ त रचलेले असून त्याचा कर्ता कल्याणीचा शिवरामस्वामी हा आहे. 'पंचीकरण' हे या प्रकरणाचे नाव. प्रकरण अगदी लहानसे आहे. परंतु, त्यात पिंड आणि ब्रह्मांड यांची

उत्पत्ती आणि महावाक्याद्वारे होणारा अद्वैतबोध हे विषय आले आहेत. वेदोपनिषदे आणि शंकराचार्यांचे ग्रंथ यांचे आधार जागोजाग 'संमतीसाठी' देण्यात आले आहेत. तत्पूर्वी शके १५७६ त रचलेला गरीबनाथकृत 'पंचीकृत विवेक' स्थूलमानाने पंचीकरणाचे विवरण करणारा असला तरी इतरही अनेक विषय त्यात आले असून रचना गद्यपद्यमिश्र स्वरूपाची आहे. हिंदी भाषेचाही उपयोग अधूनमधून आढळतो. नाथपंथाच्या प्रभावाचा तो परिणाम दिसतो. नाथपंथाचा आचारविचारांचे विवरण करताना ग्रंथकाराने अन्य मतांचाही परामर्श घेतला आहे. ग्रंथाची मांडणी गुरुशिष्य-संवादात्मक असून अध्यात्मशास्त्राशी संबंधित असलेल्या व नसलेल्या अनेक विषयांचा ऊहापोह या ग्रंथात आढळतो. एका परीने तो वेदांताचा ज्ञानकोश म्हणावा लागेल.

गरीबनाथाने कल्पिलेला शिष्य बराच चोखंदळ वाटतो. पुष्कळदा विषय स्पष्ट होऊनही त्याची समजूत पटत नाही. वाचेचे चार भेद गुरूने स्पष्ट केल्यानंतरही शिष्याची तृप्ती होत नाही. तो गुरुस प्रतिप्रश्न करतो :

> " शिष्य परिपृच्छतिः नाभिस्थानिं परा वाचा तरि काय नाभिहुनि हृदय खालुते ? कीं तयांहुनि कंठ खालुता ? की कंठाहुनि मुख खालुते ? हा विचारू काय सांगितला. परेपरता पर म्हणौनि परात्पर बोलिजे । तरि नाभिस्थानिं परा स्थापिता ऊर्ध्व जे स्थानें ते काय अधे नालिं ? तरिं स्वरूप काय ? लिंगस्थानी कीं गुदस्थानिं हा अर्थु कांहि कलतुचि नाहिं म्हणौनि विशद करौनि सांगावा । तदा सद्गुरुस्वामी आह । मग सद्गुरू म्हणति ऐक याचा विचारु...." ४०

वेदांतपर स्वतंत्र प्रबंधांच्या संदर्भात शके १५६० च्या सुमारासचा 'सुगमबोध' या प्रकरणाचा उल्लेख आवश्यक ठरतो. हे प्रकरण प्रस्तुत लेखकाने संपादित केले असून उस्मानिया विद्यापीठाने ते प्रकाशित केले आहे. पंचीकरण आणि महावाक्यविवरण हे या प्रकरणाचे विषय आहेत. अनंतानुचर असे ग्रंथकर्ता आपले नाव देतो. समर्थांचा तो प्रशिष्य आहे. ग्रंथारंभीच्या मंगलाचरणात त्याने प्रथम समर्थ आणि नंतर आपला गुरू अनंत यास वंदन केले आहे. ग्रंथाचा मूळ विषय आहे 'तत्त्वमसि' या महावाक्याचे विवरण. तदनुषंगाने पंचीकरणाचाही विषय आला आहे. अनंतानुचर याचा व्यासंग दांडगा दिसतो. त्याने काही थोडक्या स्थळी वेदांचे आधार घेतले आहेत. परंतु, उपनिषदांचे आधार मात्र विपुल आले आहेत. 'श्रुती'वाचून बोलावयाचे नाही असा जणू त्याचा संकल्प दिसतो. आचार्यांची भाष्ये आणि त्यांचे स्फुटग्रंथ यांचे आधारही त्याने मोठ्या प्रमाणात घेतले आहेत. काही स्थळी विद्यारण्यांची 'पंचदशी' देखील तो उद्धृत करतो. आपला ग्रंथ 'उपनिषदत्सार' अपरोक्ष 'ब्रह्मप्राप्तीचे साधन' असल्याची प्रतिज्ञा लेखकाने शेवटी केली आहे. समर्थकालीन समर्थ गद्याचा प्रातिनिधिक ग्रंथ या दृष्टीने 'सुगमबोध' महत्त्वाचा ठरतो.[४१] या ग्रंथाची भाषा आणि प्रतिपादनशैली ध्यानात यावी या हेतूने पुढील उद्धरण देण्यात येत आहे.

जीव आणि शिव यांतील अद्वैताचा बोध होण्यापूर्वी देह आणि आत्मा हे एकरूप नाहीत हे जाणून घेणे आवश्यक असते. देहांतर्गत आत्मतत्त्व इंद्रियातीत असते, यासंबंधीचे प्रतिपादन अनंतानुचर पुढीलप्रमाणे करतो :

> " आतां इंद्रिय मी नव्हे तो ऐसा । कर्णशुष्कुल्यवच्छिन्न नभोदेशातें आश्रयून शब्द ग्रहण करते तें श्रोत्रेंद्रिय । नखशिखापर्यंत त्वचेतें आश्रयून स्पर्श ग्रहण करिते तें त्वगेंद्रिय । काळ्या बुबुळातें आश्रयून रूप ग्रहण करिते तें चक्षुरिंद्रिय । जिव्हाग्रातें आश्रयून रस ग्रहण करिते तें रसनेंद्रिय । नासिग्रातें आश्रयून गंध ग्रहण करिते तें घ्राणेंद्रिय । या प्रकारें शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पांच विषय ययाचि सामान्यें करून ज्ञानसाधनता इंद्रियास आहे । विशेष ज्ञापकता ते अंतःकरणीं आहे । मी तो उभयांचा अवभासक साक्षी । मदध्यासें अंतःकरण विशेष ज्ञापक । इंद्रियें सामान्य विषय ज्ञानसाधन भासताहेत । किंचिज्ञ ऐसीहि भासताहेत । ते ऐसी । जें शब्द ग्रहण करितें तें स्पर्श ग्रहण करीत नाहीं । जें स्पर्श ग्रहण करितें ते रूप ग्रहण करीत नाहीं । मी साक्षी निर्विकारत्वें या सर्वेंद्रिय वृत्तीचा प्रकाशक आहे । .... या प्रकारें स्वक्रियाकर्मी परक्रियेचे ठाईं असमर्थता म्हणोन (इंद्रिये) विकारी । मी तों या पांचां कर्मेंद्रियांचा साक्षी निर्विकार ॥ " – **सुगमबोध, २६–२७.**

या ' सुगमबोधा 'सारखेच दुसरे एक ' वेदांतप्रक्रिया ' नाव असलेले हस्तलिखित उस्मानिया विद्यापीठाच्या संग्रहात असून ते अपूर्णावस्थेत आहे. याच प्रकरणाची समग्र-प्रत नागपुरचे डॉ. श्री. मा. कुलकर्णी यांच्या संग्रहात असून ग्रंथनाम मात्र ' वेदांत परिभाषा ' असे आहे. हा ग्रंथही टीकाभाष्यात्मक नसून अद्वैत वेदांताशी संबंधित असलेल्या विचारप्रणालीचे प्रतिपादन करणारा आहे. विवरणाच्या ओघात पंचीकरण हा विषयही येऊन गेला आहे. विदर्भ संशोधन मंडळाच्या १९८३ च्या वार्षिकात या प्रकरणाचा परिचय डॉ. कुलकर्णी यांनी करून दिला आहे. त्यांच्या मते ' सुगमबोध 'चा कर्ता अनंतानुचार हाच ' वेदांत परिभाषे 'चा कर्ता असून या प्रकरणाचा काल ते शके १६६५ ते १६८० असा मानतात.

स्वतःच पूर्वपक्ष करून त्याचे खंडन करण्यासाठी अभिप्रेत असलेला उत्तरपक्ष मांडावयाचा ही शांकरवेदांतात रूढ असलेली पद्धती या प्रकरणात आढळते. या प्रकरणात आलेली ' आशंका ' आणि ' समाधान ' यांची एक बाणगी.

> ' सर्वथैव आत्मा एक ऐसिया सिद्धांताचे ठाईं आशंका : येकास सुखदुःख जालें असतां सर्वांसहि असावें ॥ आणि एका देहीं जो व्यापार जाला तो दुसऱ्यास कळावा ॥ ऐसे आशंकाद्वय प्राप्त जाले असतां ॥ प्रथम आशंकेचें उत्तर ॥ जैसा अनेकां शरावोदकीं सूर्य प्रतिबिंबला असता प्रतिबिंब दिनमणि अनेक भासले ॥ तेथें कोणिह जलचांचल्ये चंचळ ॥ जल नैश्चल्यें निश्चल जैसे भास

ताहेत ॥ जलगत विकार प्रतिबिंबीं घडतेत । मुख्यबिंबी घडेनात ॥ ' **विसंवा.** १९८३, पृ. ११५.

प्रमाण ग्रंथांच्या आधाराने लेखन करूनही टीका-भाष्यपद्धतीचा अवलंब न करता शके १५०० पासून झालेल्या गद्यनिर्मितीचा आढावा वर आला आहे. या रचनांचे वैशिष्ट्य असे की, त्यातील भाषा स्पष्टपणे संस्कृत भाषेचे वळण घेऊन आलेली दिसते. वाक्यरचनेचे स्वरूप तर संस्कृत वाक्यासारखे असतेच. विशेषणे, संबंधी सर्वनामे व वाक्यांग आणि धातुसाधिते यांचे प्रयोगही संस्कृतच्या धर्तीवर आलेले आढळून येतात. संबंधी सर्वनामांनी जोडलेली दृष्टांत-उपमावाक्येदेखील वाक्यरचनेवरील संस्कृत भाषेचा प्रभाव दर्शवितात.

२५. या कालखंडातील टीकाभाष्य पद्धतीच्या ग्रंथांचे स्वरूप आता समजून घ्यावयाचे आहे. विषयाचे नावीन्य या दृष्टीने ' गंधवादावरील ' मराठी टीका प्रथम लक्ष वेधून घेते. कै. गोडे यांच्या एका संशोधनपर लेखात या टीकेचा परिचय आढळतो. या टीकेस आधारभूत असलेला मूळ संस्कृत ग्रंथ चौदाव्या शतकातला असून मराठी टीका पंधराव्या शतकातील आहे असे कै. गोडे यांचे मत आहे.[४२] ' भावना दीजे ', ' रसें वाटिजे ', ' तेणें भिजौनि कढै घालुनु ' यांसारखी रूपें व प्रयोग नाथपूर्वकालीन वाटतात. ज्योतिष आणि आयुर्वेद या दोन जीवनावश्यक शास्त्रावरील ग्रंथनिर्मिती अगोदरच्या काळात झाली. ही टीका या शास्त्रग्रंथांची परंपरा पुढे चालविणारी वाटते. कै. गोडे यांनी दिलेल्या टीकेच्या भागातून पुढील उद्धरण टीकेचे स्वरूप ध्यानी यावे या हेतूने दिले आहे :

> ' तोंडीं वेळणी झोंपणी दीजे । वेळणी सछिद्र । मोहर वरती कीजे । लोखंडाची अडणी, रानसेनी तथा कोळिसें भरिजे । काचपात्रिं सद्य तूप, धूप, म्लक्ष म्हणतां सिलारस, चोल्या म्हणतां लोवान, पातालयंत्रें काढिजे । अरण्य तुलसी म्हणतां वावरी, पीतगंध म्हणता आगरू, उल्विण म्हणतां लोवाणु—'

तसे पाहिले तर भौतिक शास्त्रावरील मराठी टीकाग्रंथांचा प्रारंभ मराठी गद्यसाहित्याइतका प्राचीन. तरी या शास्त्रांवरील मराठी टीकाग्रंथ मात्र अल्प प्रमाणात मिळतात. किरकोळ स्वरूपाची वैद्यकावरील बाडे काही संशोधकांनी प्रकाशात आणली आहेत. त्यांचे काल आणि कर्ते ज्ञात नसल्याने व अशा बाडांना ग्रंथांचे स्वरूप नसल्याकारणान या टाचणांचा विचार करता येत नाही.

ज्या वैद्यक ग्रंथाचा काल आणि कर्ता यांच्यासंबंधी निश्चित माहिती देता येते असा या कालखंडातला वैद्यक ग्रंथ म्हणजे तंजाऊरचे राजे शरफोजी भोसले यांनी संकलित केलेली ' वैद्यरत्नावलि. ' आयुर्वेद पद्धतीतील वेगवेगळ्या वर्गांतील औषधे, त्यांचे गुणधर्म आणि त्यांत समाविष्ट असलेली द्रव्ये व औषधीकरण यांचे विवरण या ग्रथात आले आहे. काही गुणकारी व अनुभवसिद्ध औषधांचा संग्रहदेखील ' रत्ना-

वलीत' आढळतो. हा ग्रंथ सरस्वतीमहाल ग्रंथालयाच्या वतीने मद्रास सरकारने प्रकाशित केला आहे. राजे शरफोजी शके १७५४ साली दिवंगत झाले. तत्पूर्वीचे हे संकलन असले पाहिजे. या ग्रंथाची भाषा 'जुनी-पुराणी व अस्सल मराठी म्हणून निक्षून सांगता येईल' असा निर्वाळा संपादक रावसाहेब महादिक यांनी दिला आहे. पुढील उतारा त्याची साक्ष देईल :

'यांस गुण : अंगावरील झुरळ्या व केस पिकणें हे होऊ सकेना. जें वय कीं तो चेहरा बहुत दिवस राहिल. ज्वरादि वाजीकरणपर्यंत समस्त रोगहि स्वस्थ होतिल. त्यांपैकिं रोगास केवढें प्राबल्य कि, तेवढे तेवढे गुण होईल. हें औषध ज्याचे घरिं आहे तो मन्मथापरि दर्पित होऊन उदंड स्त्रियांस प्रियकर, वल्लभ होईल. कटु पदार्थ कामा नये.... वात, पित्त, कफ, ज्वर, तथापि अग्निमांद्य यांस परिहार करणार जाहल्यास समग्र रोग स्वस्त होतिल म्हणावयास संदेह नाहिं—' **वैद्य. २२७.**

याच ग्रंथात 'पंचामृतसिंदूर' या रसायनाचे अनुपान असे दिले आहे :

'भुई आवळ्याचे मुळीं गाईचें दुध घालून वारीक वाटून थोर गजरया येवढें गोळा काढून त्यांत अर्धा फल्लंभार सिंदूर मिळऊन घेऊन वरि पावशेर गाईचें दुध घेणें. येणें प्रमाणें अर्धमंडळ दोनी वेळेस इच्छा पथ्यानें येक मंडल घेतलिया रक्तवृद्धि होईल. हे औषध कोणत्या अनुपानासि हो कोणत्या उपद्रवासि हो दिल्यास इच्छा पथ्यानें देऊं ये. हें औषध फार अनुभवसिद्धी आले ते" **– वैद्य. १३५.**

संस्कृत ग्रंथावरून संकलन झालेले असूनही 'वैद्यरत्नावली'ची भाषा मात्र 'अस्सल मराठी' राहिली, ती संस्कृत भाषेच्या वळणावर गेली नाही. उलट, प्रचलित बोलीचाच प्रयोग ग्रंथकाराने अधिक प्रमाणात केला आहे हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य असून शास्त्रांवर आधारलेल्या स्वतंत्र वा टीकात्मक गद्यग्रंथात हा विशेष सहसा आढळत नाही. म्हणून भाषेच्या दृष्टीने "शरभेंद्र वैद्यरत्नावली" हा गद्यग्रंथ वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. गद्यसाहित्यातील ही प्रवृत्ती लक्षणीय म्हटली पाहिजे.

तंजाऊरच्या सरस्वतीमहाल ग्रंथालयात असलेल्या हस्तलिखितांत अश्व-गज-शास्त्रांवरील हस्तलिखिते आहेत. त्यांपैकी एकही प्रसिद्ध झालेले नसल्याने त्यांचा परामर्श घेता येत नाही. आंध्रप्रदेश मराठी साहित्य परिषदेच्या संग्रहात 'शालिहोत्र' या नावाचा वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथ आहे. शके १७२३ असा या ग्रंथाचा रचनाकाल असून हिजरी ८१६ (इ. स. १४०६) मधील फारसी ग्रंथाचा तो मराठी अनुवाद आहे. ग्रंथारंभी पुढील माहिती मिळते :

'हा ग्रंथ श्रीमंत महाराज राजे श्रीशंभुसिंग भोसले बहादर यांनी प्रेयत्न करून फारसी ग्रंथ आणवुनि त्यांतील सर्व परीक्षा, बोसद, बोडयांची त्या

ग्रंथाच्या अन्वयें प्राप्त करून मन्हाटभासे लिहविला. हा ग्रंथ नित्य एक संवत्सर जो कोणी पाहिल त्यास घोडयाच्या खोडी व रोग व वोषदें कळो येतील-- '

पूर्वीच्या काळात मानवी समाजातच तेवढी वर्णव्यवस्था होती अशी आपली समजूत आहे. अश्वांच्या समाजातही चातुर्वर्ण्य होते असे या ग्रंथावरूनच समजते. या वर्णांची लक्षणे अशी :

' घोडयाचे जाती च्यार आहेत : ब्राह्मण, क्षेत्री, वैश्य, शूद्र घोडा पाणी पितेसमयीं डोळयापरियेंत तोंड बुडवून पान्यामधें उभा राहोन पानी पीतो, पान्यास भेत नाहीं तो घोडा ब्राह्मण जाणावा. त्या घोडियावर बसून युद्धे अगर हरकोठें कामकाज केलें तर अगर घोडा विकला तर अथवा खरेदी केल्यास उत्तम आहे. तो घोडा अगत्य असावा ॥ छ ॥

क्षेत्री जातीचा घोडा पानी पीतेसमयीं दोनी होट नाकपुडया बुडवून पितो. त्या घोडयावर कोणि श्वार होईल त्यांचें कार्य अगत्य होईल. घोडा उत्तम आहे ॥ छ ॥ '

वर्णांप्रमाणे घोडयाला ' गंध 'ही असतो अशी माहिती हा ग्रंथकार देतो. राजाला स्वार होण्यायोग्य घोडयाचे लक्षण सांगताना हा ग्रंथकार लिहितो :

' घोडा चाळीस गाव जातां मजल करून आल्यास खुवी पहिल्याप्रमाणेंच असतो. आण त्याचे अंगाची सुवास कमळाच्या व चाफेच्या व लवंगाच्या व दालचिनीच्या व केवडयाच्या सुगंधाप्रमाणे असतो. ऐसा घोडा असल्यास राजाधिपति वैसावया योग्य आहे ॥ छ ॥ '

प्राचीन मराठी गद्यात संस्कृत भाषेतील ग्रंथाचे अनुवाद अथवा सारांश संकलनपर असे अनेक ग्रंथ आढळतात. परभाषेतील अनुवाद वा भावार्थ कथन करणारे ग्रंथ या नात्याने ' क्रिस्तपुराण ' या ओवीबद्ध ग्रंथाचा उल्लेख अगोदर येऊन गेला आहे. ' विवेकसार उर्फ मननग्रंथ ' या तेलगू भाषेतील मराठी अनुवादाचा परामर्शही अगोदर आला आहे. फारसी ग्रंथाच्या आधाराने लिहिलेला मराठी ग्रंथ या दृष्टीने शालिहोत्र या ग्रंथाचे महत्त्व आहे.

२६. टीका-भाष्य पद्धतीचा पण अगदी निराळया विषयावरील एक ग्रंथ या ठिकाणी विचारात घेतला पाहिजे. दामोदर पंडितांच्या ' संगीतदर्पण ' या ग्रंथावरील मराठी टीकेस गद्यसाहित्याच्या इतिहासात अनेक दृष्टींनी महत्त्व आहे.* मूळ संस्कृत ग्रंथावर अत्यंत साक्षेपाने मराठी टीका लिहिणाऱ्या या पंडिताने स्वतःच्या नावाचा उल्लेख कोठेही केला नाही. तसाच लेखनकालाचाही. त्यामुळे ही गद्य टीका कोणी लिहिली व कोणत्या काळात रचण्यात आली याचा बोध होत नाही. या टीकेच्या काळासंबंधी मात्र अनुमानाला जागा आहे. मूळ ग्रंथाचा कर्ता दामोदरपंडित हा शहाजान बादशहाच्या काळात होऊन गेला. इ. स. १६२५ हा ' संगीतदर्पणाचा ' काळ

विद्वानांनी निश्चित केला आहे. दामोदर पंडितांच्या हयातीतच त्याच्या ग्रंथाला बरीच मान्यता प्राप्त झाली होती. भारतीय संगीतशास्त्राचे विवेचन करणारा 'तोफतुल्हिंद' हा फारसी भाषेतला पहिला ग्रंथ पुष्कळअंशी 'संगीतदर्पणा'वर आधारलेला आहे. या फारसी भाषेतील ग्रंथाची रचना इ. स. १७०० मध्ये झालेली आहे. संगीतदर्पणास लाभलेली मान्यता लक्षात घेता या ग्रंथावरील मराठी टीका दामोदर पंडितांच्या हयातीत होणे अगदीच असंभवनीय नाही. भाषेच्या स्वरूपावरून एखाद्या ग्रंथाचा काल निश्चित करणे फारसे निर्णायक ठरत नाही. तरीही या टीकेची भाषा इ. स. १८००च्या पूर्वीची आहे एवढे मात्र सांगता येते. 'खांदियावरि', 'राजियासाठीं', 'जालियाकारणें' 'हृदयाचां ठाईं', 'भर्ताराचा वियोगें करून', 'सौंदर्येकरून अतिगर्विता', 'रागज्ञानी तिहीं' यांसारखे प्रयोग टीका पेशवेपूर्वकालात रचल्याची साक्ष देतात. स्थूलमानाने इ. स. १६२५ नंतर इ. स. १७५० पूर्वी या टीकेची रचना झाली असावी असे गृहीत धरण्यास हरकत नसावी.

शास्त्रीय विषयाचा सुबोध मांडणी हे या टीकेचे लक्षणीय वैशिष्ट्य आहे. मूळ संस्कृत श्लोकाचा अर्थ देताना टीकाकार कधी पद-पदार्थ देतो तर कधी 'ज्योतिषरत्नमालेतील' कलात्मक शैलीचा अवलंब करतो. मुळातला अर्थ विस्तार न करता आटोपशीर शब्दांत व्यक्त करण्याची लेखकाची हातोटी विलक्षण आहे. टीकेला 'व्याख्यानाचे' स्वरूप येणार नाही, याची विशेष दक्षता घेतली आहे. अगदी पहिलाच संस्कृत श्लोक आणि त्यावरील ही मराठी टीका पहा :

॥ श्लोक ॥ गीतं वाद्यं नर्तनं च त्रयं संगीतमुच्यते
मार्गं देश विभागेन संगीतं द्विविधं मतम् ॥ १ ॥

॥ टीका ॥ संगीत म्हणजे काय। गीत म्हणावें गायनास। नर्तनास नृत्य म्हणावें। शब्द होतो त्यास वाद्य म्हणावें। तीन्ही युक्त त्यास संगीत म्हणावें। संगीताचे दोन भेद सांगतों ॥ येक मार्ग संगीत। येक देशसंगीत। ऐसे दोन भेद त्यांमध्यें मार्गसंगिताचे भेद सांगतों ॥ **संद. पृ. २.**

"रागध्यान" अथवा रागाचे सगुण रूपवर्णन हा 'संगीतदर्पण' या ग्रंथाचा महत्त्वाचा विशेष आहे. हे ध्यान नेमक्या शब्दांत मराठी भाषेच्याद्वारे चित्रित करण्यात टीकाकाराचे कसब दिसून येते. 'मधुमाधवी' या रागाचे लक्षण व ध्यान असलेला पुढील भाग पहा :

"मधुमाधवी रागांग आहे ॥ मधुमाधवीचे ग्रहस्तर। अंस स्वर। न्यासस्वर। मध्यम होईल ॥ सात स्वर आहेत। संपूर्ण। मध्यम आहे नास ऐसी मूर्च्छना होती ॥ ....आतां मधुमाधवीचे लक्षण सांगतो ॥ कोण्ही येकाच्या मते मधुमाधवी रिषभधैवतहीन आहे ॥ ऐसे जालियास औडव होतो ॥ आतां मधुमाधवीचे स्वरूप सांगतों ॥

भरतारास हास्ययुक्त आलिंगन देऊन। चुंबनयुक्त अतिशयेंकरून। कमलाचे परि थोर नेत्र। शरीराची कांत सुवर्णापरि आहे। केशरेंकरून चर्चित आहे देह॥ विशेषेंकरून हृदयाचा ठाईं चर्चित॥ ऐसी भैरव रागिणी। भरतादिक रागज्ञानी तिहीं बोलिजेली॥ ऐसें मधुमाधवींचें स्वरूप आहे॥ **सद.** पृ. ८७.

या टीकेत आढळून येणारा मराठी भाषेचा अप्रतिहत वावर, संगीतविषयक सुबोध परिभाषा आणि शास्त्रीय विषयाचा सहज उलगडा करून दाखविणारी शैली विचारात घेता मराठी भाषेतला हा पहिला संगीतविषयक ग्रंथ असेल यावर विश्वास बसत नाही.

२७. संगीताची अत्यंत पुरातन परंपरा महाराष्ट्रात नांदत असताना या विषयावर अगदी अपवादात्मक मराठी साहित्य का आढळावे याचे समाधानकारक उत्तर सापडत नाही. भरताच्या नाट्यशास्त्रानंतर संगीतक्षेत्रात प्रमाण ग्रंथ म्हणून मान्यता पावलेला 'संगीतरत्नाकर' हा शार्ङ्गदेवाचा ग्रंथ सिंघण यादवाच्या राजवटीत (इ. स. १२१०–१२४७) देवगिरी येथे पूर्ण झाला. स्वतः रामदेवराय यादव हा संगीताचा थोर अभिमानी होता. त्याच्या काळातील नरेंद्राच्या 'रुक्मिणीस्वयंवरात' किन्नरांच्या गायनाच्या निमित्ताने कवीने केलेले वर्णन त्याकाळी संगीतकला ऊर्जित अवस्थेत होती याचे निदर्शक आहे. तेराव्या शतकानंतर झालेल्या आक्रमणातूनही ही कला तग धरून होती असे 'गुरूचरित्रात' आलेल्या संगीतविषयक माहितीवरून लक्षात येते. सोळाव्या शतकातील दासोपंत हे एक थोर वाग्गेयकार होते. त्यांच्या अनेक हिंदी-मराठी पदांतून विविध राग आले आहेत, तसेच स्वर-तालादिकांचे तपशीलही. सतराव्या शतकाच्या शेवटी होऊन गेलेल्या समर्थ रामदासांनी तर 'गायनी कलेचा' उत्कर्ष साधला होता. श्रीधरासारखे कथाकवी आणि अमृतरायासारखे पंडित कवी यांच्या साहित्यातून संगीताचा व्यासंग निदर्शनास येतो. सगनभाऊ आणि हैबती या शाहिरांनी तर आपल्या कवनातून संगीत-शास्त्राचे विवरण केलेले आढळून येते.

या पार्श्वभूमीवर संगीतशास्त्राचे निरूपण करणारा एकमेव मराठी टीकाग्रंथ उपलब्ध व्हावा याची संगती लागत नाही. एकतर या प्रदीर्घ कालखंडात मूळ संस्कृत ग्रंथांच्या आधाराने संगीतोपासना चालत असली पाहिजे किंवा त्या त्या काळातल्या कलावंतांनी आपली विद्या 'हात राखून' दिली, तसेच मराठी ग्रंथ 'हातचे राखून' ठेवल्याकारणाने आजच्या पिढीपर्यंत ते पोचले नसावेत. सोळाव्या शतकानंतर हरदासी कीर्तन हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे एक महत्त्वाचे अंग बनले. 'हरिकथा रागतालान्वित असावी' असा पुरातन दंडक होता.** या परंपरेतही संगीताची उपासना चालू होती. या परंपरेच्या वैभवकाळात शास्त्रीय ग्रंथाची निकड भासणे अपरिहार्य होते. या निकडीतूनच 'संगीत-दर्पणा'वरील मराठी टीका अस्तित्वात आली असावी.

२८. साहित्यातील नवा प्रवाह परिस्थितीवर मात करणाऱ्या ध्येयवादातून अथवा काल परिस्थितीच्या दडपणातून कसा उदयास येत असतो याचे एक उत्कृष्ट उदाहरण

या नात्याने तंजावर प्रांती रचण्यात आलेल्या 'नाटयशास्त्रसंग्रह' या मराठी गद्य ग्रंथाचा उल्लेख करता येईल. हा ग्रंथ टीकात्मक नसून संकलनात्मक आहे. विषयाची मांडणी संगीतरत्नाकराच्या नृत्याध्यायानुसार (अध्याय ७) करण्यात आलेली असली तरी विषय स्पष्ट व्हावा या हेतूने लेखकाने अनेक शास्त्रग्रंथांची 'संमती' घेतली आहे. नृत्याचे शास्त्रोक्त विवरण करणारा हा मराठी ग्रंथ तंजावरच्या सरस्वतीमहाल ग्रंथालयाने प्रसिद्ध केला आहे. ग्रंथकर्ता उतके गोविंदाचार्य हा तुळोजीराजे यांच्या शासन काळात (१७२९–३५) होऊन गेलेला सिद्धहस्त आख्यान कवीही आहे. तुळोजीच्या नावावर असलेल्या 'संगीत सारामृत' या संस्कृत ग्रंथाचे कर्तृत्वही त्यास देण्यात येते.

संगीतरत्नाकराच्या ७ व्या अध्यायातील पहिल्या श्लोकावर आलेले व्याख्यान पुढे देण्यात येत आहे. ग्रंथकार टीका-भाष्य पद्धतीचा अवलंब न करता मूळ विषयाचे विवरण व्याख्यान पद्धतीने करीत आहे याची कल्पना या उताऱ्यावरून यावी :

आङ्गिकं भुवनं यस्य वाचिकं सर्ववाङ्मयम्
अहार्यं चन्द्रतारादि तं नुमः सात्विकं शिवम् ॥

आता शाङ्गदेव म्हणणार कवी आपण आरंभिलेला नृत्याध्याय म्हणावयाचा ग्रंथ सुरळित व्हावयाकरितां या ग्रंथास मुख्याभिमानी चतुर्विधाभिनयाचे स्वरूप परमेश्वराचे नमन करिताहेत. हा चराचरात्मक प्रपंच अवघा ज्याचा अंगिकाराभिनय, च्यारी वेद, षट्शास्त्रें, अठरा पुराणें इत्यादीहीं ज्याचा वाचिकाभिनय, चंद्रनक्षत्रादिक ज्याचा आहार्य अभिनय, स्वयें सात्त्विकाभिनय स्वरूप ऐशा ईश्वरातें स्तवितों म्हणून श्लोकार्थ. तरि या श्लोकांत ईश्वराचें स्वरूपच सांगितले, पण स्तोत्र केलें नाहीं. ऐसें असतां तुम्ही या श्लोकांत स्तोत्र करिताहेत म्हणून अवतरिका कशी लिहितां म्हणालिया विनवितों : लोकीं कोणी एकाने चांगले काव्य केलीं ते वाखाणलिया त्यांस स्तोत्र म्हणणें. याकरितां दीनांस तारावया करितां ईश्वराने जगाकृती धरिला याचा प्रस्ताव केल्या कारणानें सहजे करून तेंच स्तोत्र जाहले " —**नाटयशास्त्रसंग्रह, ४.**

नाटयोत्पत्ती कशी झाली आणि कोणकोणत्या योगाने ही विद्या पृथ्वीवर प्रसृत झाली याची माहिती मूळ संस्कृत श्लोकात असली तरी प्रथम या श्लोकाची संगती लावण्याचा प्रयत्न या ग्रंथकाराने टीका लिहिताना केला आहे. हे शास्त्र श्रीशंकराने प्रवृत्त केले आणि पुढे ऋषी आणि मुनी यांनी शंकराचे तांडव आपापल्या शिष्यांस उपदेशिले. पण स्त्रियांना ही विद्या आली नाही, अशी शंका उपस्थित करून ग्रंथकार मूळ आशयाचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करतो :

" नाहीं तरि पुरुषांस म्हणिजे ऋषिश्वरांच्या मुखें नाटय कळलें. पूर्वीच थोर थोर राजस्त्रिया, राजकन्या यांनी नाटयाभ्यास केला ऐशे पुराणांचे आधार आहेत. त्यास इतर पुरुषांनी पाहतां नयें असा राजधर्म. ऐसें असतां त्यास

नाट्य कैसें कळलें म्हणालिया सांगताहेत : शिवभक्तांमाजी मुख्य भक्त जो बाणासुर त्याची मुलगी म्हणणारी उषा पार्वतीची गडीण जाहल्या प्रयुक्त पार्वतीने त्या उषेस लास्य म्हणावयाचें नाट्य शिकविलें. तिनें द्वारावती राहणार इतर गोपिकांस शिकविलें. त्यांनी इतर देशांच्या स्त्रियांस शिकविलें. या क्रमानें या लोकीं प्रकट होऊन राहिलें. "— **नाट्य.** ६.

वरील उताऱ्यात 'नृत्य' या अभिप्रेत अर्थाने 'नाट्य' या शब्दाचा प्रयोग करण्यात आला आहे हे लक्षात घेतले म्हणजे ग्रंथातील विवरणाचा नृत्यशास्त्राशी संबंध असून रुढ अर्थाचे नाट्य व नाटक येथे अभिप्रेत नाही हे लक्षात घेतले पाहिजे. नृत्य आणि संगीत यांची दीर्घकालीन परंपरा महाराष्ट्रास होती असे या भागांतील शिल्पे आजही साक्ष देतात. असे असताना नृत्याचे विवेचन करणारा ग्रंथ महाराष्ट्राबाहेर का निर्माण व्हावा असा प्रश्न पडतो. या देशाच्या सांस्कृतिक इतिहासाकडे पाहिले तर मात्र ही ग्रंथनिर्मिती कालापरिस्थितीशी सुसंगत आहे या निर्णयावर यावे लागते.

दक्षिण भारतावर झालेल्या परधर्मीयांच्या स्वाऱ्यांची सर्वांत अधिक झळ महाराष्ट्राला लागली. त्यामानाने तामिळनाडू, केरळ आणि दक्षिण कर्नाटक हे विभाग सुरक्षित राहिले याची साक्ष या विभागातली देवालये आजही देतात. प्राचीन विद्या आणि कला यांचे संरक्षण त्यामुळे या भागात मोठ्या प्रमाणावर झाले. विजयनगरच्या राज्यामुळे हा भाग पुढच्या कालातही सुरक्षित राहिला. या ऐतिहासिक परिस्थितीचा प्रभाव दाक्षिणात्यांच्या सांस्कृतिक जीवनावर अपरिहार्यपणे झाला. महाराष्ट्रात शिवकालीन स्वराज्यात सांस्कृतिक पुनरुज्जीवन घडू शकले नाही. कारण, स्वराज्याचा बराचसा काळ धामधुमीतच गेला.

शिवछत्रपती आणि त्यांचे महाराष्ट्रातील वारसदार यांना जें साधता आले नाही ते शिवछत्रपतींचे सावत्र बंधू व्यंकोजी आणि त्याचे वारसदार यांनी तंजाऊरच्या परिसरात पूर्णतेस नेले. तंजाऊरच्या भोसले घराण्यानें भारतीय विद्या आणि कला यांना उदार आश्रय दिला. त्यांच्या कारकीर्दीत दाक्षिणात्य भाषा, मराठी भाषा आणि संस्कृत भाषा या भाषांतून उदंड साहित्य निर्माण झाले. शहाजी महाराजांनी बंगळूरच्या वास्तव्यात यासंबंधीची पायाभरणी अगोदरच केली होती. शिवाय, ज्या नायक घराण्याची गादी भोसल्यांनी संपादन केली होती ते राजे स्वतः सुसंस्कृत आणि विद्या व कला यांना प्रोत्साहन देणारे होते. भोसले घराण्याने आपल्या काररकीर्दीत हा वारसा स्वतःची भर घालून अधिक समृद्ध केला. हिंदी–मराठी–तेलगू या भाषांतील पहिले नाटक तेलगू आणि संस्कृत या भाषांतील पहिला यक्षगान–प्रबंध रचल्याचा मान भोसले घराण्यातील राजपुरुषांकडे जातो.

'यक्षगानप्रबंध' हे एक प्रकारचे नृत्य नाट्य असते. संगीत, नृत्य आणि अभिनय । तिन्ही कलांचा या वाङ्मयप्रकाराशी संबंध येतो. तंजाऊरच्या मराठे राजांच्या कार-

कीर्दीत दाक्षिणात्य भाषांतील यक्षगानाचे विकासाचे शिखर गाठले होते. तंजाऊरच्या राजांनी रचलेली मराठी नाटकेदेखील कमीअधिक प्रमाणात यक्षगानांवरच बेतलेली आहेत. या नाटकांतून सूत्रधाराचे तोंडी 'कोणते नाटक नाचवू ?' अथवा 'अमुक नाटक नाचवितो पहा–' अशा आशयाचे उद्‌गार असतात. या नाटकांतील पदे आणि वरेचसे संवादही नृत्यानुकूल असतात. त्यावरून या नाटकांचे प्रयोग नृत्याभिनयासह होत असावेत असा निष्कर्ष निघतो. अशा वातावरणाचा प्रभाव नृत्यशास्त्रविषयक ग्रंथ-निर्मितीस केवळ पोषक होता असे नसून आवश्यकही होता. दरबारी वातावरणातून निर्माण झालेली ही गरज होती. त्यातूनच संगीत आणि नृत्य या शास्त्रांवरील ग्रंथनिर्मिती तंजाऊरच्या दरबारात झाली. 'नाट्यशास्त्र संग्रह' हा मराठी ग्रंथ या वातावरणात निर्माण झाला. साहित्यातील अंतःप्रकार समाजजीवनाशी कसे निगडित असतात याचे प्रत्यंतर या ग्रंथावरून येते.

'नाट्यशास्त्र संग्रह' हा गद्यग्रंथ महाराष्ट्राबाहेर का निर्माण झाला याचा उलगडा वरील विवेचनावरून व्हावा. तंजाऊरच्या परिसरातील मराठी नाटकांच्या निर्मितीचा आढावा या संदर्भात घेता आला असता तर या नृत्यशास्त्रपर ग्रंथाचे प्रयोजन अधिक स्पष्ट झाले असते. परंतु, नाटक हा दृक्‌श्राव्यात्मक आणि गद्यपद्यमिश्र असा स्वतंत्र वाङ्मयप्रकार असल्याने प्रस्तुत विषयाच्या मर्यादा सोडून बरेच विषयांतर करावे लागले असते. नृत्यशास्त्रविषयक ग्रंथ कोणत्या पार्श्वभूमीवर झाला एवढेच लक्षात घ्यावयाचे असल्याने विषयांतराचा मार्ग टाळला आहे.

२९. शके १५०० नंतर गद्य साहित्य मोठ्या प्रमाणात निर्माण झाले असून त्यांत टीका भाष्यपर ग्रंथांची विपुलता आढळते. या निर्मितीत महानुभावीय लेखकांप्रमाणेच इतरांनीही भाग घेतला आहे. महानुभाव पंथात टीपग्रंथांची रचना याच काळात झाली. पंथाच्या दृष्टीने पवित्र गणलेल्या ग्रंथांवर टीपा देण्याचे कार्य प्रथम, द्वितीय आणि तृतीय अशा तीन टप्प्यांनी पूर्ण झालेले दिसते. पहिल्या शोधनीचा टीपग्रंथकार अज्ञात असून तो ग्रंथ चौदाव्या शतकात सिद्ध झाला असे डॉ. शं. गो. तुळपुळे यांचे मत आहे. प्रथम शोधनीच्या टीपेत उद्धवगीता, ज्ञानप्रबोध आणि ऋद्धिपूर-वर्णन हे तीनच ग्रंथ आले आहेत. दुसऱ्या शोधनीचा टीपग्रंथ हरिराज पुजदेकर यांनी रचलेला असून तो सोळाव्या शतकातला आहे. तिसऱ्या शोधनीचा टीपग्रंथ याच काळातला आहे. या दोन्ही टीपग्रंथांत महानुभावपंथात पवित्र गणलेल्या सात ग्रंथांवर टीप देण्यात आली आहे. दत्तराज मराठे यांच्याकडे शेवटच्या शोधनीचे कर्तृत्व दिले जाते.[४३] 'साती ग्रंथांचे' सांप्रदायिक अर्थ समजून घेण्यास हे टीपग्रंथ उपयुक्त ठरतात. कित्येक स्थळी टीपकारांनी पाठभेदांची चर्चाही केली आहे. पं. भीष्माचार्यकृत 'गीतगोविंद' या संस्कृत ग्रंथावरील मराठी टीपग्रंथ याच काळातला आहे.

याच लेखकाचा 'बत्तीस लक्षणी टीप' ही लक्षण रत्नाकरावरील मराठी टीका यापूर्वी उल्लेखिण्यात आली आहे. ही केवळ टीका नसून महानुभावीय दर्शनाचा तो एक कोशच आहे. या पंथाचे समग्र तत्त्वज्ञान लक्षात घेऊन टीकाकाराने पद-पदार्थांचे विवरण केले आहे. हा टीपग्रंथ वाचत असताना शंकराचार्यांच्या भाष्यांवर झालेल्या अनेक टीकांचे स्मरण होते. या दोन्ही टीकांचा विस्तार सारखा आहे असे नाही. परंतु पदशः अर्थ, पदांचा परस्परांशी अन्वय, एका श्लोकाचा दुसऱ्या श्लोकाशी असलेला संबंध आणि त्यांतून स्पष्ट होणारे तत्त्वज्ञानाचे स्वरूप हे भामतीकार कटाक्षाने मांडतात, त्याचप्रमाणे प्रत्येक लक्षणातून महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान कसे सूचित होते हे विशद करण्यावर भीष्माचार्यांचा कटाक्ष असतो. आवश्यकतेप्रमाणे लीळाचरित्र आणि श्रीचक्रधरोक्त सूत्रे यांचा आधारही टीकाकाराने घेतला आहे. नैयायिक आणि मीमांसक यांची परिभाषा वापरल्यामुळे या टीपग्रंथास वेगळेच प्रौढत्व आले आहे.

" पक्ष " या २० व्या लक्षणावर टीका करताना भीष्माचार्यांनी केलेले स्पष्टीकरण त्यांच्या टीकापद्धतीचा परिचय करून देणारे ठरेल :

> 'पक्ष शब्द मतांतरा वाचक : या शास्त्राची सा मतें तेचि साही पक्ष : 'विवर्ते वस्तुभेद' ते वेदांत मत : 'परिणामे वस्तुभेद' हें सांख्यमत : 'स्वरूपें वस्तुभेद' हें याग मत : 'जातिकरूनि वस्तुभेद' हें मीमांसक कर्ममत : 'स्वभावें करूनि वस्तुभेद' हें चार्वाक मत : 'विशेषें करूनि वस्तुभेद' हें न्याय मत.....
>
> पक्ष शब्द वादांतरवाचक : वेदांतीं अभेदवाद, सांख्यीं मायावाद : मीमांसे कर्मवाद : तोचि अस्तिवाद : चार्वाकीं नास्तिवाद : न्यायी भेदवाद : .... सिद्धांत अर्थ ग्रहणाचिया प्रयोजनालागीं मतांतर कां वादांतर योजिजे तो पूर्वपक्ष : पूर्वपक्षाते तिरस्करूनि उद्धरिजे तो पर पक्ष : तोचि सिद्धांतपक्ष ॥[४४]

टीपकाराने षड्दर्शने व त्यांचे सिद्धांत यांचा उल्लेख करून शेवट चक्रधरोक्त सूत्रातील 'प्रपंच भणिजे स्वतंत्र वस्तु' या सिद्धांताने केला आहे. या टीकेत बौद्धिक कसरत भरपूर असली तरी पंथाचे तत्त्वज्ञान आणि विवरणातील सुबोधता यांवरील टीकाकाराची दृष्टी मात्र ढळली नाही.

उपमेचे स्वरूप स्पष्ट करणारा पुढील भाग पहा :

> 'गुणीं उत्कृष्ट प्रसिद्ध जे वस्तु ते उपमा बोलिजे : यथा चंद्रु : गुणीं साधारण अप्रसिद्ध जे वस्तु ते उपमेय बोलिजे : यथा मुख : उपमान उपमेयासि क्वचित् गुणें तुल्यता : क्वचित् धर्में तुल्यता : क्वचित् जाति तुल्यत : क्वचित् क्रिया तुल्यता : ते उपमा बोलिजे : यथा चंद्रवत् मुख : एवं उत्तमेसि आणि हीनेसि जे गुणादिकी साम्यता ते उपमा ऐसा अर्थ ॥ "[४५]

महानुभाव पंथातील शार्ङ्गधर पुजदेकर यांच्या नावावर अनेक टीकाग्रंथ आढळतात. हे सर्व शार्ङ्गधर एक की अनेक हे निश्चित करता येत नाही. गीतेचा पदशः अर्थ देणारी 'कैवल्यदीपिका' या नावाची टीकाही या पुजदेकरांच्या नावावर देण्यात येते. महानुभाव पंथातील गद्य गीताटीका या दृष्टीने तिला महत्त्व आहे.[४६]

३०. पेशवेकालीन विख्यात कवी आणि समकालीन राजकारणात महत्त्वाची कामगिरी बजावणारा निरंजन माधव हा एक गद्य टीकाकारदेखील आहे, याकडे आजवर दुर्लक्ष झाले होते. निरंजन माधवाची कविता कै. ल. रा. पांगारकर यांनी तीन खंडांत प्रसिद्ध केली आहे. तिसऱ्या खंडाच्या प्रस्तावनेत त्याने लिहिलेल्या 'लघुवाक्यवृत्ती' वरील मराठी टीकेचा उल्लेख आहे. आद्यशंकराचार्यांच्या 'स्वात्मानंदप्रकाश' या ग्रंथावर निरंजन माधवाने लिहिलेली गद्य टीका प्रस्तुत लेखकाने संपादून प्रसिद्ध केली आहे.[४७] त्याचे मराठी गद्य अत्यंत डौलदार वाटते. 'साधनचतुष्टयसंपन्न अशा शिष्यास गुरूने बोध करावा' अशा आशयाच्या संस्कृत श्लोकावर त्याने पुढील टीका केली आहे :

> 'संसार दावानलवत् दुःखदायक जो तेणें संतप्त साधनचतुष्टयसंपन्न असा शिष्य जो तो गुरू जे तेहीं आत्मज्ञान परिपूर्ण जी वाक्यें तिहींवरून बोधिजे। प्रसंगें अनुबंध चतुष्टय वर्णतों। सकल शास्त्रीं सकल व्यवहारिं अनुबंधचतुष्टय पाहिजेत॥ अनुबंधचतुष्टय म्हणिजे बध्यते अनेन इति बंधः॥ तृणादिकांचा भार चारि स्थळिं बांधला असतां सर्वत्र न्यावयास उपयोगी पडतो तद्वत अनुबंधचतुष्टय शास्त्रातहि पाहिजेत॥ ते अनुबंधचतुष्टय कोणते तरि सांगो॥ अधिकारि। विषय। संबंध। प्रयोजन। साधन चतुष्टयसंपन्न अधिकारी॥ साधनचतुष्टय म्हणिजे काय? विवेक। वैराग्य। शमादि षट्क। मुमुक्षता॥'[४८].

अमरकोशावरील मराठी टीकेचा उल्लेख याच काळाच्या संदर्भात 'सारस्वतकारांनी' केला आहे. शके १६४० ते १७३८ च्या सुमारास होऊन गेलेल्या मोरेश्वराने ही टीका लिहिली असावी असा डॉ. तुळपुळे यांचा अंदाज आहे.[४९] परंतु ही टीका उपलब्ध नाही, असेही ते सांगतात. अमरकोशावरील मराठी टीकेची काही पाने माझ्या संग्रहात आहेत. परंतु तिचा कर्ता आणि काळ यांसंबंधी काहीच माहिती देता येत नाही.[५०]

३१. मराठी गद्याच्या पंडिती परंपरेत कालभेदाने वा पंथभेदाने भाषेत फारसे परिवर्तन झाले आहे असे दिसून येत नाही. भिन्न काळात होऊन गेलेले महानुभाव पंथातील व पंथाबाहेरील टीकाकार यांच्या भाषेत आणि टीकापद्धतीत विलक्षण साम्य असल्याचे दिसून येते. अपरिवर्तनशीलता हा पांडित्याचा स्वभाव असल्यामुळे असेल कदाचित् अथवा एकाच संस्कृत-आदर्शाचे अनुकरण सर्वकाळी व सर्व पंथांत होत असल्यामुळेही हा विशेष निर्माण झाला असावा. किंवा टीका-भाष्यग्रंथासाठी प्रमाण

भाषा या नात्याने या भाषेचा अवलंब करण्यात आलेला असावा. प्रमाणभाषेत काल-भेदाने वा प्रांतभेदाने फारच थोडे परिवर्तन घडत असल्याने या परंपरेतील भाषा दीर्घकाळ सारखीच राहिली असावी असे वाटते. कारणे कोणतीही असोत पंडिती परंपरेत हा विशेष आढळतो हे सत्य आहे.

सोळाव्या शतकातील महानुभावपंथीय पंडिताची 'कैवल्यदीपिका' आणि शके १७१९ मधील 'गीतपदबोधिनी' ही महानुभावेतर पंडिताने लिहिलेली टीका तुलनात्मकरीत्या अभ्यासली असता याच निर्णयावर यावे लागते. वाचकांच्या सोईसाठी या दोन्ही टीकांतील काही भाग पुढे उद्धृत करण्यात येत आहे. पहिला उतारा सोळाव्या शतकातला असून नंतरचा शके १७१९ मध्ये रचलेल्या टीकेतून घेतला आहे :

> 'धृतराष्ट्र उवाच : धृतराष्ट्र जो कौरवाचा पिता जन्मांध तो : व्यास-प्रसादात् श्रुतवान् एतद् गुह्यं अहं परम् ॥ म्हटलें म्हणून त्रिकाल ज्ञानी : दूरश्रवणी : मानवव्यास शिष्य जो संजय त्यास पुसतां जाला : एकें श्लोकें-करून : धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे इति ॥ संजय म्हणजे अगा संजय : धर्मक्षेत्रे म्हणजे चतुर्दानात्मिक धर्मलक्षणबीज त्या स्थानीं : कुरुक्षेत्रे म्हणजे कौरवांच्या पूर्व-जाचा स्थळीं : क्षेत्र म्हटल्या कर्मभूमीहि बोलिजे : भूमि शब्द आन होति : शब्द विद्यामानित्वीं असे : व्यक्ताव्यक्तीं : कर्मभूमिचिया देवता म्हणितलें : म्हणून मामका म्हणजे दुर्योधनादिक माझें पुत्रपौत्रादि.....'' [५१].

हा दुसरा उतारा गीतेच्या बाराव्या अध्यायातील 'गीतापदबोधिनी' या टीकेतून घेतला आहे :

> श्रेयेहि ज्ञानमभ्यासात् ज्ञानात् ध्यानं विशिष्यते
> ध्यानात् कर्मफलत्यागः त्यागात् शांतिः अनन्तरम् ॥
>
> अभ्यासात्, अविवेकें कर्मत्यागापेक्षा । ज्ञानं, जाणौनि कर्म करणें जें । श्रेय, पुण्यप्रधान । हि, निश्चये । ज्ञानात्, जाणिवेपेक्षां । ध्यानं, ध्यान जें तें । विशिष्यते, अधिक होतें । ध्यानात्, ध्यानाहून । कर्मफलत्यागात्, कर्मफलत्याग जो तो । अधिक । त्यागात्, त्यागाहून । अनंतरम्, सर्वत्र । शांति, शांति जे तें अधिक ॥ --**महाराष्ट्र साहित्य पत्रिका** वर्ष, १, अंक १.

३२. भिन्न काल आणि भिन्न परंपरा यांतून समर्थपणे वाट काढणारी मराठी गद्याची पंडिती परंपरा अव्वल इंग्रजी अमदानीतसुद्धा ग्रंथव्यवहाराची भाषा या नात्याने प्रचलित होती. ब्रिटिश राजवट स्थापन झाल्यानंतर वाङ्मयात नवे प्रवाह आणि भाषेचे निराळे वळण रूढ होईपर्यंत जे परंपरागत साहित्य निर्माण झाले त्याचे वळण पंडिती परंपरेचे होते हे सहसा लक्षात घेतले जात नाही. प्रथम शिळाप्रेस व नंतर खिळाप्रेस या यंत्रांतून बाहेर पडलेले धर्मपर वाङ्मय भाषेच्या स्वरूपाच्या दृष्टीने अभ्यासण्याजोगे आहे. रामायण-महाभारत या ग्रंथांचे अनुवाद, पौराणिक ग्रंथांची मराठी रूपांतरे, नित्य

पठनाच्या निमित्ताने मुद्रित झालेली स्तोत्रे व माहात्म्ये असे कितीतरी प्रकार या धर्मपर वाङ्मयात आढळतात. शास्त्री-पंडितांच्या सहकार्याने प्रकाशित झालेल्या या साहित्याची भाषा पुरातन पंडिती वळण गिरविणारी आहे. आधुनिकांना ती कृत्रिम वाटली तरी तिचे वळण परंपराप्राप्त म्हणून स्वाभाविक आहे. कारण ती 'व्यासपीठाची' भाषा आहे. अर्वाचीन गद्याचा अवतार 'इंग्रजी आहे' हे विधान ब्रिटिश अमदानीत साक्षरांसाठी योजलेल्या शालेय स्वरूपाच्या साहित्याबाबत खरे असले तरी एकंदरीत मराठी गद्याच्या संदर्भात ते अर्धसत्य ठरेल. कारण, पेशवाईच्या अस्तानंतर पंडिती वळणाचे गद्य दीर्घकाळ रेंगाळत होते.

शके १७४७ च्या सुमारास रचण्यात आलेल्या मराठी व्याकरणातील भाषापद्धती या विधानास पुष्टी देणारी आहे :

१. 'शब्द म्हणजे वाक्याचा भाग आहे. तेणेंकरून कोणताहि पदार्थ जाणिजे तो.'

२. 'वर्णांत भेद दोन आहेत; स्वर आणि व्यंजनें. आतां त्यांचीं स्थानें त्यांचे उच्चारेंकरून जाणिजेताहेत. एकूण हे सोळा स्वर असे या पूर्व अभिप्रायातें शिकविजताहेत.'

३. 'द्वितीयादि विभक्ति आणि संबोधन यांच्या ठायी अकारान्त शब्दाचें अंत्य आकारांत एकवचनी 'ए' आणि अनेकवचनीं 'आ' निदर्शक होतो.'

४. 'व्यापार आहे अर्थ ज्यांचा असे जें अंकादिक त्यास धातु म्हणावें' ५२

भिन्न कालातील मराठी गद्याची अगोदर देण्यात आलेली अवतरणे लक्षात घेतली म्हणजे इंग्रजी अमदानीत रचलेल्या या व्याकरणाची भाषा निराळी वाटत नाही. तुलना सुलभ व्हावी या हेतूने तेराव्या शतकातील 'पंचवार्तिक' या ग्रंथातला उतारा पुढे देण्यात येत आहे.

'आतां प्रतिज्ञेसि अनुसरोनि प्रथम सूत्रलक्षण सांगितलें : अल्पाक्षरें : असंदिग्धें : सात्वतें : विश्वतोमुखें सार्थकें निर्देश जेहीं प्रयोगें अर्थज्ञान सूत्रिजे : मुद्रिजे तेया प्रयोगातें सूत्र भणिजे : तेआं सूत्राचे चाऱ्ही भेद १ वचन, २ वाक्य, ३ प्रकरण, ४ महावाक्य.' ५३

३३. शके १९६१ शके १७४० या कालखंडातील प्राचीन मराठी गद्यातील पंडिती परंपरेचे हे धावते विश्लेषण. एखादा जुनाट वटवृक्ष असावा, त्याला पारंब्या फुटाव्यात, या पारंब्यांतूनही नूतन वटवृक्ष उभे रहावेत आणि ते वाढीस लागले तरी मूळ वृक्षाचा डौल मात्र कायम रहावा त्याप्रमाणे ही पंडिती परंपरा इतर परंपरांना जन्म देऊनही आपल्या वैभवाने प्राचीन साहित्याचा काललंडसंपेपर्यंत तळपत राहिली. काळाच्या ओघात नवे आले ते तिने पोटच्या पोराप्रमाणे वाढविले. स्वतःचे स्वरूप आणि अस्तित्व यांच्यावर या नव्यांचा परिणाम होणार नाही याची दक्षता या परंपरेने घेतली

आहे. विषयपरत्वे आणि पंथभेदाने थोडीफार वळणे या गद्याने घेतली आहेत, तीही स्वतःचा प्रकृतिधर्म राखूनच.

काळाच्या प्रवाहात थोडेफार चढउतार या प्रवाहात आढळून येतातच. शके ९६१ च्या मूळारंभानंतर शके १२०० पर्यंतचे साहित्य उपलब्ध नाही. निर्मितीच्या अभावापेक्षा अनुपलब्धी हे त्याचे कारण असण्याचा संभव अधिक. अन्यथा शके १२०० ते १४०० या दोन शतकांत आढळणारी समृद्धी दिसलीच नसती. नंतरच्या एका शतकात पडलेला खंड तत्कालीन राजकीय परिस्थितीच्या प्रभावाचा निदर्शक आहे. थोडेफार साहित्य या धामधुमीच्या काळात निर्माण झाले असले तरी ते सुरक्षित राहिले नसावे. नंतरच्या दोन-अडीच शतकांत (शके १५०० ते १७४०) मात्र खंडित झालेला प्रवाह अधिक जोमाने गतिमान झालेला दिसतो. गद्यसाहित्याच्या सर्वच शाखांचे सुवर्णयुग या कालखंडाने पाहिले आहे जागृत धर्मप्रेरणा आणि समाजजीवनात निर्माण झालेल्या निकडी पूर्ण करण्याच्या निमित्ताने अस्तित्वात आलेल्या वेगवेगळ्या परंपरांत निर्मितीची विपुलता आढळते. नवे विषय, नवे घाट, नवी वळणे यांची लेणी धारण करून समृद्ध झालेला गद्यप्रवाह महानुभाव आणि महानुभावेतर या दोन्ही पंथांतून वाहताना दिसतो. गंगा-यमुना यांच्या संगमावर गुप्तसरस्वती असावी तद्वत् जैन पंथातील मराठी गद्यसाहित्यही या कालखंडात अस्तित्वात असल्याचे अनुमान करता येते. अशा रीतीने शेवटच्या अडीचशे वर्षांतील गद्यनिर्मितीस त्रिवेणी संगमाचे स्वरूप आले आहे.

आठ शतकांच्या या कालखंडात कालपरत्वे व परिस्थितीस अनुसरून भिन्न प्रेरणांचे आविर्भावही झाले आहेत. संस्कृत भाषेत असलेले ज्ञान या भाषेचे ज्ञान नसणाऱ्या समाजास करून देण्यासाठी मराठी भाषेतल्या पहिल्या ग्रंथाचा अवतार झाला. ज्योतिष, वैद्यक आदी जीवनोपयोगी शास्त्रांवरील संस्कृत ग्रंथ टीका-भाष्यांच्या रूपाने व स्वतंत्र संकलनाच्या स्वरूपात अस्तित्वात आले ते ज्ञान-प्रसाराच्या उद्देशाने. या शास्त्रांचा अध्यात्मविद्येशी जवळचा संबंध नसला तरी जीवन-सफल्यासाठी अध्यात्माचे विवरण करणारी प्रेरणा पद्यवाङ्मयाच्या रूपात या काळी अस्तित्वात होती. कर्मकांडात्मक धर्म सामान्यांच्या दृष्टीने अनाकलनीय होत चाललेला होता. धर्माचारांस आधारभूत असलेली मूल्ये लोकभाषेतून प्रतिपादिल्याविना धार्मिक जीवनाचे पुनरुत्थापन शक्य नव्हते. अज्ञ समाज 'डोळस' कर्म करण्यास असमर्थ असतो, त्याची श्रद्धा देखील दृष्टिविहीन असते, ही जाणीव साधुसंतांना असल्याने प्रतिष्ठितांच्या आग्रही वृत्तीस न जुमानता आर्ताच्या कल्याणासाठी संतांनी संस्कृताच्या गहनतीरावर मराठी साहित्याचे घाट बांधले. संस्कृत भाषेतील ज्ञान सामान्यांना व्हावे या प्रेरणेतून झालेला गद्य साहित्याचा आविष्कार आणि धार्मिक जीवनाच्या पुनरुत्थापनार्थ झालेली मराठी साहित्यातील पद्यबद्ध निर्मिती अशा दोन पात्रांतून मराठी साहित्य प्रवाहित झाले.

जीवनाच्या सर्वांगांना व्यापणाऱ्या धर्मभावनेचा गद्यसारस्वताने उदासीन राहून अनादर केला असे समजण्याचे कारण नाही. शके १२०० च्या सुमारास गद्य


3880
दा. क्र. 24926
वर्ष 20

सारस्वताच्या या शाखेस श्रीमंत करणारे एक निमित्तकारण घडले. महानुभाव पंथाने धर्मभाषेच्या स्थानी मराठी भाषेस पट्टाभिषेक केल्याकारणाने धर्म, अध्यात्म आदी विषयांवरही मराठी गद्यातून साहित्याची निर्मिती झाली. पंथाचे तत्त्वज्ञान दर्शनाच्या स्वरूपात सुव्यवस्थितपणे मांडण्याची आवश्यकता निर्माण झाली. भाषा मराठीच, परंतु साहित्यनिर्मितीची प्रेरणा बदलली. महानुभाव पंथाचे साहित्य धर्मप्रसाराच्या प्रेरणेतून उदयास आले. वैदिक परंपरेतील पंडितांना संस्कृत भाषेतील ज्ञान मराठी भाषेच्या द्वारे सामान्य लोकांपर्यंत पोचवावयाचे होते, तर महानुभाव पंथातील पंडितांना आपले 'दर्शन' मराठी भाषेत ग्रथित करायचे होते. हे महानुभाव ग्रंथकार संस्कृत भाषेचे गाढे पंडित होते. त्यांनी षट्दर्शनाचा अभ्यास संस्कृत भाषेतून केलेला होता. वेदोक्त धर्म त्यांना अपरिचित नव्हता. चक्रधरोक्त धर्म त्यांना प्रतिपादावयाचा होता. या धर्माचे संहितीकरण त्यांच्या दृष्टीने आवश्यक होते. वैदिक परंपरेतील संस्कृत साहित्याची चौकट आणि पंडिती परंपरेतील भाषापद्धती यांचा संयोग त्यांनी केला. श्रीचक्रधरांची वचने साहित्याच्या या 'गर्भागारात' ठेवून 'श्रुति' 'स्मृती' आणि 'वृद्धाचार' यांचा सभामंडप महानुभाव पंथीयांनी उभारला. या वास्तूवर त्यांनी भाष्य-लापणिकांचे शिल्प कोरले. महानुभावीय साहित्याचे मंदिर अशा रीतीने उभे राहिले. धर्मपर साहित्य-निर्मितीच्या प्रेरणेतून मराठी गद्याला डौलदार आणि भारदस्त रूप प्राप्त झाले.

केवळ जीवनोपयोगी शास्त्राचा परिचय करून देणाऱ्या मराठी-गद्याच्या परंपरेला या नव्या प्रवाहाची जोड महानुभाव ग्रंथकारांनी दिली. पंडिती परंपरेने आणखी एक वळण मिळाले. टीका-भाष्यादिकांच्या रचनेप्रमाणे आध्यात्म चर्चा स्वतंत्रपणे करणाऱ्या ग्रंथाची निर्मिती पुढच्या काळात झाली. ही निर्मिती तशी स्वतंत्र नव्हती. अध्यात्मपर अनेक संस्कृत ग्रंथांच्या आधाराने ती सिद्ध झालेली होती. परंतु ती टीकेच्या वा भाष्याच्या रूपात नव्हती. संस्कृत भाषेत अनभिज्ञ नसला तरी मराठी भाषेतून अध्यात्मः चर्चा करण्याइतपत व ती चर्चा समजून घेण्याइतका समाज प्रबुद्ध झालेला होता, असे अनुमान या 'स्वतंत्र' रचनांवरून करता येते. अध्यात्मचर्चा मराठी भाषे-तूनही होऊ शकते हे पंडितांना पटवून देणारा हा प्रयत्न वाटतो. धर्म आणि अध्यात्म हे विषय संस्कृत भाषेच्याच द्वारे चर्चिले जावेत या सनातनी आग्रही वृत्तीस दाद न देण्याइतकी समाजाची प्रगती झाली होती असेही या रचनांनी सिद्ध केले आहे.

शके १५०० नंतर आणखी एक प्रवाह गद्यसाहित्यात आढळतो. हा प्रवाह धर्मरक्षणाच्या प्रेरणेतून उदयास आलेला आहे. परधर्मीय शासकांच्या राजवटीत महाराष्ट्रातील बहुसंख्याकांच्या धार्मिक श्रद्धेवर खोलवर आघात झाले. त्यातून धर्मा-चरणाइतकेच धर्मरक्षण अगत्याचे असल्याची जाणीव निर्माण झाली. या जाणिवेचा आविष्कार एक नवा घाट धारण करून झाला. या प्रेरणेचा व त्यातून उदयास आलेल्या साहित्याचा विचार स्वतंत्रपणे करण्यात आलेला असला तरी गद्य-साहित्यातील एक अंतःप्रवाह या दृष्टीने तो लक्षात ठेवण्याजोगा आहे.

३४. भिन्न काळ आणि विभिन्न पंथ यांच्या रूपाने व्यक्तदशेस आलेल्या सामाजिक जाणिवा आणि त्यायोगे निर्माण झालेले गद्य साहित्य यांच्या योगे गद्य सारस्वतास वेगवेगळ्या वाटा मिळाल्या, घाट प्राप्त झाले आणि साहित्याचा थाटही त्यायोगे वाढीस लागला. समाजजीवनातील चढ आणि उतार, आशा आणि आकांक्षा यांचा संबंध पंडिती परंपरेच्या वेगवेगळ्या प्रवाहांशी कसा निगडित झालेला आहे याचे प्रत्यंतर अंतःप्रवाहांचे सूक्ष्म निरीक्षण केल्यानंतर येते. या गद्यप्रवाहाच्या विविधतेतही एक समान विशेष आढळतो : व्यावहारिक भाषेच्या व कागदपत्रांच्या तुलनेने साहित्यातील भाषेत आढळून येणारा यावनी शब्दांचा अभाव. शकाच्या चौदाव्या शतकापासून राजभाषा या नात्याने फारशी भाषेच्या संपर्कात मराठी भाषा आली. लोकव्यवहाराची भाषा किती फारसीबहुल बनली होती याची साक्ष ऐतिहासिक कागदपत्र आणि एकनाथांची 'कौल', 'अर्जदास्त' यांसारखी भारुडे देतात. ही भारुडे लौकिक जीवनावरील रूपके असल्याने नाथांनी या भारुडात तत्कालीन लोकभाषेचा वापर केला आहे हे उघड आहे. राज्यकर्ते परभाषिक असले म्हणजे त्यांच्या भाषेचा परिणाम प्रजाजनांच्या भाषेवर किती खोलवर होतो याचा अनुभव आधुनिक महाराष्ट्राने इंग्रजी भाषेच्या निमित्ताने घेतलेला आहेच. फारसी राजभाषा असताना तिचा असाच परिणाम मराठी भाषेवर झालेला होता. या परिणामाच्या वच्याच खुणा मराठी भाषेने आजही आपल्या भंडारात वाळगलेल्या आहेत. पेशवेकाळात जित-जेत्यांची भाषा असे मराठी–फारसीचे संबंध उरलेले नसले तरी महाराष्ट्राबाहेरील राजकारणाच्या निमित्ताने फारसी भाषेतील शब्द-अलंकार पेशवेकाळात हौसेने धारण करण्यात येऊ लागले. शासकीय व्यवहारातील कागदपत्रांतील फारसीबहुल मराठी भाषेचे आश्चर्य त्यामुळे वाटत नाही.

आश्चर्य वाटते ते संतांनी आणि पंडितांनी आपल्या ग्रंथांतील भाषेस यावनी शब्दांपासून अलिप्त ठेवले याचे. राजकीय कामकाजात आणि लोकव्यवहारात फारसी भाषेचे वर्चस्व असताना संतांनी आपल्या काव्यग्रंथांत आणि पंडितांनी आपल्या गद्यसाहित्यात भाषेच्या शुद्ध स्वरूपाची जोपासना करावी हे विशेष आहे. समर्थ रामदासांच्या खेरीज कोणत्याही संतांकडे सहानुभूतीने न पाहणाऱ्या कै. राजवाडे यांनीदेखील या विशेषाचा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे.[५४] इतकेच नव्हे तर महाराष्ट्रात झालेल्या राजकीय क्रांतीचे अप्रत्यक्ष श्रेयही त्यांनी या साधुसंतांना व त्यांच्या साहित्याला दिले आहे.[५५]

स्वधर्माशी प्रत्यक्षाप्रत्यक्ष संबंधित असलेल्या सर्वच भाषाव्यवहारात भाषाशुचित्वाचे हे तत्त्व पाळण्यात येत होते असे दिसून येते. शके १६६२ त लिहिलेल्या एका तांत्रिक पद्धतीच्या मंत्राची भाषादेखील संत-पंडितांच्या भाषेप्रमाणेच यावनी शब्दांपासून अलिप्त राहिली आहे.[५६]

३५. मराठी गद्याच्या पंडिती परंपरेचा प्रपंच हा असा आहे. लिखित मराठी

साहित्यावरोवरच उदयास आलेली ही परंपरा सुमारे आठ-नऊ शतकांच्या कालावधीत समाजजीवनावरोवर वाढली. या जीवनाच्या आशा-आकांक्षांशी समरस होत होत प्राचीन साहित्याच्या कालखंडाची समाप्ती होईपर्यंत ती वर्धमानच राहिली. या परंपरेने भिन्न प्रेरणांतून उदयास आलेल्या निरनिराळ्या प्रवाहांचे भरण-पोषण आपल्यापरीने केले असले तरी स्वतःचा पिंड आणि प्रकृती यांवर कालगतीचा फारसा परिणाम होऊ दिला नाही. पेशवाई-अखेरच्या काळातदेखील मराठी भाषेला 'प्रतिष्ठित' भाषेचा दर्जा देण्यास शिष्टांनी नकार दिलेला असला तरी अनेक ग्रंथकारांनी 'वहुजनहिताय' व सामान्यांच्या इहलोकीच्या व पारलौकिक कल्याणासाठी ही परंपरा जागती ठेवली.[५७]

मराठी गद्य साहित्यातील प्रवाहांचे हे विश्लेषण लिखित साहित्याच्या प्रारंभापासूनचे आहे. कोणत्याही भाषेत साहित्य-निर्मिती होण्यापूर्वी ती भाषा वोलीच्या रूपात दीर्घकाळ रूढ असते : वोली हे सामान्यांच्या स्तरांवर होणाऱ्या भाषाव्यवहाराचे माध्यम असते. या माध्यमातून परंपरेने चालत आलेल्या लोककथा आणि लोकगीते यांचे भरणपोषण होत असते. लोकसाहित्यात साहित्यगुण किती असतात हा प्रश्न विवाद्य म्हणून विचारात घेतला नाही तरी परंपरा आणि संस्कृती यांचे सातत्य लोकसाहित्यामुळे टिकते याविषयी वाद असण्याचे कारण नाही. या लोकपरंपरेसच एखादा प्रतिभासंपन्न साहित्यगुणांनी नटवितो, तिला कलात्मक आकार देतो अथवा तिला प्रगल्भ विचारांचे वाहन या नात्याने समर्थही वनवितो. त्यामुळे केवळ वोली म्हणून वावरणाऱ्या माध्यमास प्रतिष्ठा लाभते व लोकवाङ्मयदेखील साहित्यपदवी प्राप्त करते. भाषाविकासाचा हा सर्वसाधारण क्रम आहे. इतर भाषेप्रमाणे मराठी भाषेसही तो लागू पडतो. या विकासक्रमात साहित्यनिर्मितीच्या भिन्न प्रेरणा निरनिराळे आकृतिवंध घेऊन आविष्कृत होत असतात. मराठी गद्य साहित्यात आढळून येणारे विविध आकृतिवंध आणि त्यांच्या निर्मितीच्या मुळाशी असलेल्या प्रेरणा यांचा शोध हे प्रस्तुत अभ्यासाचे मध्यवर्ती सूत्र आहे. या सूत्रास अनुसरून पंडिती वळणाचे गद्य कोणकोणत्या प्रेरणा घेऊन कोणत्या स्वरूपात विकास पावले याचा परामर्श या प्रकरणात घेण्यात आला आहे.

वोलीला भाषेची व लिखित साहित्याची प्रतिष्ठा प्राप्त होण्यापूर्वी लोककथा अस्तित्वात असतात. त्या समाजाच्या सर्व थरांस परिचित असतात. या परिचित माध्यमाचा उपयोग साहित्य-निर्मितीसाठी निरनिराळ्या कारणांनी होत असतो. या प्रक्रियेत लोककथा ही लोककथा रहात नाही. विशिष्ट हेतूंचे संस्कार तिच्यावर घडतात. अशा संस्कारित कथांचा परामर्श पुढील प्रकरणी घ्यावयाचा आहे.

□

टीपा

१. Naik B. N., Inscriptions of the Deccan, Bulletin of the Deccan College Research Institute, Dec. 48, P. 57.

२. **भाईत्रै**, आश्विन-फाल्गुन, शके १८३४, पृ. १३१.

३. **कुवलयमाला**, १५३.

४. रोडे राउलवेल वखाणी । सातही भासहजहसी वाणी ॥ –
पायहिं पाहंसिया निरूचांगा । लोणचि आणि मांडि अंगा
— **राऊलवेल और उसकी भाषा**, ९२.
गोल्ले आनंदिअ तुमचि देसु । आनिक तेहचा तो वेसु — **तत्रैव**, ८७.

५. **महाराष्ट्र सारस्वत** (पुरवणीसह) आणि **प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास** खंड १, (देशपांडे अ. ना.) या ग्रंथांत हे पद आले आहे.

६. **प्राकृत साहित्य का इतिहास**. ६३३.

७. **रार**, ८१, **ज्योर**, प्रस्तावना ३.

८. **रार**, १०९.

९. **तत्रैव**, ११२.

१०. **ज्योर**, १२१.

११. **तत्रैव**, १२५.

१२. **करणप्रकाश**, ३७.

१३. **विवेकसार**, प्रस्ता. ६५.

१४. **करणप्रकाश**, ६५.

१५. **प्रतिष्ठानीं भटाज्ञा भास्करभटीं सन्यासिया पराजयो करणें** : कविस्वरीं निरोत्तर केलें : संन्यासिया दैन्य आलें – **स्मृतिस्थळ**, ६५.
पिंपळेस्वरी कविस्वर चर्चा तंव तो (विद्वांस) पींपळेस्वरीं पांडित्य करीत असे : सभा घन दाटली असे : ....तवं एके ठायीं एकी चुकी देखिली : आणि कवीस्वरीं भणितलें अवध अवध : ....मग तेणें वाखाणिला : कविस्वरवासीं वितंडिला : ....मग तेणें विद्वांसें पुसिलें : तुम्ही कवण : कवीस्वरवासीं सीघ्र वाक्येंचि उत्तर दिधलें : हा श्लोकु म्हणितला— **स्मृतिस्थळ**, ६५.
' एकवेळ भटाचिया दर्शना नाथपंथी जोगी एक आला : तेणें भणितलें : नाथ जाणा ? भटीं पंडितांची वास पाहिली : मग पंडिती भणितलें : तुम्ही जाणा : तेही भणितलें : हो : बोला पां : ते बोलिलें : मग पंडिती आक्षेपिलें : मग नवनाथ कहे सो नाथपंथी हे चौपदी पंडितीं केली : तो खंडिला ॥
— **अन्वयस्थळ** (मसाप. अंक १०६) २६.

कवीश्वरबासाने आपले पूर्वाश्रमीचे गुरू केशवाचार्य यांचा वादात पराभव केल्याची आणखी एक नोंद स्मृतिस्थळात आढळते.—**स्मृति** ३९.

१६. ' रसकौमोदि ' या ग्रंथाचे संपादन प्रस्तुत लेखकाने केले असून प्रस्तावनेत हा ग्रंथकार व ग्रंथ यांची माहिती आली आहे.
* ' वैद्यवल्लभसंहिता ' (भाग १) डॉ. व. दा. कुलकर्णी यांनी संपादित केला असून उस्मानिया विद्यापीठाने या संहितेचे प्रकाशन केले आहे (१९८७).

१७. ' येहीं (दैत्याच्या योगाने) दगदगिली वसुंधरा ते देखौनि आदि विष्णु नारायण पृथ्वीचा भार फेडावयाकारणें अवतार चारि घेतले ' पृ. ७.

१८. ' पूर्वी पंच कृष्ण नवा प्रकरणां अन्वयो लाविला : बत्तीस लक्षणें : गोसावीं महाराष्ट्र भाषा म्हाइभट्टाप्रति निरूपिली होती : तिये (अनेराजबासांनी) संस्कृतें केलीं : सुभाषित स्तोत्र केलें : प्रमाणाचें भाष्य केलें '
—**अन्वयस्थळ** (**माईंत्रे** वर्ष १७, अंक २, पृ. ५८.)

१९. **लक्षणरत्नाकर**, ३०.

२०. **श्रीचक्रधरोक्त सूत्रपाठ**, ५.

२१. **दृष्टांतपाठ**, ५३.

२२. **आचारस्थळ** (यागप्रकरण, सं. नेने), ४३.

२३. १) ' आर्यशूरने (इ. स. पूर्व २००) जातकों की कथाओं को लेकर संस्कृत में गद्यपद्यमय जातकमाला लिखी. इस में ३८ जातक सुंदर काव्यशैलि तथा भव्य साहित्यिक भाषा में लिखे गये है. '
— राहुल सांस्कृत्यायन, **संस्कृतकाव्यधारा**, २६०

२) डॉ. प. ल. वैद्य यांनी ' बौद्ध आगमार्थसंग्रह ' या नावाचा ग्रंथ संपादित केला असून या ग्रंथात माध्यमकशास्त्र, समाधिराजसूत्र, सद्धर्मपुण्डरीक, लंकावतारसूत्र इत्यादि प्रकरणांत आलेली संस्कृत अवतरणे उद्धृत केली आहेत. (पहा : पृ. २८७, २८८).

३) जैन आगमग्रंथ प्राकृतातून असले तरी या ग्रंथांवर संस्कृतातून टीका लिहिण्यात आल्याचे निर्देश आढळतात. (पहा : जगदीशचंद्र जैनकृत **प्राकृत साहित्य का इतिहास**, १९७)

२४. महानुभावेतर साहित्यात अशा प्रकारचे एक उदाहरण आढळते. मराठी ' विवेकसिंधू ' चे संस्कृत रूपांतर प्रसिद्ध आहे. मूळ ' विवेकसिंधू ' संस्कृत भाषेतच रचण्यात आला असून स्वतः मुकुंदराजाने आपल्याच ग्रंथावर मराठी ओवीबद्ध टीका रचली असेही मत आहे. पहा : **महाराष्ट्र सारस्वत**, ६६४, **विवेकसिंधू** प्रस्ता. ३०, **माई** शके १८३७, पृ. १८०.

२५. **लक्षणरत्नाकर**, पृ. ३७.

२६. **तत्रैव.**

२७. मोने, **मराठी भाषेचे व्याकरणकार आणि व्याकरण प्रबंधकार**, ११५.
२८. **लक्षणरत्नाकर**, परिच्छेद ४८ ते ५१.
२९. **तत्रैव**, परिच्छेद १.
३०. डॉ. व. दा. कुलकर्णी संपादित **चौपदीसंग्रहातून** ही चौपदी घेतली आहे.
३१. **महाराष्ट्र सारस्वत**, ७९०.
३२. **तत्रैव**, ८१७.
३३. **क्रिस्तपुराण**, ९४.
३४. **तत्रैव**, ९५.
३५. **भाईत्रै**, वर्ष ११, अंक २, पृ. १९६.
३६. **विवेकसार**, प्रस्ता. ५.
३७. इति परमहंस परिव्रजकाचार्य श्रीमद्‌वासुदेवस्वामी जे तेहीं विवेकसार ऐसें नाम जयाचें तो ग्रंथ संस्कृत फक्किकारूप केला. तेहींच परम दयाळुपणें आपले शिष्य श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीरघुनाथेंद्रस्वामी जे त्याचे हाती संस्कृतानधिकारी ऐसे जे ब्राह्मण आणि श्रीपाद तेलंग यांकारणें तैलंग भाषेवरून ग्रंथ करा म्हणून आज्ञा केली. त्याउपरीं तेहीं मननग्रंथ ऐसें नाम ठेवून ग्रंथ केला. याउपरीं श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीबाळकृष्णानंद स्वामी सरस्वती जे तेही महाराष्ट्र ब्राह्मण आणि श्रीपाद संस्कृत अधिकारी त्यांस वेदशास्त्रानुसार अभिप्राय जो याचे ठाईं अभिनिवेश होऊन साक्षात्काराकारणें स्वशिष्य बाळाजी अंबाजी नामक लक्ष्मीश्वरचे गृहस्थ पौरुषत्रय वेदांताचे ठाईं निष्ठा आहे ज्यास त्यास आज्ञा केली त्यावरून तेहीं महाराष्ट्र ग्रंथ यथा तैलंग केला तो श्रीस्वामीचे कृपेकरून समाप्तीते पावलां.'— **विवेकसार** ऊर्फ **मननग्रंथ**, १९६.
३८. **विवेकसार**, १००.
३९. **तत्रैव**, १०१.
४०. **पंचीकृतविवेक**, २७.
४१. **सुगमबोध** हा ग्रंथ प्रस्तुत लेखकाने संपादित केला असून उस्मानिया विद्यापीठाने तो प्रकाशित केला आहे.
४२. 'Judging from the above forms of Marathi language of Commentary I may tentitively assign this commentary to the later half of the 15th century or middle of the 16th century.' — Studies in the History of Indian Cosmatics and Perfumes. Published in the Studies in Indian Culturai History, Vol. I, 43.

* श्रीधर रंगनाथ कुलकर्णी, **संगीतदर्पण** महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, १९८५

* * **मानसोल्लास**, भाग ३, कथाविनोद श्लोक १४१७–२३ (म्हैसूर प्रत) पृ. ८२.

४३. **महानुभाव पंथ व त्याचे वाङमय**, २५८.

४४. **लक्षणरत्नाकर**, ८८.

४५. **तत्रैव**, १५.

४६. **महानुभावीय मराठी वाङमय** (प्रथमावृत्ती), ७५.

४७. **मराठी स्वाध्याय संशोधन पत्रिका**, अंक ३, (१९६८)

४८. **तत्रैव**, ७५.

४९. **महाराष्ट्र सारस्वत** (पाचवी आवृत्ती), १९६.

५०. एका पानावर आलेली संस्कृत श्लोकावरील टीका नमुन्यादाखल पुढे देण्यात येत आहे.

' सिके । काच । नेत्र रोग । हे ३ ही काच । म्हणवितांहेत । विशेषणामुळे बहुवचन ॥ प्रपंच : हे १ विपर्यस्ता ठाईं । विस्तारा ठाईं वर्तते । ज्येष्ठ मासा ठाईं । शुद्धा ठाईं धवला ठाईं वर्तते ॥ .... ज्येष्ठ आषाढमासा ठाईं या तिनी ठाईं । पुंसिः पुल्लिंग ॥ पवित्रा ठाईं शुभ्रा ठाईं या दो ठाईं । त्रिषु : तिनी लिंगी : या पांचां ठाईंही शुचि शब्द वर्तते ॥ रुचि हे १ स्त्रियां : स्त्रिलिंगी : हे १ आलिंगन । इच्छा । किरण । या तिनी ठाईं वर्तते ॥ इति चान्ता ॥

५१. **महानुभावीय मराठी वाङमय** (प्रथमावृत्ती), ७५.

५२. **महाराष्ट्र भाषेचे व्याकरण**, पृष्ठांक अनुक्रमे १, २, २६ आणि ७६.

५३. **मराठी भाषेचे व्याकरणकार व व्याकरण प्रबंधकार**, ८९.

५४. ' साधुसंतांचे ग्रंथ म्हणजे ' त्या वेळच्या फारसीमिश्रित धेडगुजरी मराठी बडबडीवर केवळ रामबाण औषध होते. '— **राप्र**, ४१७.

५५. ' हे ग्रंथकार न होते तर सतराव्या शतकात महाराष्ट्रात झालेली स्पृहणीय क्रांति झालीच नसती. ' **राप्र**, ४२०.

श्रीशिवछत्रपतींनी तत्कालीन पंडितांच्या सहाय्याने ' राज्यव्यवहारकोश ' सिद्ध केला होता. मराठी भाषेचे यावनी वलण खंडित करण्यासाठी करण्यात आलेला हा एक महत्त्वाचा प्रयत्नदेखील या संदर्भात ध्यानात ठेवला पाहिजे.

५६. ' मल्लासि झोंबिजे । बळ अद्भुत होय । ओं नमो दिठी देखिलिया । असम साहस जालें तेणें जाऊन झोटिंगापुढें सांगितलें । तुझें मज देणें । धारा वहिणीची आण । ही देवागुरूची आण । सिद्धि दे स्वाहा ॥ येणें मंत्रें दोन्ही हळदी आमंत्रून आंगीं उटणें कीजे । चिंतिलें कृत्य देवतास्वामी सांगेल सर्व संपूर्ण ॥ शके १६३२ विकृति संवत्सरे लिख्यते ॥ ' **भाई** शके १८३७, पृ. १२९.

या तांत्रिक मंत्रात एकही यावनी शब्द आढळत नाही हे लक्षात ठेवले पाहिजे.

५७. शंकर दैवज्ञकृत ' तिथिनिर्णयमाला ' या ग्रंथाचा परिचय कै. राजवाडे यांनी

करून दिला आहे. हा ग्रंथकार शके १६८८ च्या सुमारास हयात होता असे सांगतात. त्याच्या उपरोक्त ग्रंथाची शके १७०८ मधील नक्कल उपलब्ध आहे. ग्रंथकाराने शेवटी 'पंडितांनी बोल लावू नये' असे विनविले आहे. त्यावरून या काळातदेखील मराठी भाषेतील ग्रंथलेखन गौणच समजले जात होते असे दिसते.

'मऱ्हाटे भाषेणें लिहिलां म्हणऊन पंडितीं बोल न ठेवावा, जो निर्णय लिहिला तो निबंध पाहून लिहिला' — **माई**, १८३७, पृ. २५.

□

३. कथाप्रधान साहित्य

१. लोक साहित्याची परंपरा २. अद्‌भुताचे आकर्षण ३. संस्कारित लोककथा ४. मराठी कथांची प्राकृत परंपरा ५. लोकसाहित्याची उपेक्षा ६. मराठी पंचतंत्र ७. 'लीळाचरित्रातील' दृष्टांतकथा ८. व्रतकथा ९. रामायण-महाभारतातील कथा, आख्याने १०. महानुभाव चरित्रपर कथा आख्याने ११ कथात्मक साहित्याचे महानुभावीय वर्गीकरण १२. चरित्र ग्रंथांची भाषा १३. चरित्र-ग्रंथांची प्रेरणा १४. जैन परंपरेचा कथात्मक आदर्श १५. एका अपवादाची मीमांसा १६. कथात्मक साहित्याची विविध वळणे.

प्राचीन मराठी गद्य साहित्य प्रमाणाने अल्प असले तरी या साहित्यास प्रदीर्घ परंपरा असून ती शकाच्या सहाव्या शतकापासून ते अठराव्या शतकाच्या अंतापर्यंत चालत आलेली आहे. इतकेच नव्हे तर अव्वल इंग्रजी अमदानीतदेखील ती रेंगाळत होती हे मागील प्रकरणातील विवेचनावरून स्पष्ट होईल. गद्य-साहित्याच्या उपलब्धीचे अल्प प्रमाण हे निर्मितीच्या अभावाचे द्योतक नसून ते अनुपलब्धीचे निदर्शक आहे, हे पंडिती परंपरेच्या विवरणाच्या संदर्भात केलेल्या विवेचनावरून ध्यानात येईल. प्राचीन गद्याच्या परंपरेशी संबंध असलेल्या कथाप्रधान साहित्याचे विवरण या प्रकरणात करण्याचे योजिले आहे.

१. कोणत्याही भाषेत लिखित साहित्याची निर्मिती होण्यापूर्वी मौखिक परंपरेने चालत आलेले लोकवाङ्मय अस्तित्वात असते. या मौखिक साहित्यात पारंपरिक गीते असतात तशाच पूर्वापार चालत आलेल्या कथाही प्रचलित असतात. असे वाङ्मय सामान्यपणे जनमानसाचे प्रतिबिंब असते. समाजाच्या सांस्कृतिक विकासाचेही निदर्शक असते. अशा वाङ्मयास केवळ त्या त्या भाषेतील मौखिक साहित्याची परंपरा असते, असे नसून मानवी समाजाच्या सांस्कृतिक विकासाची परंपरा घेऊन या साहित्याचा

विकास घडत असतो. विकसनाचे हे प्रयत्न केवळ एकाच भाषेच्या कालावधीत घडतात असे नाही. लोकसाहित्याच्या विकासक्रमाने अनेक भाषांचे उदयास्त पाहिलेले असतात. प्रत्येक भाषिक समूहाच्या अंतरंगावरील त्याची पकड विलक्षण असते. बालकाने सहजगत्या मातृभाषा आत्मसात करावी तद्वत् लोकसाहित्य लोकमानसात रुजत असते, आणि समाजास संस्कारित करीत असते. समाजाचा मानसिक पिंड घडविण्यात या संस्काराचा फार मोठा वाटा असतो. आपण लौकिक अर्थाने ज्यास 'शिक्षण' हे नाव देतो त्या शिक्षणापासून अलिप्त असलेला समाजदेखील लोकसाहित्याच्या संस्काराने नकळत सुसंस्कृत होत असतो. भिन्न प्रदेशांत, विभिन्न भाषांतून वेगवेगळ्या काळांपासून चालत आलेल्या समान लोककथा अशा संस्कारांची व्यापकता व सार्वकालित्व यांची साक्ष पटवितात.

प्रगत भाषांतूनच लोकसाहित्य आढळते असे समजण्याचे कारण नाही. बोलीच्या रूपात नांदणाऱ्या भाषादेखील लोकसाहित्याच्या दृष्टीने समृद्ध असतात. गोंड, भिल्ल, कातकरी, वारली यांच्यासारख्या आदिवासी जमातींत देखील त्या त्या बोलीतून प्रचलित असलेल्या कथा-गीते आढळतात. वऱ्हाडी, अहिराणी यांच्यासारख्या मराठी भाषेच्या प्रादेशिक बोलीत तर लोकसाहित्य असतेच असते. लिखित साहित्याचा आस्वाद घेण्यास असमर्थ असलेल्या समाजाचे मनोरंजन तर अशा साहित्याने होतेच; त्यावरोवरचं त्या त्या समाजाच्या सांस्कृतिक परंपरा, सामूहिक धारणा आचारविचार यांचे संरक्षणसंवर्धनही अशा साहित्यातून घडत असते. अशा समाजातील धार्मिक विधिविधानेही कित्येकदा लोकगीतांच्या गायनाद्वारे पार पडत असतात. समाजातली रसिकता जागविण्याचे कार्यदेखील लोकसाहित्याच्या द्वारे घडत असते.

२. अद्भुताचे आकर्षण मानवी मनाला स्वभावतःच असते. अप्रगत समाजात ते थोडे अधिक असते एवढेच. केवळ निसर्गाच्या संपर्कात येणारा मानव सभोवतालच्या वातावरणाच्या योगाने कोड्यात पडतो. आपल्या समजुतीप्रमाणे तो ही कोडी सोडविण्याचा प्रयत्न करीत असतो. दूरवर पसरलेले निळे आकाश प्रतिभावंतांचीही क्षेप कुंठित करीत असते. सामान्य माणूस आपल्या परीने त्याचे रहस्य उलगडण्याचा प्रयत्न करीत असतो. नियमाने उदयास्त पावणाऱ्या सूर्यचंद्रांच्या गतीचा वेध तो आपल्या परीने घेत असतो. विश्वाच्या रहस्यासंबंधी रूढ असलेल्या लौकिक, धार्मिक आणि पौराणिक कथा म्हणजे व्यक्तीने, व्यक्तिसमूहाने वा जमातींनी आपापल्या समजुतीप्रमाणे विश्वाचे कोडे उलगडण्याचा केलेला प्रयत्नच म्हटला पाहिजे. अशा प्रयत्नांतूनच लोककथा उदयास येतात. निर्मात्यांची बौद्धिक पातळी आणि सांस्कृतिक प्रगती यांच्या मानाने या लोककथांना आकार मिळत जातो.

'चंद्रमा मनस्ते जातः चक्षोः सूर्यो अजायत ॥ —' आदिशक्तीच्या वा पुरुषाच्या मनातून चंद्र उत्पन्न झाला तर त्याच्या डोळ्यांतून सूर्याने जन्म घेतला' अशी ऋग्वेदातील पुरुषसूक्ताने चंद्रसूर्याची उत्पत्ती सांगितली आहे. देव-दैत्यांनी केलेल्या

समुद्रमंथनातून चंद्र वर आला असे पुराणांचे कथन आहे. तर पृथ्वी आणि आकाश यांना विवाहोत्तर झालेली संतती असा चंद्रसूर्यांचा जन्म आदिवासी लोककथांतून आढळतो. धरतीस आलिंगून असलेले आकाश कोणा एक प्रातःकाळी एका वृद्धेची केरसुणी लागून जे दूर पळाले ते अद्याप खाली आलेच नाही अशी मनोरंजक माहिती एका आदिवासी कथेत आली आहे. दुसऱ्या एका कथेने कजाग पत्नीच्या (पृथ्वीच्या) माराच्या भीतीने तिचा नवरा (आकाश) दूरवर पळाला असा शोध लावला आहे. 'आप एव ससर्ज आदौ—' प्रथम पाणी निर्माण केले (विश्वकर्त्याने) असे स्मृतिवचन आहे; तर कित्येक आदिवासी कथांतून आपदेवाने (जलदेवता) पृथ्वी कोणकोणत्या परीने उत्पन्न केली यासंबंधींच्या रंजककथा आल्या आहेत. इंद्रधनुष्य हे अनेक कवींच्या काव्याचे विषय झाले आहे. या प्रतिभावंतांना इंद्रधनुष्याचा थांग लागला नाही तो नाहीच. सामान्य असंस्कृत माणसाला मात्र त्याचे कोडे उलगडले आहे. त्याच्या दृष्टीने ती आहे पायवाट, देवांच्या आकाशातील येरझारांमुळे रुळलेली ! पर्जन्याची उत्पत्ती वैज्ञानिकदृष्ट्या भली निराळी असो. आदिवासी जमातींना त्यांत फारसे गूढ वाटत नाही. त्याच्या दृष्टीने प्रेयसीच्या शोधात असलेले देव फीरफीर फिरतात, थकतात आणि मद्य पितात; पिताना सांडलेले मद्य म्हणजेच पर्जन्य !

अशा अद्‌भुत कथा केवळ निसर्गाच्याच संबंधात रूढ झाल्या आहेत असे नाही. राजाराणींच्या, राजपुत्र-प्रधान-पुत्रांच्या, कर्तबगार भाग्यवंतांच्या आणि कर्तृत्वशून्य गर्भश्रीमंतांच्या, खलदुर्जनांच्या तशाच सतीसाध्वींच्या कितीतरी कथांतून अद्‌भुतांचे साम्राज्य आढळेल. अशा कथा लोकपरिसरात वाढतात, हाडामासांनी पुष्ट होतात आणि एका पिढीतून दुसऱ्या पिढीत संक्रांत होतात. दिसामासाने वाढणाऱ्या बालकासारखे लोकवाङ्मय पिढीपिढीने वाढते. बालकांसारखीच निर्मळ मने असलेला समाज हा ठेवा जपून ठेवतो, साहित्याचे हे मूलधन अशा रीतीने अजर तसेच अमर ठरते.

देशपरत्वे, कालपरत्वे आणि भाषापरत्वे लोककथा अनेक प्रवाहांनी युक्त होते. लोकजीवन फुलविणाऱ्या या कथांतून अनेक प्रवाह उदयास येतात. धर्म, पंथ आणि संप्रदाय अशा लोककथांत स्वतःचे रंग भरतात. बोध करणारे पंतोजीही आपल्या समजुतीप्रमाणे तिच्यावर साज चढवितात. या महापुरात पुराणेही सापडतात. पण, ते लव्हाळ्याच्या रूपाने 'वाचतात'. अद्‌भुताच्या घरी पुराणे, पंतोजी, जति, श्रावक या सर्वांनाच पाहुणेर होतो. कथेची कहाणी होते, व्रतकथा बनते, बोधकथाही होते आणि भिन्न रुचीच्या व पातळीवरच्या लोकांचे रंजन करते, जीवनास वळण देते.

३. लोककथांचे हे सामर्थ्य लक्षात घेऊनच धर्मपंथ आणि संप्रदाय आपल्या आचारविचारांचे, व्रतवैकल्यांचे सूत्र लोककथांच्या सभोवती विणतात. या संस्कारांमुळे समाजात या पंथांच्या विचारसरणीचा व आचरधर्माचा प्रसार सहजगत्या होतो.

धार्मिक भावनांच्या प्रसाराचे फार मोठे कार्य अशा संस्कारित कथा करीत आल्या आहेत. वेदवाङ्मयात बीजरूपाने असलेल्या कथा, ब्राह्मणग्रंथांतील आख्याने व अन्वाख्याने, भारताचे महाभारत करणारे कथासमुच्चय. बौद्धांचे जातक वाङ्मय, जैन-पुराणातील कथा, पौराणिक आख्याने व उपाख्याने अशी कितीतरी संस्कारित कथांची उदाहरणे देता येण्यासारखी आहेत. पंचतंत्र आणि हितोपदेश यांतील नीतिकथा संस्कारित कथांचाच एक वेगळा वर्ग मानता येईल. अशा कथांचे श्रवण करणारा वर्ग एक कथा या नात्यानेच त्यांचा स्वीकार करतो. त्यातील हेतुपूर्वकता श्रोत्यांच्या गावीही नसते. सतत होणाऱ्या संस्कारांनंतर मात्र नकळत श्रोता कथेच्या हेतुपूर्वकतेने प्रभावित होतो. कालांतराने संस्कारित कथाच मान्यता पावते आणि मूळ कथा आणखी एखाद्या संस्करणाचा विषय होण्याची वाट पहात कालप्रवाहात तग धरून राहते.[१]

स्थूलाच्या साहाय्याने सूक्ष्माचे आणि परिचिताच्या मदतीने अपरिचिताचे ज्ञान करून घेणे हे ज्ञानप्राप्तीचे सर्वमान्य साधन समजले जाते. सिद्धहस्त कवी आणि लेखक याच मार्गाने ज्ञानाचा प्रसार करीत असतात. 'लीळाचरित्रात' आलेले दृष्टांत याच प्रकारचे आहेत. ज्ञानेश्वरांनीही टिटवीच्या कथेचा दृष्टांत ज्ञानेश्वरीत विषयाचे स्पष्टीकरण करताना दिला आहे.[२] अनेक पुराणकथांचा संदर्भही याच हेतूने ज्ञानेश्वरीत येतो.[३] या कथा लोकांच्या परिचयाच्या असतात. त्यामुळे कथेचा संदर्भ लागताच प्रतिपाद्य विषयाचा बोधदेखील चटकन् होतो.

विशिष्ट धर्म आणि पंथ यांच्या विचारांच्या प्रसारार्थ लोककथांवर विशिष्ट संस्कार करण्यात येतात, त्याचप्रमाणे व्रते, तीर्थे, देवता यांचे माहात्म्य सांगण्याच्या निमित्तानेही लोककथांवर आवश्यक ते संस्कार करण्यात येत असतात. अशा कथांच्या शेवटी फलश्रुतीही हेतूपूर्वक जोडलेली असते. त्यामुळे सश्रद्ध आणि सकाम भाविकांच्या नित्य वा नैमित्तिक पठणाचे व श्रवणाचे विषयही अशा कथा बनतात. व्रतांची फल-श्रुती व तीर्थस्थानाचे माहात्म्य-पठन यांना जशी फलश्रुतीची जोड असते तशीच ती धर्मप्रसार संत व भक्त यांची चरित्रे व आख्याने यांनाही असते.

४. लोककथा आणि त्यांतून उद्भवलेले विभिन्न प्रवाह यांचा 'वसा' मराठी साहित्याने अगदी प्रारंभापासून घेतला आहे. प्राकृत अपभ्रंश या मराठी भाषेच्या पूर्ववर्ती भाषांतून बरेच समृद्ध कथासाहित्य आहे. त्यातही वर उल्लेखिलेले विविध प्रवाह आढळतात. पैशाची भाषेत रचलेली गुणाढ्याची बृहत्कथा आज मूळ स्वरूपात अस्तित्वात नसली तरी तिचे संस्कृत व प्राकृत अवतार आज उपलब्ध आहेत. सोमदेवाचा 'कथा-सरित्सागर' आणि क्षेमेंद्राची 'बृहत्कथामंजरी' यांवरून गुणाढ्याच्या निर्मितीची कल्पना करता येते. प्राकृताकडे उपेक्षेने व तिरस्काराने पाहणारा संस्कृत भाषेच्या पंडितांचे वर्ग प्राकृत भाषांतील कथासंग्रहाचे संस्कृत अनुवाद करण्यास पुढे सरसावतात ही घटनाच या कथांच्या प्रभावी स्वरूपाची पावती आहे. त्याच प्रमाणे कथासाहित्या-विषयीच्या आसक्तीचाही तो परिणाम मानता येईल. जैन आणि बौद्ध या पंथांनी

पंथाच्या प्रसारार्थ तत्त्वज्ञानपर वाङ्मयापेक्षा कथासाहित्याचाच प्राधान्याने स्वीकार केला आहे. महाराष्ट्री प्राकृत आणि अपभ्रंश या भाषांतील जैन साहित्य वाचताना आपण लोककथांच्या विश्वातच वावरत आहोत असा अनुभव येतो. अर्थात् या कथा संस्कारित आहेत हे विसरता येत नाही. या कथांचा संग्रह ग्रंथरूपाने झालेला असला तरी ग्रांथिक भाषेच्या प्रौढत्वाचा आणि गांभीर्याचा स्पर्श या साहित्यनिविष्ट कथांना झालेला नाही. कथाकथनाची हीच शैली मराठी भाषेने पुढे चालू ठेवली आहे. मराठी कथांच्या पूर्वावर्ती शैलीची कल्पना यावी या हेतूने प्राकृत भाषेतील दोन कथांचे काही भाग पुढे उद्धृत करण्यात येत आहेत. यांपैकी पहिला उतारा शके ७०० च्या सुमारास रचण्यात आलेल्या 'कुवलयमालेतून' घेतलेला असून दुसरा उतारा डॉ. उपाध्ये यांनी संपादिलेल्या 'करकण्डुचरित्र' या ग्रंथास जोडलेल्या परिशिष्टातून घेण्यात आलेला आहे.

मराठी भाषेच्या उत्पत्तीसंबंधी विचार करताना नेहमी 'कुवलयमाला' या ग्रंथाचा उल्लेख होत असतो. मराठी माणसाचे व त्याच्या भाषेचे विशेष सांगणारा प्राचीनतम ग्रंथ या नात्याने 'कुवलयमाला' अभ्यासकांच्या परिचयाची आहे. या ग्रंथातला हा एक उतारा :

> 'चिंतयं तेण भणियं, कुमार, कत्थ तुमं जा ओ. कुमारेण भणियं, आउज्झापुरवरिए. तेण भणियं कत्थं सा आउज्झापुरवरी. कुमारेण भणियं भरहवसो. तेण भणियं कत्थं स भरहवसो. कुमारेण भणियं जंबुदीवे. तेण भणियं कत्थं स जंबूदीवं. कुमारेण भणियं लोए. तेण भणियं सव्वं अलियं. कुमारेण भणियं किं कज्जं....तओ कुमारेण हसिऊण भणियं किं जं जं तेल्लोपक कपयडं तं तं जणो जाणइ सव्वे – तेण भणियं सुठ्ठू जाणइं....' [४]

पुढे मराठी पंचतंत्रातील काही उतारे आले आहेत त्यावरून कुवलयमालेची संवादात्मक शैली मराठी पंचतंत्राने उचलल्याचे जाणवेल. 'लोळाचरित्रातील' पुढील उतारा दोन्ही ग्रंथांचे परस्परांशी असणारे ज्ञान स्पष्ट करणारा आहे.

> " मीया त्यांतें पुसिलें : आपणासि नांव काइ : महादेवो मुनि : आपण कवणाचे अनोग्रहीत : अनंत मुनिचेया : ते कवणाचे : चांगदेव राउलाचे : श्रीचांगदेव राउळे बीजे कैशापरि केलें : तें आम्ही नेणो : तरि तुमचे अनंतमुनी काइ म्हणा : आम्ही अनंतु अनंतु म्हणो. " [५]

डॉ. अ. ना. उपाध्ये यांनी 'करकण्डुचरित्र' या जैन ग्रंथाचे संपादन केले असून या संपादनास जोडलेल्या परिशिष्टात उत्तराध्ययन सूत्रावरील देवेंद्राची टीका देण्यात आली आहे. या टीकेचा काही भाग मराठी छायेसह पुढे उद्धृत करण्यात येत आहे. कथासंदर्भ असा :

करकण्डूची गर्भिणी माता आपल्या पतीसह हवनक्रीडेस गेली असता तिची व राजा असलेल्या तिच्या पतीची ताटातूट होते. राजा कसा तरी आपल्या नगरीत येतो.

परंतु त्याची गर्भिणी पत्नी भ्रमंतीत असतानाच प्रसूत होते. तिला पुत्र होतो. या पुत्रास एका चांडाळाच्या स्वाधीन करून ही राणी श्राविका बनते. जगाच्या परिचयाचा असलेला हा चांडाळपुत्र असतो राजपुत्र. त्याला एक दंड मिळालेला असतो. हा दंड जसजसा वाढेल तसातशी या राजपुत्रास होणारी राज्यप्राप्ती जवळ आली असा संकेत असतो. या दंडापायी करकण्डूचे एका ब्राह्मणाशी भांडण होते. दंडासंबंधीचे भाकित ब्राह्मणास सांगितले असताना ब्राह्मण दंडाचा नाद सोडतो. पण, एक आश्वासन मागतो : 'तुला राज्यपदाची प्राप्ती झाल्यावर मला एक गाव दान दिला पाहिजे.' करकण्डू ते मान्य करतो. योगायोगाने करकण्डू राजा होतो आणि ब्राह्मण आश्वासिलेलें दान मागण्यासाठी येतो :

> "ताहो सो धिज्जाइओ, आग ओ देहि मम गामं भणइ : जो ते रूच्चइ ते गेहइ : सो भणइ : मम चंपाए घरं ता तिए विसये देहि : ताहे दहिवाहणस्स लेहं देइ : एयस्य बम्हणस्य दिज्जे एकं गामं : अहं तुज्झ जं रुच्चइ गामं वा नअरं देमि : सो रुट्ठो : दुट्ठमायंगो अप्पाणं न याणइ त्ति. दुएण पडियागएण कहिअं : करकण्डु कुविओ : चंपा रोहिया : जुद्ध वट्टइ : ताहे संजाइए सूयं : मा जनक्खओ होइ त्ति मयहरियं आपुच्छिऊण गया तं नयरं : करकण्डु उत्सारिता रहस्यं भिंदइ : एस तव पिय त्ति : तेण ताणि अंबा पितरो पुच्छिआणि : तेहिं सव्व भावो कहिओ : भाणेणं न ओसरइ : ताहे सा चंपं आइगया : रन्नो घरं अईइ : माया : यायपाडियाओ दासीओ परूण्णओ : राइणा विसुयं : सो वि आगउरो : वन्दिता : असणं दाऊण तं गब्भं पुछइ : सा भणइ : एसो वेण राहियं नयरं : तुठ्ठो, निग्गओ : मेलिओ : दोवि रज्जाणि तस्य दाऊण दहिवाहणो पव्वाइओ." [1]

याच कथेचे शाक्यतो मूळ कायम ठेऊन मराठी रूपांतर असे :

> तेव्हा तो आला. दे मला गाव म्हणाला. जो तुला रुचेल तो घे. तो म्हणाला. माझं घर चंपेला, गाव त्याच प्रदेशात दे. तेणे दधिवाहनास लेख दिला : 'एक गाव या ब्राह्मणास दीजे.' तो रुष्टला. हा दुर्भागी समजतो कोण स्वतःला ? दूत परतला. त्याणे कथिले. करकण्डु कोपला, 'युद्ध होऊ द्या.' तेव्हा जननीने ऐकले. जनक्षय होऊ नये म्हणून आश्रमाच्या श्रेष्ठींस पुसून ती नगरीस आली. करकंडूस (बाजूस) बोलविले. रहस्य भेदिलें. हा तर तुझा पिता. तेणे आपल्या मातापित्यास पुसिले. तिने सर्व सांगितले. तो मानी काही केल्या ओसरेना. तेव्हा ती (चंपा) नगरीस आली. राजघरीं गेली. ओळखलें. दासा दासी पाया पडल्या. राजानें ऐकले. तो आला. वंदिले. गर्भाची विचारपूस केली. ती म्हणाली : तोच ज्याने नगर वेढिलें. तुष्टला, निघाला. भेटला, दोन्ही राज्ये देऊन दधिवहन परतला. (निवृत्त झाला. [परावृत्त]).

वाक्ये लहान. क्रियापदे अथवा धातुसाधिते यांच्या योगाने वाक्यार्थ प्रगट करणे ही बोलींची वैशिष्ट्ये वर दिलेल्या दोन्ही कथांतून आढळतील. 'ज्योतिषरत्न मालेतील' काही उतारे अगोदरच्या प्रकरणात आले आहेत. त्यातही वाक्यांची घडण अशाच प्रकारची असल्याचे निदर्शनास येईल. अगोदर आलेला लीळाचरित्रातील उतारा व पुढे आलेले पंचतंत्रातील उद्धरण वाचले असताना प्राचीन मराठी कथेने प्राकृत व अपभ्रंश भाषेतील कथाशैली उचलली आहे हे सहजच ध्यानात येईल.

५. प्राचीन कथात्मक साहित्य विशेषतः लोककथा अद्यापही मोठ्या प्रमाणावर असंग्रहित आहेत. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या अंकातून काही लोककथा प्रसिद्ध झाल्या आहेत. लोककथा मालेतूनही काही साहित्य प्रकाशात आले आहे. प्रा. वामन चोरघडे यांनी या संदर्भात उल्लेखनीय कार्य केले आहे. गेल्या दोन दशकांत अभ्यासक-संशोधक लोकवाङ्मयाकडे आकृष्ट झाले आहेत. त्यांच्या प्रयत्नांतून लोककथा प्रकाशात येत आहेत. त्याचप्रमाणे लोककथांवर बरीच चर्चाही होऊ लागली आहे. श्रीमती दुर्गाबाई भागवत यांच्या 'लोकसाहित्याची रूपरेखा' या ग्रंथाने एकंदरीत संशोधनाला शिस्तही आणलेली दिसते. इतरही काही अभ्यास गेल्या दहा-पंधरा वर्षांत प्रसिद्ध झाले आहेत.*

आजवरच्या अभ्यासात लोककथांतील आशय आणि लोकपरंपरा यांवर अधिक भर देण्यात आला आहे. लोककथांतील आशय आणि परंपरा यांच्याप्रमाणेच या कथांच्या शैलीचाही अभ्यास व्हावयास पाहिजे. लोककथेचा घाट मध्यवर्ती कल्पून त्यात घडलेल्या विकासातून समाजजीवनाशी कथांचा असलेला संबंध शोधण्याचा प्रयत्न झाल्यास समाजेतिहासासंबंधी मोलाची सामग्री या साधनांतूनच उपलब्ध होऊ शकेल. या अभ्यासात सुधारणेला बराच वाव आहे असे मत श्रीमती दुर्गा भागवत यांनी सुमारे तीस वर्षांपूर्वी व्यक्त केले होते.[७] गेल्या तीस वर्षांत फारशी प्रगती झालेली नसल्याने श्रीमती भागवत यांचे मत आजही स्वीकारावे लागते.

६. प्राचीन मराठी कथात्मक वाङ्मयाचा विचार करताना लोककथांच्या तुलनेने संस्कारित कथा आणि नीतिकथा यांची पार्श्वभूमी असलेल्या कथांचाच परामर्श महत्त्वाचा ठरतो. नीतिकथांना संस्कृत आणि मराठी या दोन्ही भाषांतील साहित्यात दीर्घ परंपरा आहे. नीतिकथा एका परीने संस्कारित कथाच होत. प्राचीन मराठी साहित्यात 'पंचतंत्र' आणि 'हितोपदेश' यांची समग्र व त्रुटित अशी कित्येक हस्तलिखिते उपलब्ध झाल्याची नोंद संशोधकांनी केली आहे. त्यातील काही पद्यबद्ध आहेत, तर काही गद्यात लिहिलेली.[८] या नीतिकथांची सात-आठ हस्तलिखिते पाहिल्याचे कै. भावे सांगतात.[९] महाराष्ट्र कवींत एक त्रुटित पंचतंत्र प्रसिद्ध झाले असून म. म. पोतदार यांनीही दोन प्रतींची माहिती दिली आहे. त्यांपैकी एका पंचतंत्रासंबंधी 'मराठी भाषेचे स्वरूप फार जुनाट म्हणजे ज्ञानेश्वरकालीन, किंचित पुढचे' असा त्यांचा अभिप्राय आहे; तर दुसरी प्रत भाषेच्या स्वरूपावरून तेराव्या शतकातील आहे असे त्यांचे मत आहे.[१०] कै. नेने

यांनी शके १६९७ त नकललेल्या एका पंचतंत्राचा परिचय करून दिला आहे; या पंचतंत्राची भाषा 'ग्रंथलेखनास जुळणारी जुनी' असे मत त्यांनी दिले आहे. या प्रतीला दुसऱ्या एका कारणाने महत्त्व आहे. ते म्हणजे ही पोथी एका महानुभव मठाच्या संग्रहात उपलब्ध झाली आहे. ''

डॉ. वि. भि. कोलते यांनी कै. नेने यांनी परिचय करून दिलेल्या हस्तलिखिताच्या आधारेच 'पंचोपाख्यान' संपादित केले असून ते इ.स. १९७९ साली साहित्य संस्कृती मंडळाने प्रसिद्ध केले आहे. ही पोथी बालबोध लिपीत असली तरी सकळ लिपीतील हस्तलिखितावरून ती नकलण्यात आली असावी, असे डॉ. कोलते यांचे मत आहे. (प्रस्ता. पृ. ५०) महानुभाव पंथात पंथाच्या एकंदरीत तत्त्वज्ञानाशी व आचरधर्माशी संबंध नसलेले ग्रंथदेखील संग्रह करण्याची प्रथा होती असा निष्कर्ष या पोथीच्या आधारे काढता येतो.

पंचतंत्राचा आणि त्याच्या विविध अवतारांचा परिचय करून देताना डॉ. कोलते यांनी व्यक्त केलेले मत प्रस्तुत विवेचनात लोककथा आणि कथासाहित्य यांच्या अन्योन्य संबंधाविषयी करण्यात आलेल्या विवेचनास पुष्टी देणारे आहे.

> 'या सर्व कथा लेखकाने म्हणजे विष्णुशर्म्याने स्वतःच्या कल्पनेतून निर्माण केल्या असतील असे मात्र म्हणता येत नाही. लोकमानसात परंपरेने दीर्घकाळ रुळलेल्या कथा नीतिशास्त्राच्या सूत्रात गुंफण्याचे अपूर्व कार्य त्याने आपल्या प्रतिभेने केले आहे, असे म्हणावे लागेल....एखादा ग्रंथकार त्या कथांचा आपल्या साहित्यात जेव्हा उपयोग करतो तेव्हाही तो आपल्या आवश्यकतेप्रमाणे त्यात परिवर्तन करतो. **पंचतंत्रातील कथाही मुळात अशाच लोककथा असल्या पाहिजेत.** त्यांना नीतिशास्त्राच्या सूत्रात गुंफण्याचे महत्त्वाचे कार्य विष्णुशर्म्याने केले असावे असे म्हणावे लागते.'
>
> — **पंचोपाख्यान**, प्रस्ता. २, [जाड ठसा प्रस्तुत लेखकाचा]

निरनिराळ्या काळांतील पंचोपाख्यानांच्या भाषेचे स्वरूप लक्षात यावे या हेतूने दोन उतारे पुढे देण्यात येत आहेत. पहिला उतारा कोलते संपादित पंचोपाख्यानातून घेण्यात आलेला असून दुसरा उतारा म. म. द. वा. पोतदार यांनी 'तेराव्या शतकातले पंचतंत्र' असा ज्या हस्तलिखिताचा उल्लेख केला आहे, त्यावरून घेण्यात आला आहे :

१) 'जयंति नांव नगरि : तेथें नगराबाहिरिं येकु वटु असे : तेयें वुटकर्णु नांवें तपोधनु तप करितो : भीक्षेचें आन उरलें तें सीकां ठेवितो : ते आन मी उडोनि खाये : तंव येके दिवसीं : तयाचिया घरासी येकु वृहत्कटी नांवे तापसु पाहुणा आला : ते दोघे रात्री गोष्टी करू लागले : तेंव्हां मी सीकाचें आन खाऊं लागलो : तवं वुटकर्ण गोष्टी करितां दुचीता जाला : तंव तो अभ्यागतु ऐसें

म्हणे : ' तुं कां दुचीता जालासी ? तुझा आदर म्यां जाणीतला : प्रभाते तुझिया ठायिं न राहे : आनीका ठाया जाईन '– **पंचोपाख्यान**, ६९.

२) ' कोण्ही एके वटवृक्षाचां ठाइ चिडि एक व्याली होती. तंव तिये मार्गीचि हस्ती एक जात होता. तेणें सोंडी घालुनि पांदी मोडिली. चिडिची अंडी मेली. ते चिडि थोर दुःखातें पावली. हस्तीचा दोष धरूनि काष्टाकुष्टा पक्षियापासि गेली. तयापुढें दुःख निवेदन केलें. तेणें समजाविलें. तो म्हणे, चिडिये मी तुझा वैरि मी मारिन. '

— **भाइन्नै**, वर्ष १७, अंक २, पृ. ६१

' पंचतंत्रा 'तून घेतलेल्या वरील दोन उताऱ्यांत सुमारे चार शतकांचे अंतर आहे. पहिला सतराव्या शतकातला असून दुसरा तेराव्या शतकातला आहे. काळाचे एवढे अंतर असूनही कथेचा घाट आणि निवेदनातली लय यात फारसा फरक पडलेला दिसून येत नाही. शब्दांच्या काही रूपांत पडलेला फरक वगळता दोन्ही उताऱ्यांतील वळण सारखेच आहे.

विशेष आश्चर्य म्हणजे ' लीळाचरित्रात 'देखील जवळपास अशाच घाटाच्या कथा आल्या आहेत. ' लीळाचरित्रात ' तशा अनेक कथाकहाण्या येतात. तथापि लोक-साहित्यातील अत्यंत पुरातन गणलेली कथा ' लीळाचरित्रात ' येते. ती कथा स्वतः चक्रधरांनी एका मुलीला ' उगी करण्यासाठी ' सांगितलेली आहे :

> ' तंव धमाई : गोसावियाची श्रीमूर्ति गौरवर्ण देखिली : मग म्हणति : गोसावियाची श्रीमूर्ति हळदी उटिली : म्हणौनि गौर आली : तर ते हळदी माझां अंगी लावा कीं : म्हणौनि आळि घेतली : कांहीं केल्या संवरति ना : मग सर्वज्ञें म्हणितलें : बाइ : तया बाइया हे तुम्हां काहाणी सांगैल : आली : पासि घेतली : साळेचें घर मेणाचे काउळियाचें घर सेणाचें : पाउसाळां काउ लेयाचे घर पुरे जाये : साळेचें वाचे : मग उगीच राहिलि ॥ '
>
> — **लीळा**, भाग १, पृ. १३, (तुळपुळे प्रत)

या कथेचा विशेष असा की, इतर लोककथा महाराष्ट्राबाहेर निरनिराळ्या भाषां-तून जवळपास सारख्याच रूढ असल्यातरी ही कथा मात्र महाराष्ट्राबाहेर आढळत नाही, असे चिं. ग कर्वे यांचे मत आहे.[१२] याचा अर्थ अशा की, अस्सल महाराष्ट्रातली ही कथा ' लीळाचरित्रात ' येथे त्या अर्थी ती लीळाचरित्रापेक्षा पुरातन असली पाहिजे.

७. श्रीचक्रधर स्वामींनी आपल्या शिष्यांना केलेल्या उपदेशाच्या ओघात काही दृष्टांत-कथा आल्या आहेत. हे दृष्टांत काही संक्षेपाने येतात तर काहींची समग्र कथा आढळते. अशा दृष्टांताची फोड करणारे संकलन ' दृष्टांतपाठ ' या नावाने नंतर झाले आहे. श्री चक्रधरांनी काही दृष्टांतांचा केवळ नावाने उल्लेख केला[१३] त्या अर्थी आधारभूत कथा त्या काळात लोककथांच्या रूपाने रूढ असल्या पाहिजेत. एका परीने

दृष्टांतकथा हे नीतिकथांचेच भावंड ठरते आणि संस्कारित लोककथांच्या कुलगोत्रात वसते. एक नमुना पहा :

> "गांवा हस्ती आला : तेथ जात्यंध हस्ति पाहों गेले : येकें पावो देखिला : एकें सोंड देखिली : येकें कानु देखिला ; येकें पाठि देखिली : येकें पोट देखिले : येकें पुस देखिलें : मग येकमेकां संवादिति : अरे तुवां हस्ति देखिला : पावो देखिला : तो म्हणे हस्ति खांवासारिखा : सोंड देखिली तो म्हणे हस्ति मुसलासारिखा : कानु देखिला तो म्हणे हस्ति सुपासारिखा :....ऐसें येकमेका उपरोधिती : तयांमध्यें डोळसु असे तो म्हणे : हस्तीचा येकु येकु अवयेवु : ऐसा अवयेवी युक्त तो हस्ती." १४

यादव काळात लोककथांप्रमाणेच नीतिकथा रुढ होत्या हे लीळाचरित्रात आलेल्या कथांवरून सिद्ध होते. विशेषतः दृष्टांतादाखल येणाऱ्या काही कथा विस्ताराने न येता सूचकतेने येतात. त्यावरून या कथा लोकपरिचित होत्या असाच निष्कर्ष निघतो. अन्यथा श्रीचक्रधरांच्या हालचालीचे अगदी बारकाव्याने चित्रण करणाऱ्या लीळाचरित्राच्या संकलकास या कथांचा विस्तार करता आला असता. सांप्रदायिक अन्वयार्थाच्या दृष्टीने तसा विस्तार 'दृष्टांतपाठात' झालाही आहे.

८. महानुभावेतर प्राचीन मराठी साहित्यात आढळणाऱ्या कथाप्रधान साहित्याचे साधारणपणे तीन वर्ग कल्पिता येतील :

१. **माहात्म्यपर** : व्रत, तीर्थ, देव-देवता इत्यादिकांची माहात्म्ये,

२. **आख्यानपर** : रामायण, महाभारत, पुराणे इत्यादिकांतील कथाभाग,

३. **चरित्रपर** : भक्त, संत, अवतारी पुरुष यांची चरित्रे.

त्या तिन्ही प्रकारांतील साहित्य गद्यात आहे तसेच ते पद्यबद्धही आहे.

व्रतकथा : या सामान्यपणे गद्यातच असतात. त्यांचे वळण लोककथांचे असते. हरतालिका, मंगळागौर, श्रावणी शुक्रवार, सोळा सोमवार, इत्यादी व्रतांशी संबंधित असलेल्या कथा सांगाव्यात आणि ऐकाव्यात अशी रूढी आहे. साक्षरतेचा प्रसार झालेला असल्याने या व्रतकथा आता मुद्रित स्वरूपातही उपलब्ध आहेत. नवरात्रोसवात देवीच्या मंदिराच्या आवारात 'घटी' बसण्याची प्रथा पूर्वी रूढ होती. अशा व्रतात देवी माहात्म्याशी संबंधित अशी एकतरी कथा दररोज श्रवण करावी, असा दंडक असे. या सर्वच व्रतकथांचे श्रवण श्रद्धेने होत असते. या कथा कोणत्यातरी आटपाट नगरात सुरू होतात आणि व्रतांच्या फलश्रुतीवर त्यांचा शेवट होतो. काही कथा अनेक उपकथांनी गुंफलेल्या असतात. समाजाच्या भिन्न थरांत आणि प्रादेशिक विभागांत अशा कथांचे सारखेच स्वरूप आढळते. वैदिक संहितेची संथा घ्यावी त्याप्रमाणे नवी पिढी जुन्या पिढीकडून 'शब्द' घेते आणि असे हे 'अपौरुषेय' वाङ्मय "श्रौत" रूपात जोपासले जाते. या कथांची लय बदलत नाही, आशय तर

नाहीच नाही आणि या सर्वांच्या मुळाशी असलेली श्रद्धा स्थिर राहिल्याने या कथांना सातत्य येते. या कथांत प्रत्येक पिढीची काहीतरी भर पडतेच. भाविक वातावरणात हे साहित्य फुलते. भाववलावरच ते वाढते आणि टिकतेही. कै. राजवाडे यांना एका भिक्षुकाच्या वाडग्यात आढळलेली एक व्रतकथा पुढे देण्यात येत आहे. 'पुण्यापासून नागपूरपर्यंत तिचे एकच एक रूप आढळते' असा राजवाडयांचा या कथेसंबंधी अभिप्राय आहे.[१५]

"दुबळासा ब्राह्मण होता. त्याच्या घरांत खायास नाहीं. बाइल म्हणते....काइ मिळवोन आणा. हातीं काठी, खांद्यावर धोकटी, गेला. तईं इंद्राची इंद्राणी, चंद्राची रोहिणी, नळाची दमयंती, ईश्वराची पार्वती चौघी मिळून गंगे गेल्या. स्नान केल्या. बारा रेघांचें मंडळ काढलें. तेथें कहाणी ऐकिली. बारा तातु सुताचे, तेरावा पाटाचा. तेरा गाठी द्याव्या. हळदेंत घोळावा. सूर्यनारायणाचे पायीं ठेवावा. सहा महिने चालावा. सहा महिने पाळावा. वैशाखांत उद्यापन करावें....ऐसें केल्या काय होतें? निर्धना धनें येती. निपुत्रिका पुत्र भेटे. अंतकाळीं महाविष्णूची भेट होय....अर्धी कहाणी जाली : अर्धी धोकटी भरली. सगळी कहाणी झाली. धोकटी भरोन उचंवळली. घरीं गेला. 'बायको, बायको धोकटी उतर.' 'कोणाचें चोरून आणलें. कोणाचें पळवून आणलेस.' 'चौघींची कहाणी ऐकली.' कहाणी ऐकिल्यानें एवढें फल. व्रत केल्याने केवढें फळ....'

'मुली दोघी नवऱ्या होत्या. बाहीर जावो नको, फिरो नको. राजा देखेल. प्रजा देखेल. बटकी करील. दासी करील. त्या मुली खेळाया गेल्या. त्या गांवचे राजे शिकारीस आले होते. दोघे त्यांणीं देखिल्या, 'या मुली कोणाच्या?' 'भटा-भिक्षुकाच्या.' 'जाऊन सांगा : एक राजास द्या, एक प्रधानास द्या.' एक म्हणतो, 'भटा-भिक्षुकाच्या मुली घेऊन काय कराल? दासी कराल, बटकी कराल.' एक म्हणतो. एक वरिस गेलें. पांच म्हणता पंचवीस गेलें. ब्राह्मणास बलाऊन त्यास गादी बसायास दिली. मुडा टेकायास दिला. फुलांचा झेला दिला. हातीं विडा दिला. ब्राह्मणा, भिवो नको, कापो नको, येक मूल राजास दे, येक प्रधानास दे. बरें म्हटलें. त्याच मुहूर्ती दाळीसाळी दळो घातल्या....वाजत गाजत लग्न लागलें. आपण बसले हत्तीवर. राण्या बसल्या सुखासनावर. ऐशा घरास गेल्या.....'[१५]

९. रामायण महाभारत : या ग्रंथांचा फार मोठा परिणाम भारतीय लोकजीवनावर झालेला आहे. देशाच्या सर्व विभागात आणि समाजाच्या सर्व थरांत ये ग्रंथांतील कथा-आख्याने परिचित आहेत. या कथांनी लोकवाङ्मयात स्थान मिळवलेले आहे. त्याचप्रमाणे कित्येक कवींना काव्यलेखनाची स्फूर्ती दिली आहे. निरक्षर समाजात-

देखील 'रामालासुद्धा वनवास चुकला नाही' हा विचार सहजगत्या उच्चारलेला आढळून येतो. विद्येचा संस्कार नसलेली माणसे जेव्हा रामायण-महाभारताच्या कथा सांगू लागतात, तेव्हा या कथा त्यांच्यापर्यंत कशा पोचल्या असतील याचे कोडे पडते. लोककथांच्या द्वारे रामायण-महाभारत रूढ असले पाहिजे हे गृहीत धरले तरच हे कोडे उलगडते. या कथांचा स्थूल आशय लोकप्रवाहात कायम रहात असला तरी हे मौलिक परंपरेने चालत आलेले साहित्य लोककथांचा घाट घेऊनच प्रचलित झालेले दिसून येते. पुराणातल्या अनेक कथादेखील याच माध्यमातून समाजाच्या परिचयाच्या झाल्या आहेत. पुराणोक्त धर्माच्या संस्कारामुळे या कथांचा साक्षर समाजात आणि सामान्य जनसमूहात प्रसार झालेला दिसतो. संस्कृत ग्रंथांत नसलेल्या कथा कित्येक मराठी आख्यानांतून आढळतात. मुक्तेश्वर काळीदेखील असा प्रकार होता. म्हणून महाभारतात नसलेल्या काही कथांचा 'प्राकृत कवींचा जल्प' असा उल्लेख तो करतो. मराठी गद्यात अशा प्रकारची कथा-आख्याने आज उपलब्ध नसली तरी ती दीर्घकाळ प्रचलित असावीत असे अनुमान करण्यास आधार सापडतात. भारती कथांप्रमाणेच पुराणकथांनीही लोककथांचा आश्रय केला असावा.

१०. **चरित्रपर कथा-आख्याने :** ही प्रामुख्याने पद्यात आहेत. महानुभाव पंथातील अवतारी पुरुषांची व आचार्यांची चरित्रे मात्र गद्यात आहेत. या चरित्र-ग्रंथांचा घाट बराचसा लोककथांचा असला तरी या ग्रंथाच्या निर्मितीच्या मुळाशी धर्मप्रसाराची प्रेरणा आहे. लीळाचरित्र, गोविंदप्रभुचरित्र, श्रीचक्रधर निरूपित श्रीकृष्णचरित्र आणि नागदेवाचार्यांचे चरित्र असलेले स्मृतिस्थळ हे महानुभाव पंथातील धर्मग्रंथ 'चरित्र' या नावाने ओळखण्यात येत असले तरी वस्तुतः ते निरनिराळ्या कथांचे अथवः 'लीळांचे' संकलन आहे. या कथांतून चरित्रविषय असलेल्या व्यक्तींचा भिन्न स्थळांशी आणि व्यक्तींशी आलेला संबंध, त्यांनी प्रसंगोपात्त केलेला उपदेश व लीळा सांगण्यात आल्या आहेत. म्हणूनच या साहित्याची कथात्मक साहित्यातच गणना केली पाहिजे. या 'लीळा' प्रत्यक्ष पाहिलेल्यांनी 'कथन' केल्या आहेत. क्वचित चरित्रविषय असलेल्या व्यक्तींचे आत्मकथनही आढळते. हे सर्व श्रद्धेने आणि भक्तिभावाने व अधिकारी व्यक्तीच्या संमतीने संगृहीत करण्यात आले आहे. महानुभावांच्या चरित्र ग्रंथांतील 'लीळा' म्हणजे एका परीने कथाच होत. म्हणून हे साहित्य कथाप्रधान ठरते. चरित्र-ग्रंथांत आलेल्या लीळांत कथेचे अंग प्रधान असते हे या पंथाच्या पंडितांनीही मान्य केले आहे.

११. 'लक्षणरत्नाकरां'वरील 'बत्तीस लक्षणी टीपेत' लीळावाक्यांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे येते :

'जेथ गोष्टी, मात, कथा, वार्ता, आख्यायिकाते 'लीळावाक्य' बोलिजे : अज्ञाननिवृत्ति लागीं कीं संदेहनिवृत्ति लागीं जे वृत्तांतु सांगिजे ते **गोष्टि** : यथा

कामाख्यानिमित्तें पुरत्यागु : आश्चर्यकारक जे गोष्टि भविष्यरूप ते **मात** बोलिजे : ....एवं आदि द्वापाराचिया अथवा आपुल्या मागिलिया एकांकाचिया : लीळा सांघितिलिया : तिया **कथा** : भक्ता विद्यमान जें वर्तलें त्या **वार्ता** : पुराणव्यतिरिक्त कथारूप गोष्टि ते **आख्यायिका** : यथा धनाइसा प्रति काउळिया साळैची.....[११]. [जाड ठसा प्रस्तुत लेखकाचा].

गोष्टी, मात, कथा, वार्ता आणि आख्यायिका अशा पांच घटकांचा अंतर्भाव 'लीळेत' होतो असे टीपकार सांगतात. या पांचा घटकांचे जे स्वरूपवर्णन आले आहे त्यावरून कथात्मकता हा विशेष सर्व घटकांना समान असल्याचे निदर्शनास येते. लीळाचरित्रादि ग्रंथ हे कथाप्रधान साहित्यात समाविष्ट होतात हे टीपकारांच्या आधारानेही स्पष्ट होते. टीपकारांच्या व्याख्येप्रमाणे 'आख्यायिका' या प्रकारात येणारी धनाईस सांगितलेली काउळा-चिमणी यांची कथा अगोदर दिली आहे. 'गोष्ट' या सदरात समाविष्ट होणारी कथा अशी :

"काउरलिची कामाख्या : प्रसिद्धि आइकोनि : रतिचिया चाडा तेथें आली : देवनेची आज्ञा लंघौनि साउमेया न वचे : तेथ ब्रह्मचर्याची प्रवृत्ति : म्हणौनि बाहेरिं बीजे न करिती : ऐसी सात अहोरात्रें उभी होती : तियेचा आग्रह देखौनि तें पुर त्यजिलें : तिये समयिं गुजरातेचेया कूमराचे देह गेलें : तें समसाना आणिलें होतें : तेव्हळिं तें स्वीकारलें...." [१७].

१२. माहीमट संकलित 'लीळाचरित्र' हा साहित्यगुणांनी नटलेला ग्रंथ वस्तुतः रूढ अर्थाने चरित्रग्रंथ नसून लोककथांचा तोंडवळा असलेला तो एक कथासंग्रह आहे. या कथांना धर्मप्रसाराची प्रेरणा कारणीभूत ठरली आहे. तोच प्रकार 'गोविंदप्रभुचरित्राचा' आहे. या दोन्ही ग्रंथांतील भाषेचे स्वरूप विशेषेकरून ध्यानात घेण्याजोगे आहे. महानुभावांच्या टीका-भाष्य-ग्रंथांच्या तुलनेने 'लीळाचरित्र' व 'गोविंदप्रभुचरित्र' यांतील भाषा विशेषेकरून नजरेत भरते. टीकाभाष्यपर ग्रंथांवर संस्कृत भाषेतील टीकापद्धतीची झाक तर आहेच, परंतु भाषेचे वळणही पंडिती थाटाचे, प्रौढ आणि डौलदार आहे. त्यामानानें चरित्र ग्रंथांची भाषा वेगळी, बोलीच्या स्वरूपाची वाटते. स्वतः माहीमट्ट संस्कृत भाषेचा थोर पंडित होता हे लक्षात घेतले म्हणजे चरित्र-ग्रंथांची भाषा लोकाभिमुख राहील याची हेतुपूर्वक दक्षता त्याने घेतली आहे असे वाटू लागते.

'गोविंदप्रभूचरित्रा'त आलेल्या पुढील वर्णनावरून चरित्रग्रंथांतील भाषेच्या स्वरूपाची कल्पना करता येईल :

'पेंधी हे एका ब्राह्मणाची स्त्री : ते पोढरा धोंगडा नेसली होती. मुडवाहियाची चोळी : आवया ऐसी डोई : वेखंडलें दांत : हातीं कथिलाचे दोरे : पायिं कांसेयाचे पाहहेरे : हातीं टीकेची मुदी : मसि ऐसी काळा : ते पाणि-

यासि गेली होती : ....तंव सेजीं म्हणितलें : आवो, तूं राउळातें वोवाळु गेलि होतिसि ? तीया म्हणीतलें ना नाहीं : आवो जासी ना : राउळ चोळी देतातिः कां चोळीचे लेख देताती : आणि ते हरिखेली : घागरि ठेविली : दीवेयाचेनि तेलें डोइ सरिसी केली : रांधणाचें काजळ डोळां भरिलें : कुंकुमाचा कपाळभरि थेवडु लाविला : .... मग निगाली : .... हांसत हांसत ते भक्तजनीं देखिली : आणि भणितलें : जीः जीः पैंधी सुंदरी नारि एकी येते कीं : '

— **गोविंदप्रभुचरित्र** (कोलते प्रत), पृ. ५१.

अपभ्रंश भाषेतील जैन-चरित्रग्रंथात आढळून येणारा भाषेचा डौल या चरित्र-ग्रंथात उतरलेला दिसेल. शैलीचे हे सातत्य लक्षणीय ठरते. केवळ बोलीच्या स्वरूपातील भाषेच्या आधाराने प्रभावी व्यक्तिचित्रण आणि रेखीव प्रसंगवर्णन माहींभट्टांसारखा भाषाप्रभूच करू शकतो. अशा प्रसंगी स्वतःच्या अंगी असलेल्या पांडित्याचे त्याला विस्मरण घडते. साहित्यगुणांचा परिपोष करूनही निवेदनाचा कथात्मक घाट ढळणार नाही याची दक्षता माहींभट्ट घेत असतो याचे आणखी एक उदाहरण—

' एकु दी माहादाइसे पाहारा रात्री उठिली : तांव कळस घेतलें : मग गेली : तांवकळस भरिलें : कावडिसि घातलें : घेउनि निगाली : तंव पान लागलें : तैसिचि कवाडी घेउनि आली : रायांगणीं उतरली : आणि मूर्छना येउनि पडिली : ....तंव आवाईसें वोवाईली : जी : जी : देवकी दासी रुपे सर्पे खादली जी : तैसेंचि गोसावियें रायागणासि बीजें केलें : दृष्टि अवलोकिली : वीस निरपौनि काढिलें : ....मग गोसावीं म्हणितलें : आवो मेली जाए : महादी सापें खादिली म्हणे : की महादिया सापु खादिला म्हणे '

— **गोविंदप्रभुचरित्र**, पृ. ४४

महानुभाव पंथाच्या चरित्र ग्रंथांतून उद्धृत केलेला काही भाग आणि सूर्यनारायणाची कहाणी यांचा तुलनात्मक अभ्यास केला असता असे दिसून येईल की, या चरित्रग्रंथाचा ढंग लोककथेच्या धर्तीवरचा आहे. आपल्या धर्मपुरुषांच्या कथा सांगण्यासाठी या ग्रंथकारांनी लोकांना परिचित असलेला लोककथेचा घाट उचलला आहे. ग्रांथिक भाषेचा अवलंब न करता बोलीची योजना या ग्रंथांतून करण्यात आली, ती या घाटास सुसंगत अशी ठरते. टीका-भाष्यादी ग्रंथातील भाषेचे स्वरूप वेगळे पडते ते यामुळेच.

१३. केवळ भाषेच्याच बाबतीत महानुभाव-चरित्रग्रंथ आणि लोककथा यांत साम्य आढळते. या दोन्ही साहित्यप्रकारांच्या प्रेरणा भिन्न आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे. लोकरंजन करीत करीत कधी अद्भुतरम्य तर कधी हेतुगर्भ वळणे घेणारा लोकसाहित्याचा प्रवाह स्थूल मानाने एका व्यापक संस्कृतीची जोपासना करतो. महानुभाव-चरित्र-ग्रंथांची रचना एका निश्चित हेतूने झालेली आहे. पंथातील श्रेष्ठ पुरुषांचे

जीवन, त्यांनी व्यक्त केलेले विचार, त्यांच्या जीवनातून व आचारविचारांद्वारे व्यक्त झालेला धर्ममार्ग यांचे वर्णन या चरित्र-ग्रंथांतून आढळते. अवतारी पुरुषांसंबंधीचे हे कथन व त्यांच्या 'लीळा' तशा सुट्या पाहिल्या तर कथाच असतात. या कथांच्या संकलनातून पंथाचा आचारधर्म आणि तत्त्वज्ञान आकार घेऊ लागते. पंथाचा आचार आणि विचार यांचा सुगम मार्गाने प्रसार करण्याचे कार्य चरित्र-ग्रंथ करीत असतात. चरित्र-ग्रंथाचा तोंडवळा लोककथांचा आढळला तरी निर्मिती मात्र धर्मप्रसाराच्या हेतूने झालेली असल्याने सर्वसाधारण कथात्मक साहित्यात चरित्र-ग्रंथांची गणना न करता त्यांचा विचार स्वतंत्र साहित्यप्रकार या नात्याने करणे सयुक्तिक ठरते.

महानुभाव साहित्यात अशा प्रकारचे कथात्मक साहित्य संख्येने विपुल नसले तरी वेगळा वाङ्मयीन प्रवाह या नात्याने त्याची नोंद घ्यावी एवढ्या योग्यतेचे ते निश्चितच आहे. म्हणूनच चरित्रवाङ्मय हा वेगळा प्रकार महानुभाव साहित्यात मानावा लागतो. 'लीळाचरित्र', 'गोविंदप्रभुचरित्र' श्रीचक्रधरनिरुपित श्रीकृष्णचरित्र आणि स्मृतिस्थळ (नागदेवाचार्य-चरित्र) हे ग्रंथ या प्रकारात मोडतात. महानुभाव पंथाच्या बाहेर अशा प्रकारची रचना आढळत नाही. महानुभावेतर वाङ्मयात साधुसंतांची आणि पौराणिक भक्तांची आख्याने आली आहेत. परंतु हे साहित्य पद्यबद्ध असल्याने त्यांचा समावेश उपरोक्त प्रकारात करता येत नाही. निराळ्या प्रेरणेतून रचण्यात आलेल्या चरित्र-आख्यानपर बखरी गद्यात आढळतात. त्यांचा विचार स्वतंत्रपणे पुढील प्रकरणात आला आहे.

'साहित्यातील कोणताही प्रवाह केवळ योगायोगाने अस्तित्वात येत नाही. समकालीन वाङ्मयीन प्रवाहांचाच तो परिपाक असतो.' अशा आशयाची विधाने निरनिराळ्या संदर्भांत यापूर्वी करण्यात आली आहेत. महानुभावपंथाचे चरित्र-वाङ्मय या पंथाबाहेर आढळत नाही ही वस्तुस्थिती या विधानांशी विसंगत ठरते काय असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होण्याची शक्यता आहे. या विसंगतीचा परिहार करता येणे शक्य आहे काय याचा शोध घेतला पाहिजे.

हा शोध प्रथम महानुभाव साहित्यातच लागतो काय हे पाहिले पाहिजे. या पंथाच्या चरित्र-ग्रंथात 'लीळाचरित्रा'स महत्त्वाचे स्थान आहे. कारण या पंथाची 'श्रुती' 'लीळाचरित्रा'वर आधारलेली आहे. या पंथाचे एक 'इतिहास प्रकर्ण' उपलब्ध आहे.[१८] या ग्रंथाचा काळ निश्चित नसला आणि कर्ता अज्ञात असला तरी 'इतिहास-प्रकर्णास' पंथात मान्यता लाभलेली आहे. या प्रकरणातील काही बाबी महत्त्वाच्या आहेत. श्रीचक्रधर आणि नंतर श्रीगोविंदप्रभू यांच्या परलोकगमनाने शोकाकूल झालेल्या नागदेवाचार्यांना एकदा माहींभट्टाने प्रश्न केला :

'हा भटो, सृष्टिमध्यें सर्वज्ञ बोधु कितीं प्रकारीं देती : भटीं भणतलें : दो प्रकारीं माहींभटीं भणितलें ते कवण : भटीं भणितलें तें सर्वज्ञें ऐसें निरोपिलें

असे : परमेश्वर साक्षात्कारें ज्ञान देती : कां अधिकरण द्वारें : अधिकरणाते आदिकरूनि परमेश्वर उद्धरिति : –**इतिहास प्रकरण**, पृ. ७.

साक्षात्कार किंवा आचार्य यांच्याद्वारे भक्ताला ज्ञान होते असे श्रीचक्रधरांनी सांगितले. नागदेवाचार्यांना श्रीचक्रधरांनी ज्ञानबोध केला व पंथाचे आचार्यपदही त्यांना दिले. त्यामुळे भक्तांच्या उद्धाराची जबाबदारी नागदेवाचार्यांवर आली आणि हे आचार्य तर सदा शोकमग्न. अशा परिस्थितीत भक्तांचा उद्धार होणार कसा ? या विनतोड युक्तिवादामुळे नागदेवाचार्य ज्ञानोपदेश करू लागले, असे या प्रकरणात पुढे नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणातील दुसरा महत्त्वाचा उल्लेख आहे 'लीळाचरित्रा'च्या संकलनाची पार्श्वभूमी देणारा. माहींभट आणि नागदेवाचार्य यांच्या संवादातून ही माहिती मिळते. असाच एकदा नागदेवाचार्यांना प्रश्न करण्यात आला : 'तुम्ही सतत चिंतन कशाचें करता ?' नागदेवाचार्यांनी उत्तर दिले :

'[सर्वज्ञ चक्रधरांनी मला असे सांगितले होते कीं,] वानरेया, येथोनि निरुपिले विचार, शास्त्र, पदार्थज्ञान तेयातें श्रवण, मनन, निदिध्यासन करिजे : तेहि एक स्मरणुचि की : गा : येथिचि चरित्रें आठविजति : आइकिजेति : उच्चारिजेति : तेंहि एक स्मरणचि कीं गा : ' **इति**. ८.

आपण नित्य श्रीचक्रधरांच्या उपदेशाचे चिंतन करीत असतो. कारण, त्यांच्या आदेशाप्रमाणे तेही एक स्मरणच आहे असे उत्तर मिळाल्यानंतर माहींभट्टाने या प्रथमाचार्याला पुन्हा कोडयात टाकले. तो म्हणाला, 'तुमचे ठीक आहे. तुम्हाला ज्ञान झाले. श्रीचक्रधरांच्या सहवासातही तुम्ही होता. तुम्हाला नित्य स्मरणाला विषयही आहेत. पण आम्हा भक्तांना त्याचा लाभ काय ? आम्ही कशाचे चिंतन वा स्मरण करावे ? हा मार्ग पुढे चालवावयाचा असेल तर 'तंव सर्वज्ञाचिया लीळा तुम्ही सांगा : मी लिहीन.'

इतिहास प्रकरणातील वरील उल्लेखावरून लीळाचरित्रातील लीळांचे संकलन करण्यास कोणते निमित्त कारण ठरले याचा बोध होतो. श्रीचक्रधरांनी केलेल्या उपदेशांचे मनन आणि स्मरण सारख्याच योग्यतेचे असल्याने भक्तांच्या उद्धारार्थ लीळांचा संग्रह करण्यात आला. या पंथातील चरित्रग्रंथ अवतारी पुरुषांच्या गुणवर्णनापुरते मर्यादित नसून ज्ञानप्राप्तीचे ते अमोघ साधनही आहे. पंथाबाहेर ही धारणा रूढ नसल्याने फक्त महानुभाव पंथातच अशा प्रकारची चरित्रनिर्मिती झाली. वाङ्मयातला हा प्रवाह केवळ महानुभाव पंथापुरताच मर्यादित का राहिला याचे उत्तर इतिहासप्रकरणाच्या आधाराने मिळते. या चरित्र ग्रंथाला गद्याचा घाट असला तरी महानुभाव परंपरेतील पंडिती वळणाचे सूत्रबद्ध ग्रंथ आणि चरित्रग्रंथ हे एकाच ज्ञानप्राप्तीच्या प्रेरणेचे द्विविध अवतार ठरतात. फरक एवढाच की, पंडिती वळणाचे ग्रंथ शिष्टांच्या भाषेत रचण्यात आले आहेत, तर चरित्रग्रंथात सामान्यांची बोली योजण्यात आली आहे.

टीपग्रंथात लीळावाक्याची फोड करताना कथेचे पाच प्रकार सांगण्यात आले आहेत : गोष्टी, मात, कथा, वार्ता आणि आख्यायिका. या पाचही प्रकारांतील कथांचा संग्रह लीळाचरित्रात आठवतो. या पाचही घटकांचे प्रयोजन आहे ज्ञानप्राप्ती आणि संदेहनिवृत्ती, तत्त्वज्ञानपर रचना आणि कथारूप साहित्य या दोहोंचे घाट भिन्न असले तरी त्यांची रचना एकाच उद्देशाने – अज्ञाननिवृत्ती – झालेली आहे. अनुयायांची बौद्धिक पातळी लक्षात ठेवून ही विभागणी झालेली दिसते. या दोहोंचे पर्यवसन ज्ञानातच होत असल्याने या उभय प्रकारांना महानुभाव पंथात सारखेच प्रामाण्य लाभले आहे.

१४. महानुभाव चरित्रग्रंथांना कोणत्या कारणाने आणि कोणत्या परिस्थितीत वैशिष्ट्यपूर्ण आकृतिबंध लाभला याचे स्पष्टीकरण वरील विवेचनात मिळावे. साहित्यातील प्रवाह आणि समाजजीवन यांच्या अन्योन्य संबंधाविषयी अगोदर मांडलेल्या विचारांना या ग्रंथाच्या वैशिष्ट्यांमुळे बाध येत नाही हेही या विवेचनावरून ध्यानात आले असेलच. या वैशिष्ट्यपूर्ण प्रवाहाच्या उगमस्थानासंबंधी काही शोध लागतो का यतेवढेच पहावयाचे आहे. एक गोष्ट प्रथम लक्षात ठेवली पाहिजे : शकाच्या तेराव्या शतकापूर्वी हा प्रकार मराठी साहित्यात नव्हता, तसा तो चौदाव्या शतकानंतरही आढळत नाही. याचा अर्थ मराठी साहित्यात या साहित्यप्रकाराला परंपरा नव्हती आणि या साहित्यप्रकाराने परंपराही निर्माण केली नाही, असा होतो. या प्रवाहाचे उगमस्थान कोणते ?

आचार-विचारांच्या दृष्टीने महानुभाव पंथास जवळ असलेला व या पंथापूर्वी कित्येक शतके या देशात रूढ असलेला जैन पंथ आणि त्याचे साहित्य यांत काही शोध लागतो किंवा काय हे पाहिले पाहिजे. महानुभाव पंथाचे प्रवर्तन झाले त्यावेळी महाराष्ट्रात जैनपंथ तर होताच. परंतु या पंथातील साहित्यनिर्मितीही चालू होती. हे साहित्य महाराष्ट्रीय प्राकृत आणि अपभ्रंश (विद्वानांनी त्यास जैन अपभ्रंश असे नाव दिले आहे) या भाषांतून आढळते. या साहित्यात जैन तीर्थंकर आणि इतर श्रेष्ठ पुरुष (शलाका पुरुष) यांची अनेक चरित्रे आढळतात. विशेष म्हणजे ही चरित्रे अनेक कथांचा संग्रह असल्यासारखी आहेत. शीलांकाचे 'चौउपण्ण महापुरिस चरित्रम्' (इ.स. ८६९) पुष्पदंताचे 'त्रिसठ्ठी महापुरिस गुणालंकार' (इ.स. ९६५), हेमचंद्रसूरीचे 'त्रिषष्ठीशलाकापुरुषचरित' (इ. स. ११००) यांखेरीज हरिभद्र, रत्नप्रभ इत्यादिकांनी ऐकलेली नेमिनाथचरित्रविषयक रचना व इ. स. ७८३ पासून रचण्यात आलेली अनेक पुराणे असे बरेच साहित्य जैनपंथात आढळते हे सर्व ग्रंथ धर्मावतारांच्या लीळांचेच संग्रह आहेत असे स्थूलमानाने सांगता येईल. या ग्रंथांतून त्या त्या पुरुषांच्या जन्मांतरीच्या कथाही येतात. (लीळाचरित्रातही पुरस्कीकाराची कथा एकांकात येते). लीळासंग्रहाचा घाट आणि प्रसंगोपात्त उपदेश यांच्या बाबतीत जैन चरित्रग्रंथांचे लीळाचरित्रादि ग्रंथांशी विलक्षण साम्य आहे.

आठव्या शतकानंतर बरेच जैन ग्रंथकार वऱ्हाड आणि मराठवाडा या विभागाच्या

परिसरात होऊन गेले आहेत. महानुभाव पंथाचे प्रवर्तन आणि प्रसार याच भागात झाला आहे. अहिंसा हा परम धर्म उभय पंथात आढळणारा समान दुवा, त्याचप्रमाणे प्रपंचापासून निवृत्ती या दोन्ही पंथात अभिप्रेत असलेली. 'चित्रींची हि स्त्री न पहावी' हे चक्रधरोक्त सूत्र 'दशवैकालिक' या जैन सूत्र-ग्रंथातील एका सूत्राचा प्रतिध्वनी वाटतो.[१९] विचार आणि आचार या दोहोंच्या बाबतीत काही मर्यादेपर्यंत साधर्म्य असलेल्या या दोन पंथांपैकी जैनपंथ व त्याचे साहित्य अगोदरचे असल्याने महानुभाव पंथातील चरित्रग्रंथात जैनपंथीय प्रवृत्तीचे अनुसरण आले नसेलच असे म्हणता येत नाही. अवतारी पुरुषांच्या कथा आणि आख्यायिका यांचा संग्रह धर्मप्रसारार्थ करण्याची जैनपंथीय प्राकृत साहित्याची परंपरा महानुभाव चरित्रग्रंथांत आढळून येते, एवढे मात्र खरे. जैन पंथाच्या परंपरेतील ६३ पुरुषांची म्हणजे तीर्थंकर, बलदेव, वासुदेव, चक्रवर्ती यांचीच चरित्रे आणि जीवनगाथा प्राकृत आणि संस्कृत जैन साहित्यात आढळतात. नागदेव हे आचार्य वगळले तर महानुभावांचे चरित्रग्रंथ श्रीचक्रधर, गोविंद-प्रभू आणि श्रीकृष्ण यांचीच कथा-आख्याने सांगणारे आहेत. यावरूनही जैनग्रंथांचाच आदर्श या पंथातील मराठी चरित्रग्रंथांपुढे असावा असा निष्कर्ष निघतो. शैलीच्या दृष्टीने लोककथांची कथनपद्धती या उभय पंथातील चरित्रग्रंथात आढळून येणारा समान विशेष आहे[२०] हे लक्षात घेतले म्हणजे हा निष्कर्ष अधिक दृढ होतो.

महाभारतेतर मराठी साहित्यात मात्र असा 'लीळासंग्रह' आढळत नाही. वैदिक परंपरेच्या अनुसरणाचा तो परिणाम असावा.

१५. एक अपवाद मात्र या ठिकाणी नमूद केला पाहिजे. तो आहे शके १६८३ साली रचण्यात आलेल्या निरंजनस्वामी कराडकर यांच्या चरित्राचा. हा गद्यग्रंथ स्वामींच्या लीळा आणि ज्या ज्या भागात त्यांचा संचार झाला त्यांचे वर्णन करणारा आहे. या चरित्रग्रंथात 'लीळाचरित्रा' तील काही विशेष उतरले आहेत असे दिसून येते. भाषा मात्र पल्लेदार, संस्कृतप्रचुर आणि बखरींच्या भाषाशैलीस अधिक जवळची वाटते. त्यामुळे लीळाचरित्रादी ग्रंथाचे अनुकरण या ग्रंथात झाले आहे असे म्हणता येत नाही. या चरित्राचा काल बखरींच्या वैभवकालाशी समांतर आहे. भाषा बखरीची आणि वर्णनपद्धती मात्र लीळाचरित्रात आढळून येणारी, असे अपवादात्मक गद्यग्रंथाचे स्वरूप पुढील उताऱ्यांवरून ध्यानात येईल :

> 'एकदां त्रिवक वसवेश्वरास देव बोलिले कीं, तूं एकनिष्ठ भक्त आहेस म्हणोन एक गोष्टि तुजपाशि सांगतो ते कोणास सांगो नको ? प्लवंग संवत्सर भाद्रपद शुद्ध चतुर्दशी प्रगतकाली प्रयाण होईल । हें ऐकोन जैसा वज्रें पर्वत की वायूनें कर्दळी तैसा मूर्च्छित पडोन मुख शुष्क जाहलें । ऐशि अवस्था पाहोन देवासहि गंहिवर येताच त्यास पोटाशि धरितांच इंद्रियें क्रिया विसरली । चित्त-चैतन्य समरसलें । मनाचे संकल्प-विकल्परूप गेलें । अहंकार हे भान सांडिलें ।

पंचभूतें विरो पाहती । ऐसि क्षणैक विदेहस्थिति होताच....देव बोलिले । पंच भौतिकासाठी काही शोक करावा ऐसें नाही । (भक्त बोलिला) परंतु स्वामीचें रूप काशीच्या वक्रतुंडासारिखे आरक्त गौर । आरक्त मृदुचरण । नखें चंद्ररेखेसारिखी । टाचा नवनीता सारिख्या । मृदु घोटे । वर्तुल पुष्ट वर्तुल कदलीवत् जानु । कटी दृढ । निम्न नाभिवर्तुल दोंदावरि । श्वेतवसन, विशाल हृदय । हस्तद्वय पुष्ट सरल । मृदु सरल बोटें । आरक्त कर । मालाजपक ग्रीवा । विशाल कर्ण । सुंदर नासिक । कमलनेत्र आरक्त । बोष्ट प्रसन्नवदन । वर्तुल हनुवटि । विशाल भालें शिंदूरवर्ण टिळक ।.....जेवि वत्सास धेनु कि मीत्रास जल तैसे कृपाळूपणें अनाथांस दीनांस दुर्बलास अज्ञानांस विवेकें मृदु भाषणें । ऐसें वारंवार पुढे कैसे भेटेल याकरितां परम दुःख जाहलें....'[२१]

उतारा बराच लांबसा. ग्रंथाचे संमिश्र स्वरूप लक्षात भरावे या हेतूने दिला आहे. या उताऱ्यात आलेले स्वामींच्या अंगप्रत्यंगांचे वर्णन लीळाचरित्र व गोविंदप्रभूचरित्र यांत येणाऱ्या चक्रधर–गोविंदप्रभूंच्या वर्णनासारखे वाटते, तर प्रारंभीची वाक्यरचना संस्कृत-प्रचुर व बखरीत चपखल बसणारी असल्याचे निदर्शनास येते. पुढील उताऱ्यातील भाषा तर पंचतंत्र अथवा हितोपदेश यांतील कथांसारखी वाटते. दोन बायकांचा दादला स्वामींजवळ आपले दुःख व्यक्त करतो स्वामी त्याला उपाय सांगतात असा संदर्भ आहे :

> " स्त्रिया बाहेर जातिल तेंव्हां देव्हारा खणोन गुडग्याप्रमाणें गारि करणें । आलियावरि त्या पुसतील गारि का केल्या म्हणोन । त्या सांगणें कि बडिलांचें धन होतें । तें मइत्राचे घरिं ठेविलें आहे । जी स्त्री मारणार नाहीं तीस तें धन देईन । नाहीं तर तें धन देऊन तिसरी स्त्री करीन । याप्रमाणें त्या करितां दोघीहि कृपा करू लागल्या । "[२२]

साधुसंतांची चरित्रे आणि आख्यायिका यांवर आधारलेले पद्यग्रंथ महानुभावेतर साहित्यात विपुल आहेत. वरील चरित्र गद्यात आहे. महानुभावेतर साहित्यात चरित्र-ग्रंथांचे गद्यात लेखन नक्की केव्हापासून सुरू झाले हे सांगता येत नाही. कारण संध्या तरी या ग्रंथापूर्वीचे चरित्र उपलब्ध नाही. ते अपवादात्मक समजावयाचे किंवा रूढ परंपरेचा एक भाग मानावयाचा हा प्रश्नच आहे. तथापि, पुढच्या कालात बखर या नावाखाली आलेली संतचरित्रात्मक रचना लक्षात घेतली म्हणजे निरंजनस्वामी कराडकरांचे चरित्र केवळ अपवादात्मक आहे असे म्हणता येणार नाहीं. गद्य साहित्य म्हणजे बखर अशी समजूत रूढ असल्याने संतचरित्रात्मक बखरी पुढच्या कालात वऱ्याच आढळतात. स्मर्थ रामदासांचे चरित्र असलेली हनुमंतस्वामींची बखर, जयराम-स्वामी वडगावकर यांची बखर, धावडशीकर ब्रह्मेंद्रस्वामी यांची बखर (शके १७७०)

हे 'बखरग्रंथ' निरंजनस्वामी कराडकर यांच्या चरित्राच्या मालिकेतच बसणारे आहेत. हेरवाडकर यांनी सांप्रदायिक वा साहित्येतर बखरीत अशा चरित्रग्रंथांची गणना केली आहे. त्यांच्या मते, हनुमंतस्वामींच्या बखरीचे शेवटचे संस्करण शके १७१५ मधील असून शके १७३० ते ३३ या कालखंडात जयरामस्वामींची बखर रचण्यात आली आहे. ब्रह्मेंद्रस्वामींची बखर शके १७७० मानली जाते. हे काल लक्षात घेतले म्हणजे शके १६८३ मधील 'निरंजनस्वामी कराडकरांचे चरित्र' हा ग्रंथ गद्यात्मक संत-चरित्राची परंपरा निर्माण करणारा ठरतो.

महानुभाव पंथातील चरित्र-ग्रंथ आणि वर उल्लेखिलेली महानुभावेतर वाङ्मयातील संतचरित्रे कथात्मक गद्यसाहित्याचे भिन्न काळांतील आविष्कार ठरतात. महानुभाव पंथातील चरित्र-ग्रंथांची प्रेरणा मात्र निराळी आहे. ज्ञानप्राप्तीचे एक साधन या दृष्टीने लीळा-चरित्रादिकांची रचना झाली आहे, तर संतांचे भक्तिभावाने स्मरण करण्याच्या हेतूने महानुभावेतर साहित्यातील संतचरित्रे अस्तित्वात आली आहेत. दैवी चमत्कार, दंतकथा, आख्यायिका यांचा संग्रह दोन्ही पंथांतील चरित्रांतून आढळतो. तथापि, महानुभाव पंथातील चरित्रग्रंथांचा तोंडवळा लोककथांना, अधिक जवळचा आहे, तर अन्यचरित्र ग्रंथांची भाषा वरीच प्रौढ आणि संस्कृत साहित्याच्या संस्काराने अधिक पल्लेदार झालेली आहे. ऐतिहासिक वीर पुरुषांच्या बखरी ज्या कालखंडात रचण्यात येत होत्या त्याच काळात या चरित्रग्रंथांची निर्मिती झालेली आहे. महानुभावीय चरित्र-ग्रंथांना लोककथांचा संग्रहाचा घाट आहे, तर हे चरित्रग्रंथ बखरीतून विकास पावलेल्या शैलीचे निदर्शक आहेत. साधुसंतांची महानुभावेतर साहित्यातील चरित्रे आणि बखर यांच्या भाषाशैलीत साधर्म्य दिसून आले तरी या दोहोंच्या निर्मिती-प्रेरणा मात्र भिन्न आहेत. बखरींच्या निर्मितीस कारणीभूत ठरलेल्या प्रेरणांचे विवेचन पुढील प्रकरणी करण्यात आलेले असल्याने या दोहोंच्या प्रेरणा वेगळ्या आहेत एवढेच या ठिकाणी लक्षात ठेवले पाहिजे. म्हणून हेरवाडकरांनी 'सांप्रदायिक बखर' या सदरात समाविष्ट केलेल्या संतचरित्रांची गणना 'बखरी'त करता येत नाही हे ओघाने येते. गद्यग्रंथांची लोकप्रियता वाढल्यानंतर पद्यात रूढ असलेली संतचरित्रात्मक रचना गद्यातही झालेली दिसते.

१६. पूर्वापार चालत आलेल्या देवादिकांच्या, यक्षराक्षसांच्या, राजाराणीच्या, राजा-प्रधानांच्या लोककथा, प्राणिसृष्टीवर आधारलेल्या व संस्कृत साहित्याच्या आधाराने प्रस्तुत झालेल्या **नीतिकथा**, धार्मिक परंपरेतून उदयास आलेल्या **व्रतकथा**, **रामायण-महाभारत** आणि पुराणे यांवर लौकिक पुट देऊन अस्तित्वात आलेल्या **पुराणकथा**, अशा कितीतरी परींनी कथात्मक वाङ्मय मराठी भाषेत वाढले. कोणत्याही संस्कृत ग्रंथात न आढळणाऱ्या रामायणीकथा आणि महाभारताचा नाममात्र आधार घेऊन प्रचलित झालेली आख्याने हासुद्धा लोककथांनी घडविलेला एक चमत्कार मानावा लागेल. अशी कित्येक आख्याने मराठी कवींनी गाइलेली आहेत. या कथांवर झालेला

लोककथांचा प्रभाव एवढा गाढा होता की, पंडितांना देखील संस्कृत भाषेतील रामायण-महाभारतातूनच त्या आलेल्या आहेत असा संभ्रम झाला. या कथा व आख्याने ग्रंथ-निबिष्ट होण्यापूर्वी दीर्घकाळ कथा ही मौखिक परंपरेने चालत आलेली होती. लिखित साहित्यात दृष्टांतादाखल चालत आलेल्या कथांचाही अशाच मौखिक परंपरेत समावेश करता येईल.

हा कथात्मक प्रवाह चालू असताना – आणि सध्याच्या काळातही भिन्न पातळीवर अखंडितपणे चालू आहे – कथात्मक साहित्याला प्रयोजनपरत्वे वेगवेगळे आकार मिळत गेले. त्यांच्यावर भिन्न भिन्न संस्कारही झाले. या संस्कारित कथांचे प्राचीनतम लिखित मराठी रूप महानुभाव साहित्यात आढळते. पंचकृष्णांच्या अवतारांपासून झालेला लीळासंग्रह हा एक प्रकारे संस्कारित लोककथांचाच आविष्कार मानता येईल. टीकाभाष्य – पद्धतीचे गद्य रचण्याची क्षमता आणि योग्यता असलेल्या महानुभाव पंडितांनी आपल्या पंथातील सामान्य जनांना ज्ञानसाधन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा लीळासंग्रह केला आहे. या कथांत हेतुपूर्वकता आहे. विशिष्ट तत्त्वप्रणालीचा पुरस्कार करण्याची दृष्टीही त्यात आहे. विचारप्रसाराचे सुगम आणि प्रभावी साधन या दृष्टीने त्यांनी कथात्मक माध्यमाचा स्वीकार केला. तसे करताना जैनपंथात प्रचलित असलेल्या विविध प्राकृत कथांचा आदर्श त्यांच्यापुढे नव्हता असे म्हणता येणार नाही. मराठी कथात्मक साहित्याला लागलेले हे वळण पंडिती परंपरेतील गद्य साहित्याची प्रेरणा घेऊन प्रकट झाले आहे. माध्यम कथेचे आणि भाषा तत्कालीन व्यवहारात रूढ असलेली बोली एवढाच काय तो फरक आढळतो. हे वळण शकाच्या तेराव्या शतकात लागले. शकाच्या चौदाव्या शतकानंतर मात्र ते आढळत नाही.

यानंतरच्या काळात मराठी कथात्मक गद्यसाहित्याने आणखी एक वळण घेतले. हे वळण धार्मिक परंपरेशी संबद्ध असले तरी त्याचा आविष्कार आणि घाट वेगळा राहिला; कारण त्याची प्रेरणा निराळ्या स्वरूपाची होती. या प्रेरणेचे स्वरूप आणि आविष्कार यांचा विचार बखरसाहित्याविषयीच्या प्रकरणात पुढे येणार आहे.

दरम्यान लोककथा आणि नीतिकथा यांच्या जोडीने कथात्मक साहित्याने आणखी एक वेगळे स्वरूप धारण केले. साधुसंतांची चरित्रे व आख्याने सतराव्या शतकानंतर पद्याप्रमाणेच गद्यातही आढळतात. गद्यात्मक संतचरित्रांना शके १६८३ पूर्वी परंपरा होती किंवा नाही हे सांगता येत नाही. तथापि, तदनंतर मात्र संतचरित्रात्मक गद्य-साहित्य निर्माण झाले आहे. महानुभावांच्या चरित्रग्रंथांच्या तुलनेने या प्रवाहाचे स्वरूप वेगळे आहे. चरित्र-आख्यानपर बखरींना ते अधिक जवळचे आहे. बखरसाहित्याच्या प्रभावातून हा संतचरित्रविषयक प्रवाह निर्माण झाला असण्याची शक्यता आहे. अन्यथा बखरींच्या वैभवकाळात अशा प्रकारची संतचरित्रे वा 'दखरी' का रचण्यात आल्या याचे समाधानकारक उत्तर मिळत नाही.

पंडिती परंपरा आणि कथाप्रधान परंपरा अशा दोन परंपरांचे विवेचन आतापर्यंत

करण्यात आले आहे. प्राचीन मराठी गद्याची तिसरी – पौराणिक – परंपरा पुढच्या प्रकरणी विवेचिण्यात येणार आहे.

□

टीपा

१. 'साधारणपणें असे धरून चालण्यास हरकत नाहीं कीं, समाजात जो प्रतिष्ठित वर्ग असतो तो समाजातल्या खालच्या थरातील लोकांचीं मान्यता मिळविण्यासाठी बहुजन समाजात रूढ असलेल्या गोष्टींचा संस्कारित पद्धतीने स्वीकार करतो. या गोष्टी नंतर मूळच्या संस्कृतीत अधिष्ठान पावतात' – कर्वे चिं. ग., **लोकसाहित्य माला** क्र. ४, पृ. ६.

२. **ज्ञानेश्वरी** (दांडेकर प्रत) १–६८.

३. **ज्ञाने**. ९–४०५, १८–१७३०, ११–१०४; ५–११.

४. **कुवलयमाला**, पृ. १६८;

५. **लीळाचरित्र** (एकांक-तुळपुळे प्रत) पृ. २.

६. **करकण्ड चरित्र**, परिशिष्ट. पृ., २७८.

* गेल्या दोन दशकांत ही परिस्थिती बरीच पालटली आहे. वेगवेगळ्या दृष्टिकोणांतून लोकसाहित्याचे अभ्यास करणारे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. काही प्रादेशिक गीतांचे संग्रहही प्रकाशित झाले आहेत. निरनिराळ्या विद्यापीठांतून पीएच्. डी. पदवीसाठी अनेकांनी लोकसाहित्य हा विषय घेतलेला आहे.

७. **लोकसाहित्याची रूपरेखा**, ५०३.

८. **महाराष्ट्र सारस्वत** (पुरवणीसह) ७८०.

९. **महाराष्ट्र सारस्वत** (दुसरी आवृत्ती) ८४.

१०. **भाइ** १८४४, पृ. ४५, वर्ष १७, अंक २, पृ. ६०.

११. **भाइत्रै**, वर्ष १९, अंक ३, पृ. ९५.

१२. **लोकसाहित्य माला**, पुष्प ४, प्रस्ता. ६.

१३. 'यावरि गोसावीं कानवाथराचा दृष्टांत निरूपिला'; 'यावरिं गोसावीं मळेकराचा दृष्टांत निरूपिला;' 'यावरिं गोसावीं बांदीकरियाचा दृष्टांत निरूपिला'; 'यावरिं वाटसीएचा दृष्टांत निरूपिला;' **लीळाचरित्र** (नेनेप्रत) उत्तरार्ध, अनुक्रमे पृ. ८७, ८९, ९९, १००, २५८.

१४. **दृष्टांतपाठ** (तुळपुळे प्रत) २२.

१५. **भाइ,** शके १८३७, पृ. १.
१६. **लक्षणरत्नाकर;** ३२.
१७. **लीळाचरित्र** (एकांक), २.
१८. **भाइप्रे.** वर्ष १३, अंक ६, **महानुभाव इतिहास प्रकर्ण** (१९५५).
१९. **संस्कृत साहित्य का इतिहास,** १७९.
२०. याच प्रकरणात प्रारंभी प्राकृत ग्रंथातील दोन उतारे उद्धृत करण्यात आले आहेत. या उताऱ्यांवरून महानुभाव चरित्र–ग्रंथांचे प्राकृतकथांशी असलेले नाते स्पष्ट होते.
२१. **महाराष्ट्रीय सारस्वत** ग्रंथ ४, पृ. १६३.
२२. **तत्रैव,** ९७.

❑

४. मराठी गद्याची पौराणिक परंपरा

१. साहित्याचा समाजजीवनाशी संबंध २. बखर साहित्य : संशोधन आणि संपादन ३. अखबारनीस आणि बखरकार ४. बखर, नव्हे चरित्र आख्यान ५. बखर शब्दाची व्युत्पत्ती ६. बखरवाङ्मयाचे वर्गीकरण ७. बखर : चरित्र-आख्यान ८. पुराणे आणि बखरी ९. धर्मरक्षणाची कालसापेक्ष जाणीव १०. 'धर्मस्थापनेचे नर : तेही ईश्वरी अवतार ११. बखरीतील वंशावळी १२. धर्मरक्षण : बखरींची प्रेरणा १३. पुराणवाङ्मयाचा ठसा १४. ध्येय नवे : घाट नवा १५. धर्मावतारांच्या पराक्रमी गाथा १६. भाषा आणि शैली १७. पांडित्य आणि कथात्मकता यांचा समन्वय १८. बखरसाहित्याचा उत्कर्ष : भाऊसाहेबांची बखर १९. क्षीणतेज बखरसाहित्य २०. बखरींचे इतिहास-प्रामाण्य २१. युगधर्म आणि प्राचीन काव्य २२. त्रिविध प्रेरणांचे सहजीवन २३. साहित्यातील प्रवाह आणि सामाजिक जाणीव.

१. प्राचीन मराठी गद्यात आढळणाऱ्या दोन परंपरांचा आणि या परंपरांत दिसून येणाऱ्या वेगवेगळ्या प्रवाहांचा विचार मागील दोन प्रकरणांत करण्यात आला आहे. या दोन्ही परंपरांचे समालोचन करताना, काळपरिस्थित्यनुरूप या साहित्यास जे वळण मिळाले त्याचे विवेचन करताना या वळणांच्या मुळांशी असलेल्या विचारांचा आणि प्रवृत्तींच्या अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न त्या त्या ठिकाणी करण्यात आला आहे. लिखित साहित्याचा प्रारंभ पंडिती परंपरेतील ग्रंथाने झालेला असल्याने प्रथम या परंपरेतील प्रवृत्तींचा आणि या प्रवृत्ती ज्या सामाजिक निकडीतून उदयास आल्या, त्यांचा विचार केला.

साहित्यातील प्रवाह केवळ योगायोगाने अस्तित्वात येत नाहीत. काळाच्या

प्रवाहात समाजाची गरज भागविण्यासाठी किंवा परिस्थितीस इष्ट वळण देण्याच्या हेतूने विशिष्ट प्रवाह वाङ्मयात साकार होत असतो. म्हणून साहित्याचे समालोचन करताना अमुक प्रवाह अमुक कालखंडात निर्माण झाले एवढी नोंद अपुरी ठरते. साहित्याचे यथार्थ आकलन करून घेण्याच्या दृष्टीनेही ती अपर्याप्त ठरते. काल-सापेक्षतेचे सूत्र जमेस धरून साहित्याचे मूल्यमापन करावयाचे किंवा नाही हा स्वतंत्र प्रश्न आहे. या प्रश्नावर मतभेद होण्याची शक्यता आहे. तथापि साहित्य-निर्मितीची कार्यकारणमीमांसा केल्याविना साहित्याचा यथायोग्य विचार करता येईल असे वाटत नाही. साहित्याचा समाजजीवनाशी असलेल्या संबंधांचा उलगडा झाला म्हणजे केवळ साहित्याच्या भूमिकेवरून न सुटणाऱ्या प्रश्नांची उत्तरे सापडतात. अन्यथा विशिष्ट काळातील साहित्यास विशिष्ट वळण का लागले याचा उलगडा होत नाही. साहित्यातील अंतःप्रवाहाशी समाजजीवनाचा संबंध या ना त्या परीने येत असल्याने त्याकडे दुर्लक्ष झाले की चुकीचे निष्कर्ष निघण्याचा संभव अधिक असतो.

बखरसाहित्यासंबंधी आजवर झालेल्या अभ्यासात हेच घडले आहे. बखर हा एक वाङ्मय-प्रकार आहे याची नोंद अभ्यासकांनी घेतली असली तरी बखरींचे मूल्य-मापन प्रामुख्याने इतिहासाचे साधन या नात्यानेच झाले आहे. या साहित्याच्या निर्मितीस कारणीभूत ठरलेली प्रेरणा आणि ज्या काळात हे साहित्य निर्माण झाले तो काळ ध्यानात न घेता बखरी इतिहासाच्या दृष्टीने किती विश्वसनीय ठरतात याचाच विचार बखरीच्या संपादकांनी व इतरांनी अधिक केला आहे. इतिहासाचे एक साधन या दृष्टीने बखरी विचारात घेऊ नयेत असे नाही. परंतु इतिहाससंबंधीच्या आपल्या आजच्या कल्पना बखरकारांनी पूर्ण कराव्यात ही अपेक्षा बाळगणे कितपत सयुक्तिक ठरते हा प्रश्न आहे.

२. बखरसाहित्याचे संशोधन आणि प्रकाशन ज्या काळाच्या पार्श्वभूमीवर झाले त्याचा बखरींच्या मूल्यमापनावर बराच परिणाम झाला आहे. अव्वल इंग्रजी अमदानी-तील दिङ्मूढ अवस्थेचा छेद करण्याच्या हेतूने राष्ट्राभिमान आणि स्वाभिमान यांचा पुरस्कार विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी केल्यानंतर या भावनांची जोपासना करण्याच्या हेतूने तत्कालीन पिढीचे लक्ष या देशाचा पुरातन इतिहास आणि प्राचीन वाङ्मय यांकडे वेधण्यात आले. इतिहास-संशोधन आणि प्राचीन वाङ्मयाचे प्रकाशन यांना चालना मिळाली ती या दृष्टिकोणातून. कित्येकांनी या क्षेत्राच्या संशोधन-प्रकाशनास आपले जीवित कार्य मानले. याच ध्येयवादातून कित्येक संस्था स्थापण्यात आल्या. इति-हासाची साधने गोळा करण्यासाठी जिवाचे अक्षरशः रान करणारे वासुदेवशास्त्री खरे, उन्हापावसातून आणि काटयाकुपाट्यांतून अनवाणी प्रवास करणारे इतिहासाचार्य राजवाडे, यांनी संशोधनाचा काटेरी मार्ग अवलंबिला. या संशोधकांना आपल्या या कार्यात जीवितसाफल्याचा साक्षात्कार झाला तो राष्ट्रीयत्वाच्या भावनेमुळे. धुळ्याचे शंकर श्रीकृष्ण देव यांनी समर्थ रामदास आणि त्यांचा संप्रदाय यांच्या कागदपत्राचे

संशोधन व प्रकाशन यांसाठी तन, मन आणि धन पणास लावले ते याच राष्ट्रीयत्वाच्या भावनेने. भारत इतिहास संशोधक मंडळासारख्या संस्था आणि या संस्थांना सक्रीय पाठबळ देणारे संशोधक यांनी एक पवित्र राष्ट्रीय कार्य या दृष्टीनेच संशोधन कार्याचा व्याप वाढविला.

या सर्व प्रयत्नांतून महाराष्ट्रात इतिहास-संशोधन आणि प्राचीन मराठी वाङ्मयाचे संशोधन-प्रकाशन यांना चालना मिळाली. मराठ्यांच्या इतिहासाची साधने गोळा होऊ लागली. त्यांचे अंशतः प्रकाशनही होत राहिले. अडगळीत पडलेल्या रुमालांना मोल आहे याची जाणीव झाली. जुना कागद पायदळी पडू नये म्हणून तो गंगार्पण करणे खुळेपणाचे असून अशा कागदांवरून मोलाची माहिती मिळण्याचा संभव असतो हे लक्षात येऊ लागले. पुराणांना प्रतिष्ठा आली. पोथ्यांची महती भाविकांपुरती मर्यादित न राहता त्यांच्याविषयी डोळस भक्ती निर्माण झाली. आपले पूर्वज थोर होते. त्यांचा इतिहास अभिमानास्पद आहे. दुर्दैवामुळे वाका प्रसंग गुदरलेला असला तरी कधी काळी या देशाने स्वराज्य आणि वैभव यांचा अनुभव घेतलेला होता. पुढेही ते दिवस येणार नाहीत कशावरून ? या व अशा स्वरूपाच्या भावना प्रारंभीच्या इतिहास-संशोधनास प्रेरक ठरल्या. राष्ट्राभिमान जागवावयाचा म्हणजे प्राचीनांचे संरक्षण झाले पाहिजे, अडगळीत पडलेला इतिहास आणि साहित्य प्रकाशात आले पाहिजे, असे विचारवंतांना ज्या काळात वाटत होते त्या काळात प्राचीन वाङ्मयाचे आणि पुरातन इतिहासाचे संशोधन झाले. या संशोधनातूनच ऐतिहासिक कागदपत्रांबरोबरच बखरीही उजेडात आल्या. बखरींचे संशोधन-प्रकाशन झाले ते या पार्श्वभूमीवर.

आज कालक्रमानुसार बखरींचा क्रम लावता येणे शक्य आहे. परंतु बखरी प्रथम प्रकाशात आल्या त्या कालमानानुसार नव्हे. संशोधकांनी त्या जसजशा सापडल्या तसतसे त्यांचे प्रकाशन केले. प्रारंभीच्या काळात बखरींचा इतिहास लिहिणे शक्य नव्हते. आता मात्र या साहित्याचा सुसंबद्ध इतिहास लिहून या वाङ्मयप्रकाराच्या विकासाचे समालोचन करता येते. प्रारंभीच्या काळात इतिहासाच्याच दृष्टीने बखरी महत्त्वाच्या वाटत असल्याने या साहित्याचा अन्य दृष्टिकोनांतून विचारच झाला नाही. संशोधकांच्या संबंधी एक गोष्ट मात्र अभिमानाने सांगता येण्यासारखी आहे. त्यांनी प्राचीनाविषयीच्या अभिमानास दुराभिमानाचे स्वरूप कधीच येऊ दिले नाही. जुने ते सोनेच असावयास पाहिजे या भावनेपासून संशोधन अलिप्त राहिले. म्हणूनच बखरींच्या प्रामाण्यासंबंधाने सडेतोड चर्चा झाली. जेथे जेथे वैगुण्य आढळले त्या त्या ठिकाणी बखरीचा विशिष्ट भाग इतिहासाच्या दृष्टीने विश्वासार्ह नाही, असा निर्वाळाही संशोधकांनी दिला आहे.

बखरींच्या प्रामाण्यासंबंधी संशोधकांनी केलेला ऊहापोह इतिहासैक दृष्टीचा परिणाम आहे. 'बखरकारांनी जाणूनबुजून सत्यापलाप केला नाही'' हे मान्य

करूनही इतिहासाचार्य राजवाडे यांनी 'एक अस्सल चिठोरे सर्व बखरींच्या पुराव्यास हाणून पाडण्यास वस्स् आहे'[२] असे विधान केले आहे. इतकेच नव्हे तर अव्वल दर्जाच्या साधनांत बखरींचा अंतर्भाव करण्यात येऊ नये असा इषारादेखील त्यांनी दिला आहे. इतिहास आणि बखर यांची सांगड प्रारंभीच्या संशोधनात जी लागली ती अद्याप कायम आहे. आजच्या अभ्यासकांच्या भूमिकेतदेखील फार मोठा बदल झाला आहे असे दिसून येत नाही.[३]

२. बखर आणि इतिहास यांचा मेळ घालण्याच्या कल्पनेचे मूळ बखर या शब्दाची जी व्युत्पत्ती सांगण्यात येते तीत असावे. 'वक्' म्हणजे बोलणे अशी कै. राजवाडे यांनी बखर या शब्दची उपपत्ती लावली असली तरी[४] 'खबर' या शब्दात झालेला वर्णविपर्यय हेच बखर या शब्दाचे मूळ आहे, हे मत सर्वमान्य झाल्यासारखे दिसते. हा शब्द फारसी भाषेतला असल्यामुळे या भाषेतील तवारिखांच्या अनुकरणातून बखर-साहित्य मराठी भाषेत रूढ झाले हे मत मान्यता पावले. त्यामुळे बखरींचा अभ्यास इतिहासाच्या दृष्टिकोनातून होऊ लागला.[५]

बखर हा मराठी साहित्यातला प्रकार फारसी तवारिखा, अखबार, शाहनामे इत्यादी फारसी भाषेतील साहित्याशी खरोखर सदृश आहे काय याचा विचार उभय प्रकारच्या साहित्याचे अंतरंग लक्षात घेऊन केला पाहिजे. असा अभ्यास झाला असता फारसी तवारिखा आणि त्यांच्या अनुकरणातून रचण्यात आलेले दखनी भाषेतील 'इतिहास-ग्रंथ' यांचे नाते बखरींशी जोडता येईल असे वाटत नाही. फारसी अखबार-नवीस आणि मराठी बखरकार यांच्या भूमिकेत मूलभूत फरक आहे हे लक्षात घेतले पाहिजे. अखबारनवीस त्या त्या राजांचे वा नवाबांचे आश्रित होते. राज्यकर्त्यांचे स्तुतिपाठ गाणारे ते भाट होते. बखरींचे लेखक हे 'दौलतीचे' सेवक होते, हे विसरता येत नाही. बखरकारांना प्रशस्ती गाणाऱ्या आश्रितांच्या मालिकेत बसविणे चुकीचे ठरेल. राजांनाच केवळ संतुष्ट करण्याचा प्रयत्न बखरकारांनी केला नाही. इतकेच काय समकालीन राजाचे चरित्र बखरीच्या रूपाने लिहिल्याचे उदाहरण अपवादात्मकच सापडेल. राजांना अप्रिय वाटणाऱ्या सत्याचे कथन बखरकारांनी निर्भयपणे केले आहे; त्याचप्रमाणे पराभवाच्या घटनादेखील बखरकारांनी नोंदविल्या आहेत. 'भोसले व पेशवे यांची बखर' लिहिणारा लेखक तंजाऊरच्या युद्धासंबंधी लिहिताना पुढील माहिती देतो :

> 'त्रिचनापलीकर यास राज्य घेऊन द्यावें असें होतें. परंतु त्यासि वेइमानी करून त्यास मारून बाहेर काढिलें. तेंही राज्य आपणेंच घेतले.'[६]

भोसल्यांच्या वंशजांना त्यांच्या पूर्वजांनी 'वेइमानी केली' असे हा बखरकार स्पष्टपणे सांगतो. एवढा तो निर्भय आहे. याउलट छत्रपती शिवाजी महाराज यांचा समकालीन कवी आणि अली आदिलशहाचा आश्रित असलेला नुसरती याचे लेखन विचारात घेण्याजोगे आहे. फारसी तवारिखांच्या धर्तीवर त्याने 'अलीनामा' हे काव्य

दखनी भाषेत रचले आहे. आपल्या बादशहाची त्याने स्तुती करावी यात वैषम्य वाटण्यासारखे काही नाही. परंतु आपण 'खरालुरा इतिहास' लिहीत आहोत अशी प्रतिज्ञा तो करतो तेव्हा त्याने लिहिलेला इतिहास तपासून पहावा लागतो. त्याची प्रतिज्ञा अशी :

पकड असल तारीख-लिखत्याकी चाल
लिखा किस्सा दरकिस्सा मैं हस्बेहाल
कया था सो तारीख मैं हस्बे हाल
लिखा था इस किस्से को हस्बे मिसाल ॥

'इतिहास-लेखकाची पद्धती स्वीकारून प्रत्यक्षात घडलेला इतिहास लिहिला आहे' असा या चार ओळींचा अर्थ आहे. तरीही त्याने इतिहास मात्र लिहिला नाही ! अफजलखानाने 'सिंहगर्जना' केल्याचे हा 'इतिहासकार' सांगतो. परंतु या 'सिंहाची' आतडी बाहेर काढल्याची घटना मात्र तो देत नाही. त्याने अनेक काल्पनिक युद्धांत आदिलशहास लढावयास लावले आहे. या सर्व 'युद्धांत' त्याचा 'विजय' हा ठरलेलाच ! जेथे प्रत्यक्ष अपयश आले अशा प्रसंगाचे 'पडलो तरी नाक वर' अशा प्रौढीने समर्थन केले आहे ! सभासदाची बखर ही जवळपास समकालीन कृती 'आलीनाम्या'शी तुलना करून पहाता येण्यासारखी आहे. पराभव आणि माघार यांचे वर्णन करण्याचा सभासदाने दाखविलेला प्रांजळपणा या दोघांची भूमिका भिन्न असल्याचे सिद्ध करतो[७] अखबार-नवीस आणि बखरकार यांच्या भूमिकेत मूलभूत फरक असल्याने या दोघांना एका मालिकेत बसवणे म्हणजे हुजऱ्या आणि हुजूर यांना समान लेखण्यासारखे आहे. त्यामुळे मराठी बखरकारांनी फारसी अखबारनवीसांचे अनुकरण केले असेल हे संभवनीय वाटत नाही.

४. ज्या बखर शब्दाच्या योगाने अखबारनवीसांशी मराठी बखरकारांचे नाते जोडले जाते तो बखर हा शब्द एक वाङ्मयप्रकार या नात्याने बखरकारांना कितपत अभिप्रेत होता हा प्रश्नच आहे ! प्रारंभीच्या बखरकारांनी तरी आपल्या कृतीचा बखर या नावाने उल्लेख केला नाही. प्राचीनतम मानलेल्या 'महिकावतीच्या बखरीत' मूळ ग्रंथकाराने 'बखर' हा शब्द या प्रकारणासाठी योजला नाही. कृष्णाजी अनंत सभासद यास लेखनाबाबत जी आज्ञा झाली तीत 'चरित्र लेहून देणें' असा निर्देश आहे.[८] "ऐसें **चरित्र आख्यान** राजियाचें उत्पन्नकालापासून देहावसानापर्यंत जाहले" असे हा बखरकार शेवटी लिहितो.[९] या बखरीतील शेवटचे वाक्य 'ही बखर संपूर्ण जाहाली' हे मूळ बखरकारापेक्षा नक्कल करणारांनीच घातल्याची शक्यता अधिक आहे. मल्हार रामराव चिटणीस यांनी 'चरित्रे' लिहिली आहेत. शिवछत्रपतींचे 'सप्तप्रकरणात्म चरित्र' लिहिण्यासाठी जी लेखनाज्ञा झाली आहे ती अशी :

'हें **चरित्र** पूर्वील दाखले वगैरे लेहून ठेवले असेल त्या अन्वयें लेहून आणावें.'[१०]

९१ कलमी बखरीचा शेवट असा आहे :

> ' ९१. सदरहू **आख्यान** नवद प्रकरणे पुण्यश्लोक राजा त्याची **कथा** दत्ताजी वाकेनवीस यांपासि तपसीलवार लिहिली होती. '

सभासद, चिटणीस, वाकेनवीस हे आपापल्या प्रकरणांना अनुक्रमे चरित्र-आख्यान, चरित्र आणि आख्यान अशी नावे देतात हे वरील उल्लेखांवरून स्पष्ट होते. मग बखर हे नाव आले कसे ? केव्हा ? कोठून ?

शके १४८७ च्या नंतर म्हणजे राक्षसतागडीची लढाई झाल्यावर दोन-चार वर्षांनीं लिहिण्यात आलेल्या बखरीच्या शेवटी आलेला पुढील उतारा या संदर्भात घेतला पाहिजे. या उताऱ्यात ' बखेर ' हा शब्द दोन वेळा आला आहे :

> ' येदलशाहने राजयाचें सो [र]....कासीस देऊन पाठविलें. त्याचे बिलायेती गडकोटासि काविजे बदल घोडे राऊत देऊन पाठविताती. पेस्तर अहवाला नजरे पडलेया बयाजवार **बखेर** पाठवून देऊन.... लिहनु पाठविलें असे.... जासूद व नाईकवाडी रोशन करता मालूम होईल.... हे **बखेर** मोर्तुब जहाले ''

वरील उताऱ्याचा संदर्भासह अर्थ लावता असे दिसते कीं, वृत्तांत या अर्थाने ' बखेर ' हा शब्द प्रथम आला असून ' अधिकृत कागद ' या अर्थाने बखेर हा शब्द शेवटी आलेला आहे. अधिकृत कागदपत्रासाठी देखील ' बखेर ' हा शब्द सोळाव्या शतकात योजण्यात येत असावा असा या उल्लेखातून अर्थ निघतो. तो लक्षात घेतला म्हणजे ' खबर ' या शब्दात वर्णविपर्यास होऊन बखर हा शब्द बनला असावा ही उपपत्ती सयुक्तिक वाटू लागते. परंतु ' बखेर ' या शब्दात आलेला ' एकार ' संशय निर्माण करतो. या संशयाचे निराकरण करता येईल काय ?

५. मागील पिढीतील पत्रलेखनातील एका संकेताचा उल्लेख या ठिकाणी करावासा वाटतो. पत्र लिहून पूर्ण केल्यानंतर पत्ता लिहिण्यापूर्वी ' क्षेम ' वा ' कुशल ' अशी अक्षरे लिहिण्याची प्रथा होती. या संकेताचे मला पुष्कळ दिवस कोडे होते. त्याचा उलगडा झाला तो असा : जुन्या जमान्यात काही आनंददायक अथवा शोककारक घटनाच तेवढ्या कळविण्यासाठी पत्राचा उपयोग होत असे. त्यामुळे येणारे पत्र म्हणजे काहीतरी अशुभ नाही ना, अशी शंका मनाला स्पर्श करून जात असे. आजच्या काळात देखील तार घेऊन येणारा शिपाई पहाताच घाबरून जाणारे महाभाग आढळतील. अशा परिस्थितीत पत्र खुशालीचे आहे हे पत्राचे वाचन होण्यापूर्वीच लक्षात यावे या हेतूने वर अगदी ठळक अक्षरांत ' क्षेम ' वा ' कुशल ' लिहिण्याची प्रथा होती. या ' क्षेम ' वा ' कुशल ' या शब्दाचा फारसी भाऊ आहे : ' बिलखैर ' अथवा ' बखैर.' बखैर या शब्दाचे ' बखेर ' हे रूपांतर होऊन 'बखर' या शब्दात त्याची परिणती झाली असावी. बखरीदेखील पत्ररूपाने सादर होत असत व ' बखेर 'प्रमाणेच तो अधिकृत

वृत्तांत वा कागदही असे. अर्थात हे अनुमान आहे. आणि 'खबर' या शब्दाचा वर्ण-विपर्यय ही बखरीची उपपत्तीदेखील एक अनुमानच आहे. एवढे मात्र खरे की, कानडी साहित्यात हा वाङ्मयप्रकार 'बखेर' या नावाने ओळखला जातो. त्याचप्रमाणे जुन्या कागदपत्रांतदेखील 'बखेर-नामे' असल्याचे उल्लेख आढळतात.[१२]

आणखी एक उपपत्ती सुचविता येण्याजोगी आहे. प्राचीन काळी महत्त्वाचे कागदपत्र चामड्यावरही लिहिले जात होते, अशी माहिती मिळते. इ. स. च्या चौथ्या शतकापूर्वी अरबस्तान आणि युरोप खंड या भागांत चामड्यावर लेखन करण्याची प्रथा होती असे सांगतात. इ. स.च्या चौथ्या शतकानंतर कागद तयार करण्याच्या कलेचा प्रसार अरबस्तानातून युरोप खंडात झाला. कागदाचा शोध लागल्यानंतरही टिकाऊ स्वरूपाचे कागदपत्र चामड्यावर लिहिण्याची प्रथा होती. भारतातदेखील असे तुरळक लेखन चालू होते असे दिसते. इ.स.च्या प्रारंभी एका भारतीय अधिकाऱ्याने चामड्यावर लिहिलेला आदेश नमूद करण्यात आला आहे.[१३] ज्ञानेश्वरीत आलेल्या पुढील ओव्यांत राजमुद्रेचे चामड्याशी असलेले साहचर्य उल्लेखण्यात आले आहे.

राजाज्ञेचीं अक्षरें आथी । तिये चर्मा एका जिया पडति
तेया चर्मासाठीं जोड ति ! सकल ही वस्तु ॥
वांचुनि सोनें-रुपें प्रमाण नोहे । जेथ राजाज्ञा समर्थ आहे
ते धर्म चि एक जे लाहे । तेणें विकेति अवघी ॥ ज्ञा. ९.४४० ते ५०.

लेखनासाठी मुबलक उपलब्ध होणारे चामडे बकरीचे असण्याचीच शक्यता अधिक. 'बकरीतील' '.क' या अरबी वर्णाचा उच्चार मराठीत सहसा 'ख'मध्ये रूपांतरित होतो. उदाहरणार्थ 'वक्त' या शब्दातील क् या ध्वनीचे मराठीत 'ख' हे रूपांतर होऊन 'वखत' असा उच्चार होतो. तदनुसार 'बकर' या अरबी शब्दाचे 'बखर' हे रूपांतर केवळ असंभवनीय म्हणता येणार नाही. ताम्रपत्रावरील दानपत्राला वाहत्य-स्वरूपावरून ताम्रपट हे नाव पडले तद्वत बकरीच्या चामड्यावरील लेखास 'बखर' हे नाव मिळण्याची शक्यता वाटते. सही-शिक्क्यानिशी प्रसिद्ध होणाऱ्या अधिकृत लेखासाठी वा वृत्तांताकरिता बखर हा शब्द रूढ झालेला असला तरी प्रत्यक्ष वाङ्मयप्रकाराच्या लेखकांनी मात्र 'चरित्र-आख्यानपर' साहित्य या दृष्टीनेच लेखन केले आहे.

मुख्य मुद्दा शब्दाच्या व्युत्पत्तीचा ऊहापोह हा नाहीच. या शब्दाची व्युत्पत्ती लावताना बखर-साहित्यासंबंधाने जे समज रूढ झाले त्यांचे निराकरण करता यावे या दृष्टीने हे विवेचन केले आहे. चुकीच्या कल्पनांशी बखर संलग्न झाल्याकारणाने इतिहासाचे साधन या पलीकडे बखरींच्या अभ्यासाची मजल गेली नाही. हेरवाड-करांचा प्रबंध अपवाद म्हणून सांगता येण्यासारखा आहे. तरीही तेदेखील इतिहास-लेखन हे बखरीचे मुख्य उद्दिष्ट मानतातच.[१४]

महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास आणि गद्य-साहित्याची परंपरा लक्षात न घेता

बखरसाहित्याचा अभ्यास होत असल्याने बखरींच्या उद्दिष्टांकडे दुर्लक्ष झाले आणि या साहित्यातील काही विशेष 'पौराणिक भारुड' या नावाने संबोधण्यात येऊ लागले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व साहित्यिक परंपरांच्या संदर्भात बखरींचे समालोचन केले असता बखरीत आढळणाऱ्या कित्येक विशेषांचा उलगडा होतो. बखरसाहित्य कोणत्याही परभाषेतील साहित्याचे अनुकरण नसून त्याला स्वतःचे काही वैशिष्ट्य आहे. या वैशिष्ट्यास पूर्वपरंपरेचा कालरूपेक्ष आविष्कार म्हणता येईल.

६. परंतु, प्रथम बखर-साहित्य म्हणजे नेमके कोणते साहित्य याची कल्पना स्पष्ट केली पाहिजे. आज स्थूल मानाने इतिहासविषयक सर्वच गद्य लेखन बखर या नावाने संबोधले जाते. ऐतिहासिक घटना, वार्ता, प्रसंग-वर्णन, वंशावळी, राज्यकारभार-विषयक उपदेश, ऐतिहासिक पुरुषांची चरित्रे या सर्व प्रकारच्या साहित्याचा बखरीत समावेश होत असतो. या साहित्याची वर्गवारी करून त्यांतून बखर या संज्ञेस पात्र ठरणारे साहित्य वेगळे केले पाहिजे. तसे झाले तरच या साहित्याचे लक्षण निश्चित करता येईल आणि साहित्यप्रकार या नात्याने बखरींचे समालोचनदेखील शक्य होईल. इतिहासाचार्य राजवाडे यांनी केलेल्या वर्गीकरणात इतिहासकाराचा दृष्टिकोन दिसून येतो. ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने बखरींची प्रतवारी उपयुक्त ठरणारी असली तरी साहित्यप्रकार या दृष्टीने बखरीचा अभ्यास करावयाचा झाल्यास या वर्गीकरणाचा उपयोग होईल असे वाटत नाही.[१५] हेरवाडकरांच्या प्रबंधात आलेले वर्गीकरण विषयानुसारी आहे. त्यांनी बखरीचे १४ प्रकार मानले असून या प्रकारांचे कालक्रमानुसार विवेचन केले आहे.[१६] प्रेरणा आणि परंपरा यांचा शोध घेण्याच्या दृष्टीने बखर साहित्य या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वाङ्मयाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले असता उपयुक्त ठरेल :

१. **चरित्र्य-आख्यानपर :** सभासदी बखर, सप्तप्रकरणात्मक चरित्र, ९१ कलमी बखर इ.

२. **प्रसंगवर्णनपर :** राक्षसतागडीची बखर, पानिपतची बखर, 'खर्ड्याच्या लढाईची बखर' इ.

३. **वार्तापत्रे :** 'पुणे अखबार', 'होळकरांची थैली', '१७३८ सालची हकीकत' इ.

४. **उपदेशपर साहित्य :** 'नारायण व्यवहार शिक्षा', 'आज्ञापत्र' या सदरात अंशतः येते, परंतु पुढील प्रकरणी त्याचा विस्ताराने विचार केला आहे.

५. **सांप्रदायिक व भक्तिपर :** 'हनुमंतस्वामींची बखर', 'जयराम स्वामींची बखर' इ.

सांप्रदायिक व भक्तिपर : या पाच वर्गांपैकी शेवटच्या वर्गात विशिष्ट संप्रदायाची परंपरा, स्थानाचे व व्यक्तीचे माहात्म्य, त्या त्या पंथाच्या आचार-विचारांचे

विवरण, साधुसंतांची चरित्रे इत्यादी विषय येतात. या प्रकारात संतसाहित्यात आढळून येणारी भक्तिधाराच प्रामुख्याने आढळते. म्हणून संतसाहित्याचाच गद्य आविष्कार या सदरात अशा रचनांची गणना करण्यास हरकत नसावी. केवळ गद्य शैली आणि कथात्मकता यांच्यामुळे अशा रचनांना 'बखर' हे नाव पडलेले दिसते. या साहित्याचा पिंड भक्तिपर असल्याने चरित्र वा आख्यानात्मक साहित्यात अशा बखरींचा समावेश श्रेयस्कर ठरेल. त्यामुळे बखरींच्या संदर्भात अशा प्रकारणांचा विचार करण्याचे कारण नाही.

उपदेशप्रधान : इतिहास-पुराणोक्त राजधर्माचे निरूपण असे या साहित्याचे स्वरूप असते. 'आज्ञापत्र' आणि 'नारायण व्यवहार शिक्षा' अशी दोन प्रकरणे यासंबंधी पाहण्यात आली. अशा ग्रंथांतून महाभारत, पुराणे, स्मृतिग्रंथ अथवा कौटिल्याचे अर्थशास्त्र अशा ग्रंथांतून आलेले राजनीतिपर सिद्धांत आणि राजधर्म यांचे संकलन असते. पौराणिक परंपरेच्या योगाने असे साहित्य बखरींच्या जातकुळीस जवळचे वाटत असले तरी बखरींचे अन्य विशेष त्यात आढळत नाहीत. त्यामुळे बखरवाङ्मयात त्यांचा समावेश न करता त्यास राजनीतिपर प्रबंध मानणे इष्ट ठरते. तथापि, 'आज्ञापत्राचे' स्वरूप सर्वसाधारण राजनीतिपर साहित्यापेक्षा वेगळे असल्याने या प्रकरणाचा विचार स्वतंत्रपणे पुढे केला आहे. पौराणिक परंपरेचा एक वेगळा आविष्कार या नात्याने 'आज्ञापत्रांचा' वेगळा वर्ग मानावा लागतो.

वार्तापत्रे : सांप्रदायिक आणि उपदेशप्रधान साहित्य यांचा इतिहासपुराणांशी जेवढा संबंध येतो तेवढा वार्तापत्रांचा येत नाही. वार्तापत्रे लिहिणाऱ्या व्यक्ती राजकारणात वावरत असल्या तरी त्यांचे लक्ष वर्तमानावर अधिक केंद्रित झालेले असते. एखाद्या युद्धाची हकीकत कळविणारा अखबारनवीस, परकी सत्तेच्या दरबारात राहून खबरदारी-(वर्तमान पुरविणारा)-करणारा वकील, एखाद्या अधिकाऱ्याच्या समागमे राहून वार्तापत्रे पाठविणारा लेखक या सर्वांचे लेखन प्रासंगिक स्वरूपाचे असते. पेशवेदप्तरात अशी अनेक वार्तापत्रे आढळतील. निजामच्या वकिलाने पुण्याहून पाठविलेली पत्रे 'पुणे अखबार' या नावाने प्रसिद्ध झाली आहेत. त्यांचा समावेशही वार्तापत्रातच केला पाहिजे. वार्ता सजवून सांगण्यापेक्षा त्या तातडीने रवाना करणे यावर वार्तापत्रकारांचा भर असल्याने हेतुपूर्वक साहित्य-निर्मितीचे स्वरूप अशा लेखनास नसते. तथापि, इतिहास आणि समाजजीवन समजून घेण्याच्या दृष्टीने या वार्तापत्रांचे महत्त्व नाकारता येत नाही. एखादा असाधारण लेखक या मर्यादेत राहूनही आपले वैशिष्ट्य प्रकट करीत असतो हा भाग निराळा. काही वार्तापत्रे आणि प्रासंगिक पत्रव्यवहार साहित्य-गुणांच्या दृष्टीने खरोखरच वाखाणण्यासारखे आहेत. स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर झाल्यानंतर तर अशा वार्तापत्रांस विशेष बहर आल्याचे निदर्शनास येते. पेशवेदप्तरातील कागदपत्रांचा भाषाविशेषांसंबंधी डॉ. ग्रामोपाध्ये यांनी केलेल्या अभ्यासाचा अपवाद वगळता एकंदरीत या पत्रांचा विशेष अभ्यास झालेला आढळत नाही.

एकंदरीत पत्रवाङ्मयच अभ्यासाच्या दृष्टीने अलक्षित राहिले आहे. या साहित्याचे महत्त्व लक्षात घेऊन ६ व्या प्रकरणात एकंदर पत्रसाहित्याचा ओझरता परिचय करून देण्यात आला आहे. या साहित्यात स्वतंत्र साहित्य निर्माण करण्याचा लेखकाचा हेतू नसतो आणि वाचकही त्या अपेक्षेने हे साहित्य वाचत नाही. त्यामुळे वार्तापत्रांचा समावेश बखरीत करीत नाही.

प्रसंगवर्णनपर : केवळ शैली आणि साहित्यगुण यांचार विचार केला, तर वार्तापत्रांच्या मानाने प्रसंगपर साहित्य सरस ठरते. राक्षसतागडीच्या लढाईची बखर, पानिपतच्या युद्धासंबंधीची लहान-मोठी वार्तापत्रे व कैफियती इत्यादी स्वरूपाची सामग्री या प्रकारात मोडते. जेधे-शकावली आणि सनपुरीची बखर यांचा समावेशही याच प्रकारात केला पाहिजे. जेधे-शकावलीत शकानुसार घडलेल्या घटनांची नोंद आहे, तर सनपुरीच्या बखरीत कालक्रमानुसार काही घटनांचे वर्णन करण्यात आले आहे. 'भाऊसाहेबांची बखर' तसे पाहिले तर पानिपतच्या संग्रामाचे वर्णन करणारी आहे, परंतु या बखरीच्या अंतरंगाचा विचार करता ती केवळ प्रसंगवर्णनपर आहे असे म्हणता येत नाही. या बखरकाराने पानिपतच्या संग्रामाचे वर्णन भाऊसाहेब ही व्यक्ती मध्यवर्ती कल्पून केले आहे. म्हणून या बखरीचा समावेश चरित्र-आख्यानपर बखरीतच करणे श्रेयस्कर ठरते.

रूढ समजुतीप्रमाणे बखरसाहित्य या नावाने ओळखण्यात येणाऱ्या साहित्याची वर्गवारी वर दिली आहे. या वर्गांपैकी शेवटच्या चारांचा विचार आतापर्यंत करण्यात आला आहे. त्यांतला शेवटचा म्हणजे सांप्रदायिक साहित्याचा विचार हा वस्तुतः आख्यानपर गद्यसाहित्य या दृष्टीने होणे आवश्यक असल्याने तो बखरसाहित्याचा एक घटक मानणे युक्त ठरणार नाही. उपदेशप्रधान साहित्यही राजनीतिपर प्रबंधात समाविष्ट होणारे असल्याने बखर साहित्यात त्याची गणना करणे योग्य होणार नाही. वार्तापत्रे द्योटक आणि प्रासंगिक स्वरूपाची असतात. त्यामुळे हेतुपूर्वक साहित्यनिर्मितीची प्रेरणा आणि स्वतंत्र कृतीचा घाट अशा नैमित्तिक स्वरूपाच्या लेखनात असणे अशक्य असते. तीच गोष्ट प्रसंगवर्णनपर साहित्याची. या नैमित्तिक रचनेतदेखील साहित्यप्रकाराच्या समग्र लक्षणांची आणि वैशिष्ट्यांची अपेक्षा करणे व्यर्थ ठरते. या वर्गातील साहित्यात बखरसाहित्यात आढळून येणाऱ्या लक्षणांचे अंशतः दर्शन कधी कधी घडत असले, तरी संपूर्ण वाङ्मयप्रकारांच्या लक्षणांचा परिचय करून घेण्यासाठी पहिल्या वर्गातील म्हणजे चरित्र–आख्यानपर चरित्रांचेच विश्लेषण उपयुक्त ठरते.

७. चरित्र–आख्यानपर साहित्यासच खऱ्या अर्थाने 'बखर' ही संज्ञा देता येण्यासारखी आहे. बखरसाहित्याला स्वतंत्र घाट आणि निर्मिती-प्रेरणा असल्याची जाणीव होते ती चरित्र–आख्यानपर गद्यसाहित्याद्वारे. आज उपलब्ध असलेल्या बखरीत महिकावतीची बखर प्राचीनतम ठरते. तसे पाहिले तर ही बखर वर दिलेल्या पाच वर्गांपैकी कोणत्याही एका वर्गात तंतोतंत बसत नाही. कारण, भिन्न कालखंडात रचण्यात

आलेल्या सहा प्रकरणांचे हे संकलन आहे. या सहांपैकी प्राचीनतम भाग शके १३७० तला असून शेवटच्या प्रकरणाचे लेखन शके १५०० च्या आसपास झालेले आहे. अंतरंगाचे स्वरूप पाहता त्यात कोणतेही एकच एक सूत्र असावे असे वाटत नाही. पहिल्या प्रकरणात पूर्वपरंपरा, वंशोत्पत्ती आणि वर्णावर्ण आदी विचार भविष्योत्तर पुराणाच्या आधारे देण्यात आले आहेत. राजवंशावळी दुसऱ्या प्रकरणात आल्या आहेत. इतरही आनुषंगिक माहिती त्यावरोवरच आली आहे. काही निवाडे हकीकती तिसऱ्या प्रकरणात असून चौथे ओवोबद्ध प्रकरण कौस्तुभपुराणाच्या आधारे रचण्यात आल्याचे या भागाचा लेखक सांगतो. पाचवे प्रकरण पठारे ज्ञातीची वंशावळी देणारे असून सहाव्या प्रकरणात पुन्हा वंशावळी आणि निवाडे आले आहेत.

एकूण सहा प्रकरणांचे हे स्वरूप लक्षात घेता ही रचना म्हणजे वेगवेगळ्या काळात रचण्यात आलेल्या काही प्रकरणांचा व कागदपत्रांचा एक संग्रहच वाटतो. या संग्रहाचा लेखक एक नाही. अमुक एक काळ निश्चितपणे सांगावयाचा आहे असा बोधही या साहित्यावरून होत नाही. या संकलनात एक सूत्र सूक्ष्मपणे अनुस्यूत असल्याचे जाणवते :

> "धर्म लयास गेला असून ठिकठिकाणचे लोक आपली ज्ञाती, वंश आणि कुळगोत्र विसरू लागले आहेत. म्लेंच्छांनी भूमी व्यापल्याकारणाने धर्माचे क्षेत्र उत्तरोत्तर संकुचित होत चालले आहे. ज्ञातिधर्माचे विस्मरण घडले तर मात्र सर्वच नष्ट होईल हे लक्षात ठेऊन कुलदेवतेचे स्मरण करावे, पूर्वकाल आठवावा, पूर्वजांचे स्मरण करावे. या कार्यात **महाराष्ट्रधर्मरक्षिका** कुलदेवता अवश्य साहाय्य करील."

महिकावतीच्या बखरीत येणाऱ्या वंशावळी, निवाडे, महजर आणि दृष्टांतादिक या मध्यवर्ती आशयाच्या भोवती फेर धरताना दिसून येतात. पौराणिक आणि लौकिक कथांदेखील याच उद्देशाने आल्या आहेत असे सूक्ष्म अभ्यासांनी निदर्शनास येते. बखर वाचन केले तर मात्र महिकावतीची बखर हे अठरा धान्यांचे कडबोळे आहे असे वाटते. पुढच्या काळात रचलेल्या चरित्र-आख्यानपर बखरींचे विशेष महिकावतीच्या बखरीत बीजरूपाने आस्तित्वात आहेत असाही निष्कर्ष शोधांती निघतो. हे विशेष कोणते हे पुढे विवेचिण्यात येणार आहे. तूर्त चरित्र-आख्यानपर बखरींचा मूळारंभ महिकावतीच्या बखरीत आहे असे गृहीत धरून चालूया. वा बखरीची रचना शके १३७० ते शके १५०० या कालखंडात झाली आहे याचा उल्लेख पूर्वी येऊन गेला आहेच. यानंतर दुसरी बखर आढळते ती सभासदांनी लिहिलेली. शके १६१६ ते १६१९ या कालखंडात ही बखर रचण्यात आली आहे कालक्रमानुसार शेवटची बखर शके १७३३ म्हणजे पेशवाईच्या अस्तापूर्वी ७ वर्षे लिहिलेली, मल्हार रामराव चिटणीस यांची 'थोरले शाहूमहाराज यांचे चरित्र' ही बखर. ज्या साहित्याला

पूर्णार्थाने बखर म्हणता येईल असे साहित्य शके १३७० ते शके १७३३ या कालखंडात रचण्यात आले आहे.

८. प्रश्न असा उद्‌भवतो की, शके १३७० त बखर साहित्याचा प्रारंभ का झाला ? या काळापूर्वी अशा प्रकारचे साहित्य असण्याची शक्यता आहे काय ? संस्कृत अथवा प्राकृत भाषेतील साहित्यात अशा प्रकारचा आकृतिबंध आढळतो काय ? अथवा कोणतीही परंपरा नसताना एखाद्या प्रतिभावंताने अशा प्रकारचे साहित्य निर्माण करून पुढच्या काळातील लेखकांस स्फूर्ती दिली ? या साहित्याला अगोदरची परंपरा नसेल तर कोणत्या कारणामुळे हा आकृतिबंध उदयास आला ?

साहित्याचा परिणाम समाजावर कितपत होतो हा प्रश्न विवाद्य असला तरी समाजाच्या आशा-आकांक्षा आणि ध्येय-धारणा साहित्यात प्रकट होत असतात, यासंबंधी वाद असण्याचे कारण नाही. आज आपल्यापुढे असलेली पहिली बखर कोणत्या राजकीय व सामाजिक परिस्थितीतून निर्माण झाली हे निश्चित करण्यास आवश्यक असलेली पुरेशी साधने उपलब्ध नाहीत. प्राचीन महाराष्ट्राचा विस्तारपूर्वक इतिहास फक्त शातवाहनकाळापुरता डॉ. केतकरांनी दोन खंडांत लिहिला आहे. तदनंतरच्या विशेषत: इस्लामी आक्रमणाच्या प्रारंभकाळातला इतिहास काही ठळक घटनांवरच आधारलेला आहे. या काळासंबंधी इतस्ततः विखुरलेली वरीच साधने इतिहासग्रंथांतून अद्याप संकलित व्हावयाची आहेत. त्यामुळे या काळातील समाज-जीवनासंबंधाने केवळ अनुमान करता येते, निश्चित विधान धाडसाचे ठरते. त्यामुळे मराठी साहित्यातील पहिली बखर कोणत्या सामाजिक व राजकीय जाणिवांतून निर्माण झाली हे निश्चित करण्यासाठी बखरीत आलेल्या माहितीवरच विसंबून रहावे लागते.

एक गोष्ट मात्र निश्चितपणे सांगता येते की, आजच्या सामाजिक जीवनात धर्मविषयक भावनांना निर्णायक महत्त्व नसले तरी प्राचीन मराठी साहित्याच्या काल खंडात परिस्थिती अगदी निराळी होती. सामाजिक व्यवहार त्या त्या काळात प्रचलित असलेल्या धर्मविषयक धारणेवर आधारलेला होता. धार्मिक कार्याचा संकल्प सोडताना आजही 'श्रुति-स्मृति-पुराणोक्त-फल-प्राप्त्यर्थम्' असा उच्चार आपण करतो. पुराणांच्या रूपाने श्रुती अवतरल्या या समजुतीने पुराणांना धर्माचे प्रामाण्य आले आणि सामाजिक व्यवहार स्मृतिग्रंथांच्या आधाराने निश्चित होऊ लागले. निबंधवाङ्मय किंवा व्यापक अर्थाने 'धर्मशास्त्र' हा स्मृतिवाङ्मयाच्या विकासातला पुढचा टप्पा. समाजनियंत्रण पुढच्या काळात या धर्मशास्त्राप्रमाणे होऊ लागले. शके १४०० ते १७०० या तीन शतकांच्या काळात झालेल्या व्यवहार-निर्णयाची छाननी अस्सल कागदपत्रांच्या आधारे करून ती कै. भट यांनी प्रसिद्ध केली आहे. तीन-चार शतकांतील महाराष्ट्राचे समाजजीवन समजून घेण्याच्या दृष्टीने ही सामग्री फारच उपयुक्त आहे.

'शके १४०० ते १७०० च्या दर्म्यान गोत, देशक, न्यायाधीश अगर खुद्द राजा यांच्याकडे कोणताही व्यवहार निर्णय करण्यासाठी आला असता त्या व्यवहाराचा निर्णय स्मृतिग्रंथांतील नियमांच्या आधारे होत असे'

असा निर्वाळा भट यांनी दिला आहे.[१७]

रामायण, महाभारत, पुराणातील अनेक कथा, पुराणोक्त स्थान-महात्मे आणि दैवतमहिमा यांचा परिणाम मध्ययुगीन काळातील सर्वच भाषांतील साहित्यावर झालेला आहे. समाजजीवनावर त्यांचे संस्कार होणे अपरिहार्य ठरते. मराठी साहित्य आणि समाज-जीवन या संस्कारापासून अलिप्त राहिले असे समजण्याचे कारण नाही. प्राचीन काव्यातील आख्याने व इतर साहित्य यांचा अभ्यास केला असता या साहित्यावर मराठी रामायण-महाभारत आणि पुराणे यांचा गाढ परिणाम असल्याचे निदर्शनास येते.

इतिहास (महाभारतादि ग्रंथ) आणि पुराणे या ग्रंथांना महत्त्व येण्याचे कारणही समजण्यासारखे आहे. श्रुतींना वर्णानुसार प्राप्त होणारा आणि विद्वत्तेचाही अधिकार आवश्यक होता. पांडित्य स्मृतींचा उलगडा करण्यास आवश्यक होते. पुराणांच्या बाबतीत असे अडथळे नसल्याकारणाने साधारण जनसमूहात पुराणांना महत्त्व येणे स्वाभाविक होते. युगधर्मांच्या कल्पनेनेदेखील पुराणांच्या प्रामाण्यात भर घातली. कलियुगात पुराणोक्त धर्माचेच अनुसरण करावयाचे अशी समजूत रूढ असल्याने श्रुती आणि स्मृती यांची श्रेष्ठता मान्य असूनही पुराणोक्त धर्म लोकरूढ झालेला होता. नित्य पुराणश्रवण धार्मिक जीवनाचे अंग बनले ते यामुळेच. धर्म जागविण्यासाठी नित्य पुराणश्रवण करावे असा आदेश महिकावतीच्या बखरीत आढळतो.[१८] पुराणश्रवणाची पुरातन परंपरा साहित्यातही कित्येक स्थळी सूचित झालेली आहे. अळजपुरच्या मुक्कामात श्रीचक्रधर अंबीनाथाच्या देवालयात पुराणश्रवणासाठी जात, असा उल्लेख लीळाचरित्रात आढळतो,[१९] आनंदीबाईंच्या एका पुराणिकाचे पत्र इतिहासाचार्य राजवाडे यांनी प्रसिद्ध केले आहे. हा पुराणिक स्वतःचा उल्लेख करतो तो असा :

'टोणपेत्युपाख्य नृसिंहाचार्याभिधानक वज्रचूडामण्डित आनंदीबाई संज्ञिक श्रीमत्सार्वभौम रघुनाथराव धर्मपत्निपुराणिक....'[२०]

यादवकाल आणि पेशवेकाल या दोन कालखंडांतील हे उल्लेख आणि महिकावतीच्या बखरीतील पुराणश्रवणाचा आदेश लक्षात घेतले म्हणजे प्राचीन मराठी साहित्याच्या कालखंडातील सामाजिक जीवनात पुराणांना किती महत्त्व होते याची कल्पना करता येते. महिकावतीच्या बखरीत पुराणांतरीची वचने व आधार जागोजाग आले आहेत. भविष्योतर, कौस्तुभ ही पुराणे व ब्रह्मोत्तरखंड आणि सप्तादि खंड इत्यादिकांच्या संमतीने लेखन झाले आहे, असे त्या त्या प्रकरणांचे लेखक सांगतात. शंकराचार्यांच्या प्रतापामुळे महाराष्ट्रात धर्म राहिला, अन्यथा हा भागही म्लेंछमय झाला असता, असे सांगताना महिकावतीच्या बखरीत पुढील कथन येते :

' सत्यमेव आइकाल तरि शैयाद्रि खंडिचें मतें शास्त्राचे आधारें श्रीशंकराचार्य जगद्गुरू तेहीं जै कर्म स्थापविले असे यावत् श्वेतबंध रामेश्वरापासून यावत् काशी व द्वारका श्रीतुळजापूर परियंत मधे देश पुण्यक्षेत्र, देवीची दशावतारिक जागा, महाराष्ट्र धर्माचे स्थान, कोटितीर्थांचें महिमान येथे हा धर्म कल्कीनारायण अवतार धरिला तोपर्यंत राहिले. दुसरे देश म्लेंछमये होतील. हा खटाटोप करावयास पुराणप्रत्ययी आइकावें. '[११]

मराठी भाषेतल्या पहिल्या बखरीत पुराणांचा आधार घेण्यात आला आहे, त्याचप्रमाणे शके १७३३ च्या सुमारास आपली ' चरित्रे ' लिहिणारा व जवळपास शेवटचा बखरकार मल्हार रामरावदेखील पुराणांच्या आधाराने लेखन केल्याचे सांगतो :

' जें (चरित्र) श्रवण, पठण, मनन केले असतां सकल विद्या व गुणसंपन्नता व शौर्य, औदार्य, गांभीर्य, दया, धर्म व नीती हे सहज उत्पन्न होत असावें म्हणून आज्ञा जाली. त्यावरून शास्त्राधार, विष्णुपुराणांतील दंडनीती, राजधर्म, राजमयूख व रमलशास्त्र व कारकीर्दी वडिलार्जित होत्या, दिनचर्या, पराक्रम-कथाही होत्या त्यांच्या आश्रयेकरून निवेदन केले कीं.... '[१२]

पहिला आणि जवळपास शेवटचा बखरकार पुराणादिकांच्या आधारे लेखन करतात याचा अर्थ या लिखकांना पुराणोक्त धर्माचे निरूपण करून तदनुसार लेखन करावयाचे होते असा होतो.

९. धर्मविषयक जागृतीप्रमाणेच धर्मरक्षणाचे महत्त्वदेखील बखरकार प्रसंगोपात सांगतात. मालाडच्या नायकोबास पडलेल्या स्वप्नाचे रहस्य विशद करताना केशवाचार्य (महिकावतीची बखर) सांगतो :

' जुने खत आजपावेतंव हिसाब पाहतां बिंबप्रारंभापासून वरुसें तीनसें जालीं. यामधें जें राज्य कुल खलक सैनिक इनामक सर्व रश्त आजम सेक अलाउ-दिनाची जाली. याउपर देशामधें तेही यवन बहुत जाले... राज्याभिमान सोडिला. शास्त्रें सोडिलीं. कुणी धरिलीं.... काही येक सेवा करू लागले. काहीक नष्टले. बहुत आचारहीन जाले. बहुत गोत्र प्रवर, कुलस्वामीण कुलगुरू ठिकाणें सांगतां विसरू लागले. जाणोन देवीनें धर्म महाराष्ट्र रक्षाया कारणें राजश्री नायको-रायास स्वप्न दिल्हे जर हा जातिमेळावा करावा .... श्रीदेवी अद्यशक्ती जगदंबिका महाराष्ट्रधर्मरक्षिका तुम्हां प्रसन्न असो....'[१३]

महाराष्ट्र धर्माचे रक्षण करण्याचे आवाहन महिकावतीत आढळते. हेच ध्येय शिवछत्रपतींच्या स्वराज्य संस्थापनेचेही होते. शिवकालीन व उत्तरकालीन बखर-कारांनी या ध्येयाचा आवर्जून उच्चार केला आहे. यासंबंधी बखरकारांप्रमाणेच समर्थ रामदासांची साक्ष उपलब्ध आहे.[१४] चिटणिसांनी आपल्या शिवचरित्रात याच ध्येय-वादाचा पुनरुच्चार केला आहे.

"पृथ्वीचे ठायीं धर्माची ग्लानि जाली व देव, ब्राह्मण, यज्ञयाग उच्छेद जाला. पृथ्वीस पीडा जाली असतां पूर्वी युगांतरीं देवांनी मनुष्यवेषे धारण करून व महान् ऋषि, ब्राह्मण, भूदेव निर्माण होऊन धर्मस्थापना घडावी तसेंच कलियुगाचे ठायिं धर्म-उच्छेद जाला असतां ईश्वरी अंशेंकरून राजे निर्माण व्हावें व ऋषी यांनींहि अवतार धारण करून कर्म, ज्ञान, उपासना कांडत्रयात्मक वेदमार्ग दाहा हजार वर्षेपर्यंत स्थापावा अशी विष्णुपुराणादिकांचे ठायि वचनें आहेत. त्या अन्वयें म्लेंच्छमय पृथ्वी जाली. सर्व धर्म उच्छेद जाला. गाई ब्राह्मणांसि बहुत पीडा जाली. त्यायोगें शिवाजी महाराज पूर्वी श्रीचे वरप्रदान होऊन निर्माण जाले. त्यास बुधि म्लेंछांचा उछेद करावा आणि धर्म स्थापावा अशी जाली असता त्यास साहेभूत ऋषीचे अवतार, सत्पुरुष, सिध, असे त्या काळाचे ठायिं बहुत निर्माण जाले. कलियुगाचे ठायिं मुख्य धर्म उपासना, नामस्मरण, कीर्तन हे उत्तम उपाय. त्यांची स्थापना करून धर्महि रक्षिते जाले."[१५]

धर्मरक्षणाचे ध्येय साध्य करण्यासाठी शिवछत्रपतींनी पुराणांतरीच्या राजेलोकांचा आदर्श आपल्यापुढे ठेवला होता, असेही चिटणिसांनी सांगितले आहे :

'धर्में करून प्रजापालन करणें हें सिद्धीस जावे म्हणून चित्तात आणून पूर्वी जे जे राजे धर्मेंकरून राज्यवृद्धीते पावले ते कोणते रीतीनें चालविले व शास्त्राचे ठायिं पुराणांतरीं महान् राजे आचरण करीत आले त्याअन्वये आपणहि करावें असें केले."[१६]

१०. केवळ इतिहासकथन आणि वृत्तांत निवेदन एवढेच बखरकारांचे उद्दिष्ट असते तर ऐतिहासिक पुरुषांचे चरित्र आख्यान लिहिताना त्यांना पुराणांचा आश्रय करण्याचे कारण पडले नसते, बखरकारांची पुराणशरणता एक महत्त्वाचे तथ्य सूचित करते : या चरित्रांच्या रूपाने पुराणसदृश साहित्य निर्माण करीत आहोत याची जाणीव बखरकारांना होती. पुराणोक्त धर्मास पूरक अशाच प्रकारचे साहित्य आपल्या हातून लिहिले जावे ही त्यांची महत्त्वाकांक्षा स्पष्ट दिसते. पूर्वी धर्मरक्षणार्थ जे जे अवतार होऊन गेले त्यांनी आपल्या अवतारकार्याने जी धर्मजागृती आणि धर्मरक्षणाचे कार्य केले त्याच अवतारांप्रमाणे आधुनिक काळातील पुरुषांचे कार्य धर्मरक्षणाचेच असल्याने पुराणांनी अवतारी पुरुषांची चरित्रे वर्णिली, त्याप्रमाणे या अवतारी महापुरुषांचे, पुराणोत्तरकालीन धर्मावतारांचे चरित्रकथन आपण करीत अहोत ही जाणीव बखरलेखकांत असल्याचे दिसून येते. पुराणोक्त धर्मरक्षणाची प्रेरणा बखरकारांना लेखनप्रवृत्त करीत असल्याकारणाने चरित्रविषयीभूत व्यक्तींकडे व त्यांच्या कार्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन

'धर्मस्थापनेचे नर । तेही ईश्वरी अवतार'
झाले आहेत पुढे होणार । देणें ईश्वराचे ॥

अशा स्परूपाची होतो[१७] त्यामुळे चरित्र-आख्यानावर बखरींना पुराणोक्त वंशानु-

चरित्राचे वळण लागणेही स्वाभाविक होते.

११. पुराणांच्या पाच लक्षणांपैकी वंशानुचरित हे एक लक्षण मानले जाते.[२८] इतर चार – सर्ग, प्रतिसर्ग, वंश आणि मन्वंतर – यांचा विचार बखरकारांनी केला नाही. वंशानुचरित या एकाच लक्षणाच्या आधाराने बखरकारांनी चरित्र-आख्यानपर बखरी लिहिल्या आहेत. काही बखरीतून येणाऱ्या वंशावळी पौराणिक थाटाच्या म्हणूनच अप्रस्तुत वाटत असल्या तरी बखरकारांना लेखनप्रवृत्त करणारा ध्येयवाद लक्षात घेतला म्हणजे बखरीतून वंशावळीचे वर्णन का येते याचा उलगडा होतो. बखरसाहित्याच्या प्रेरणेचा विचार न करता या वंशावळीकडे पाहिले असता मात्र त्या निरर्थक वाटू लागतात. वस्तुतः बखर आणि पुराणे यांचे नाते दृढ करणारा तो एक महत्त्वाचा साक्षीदार आहे. कारण पुराणांच्या पंच लक्षणांपैकी 'वंशानुचरित' या लक्षणाचा तो परिपाक आहे.

महिकावतीच्या बखरीत पहिल्याच अध्यायात 'वंशोत्पत्ती' आली आहे. तिसरा अध्याय तर 'वंशपद्धती' सांगणारा असून सोम आणि सूर्य या दोन्ही वंशांतील राजांच्या कथा त्यात आल्या आहेत. शेषवंशाची कथाही त्याबरोबरच कथन करण्यात आली आहे. '९१ कलमी' बखरीचा प्रारंभच मुळी 'यादी वंशावली भोसले....' असा आहे. युधिष्ठिरापासून ते पिढीर राजापर्यंतच्या कथा आणि वंशावळी सप्तप्रकरणात्मक चरित्रात आल्या आहेत. 'शिवदिग्विजय', 'शिवप्रताप,' शेडगावकर यांची बखर आणि शिलाखंडावर कोरलेले 'भोसलवंश चरित्र' या बखरींतूनही भोसले – कुळाच्या व अन्य राजांच्या वंशावळी आल्या आहेत.

कलियुगापूर्वीच्या आणि नंतरच्या राजांची व त्यांच्या वंशावळींची माहिती पुराणात आढळते. विष्णुपुराणाच्या चौथ्या अंशात रवि-सोमवंशांच्या राजांची नामावली आली आहे. महानंदी, महापद्म, शुंग आणि कण्व या वंशातील राजांची इतिहासास ज्ञात असलेली माहिती आली आहे.[२९] चंद्र-सूर्य या वंशांतील राजांबरोबरच विदर्भातल्या २७ राजांची माहिती भागवतपुराणात आढळते.[३०] मात्स्यपुराणात ३९ अध्यायात पुरातन राजांची व तीन अध्यायांत कलियुगातील राजे व राजवंश यांची माहिती मिळते.[३१] वायु, पद्म, अग्नि आणि ब्राह्म या पुराणांतही राजवंशांचे कथन आले आहे.

पुराणांतील राजवंशांच्या कथनाकडे फारसे लक्ष देण्याचे कारण नाही, त्या केवळ भाकडकथा होत असा समज दीर्घकाळ प्रचलित होता. या वंशावळींना नुसताच अर्थ नसून भारतीय इतिहासाचा उलगडा करण्यास त्याचा उपयोग होतो, असा सिधांत पर्गिटर या विद्वानाने आपल्या ग्रंथात सप्रमाण मांडला आहे* इतर पाश्चिमात्य विद्वानांनीही असाच निष्कर्ष काढला आहे. सूतसंस्कृतीचे विवरण करताना ज्ञानकोशकारांनी पुराणांतील वंशावळीसंबंधाने पुढील मत दिले आहे :

"पौराणिक वंशावळी सर्वत्र अविश्वसनीय मानण्याचे कारण नाही. वंशावळी लिहिण्याचे काम स्तुतिपाठकांनी केले असावे. या वंशावळीत सूर्यवंशाची जास्तीत जास्त नावे ९३, यादवांची ६२, सोमवंशाची ५० आहेत. वैदिक वाङ्मयातील क्षत्रियांच्या नावांमागे सूर्य-चंद्र-वंशांची विरुदावली नाही. परंतु, सुदास-दिवोदासाच्या कथा वेद-पुराणे यांत समान असून तोच सूतसंस्कृतीस ब्राह्मणी संस्कृतीशी जोडणारा दुवा मानावा लागेल" ३२

वंशावळीच्या निमित्ताने सूतसंस्कृतीने पुरातन वैदिक संस्कृतीशी आपला संबंध जोडला त्याच प्रमाणे बखरींनी याच साधनाच्या द्वारे पुराणांशी असलेले आपले नाते प्रस्थापित केले आहे. हे रहस्य उलगडले म्हणजे बखरीतून येणाऱ्या वंशावळी निरर्थक वाटणार नाहीत. पुराणोक्त धर्माची प्रेरणा वंशावळींचे प्रतीक घेऊन बखरीत अवतरली हे यायोगे सिद्ध होते. राजवंश आणि राजांच्या वंशावळी लिहून ठेवण्याची प्रथा महाराष्ट्रात पुरातनकालापासून चालू असून तिचे अस्तित्व बखरीच्याही पूर्वी होते असे इतिहासाचार्य राजवाडे यांचे मत आहे :

'बखरींतील वंशावळी बहुधा या (परंपरेने चालत) यादींवरून उतरून घेतल्या असतील हे उघड आहे व या यादी बखरींहून जुन्या आहेत हे त्याहून उघड अहे.' ३३

इतिहासाचार्य राजवाडे यांच्या या मताच्या संदर्भात प्रारंभीच्या प्रकरणात आलेला शकावल्यांचा उल्लेखही ध्यानात घेतला पाहिजे. हैदराबाद येथील दप्तरखान्यात असलेल्या "शकावली मराठे राजे यांची" या प्रकारणाचा परिचय अगोदर येऊन गेला आहे. निजामी मुलखात मराठ्यांच्या राजांची शकावली लिहिण्यात यावी हीच एक आश्चर्याची बाब. त्यातून १४३ वर्षांतील ही शकावली एका पिढीत लिहून पूर्ण झाली नसणार हे उघडच आहे. अनेक पिढ्यांनी आपापल्या कालातले लेखन केल्यानंतरच ही शकावली पूर्ण झाली आहे. त्याच्या मुळाशी परंपरागत लेखन करण्याची प्रवृत्तीच आढळून येते.

वंशावळ्या आणि शकावल्या एका परीने पुराणांतील वंशावळ्यांचा उत्तरकालीन वारसा ठरतो. महाराष्ट्रात अशा लेखनाची दीर्घकालीन परंपरा असल्याने चरित्र-आख्यानपर बखरींनीही हा वारसा आपल्या पद्धतीने पुढे चालविलेला दिसून येतो.

१२. धर्माचे रक्षण करणारे धर्मावतारच ज्या कालखंडात अस्तित्वात नव्हते त्या कालात अशी चरित्रे लिहिण्याचा प्रश्नच उद्भवला नाही. बखरीचे लेखन विशिष्ट कालखंडाच्या नंतर का झाले नाही याचे हेच कारण संभवते. आपल्या धर्माचे रक्षण झाले पाहिजे, धर्मरक्षणार्थ पराक्रम जागविला पाहिजे, तसे झाले तरच आपल्या धर्माच्या अफाट समुदायाला मानाने जगता येईल, अन्यथा परधर्माच्या आक्रमणाने आपल्या धर्माचा व धर्मावर श्रद्धा असलेल्या सर्वांचा निःपात होईल, ही जाणीव

मराठ्यांचे राज्य अस्तित्वात येण्यापूर्वी महाराष्ट्रात निश्चितच असली पाहिजे. या जाणिवेतूनच महिकावतीच्या बखरीसारख्या बखरी लिहिण्यात आल्या आहेत. अशाच प्रकारचे इतर साहित्यदेखील निर्माण झाले असावे. काळाने ते सुरक्षित न ठेवल्याने महिकावतीच्या बखरीसारखा एकाकी वाटणारा प्रयत्न आज दिसतो. चरित्र-आख्यानपर बखरींची सर्व लक्षणे या बखरीत नाहीत. ती एका लेखकानेही लिहिलेली नाही. तरीही चरित्र-आख्यानपर बखरींच्या मुळाशी असलेली प्रेरणा व साहित्याचा घाट यांचे बीजभूत अस्तित्व या बखरीत आढळते. अनुकूल परिस्थितीत या बीजभूत प्रवृत्तींचा विस्तार झाला आणि स्वराज्यसंस्थापनेनंतर हा आकृतिबंध झपाट्याने विकास पावला.

धर्मरक्षण करण्याची कामगिरी प्रत्यक्षात साकार करणारे पराक्रमी पुरुष समाजाने पाहिले, त्यांचे कर्तृत्व समाजाने अनुभवले. धर्मरक्षणार्थ भगवंत अवतार घेणार या श्रद्धेने जी स्वप्ने उराशी बाळगली होती, ती या वीर पुरुषांच्या कर्तृत्वाने सत्य-सृष्टीत आल्याचे समाजाच्या निदर्शनास आले. म्हणूनच त्यांना साक्षात ईश्वरी अवतार समजून त्यांचे चरित्र-आख्यान बखरकारांनी गाइले. या निमित्ताने अशा ध्येयवादाची आणि चरित्र-लेखनाची पूर्वी अस्तित्वात असलेली सामग्री फळास आली. बीजास अंकुर फुटले. अंकुराचे रूपांतर वृक्षात झाले. बखरसाहित्याला बहर आला तो असा.

धर्मप्रेरणा, किंवा अधिक निश्चयात्मक विधान करावयाचे झाल्यास, धर्मरक्षणाची प्रेरणा बखर साहित्याच्या निर्मितीस कारणीभूत ठरली. परधर्मीय शासक आणि त्यांचा धर्म यांचे आक्रमण ज्या काळात घडले त्याकाळी पुराणोक्त धर्म समाजाच्या अधिक परिचयाचा होता. पुराणवाङ्मय संस्कृत भाषेत असले तरी पुराणश्रवणाचा अधिकार सर्व वर्णांना होता. पुराण सांगण्याची प्रथा महाराष्ट्रात यादवकाळापासून होती. पुराण सांगणारे पुराणिक बहुधा मराठी भाषेतून पुराणकथा सांगत असावेत. तसे नसते तर 'नित्य पुराणश्रवण' या धर्माचाराला काही अर्थच नव्हता. पुराणांचे कथात्मक स्वरूप आणि तद्द्वारे घडणारा धर्मस्वरूपाचा बोध यामुळे लोकप्रियता आणि धर्मप्रामाण्य या दोहोंची जोड पुराणवाङ्मयास लाभली होती. पुराणोक्त धर्म लोकांसमोर राहिला तो पुराणांच्या या वैशिष्ट्याच्या योगाने.

१३. म्हणून धर्मरक्षणाची प्रेरणा मराठी भाषेत साकार होऊ लागली तेव्हा या प्रेरणेला इतर कोणत्याही साहित्यापेक्षा पुराणांचाच आदर्श मराठी साहित्याला अधिक जवळचा वाटला. धर्मरक्षणाच्या हेतूने केलेले अवतारी पुरुषांचे गुणगान कथात्मक निवेदनाचा घाट घेऊन मराठी साहित्यात अवतरले ते या पार्श्वभूमीवर. बखरीतील वंशावळीच केवळ पुराणांच्या अनुकरणातून आलेल्या नसून पुराणांच्या इतर अंगोपांगांचाही मराठी बखरींवर परिणाम झालेला आहे. पुराणांच्या अगदी प्रारंभी येणारी 'पुराणजिज्ञासा' आणि बखरींच्या लेखनास घडलेले निमित्तकारण जवळपास सारखे आहे. उदाहरणार्थ, ब्राह्मपुराणात ऋषींनी पुराण-सांगणाराचा गौरव पुढील शब्दांत केला आहे :

पुराणधर्मशास्त्राणि सैतिहासानि सक्रमम्
जानासि देवदैत्यानां चरितं जन्म कर्म च ॥
न तेऽस्त्यविदितं किंचिद्वेदे शास्त्रे च भारते
पुराणे मोक्षशास्त्रे च सर्वज्ञोऽसि महामते ॥ १–१६, १७.

वायुपुराणात देखील सुताचो अशीच प्रशंसा आली आहे : "हे सुता, व्यासाच्या जवळ तुझे चांगल्याप्रकारे अध्ययन झालेले असल्याने पुराणाश्रितकथांचे मंथन तू केले आहेस. या कथा ऐकण्याची आमची इच्छा आहे, तरी त्या तू आम्हाला सांगाव्यात." यावर, 'कथा सांगणे हा माझा धर्मच असल्याने त्या मी तुम्हाला सांगतो' असे उत्तर सुताने दिले असून नंतर पुराण सांगण्यास प्रारंभ केला आहे.[३४] भागवत पुराणाच्या प्रारंभीदेखील अशीच पुराणजिज्ञासा व्यक्त झाली आहे. 'कलियुगातील अल्पायुषी मानवाच्या कल्याणासाठी सर्व शास्त्रांचे सार तू आम्हाला सांग' अशी प्रार्थना ऋषींनी केली आहे.[३५] तपोधन ऋषींनी पुराणकथा सांगण्यासाठी सुताची प्रार्थना करावी ही बाब विशेष लक्षात घेण्यासारखी आहे. याच संदर्भात बखरकारांना झालेल्या 'लेखनाज्ञांचा' अभ्यास केला असता दोहोंत विलक्षण साम्य असल्याचे निदर्शनास येईल :

"तुम्ही पुरातन सेवक, लेखनाधिकारी, याजकरितां पूर्वीपासून महाराजांच्या कुलाचे ठायीं परमप्रतापी पूर्वज होत आले, त्यांणी पराक्रम केले, सार्वभौम राज्यें केलीं....त्याजपासून आजपर्यंत राज्य–उपभोग वंशपरंपरा दक्षिणेचे ठायिं कसें केलें, पराक्रम काय केले हें चरित्र पूर्वील दाखले वगैरे लेहून ठेवले असेल त्या अन्वयें लेहून आणावें."

'सप्तप्रकरणात्मक चरित्र' लिहिण्यासाठी झालेली ही आज्ञा आहे. सभासदांच्या बखरींच्या प्रारंभी देखील अशाच प्रकारची जिज्ञासा व्यक्त झाली असून 'आज्ञापत्रा'च्या पहिल्या प्रकरणाचा प्रारंभ देखील लेखकाच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा गौरव करणारा आहे. हे सर्व लेखन पौराणिक ग्रंथाच्या प्रारंभी येणाऱ्या जिज्ञासेच्या स्वरूपाचें आहे.[३६]

पुराणात शेवटी वा एखाद्या विशिष्ट भागाच्या समाप्तीनंतर फलश्रुती येते. बखरकारांनी देखील या फलश्रुतीचे अनुकरण केले आहे. महिकावतीची बखर, सभासदी बखर, सप्तप्रकरणात्मक चरित्र या रचनांच्या शेवटी फलश्रुती आलेली आहे. सभासदाच्या बखरीच्या शेवटी आलेली ही फलश्रुती कोणत्याही पुराणग्रंथास शोभेल अशी आहे :-

"चरित्र पुण्यश्लोक राजियाचें जें घरीं लेहून ठेवतील, त्यांच्या भाग्यास पारावार नाहीं. व जे वाचतील त्यास मोठें पुण्य जोडेल. निपुत्रियास पुत्र होतील. दारिद्रियास लक्ष्मीवंत होतील. जे पुत्रवंत असतील त्यांसहि पुत्र होतील. जे लक्ष्मीवंत असतील ते विशेष भाग्यवंत होतील. यशस्वी असतील ते दिग्विजयी होतील. येणेंप्रमाणें सर्व मनोरथ पूर्ण होतील."[३७]

अशाच प्रकारची फलश्रुती इतर बखरींतूनही आली आहे.[३८]

इतिहास-पुराणांचा ध्येयवाद आणि त्यातील वातावरण यांच्याशी बखरकार एवढे एकरूप झालेले दिसतात की, त्यांच्या भाषाशैलीवर आणि दृष्टांतादिकांच्या पद्धतीवर पुराणांची दाट छाया जाणवते. ऐतिहासिक व्यक्तींच्या ठिकाणी त्यांना पुराणपुरुषांचे दर्शन घडते. शास्ताखान आणि अफजलखान यांचे वर्णन करताना बखरकारांच्या डोळ्यांपुढे उभे असतात, रावण आणि दुर्योधन.

> 'स्वारी म्हणजे कलियुगींचा रावणच. जैसी रावणाची संपत्ती गणना न करवे तैसाच वरोवरि खजिना वेमोइन'

असे शास्ताखानाचे वर्णन सभासदाने केले आहे. अफजलखानाच्या वधात भीमाने केलेला दुर्योधनाचा वध सभासदास दिसतो :

> 'अफजलखान सामान्य नव्हे केवळ दुर्योधनच जातीने होता. अंगाचा वळाचाहि तैसाच. त्याला येकले भीमानें मारिलें तैसें केले.'[३९]

चिटणीसांना शिवाजी महाराजांनी केलेला अफजलखानाचा वध श्रीकृष्णाने केलेल्या शिशुपालवधासारखा वाटतो.[४०] एका बखरकाराने दिलेरखानाची तुलना बकासुराशी केली आहे. साहजिकच त्यास शिवाजी महाराज भीमासारखे वाटले.[४१] आपल्या यवनसेवेचे समर्थन शहाजी महाराजांनी केले ते रावणाच्या अंकित राहिलेल्या देवांचा दृष्टांत देऊन.[४२]

औरंगजेबाच्या अंतकाळीचे पुढील वर्णन एखाद्या पौराणिक आख्यानाचे रूप घेऊन येते. औरंगजेबाचा अंतःकाल जवळ ठेपला असता त्यांची कन्या दुःखी होते. याच कन्येने संभाजी महाराजांना मनोमन वरलेले असते. म्हणूनच ती शाहूमहाराजांना आपला पुत्र मानते. औरंगजेब तिचे सांत्वन करताना आपल्या पूर्वजन्माची कथा सांगतो :

> 'बेनम यांणी विनंति केली की, दो गोष्टीविशी (श्रमी झाले आहे). आपल्या सारिखा पिता यास मृत्युसमय आणि माझा पुत्र बंदी म्हणौन श्रमी. हे ऐकोन व बादशहा बिछान्यावर बसोन जवळ होते त्यास बाहेर काढोन बोलिले की, तुम्ही कष्टी न व्हावें, शत वर्षें वाचले असताही मृत्यु आहेच. पुत्रासाठी श्रमी होता तरि हा पुत्र तुझा पुन्हा शिवाजी उत्पन्न जाला आहे. शिवाजी व आम्ही बदरिकाश्रमीं राज इच्छा धरून तप केलें. आमची तपश्चर्या अति उग्र, तामसी. त्यायोगें म्लेच्छ जालों. हया धर्माची स्थापना करावी हा नियम आमचा. शिवाजीची सात्विक तपश्चर्या म्हणौन हिंदुधर्मात जन्म होऊन हिंदू धर्माची स्थापना करावी हा नेम त्याचा. आयुर्दान कमी होऊन तोच शिवाजी हा तुझा पुत्र जाला. त्याचा झेंडा दिल्लीत लागेल. माझे पुत्र त्याच्या आश्रयाने चालतील....श्रमी व्हावयाचें कारण नाहीं. आज पंचवीस वर्षें हिंदू मोडित असतां मोडत नाहींत त्याचें कारण हें....'[४३]

वरील उताऱ्याच्या शेवटी आलेले भविष्यकथन एखाद्या पुराणात शोभण्यासारखे आहे. सप्तप्रकरणात्मक चरित्रातही अशा प्रकारचे भविष्यकथन आले आहे :

> 'देशिंचे राज्य ताम्र घेतील. संभाजी राजा सांपडेल हैराण होईल. चंदीस राजाराम राज्य करील. चंदीचे राज्याकडून मागतीं देशिंचें राज्य प्राप्त होईल.... पुढें मागतीं राजा शिवनामें होईल. दिल्लीपावेतो राज्य घेईल. एक राज्य करील.''४४

भविष्यकथनाप्रमाणेच भविष्यसूचक स्वप्न वा स्वप्नदृष्टांत, आकाशवाणी, दैवी चमत्कार व अलौकिक घटना बखरकारांनीं आपल्या लेखनात योजल्या आहेत. अशी वर्णने वाचत असताना आपण पौराणिक काळात व वातावरणात वावरत असल्यासारखे वाटते. महिकावतीच्या बखरीत नायकोबास झालेला स्वप्नदृष्टांत, सभासदी बखरीत शिवरायांना भवानी देवीने वेळोवेळी दिलेले अभय,[४५] ९१ कलमी बखरीत आणि भोसले व पेशवे यांच्या बखरींत नदीने दिलेला उतार हे व इतरही अनेक प्रसंग पौराणिक घटनांचे स्मरण करून देणारे आहेत.[४६] शिवाजी महाराजांनी जंजिऱ्यावर स्वारी केली तेव्हा झालेली आकाशवाणी चिटणिसांच्या सप्तप्रकरणात्मक चरित्रात आली आहे. या आकाशवाणीत आणि द्वारकानगरीच्या स्थापनेच्या वेळी झालेल्या अशरीरी वाणीत (बखरीत अश्रणी असा शब्द येतो) विलक्षण साम्य आहे. विष्णु पुराणात यासंबंधी आलेल्या कथेचा संदर्भ असा : कालयवन आणि मागध यांनी दोन बाजूंनी वेढा दिल्याकारणाने श्रीकृष्ण त्रस्त झाला होता. यादवांच्या रक्षणासाठी त्याने जलदुर्ग उभारण्याचे ठरविले. त्याने समुद्रास बारा योजने स्थळ मागितले. सागराने संतुष्ट होऊन ही मागणी पूर्ण केली. या स्थळी श्रीकृष्णाने द्वारका वसविली. या कथेच्या पार्श्वभूमीवर जंजिऱ्याचा हा प्रसंग पहा. प्रथम आकाशवाणी, नंतर स्वप्नदृष्टांत, नंतर सिंधुदुर्गाची उभारणी असा क्रम आहे :

> '' 'जंजिरा या काळीं साध्य नाही. सातशें वर्षांचा मुहूर्त त्यास दिला आहे.' त्याजवरून तीन उपोषणे केली असतां समुद्रांनी दृष्टांत दिला कीं, मालवण म्हणून कोळियाचें बेट गलबतें उभी करण्याचें लहान आहे. तें तुला दिल्हें. तेथें जागा करावी. त्यावर दुसरे दिवशीं पाहविलें तों समुद्राचे पाणी लांब जाऊन बेटावरील जागा विस्तीर्ण झाली. त्याप्रमाणें समुद्र प्रसन्न होऊन स्थळ दिल्हें.... किला बांधविला. त्याचे नांव सिंधुदुर्ग असे ठेविलें.''४७

अद्भुत कथा आणि चमत्कार यांच्याप्रमाणे अशुभसूचक चिन्हांची वर्णनेही पुराणांतरी येतात. बखरींनी हाही पुराणांचा विशेष उचलला आहे. सभासदाची बखर आणि सप्तप्रकरणात्मक चरित्र या दोहोंतही छत्रपतीच्या अंतकाळी आलेल्या दुश्चिन्हांची वर्णने आली आहेत. मात्स्यपुराणात शांतिविधान या विषयाचे विवरण करताना (अध्याय २२७-२३७) वर्णिलेली दुश्चिन्हे बखरकारांनी उचललेली दिसतात.[४८]

१४. बखरी आणि पुराणवाङ्मय यांचे तुलनात्मक अध्ययन करण्याच्या हेतूने हे विवरण करण्यात आलेले नाही. एका विशिष्ट ध्येयवादाचा पुरस्कार करण्यासाठी बखरकारांनी आपल्यापुढे ज्या रचनांचा आदर्श ठेवला होता तो आदर्श पुराणवाङ्मयाने पुरविला हे स्पष्ट करण्यासाठी वरील विवेचन करण्यात आले आहे. धर्मरक्षणाची प्रेरणा हे बखरींच्या निर्मितीचे आदिकारण आहे. विशिष्ट काम आणि परिस्थिती यांनी या निर्मितीची आवश्यकता निर्माण केली होती. समाजाची निकड पूर्ण करण्याच्या दृष्टीने एक निराळा साहित्यप्रकार मराठी वाङ्मयात प्रचलित झाला. हा प्रकार तसा कथात्मक दिसत असला तरी गद्यात आणि पद्यात रूढ असलेल्या कथात्मक साहित्यापेक्षा या प्रकाराचे प्रयोजन निराळे होते. या साहित्यप्रकाराला केवळ लोकरंजन करावयाचे नव्हते. किंवा परमेश्वराचे अथवा त्यांच्या भक्तांचे गुणगानही करावयाचे नव्हते. धर्मग्लानी झाली असताना साधूंच्या परित्राणासाठी आणि दुष्टांच्या निर्दलनाकरिता अवतार घेणाऱ्या वीरपुरुषांची चरित्रे धर्मसंस्थापनेच्या हेतूने सादर करणे हे या साहित्य-प्रकाराचे उद्दिष्ट होते. स्वधर्मीय राजांचे शासन असताना अशा प्रकारच्या साहित्याची गरज भासली नाही. परधर्मीय शासनाच्या योगाने स्वधर्मावर संकट ओढवले तेव्हाच ही आवश्यकता निर्माण झाली. या नव्या धारणेस आकार देण्यासाठी नवा घाट शोधण्याच्या धडपडीत साहित्यिकांना पुराणवाङ्मयाने प्रभावित केले. पुराणांचे पद्यात्मक स्वरूप न स्वीकारता या साहित्याचे इतर अनेक विशेष मात्र बखरींत उतरले. रूढ पद्यसाहित्यापेक्षा निराळ्या स्वरूपाचा ध्येयवाद प्रतिपादन करावयाचा असल्यामुळे असो, वा, एकंदरीत गद्याचेच माध्यम नव्या विचारसरणीच्या आविष्कारास अनुकूल वाटल्यामुळे असो, बखरी गद्यातूनच निर्माण झाल्या. महिकावतीच्या बखरीतील काही भाग अपवाद म्हणून सोडून दिला तर बखरसाहित्य गद्याच्याच आश्रयाने वाढले असे दिसून येईल.

आज बखरसाहित्य या नावाने ओळखल्या जाणाऱ्या साहित्याचे वर्गीकरण पूर्वी येऊन गेले आहे. या प्रकारांपैकी चरित्र-आख्यापर रचनेसच खऱ्या अर्थाने बखर म्हणता येईल हेही अगोदर स्पष्ट करण्यात आले आहे. अशा बखरीत महिकावतीची बखर, सभासदी बखर, चिटणीसांनी लिहिलेली चरित्रे, ९१ कलमी बखर, भोसले व पेशवे यांची बखर, शिलाखंडावर कोरलेले भोसलेवंशचरित्र, भाऊसाहेबांची बखर इत्यादी रचनांचा समावेश होतो. यांपैकी भाऊसाहेबांची बखर पानिपतच्या युद्धासंबंधी असली तरी ती एकूण भाऊसाहेबांच्या चरित्र आख्यानावरच आधारलेली आहे. "नानासाहेब व भाऊसाहेब ईश्वरी अंश अवतार धरून या कलियुगी उभयतांनी चरित्रे केली" (पृ.१४१) किंवा "नानासाहेब व भाऊसाहेब अवतारी पुरुष. उभयतांप्रमाणे मनुष्यलोकीं या मागें कोठेंहि जाले नाहींत आणि पुढेही होणें कठिण" (पृ. १४८) हे बखरकाराचे उद्गार या रचनेचा चरित्र– आख्यानात्मक पिंड स्पष्ट करणारे आहेत. 'धर्मस्थापनेचे नर। तेही ईश्वरी अवतार' या भूमिकेस अनुसरून भाऊसाहेबांच्या बखरीत पानिपतच्या

संग्रामाच्या निमित्ताने भाऊसाहेबांचे चरित्र-वर्णन आले आहे. भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्वासंबंधी बखरकारांनी काढलेलें उद्‌गार या निष्कर्षास पुष्टी देणारे आहेत.

१५. श्रुति आणि स्मृती यांच्या परंपरेने चालत आलेला आणि पुराणांच्या रूपाने आशूद्रचांडाळ सुसेव्य झालेला धर्म थोर पुरुषांच्या जीवनात साकारतो, म्हणूनच धर्मरक्षणासाठी ज्यांनी आपले जीवित वेचले अशा पराक्रमी पुरुषांची गाथा गाऊन आणि त्यांच्या पराक्रमाच्या कथा निवेदन करून धर्म जागवावा, ही बखर साहित्याच्या निर्मितीच्या मुळाशी असलेली प्रेरणा आहे. या प्रेरणेमुळेच बखर साहित्याने निराळा घाट धारण केला आणि पुराण वाङ्मयातील काही विशेष आत्मसात केले. जे कार्य एके काळी पुराणांच्या योगाने घडले तशाच स्वरूपाचे कार्य या काळात साहित्याच्या द्वारे करावयाचे आहे अशी बखरकारांची भूमिका आहे. पुराणांचे क्षेत्र तसे व्यापक. अगदी जीवनव्यापी. जीवनाच्या सर्वांगाचा विचार बखरकारांना करावयाचा नव्हता. धर्मस्वरूपनिर्णयाच्या हेतूने पुराणात काही विषय आलेले असले तरी बखरकारांना त्या खटाटोपात पडण्याचे कारण नव्हते. मूळ धर्माच्या रक्षणार्थ झालेल्या 'अवतारांचे' चित्रण हेच बखरकारांचे उद्दिष्ट होते. या उद्दिष्टास पोषक आणि आवश्यक तेवढा वंशावळींचा अंतर्भाव चरित्र-आख्यापर बखरीत झालेला आहे. पुराणवाङ्मयातील इतर अनेक विशेषांचा स्वीकार करून चरित्र-आख्यानपर बखरी घडविण्यात आल्या आहेत. ज्या साहित्यापासून प्रेरणा लाभली त्या साहित्याचा प्रभाव अशा रीतीने बखरींवर पडलेला आढळून येतो. बखरींत दिसून येणारी पुराणांची धाटणी अनुकरणात्मक नसून पुढे असलेल्या आदर्शाचा तो एक अपरिहार्य परिपाक आहे.

१६. बखरकारांच्या भाषेवरही या आदर्शाचा प्रभाव जाणवतो. पुराणांप्रमाणेच अभिजात संस्कृत काव्याच्या शैलीचे संस्कारही बखरींच्या शैलीवर झाले आहेत. बखरीत येणारी कितीतरी सुभाषिते आणि वाक्प्रचार संस्कृत भाषेच्या मुशीतून ओतल्यासारखे वाटतात,

> 'जैसी दैवाची उजरी तैसी बुद्धी उपजते शरीरी', 'विद्युल्लतापात होतो तैसा एकच भडका जाला', 'दैत्यच तो त्याला मनुष्य म्हणिजे मत्कुणप्राय', 'सभाग्य साधून जाय निधी, अभाग्य मागें मृत्तिका शोधी', 'उष्टें झुंज शवतुल्य', 'यवन दीपावर पतंग जैसें क्षयास जातील', 'धर्मो वर्धति प्रमाण आहे', 'बक मच्छ उचलून नेतात तैसा घाला घालावा'—

यांसारखी कितीतरी सुभाषिते आणि दृष्टांत संस्कृताची घडण घेऊन बखरीत आले आहेत.

बखरकारांचा संस्कृत साहित्याचा व्यासंग एवढा आहे की, मराठी वाक्यांत देखील सविभक्तिक संस्कृत रूपे त्यांच्या लेखनात आढळतात. वाक्यरचना देखील संस्कृत वाक्याच्या धर्तीवर प्रसंगी आढळते. 'आदौ व्रतबंध होऊन', 'विनायकशांती आदौ

दा. क्र. ३४२०
दि. २८.१२.८७

केली', 'शुभ्रवर्णचक्षु होऊन गतप्राण जाहला', 'उपशम न होई ऐसे जाहले' ही काही उदाहरणे या संदर्भात देता येतील. त्याचप्रमाणे, 'शरीरपाटव्य', 'जिवाभ्य श्रम', 'हर्षायमान', 'जन्मादारभ्य', 'उदितमाग्य' यांसारखे प्रयोगही बखरसाहित्यात विपुल प्रमाणात आढळतील. तसेच 'श्रीचे कृपेकरुन आपले घरीं द्रव्य आले', 'त्याप्रभावें-करून दिवसेंदिवस अधिक योग्यता वाढली', 'जेथे जावें तेथें हे थोर आहेत असे उदिमभाग्य वाढू लागले' ही संस्कृत धर्तीची वाक्ये सभासदाच्या बखरीत आली आहेत. पुढे दिलेले युद्धाचे वर्णन एखाद्या संस्कृत उताऱ्याची मराठी छाया तर नाही ना, असा संशय निर्माण करणारे आहे :

> 'मोठें क्षेत्र जाहलें....राजियाचे लष्करी लोकांनी मारामारी केल्या. हत्ती तोडिले. ते जागा ठार जाहले. कित्येक हत्तीची पुच्छें तोडिलीं. कित्येक हत्तीचे दांत तोडिलें. कित्येक हत्तीचे पाय तोडिले....तसेच घोडे एका वारानें जीवें मारिले....कित्येकाचे पाय तोडून काढिले. कित्येकाचे दांत उडविले, कित्येकांची डोचकीं फोडविलीं. कित्येक मेले....युद्धास आले ते मारून भूईस मेळविले. तसेच उंटे मारिली....मारीत असतां रण अपार जाले : संख्या न करवें. रक्ताच्या नद्या चालिल्या..." ४९

चित्रगुप्ताने केलेले गागाभट्टाचे वर्णन वाचताना आपण बाणभट्टाची कादंबरी तर वाचत नाही अशी शंका येऊ लागते :

> संपूर्ण पांडित्यसमूहाचे अधिपत्र, द्विजकुलांत देदीप्यमान, संपूर्ण अमरासहित अमरेंद्र मस्तकें डुलवितांहेत, त्रैलोक्यभुवनीं वंद्य शापादपि शरादपि, जैसा प्रति-सृष्टीनिर्माणकर्ता विश्वामित्र किंवा वामदेव....चतुःशास्त्रीं प्रत्यक्ष वेदजातच मूर्तिमंत, स्वामींचे अकस्मात मनोजयप्राय देशावरा प्रित्यर्थ श्रीस्वर्गामिनी भागिरथी अनुक्रमें मनकर्णिका, यमुना सूर्यकन्यका प्रयाग स्थळावरून भट गोसावी महातपस्तेजस्वी यांचे आगमन जाहालें. "५०

शिवकाल आणि त्यानंतरचा पेशवाईअखेरपर्यंतचा काळ यांतील पत्रव्यवहार बराचसा प्रसिद्ध झाला आहे. या पत्रव्यवहारातील फारसीबहुल भाषा आणि बखरींचे हे घनदाट संस्कृत वळण पाहिले म्हणजे ध्येयवादाचा भाषेच्या स्वरूपावरही कसा परिणाम घडतो याची प्रचीती येते. मराठी भाषेच्या व्यवहारावर आलेला फारसी भाषेचा पगडा दूर करण्याच्या दृष्टीने शिवछत्रपतींनी 'राज्यव्यवहारकोश' तयार करवून घेतला. या कोशात त्यावेळी शासकीय व्यवहारात रूढ असलेल्या अनेक संज्ञांना देशी प्रतिशब्द दिले आहेत. तथापि, भाषाशुद्धीच्या मुळाशी असलेली जाणीव पुढील काळात टिकू शकली नाही. असे असतानाही बखर साहित्यावर मात्र संस्कृत भाषेचा प्रभाव असावा याचे आश्चर्य वाटते. बखरींचे हे संस्कृतमय वळण या साहित्यप्रकाराचा अवतार केवळ कथावृत्तांत कथन करण्याच्या निमित्ताने झाला नाही हे सिद्ध करण्यास पुरेसे ठरते.

फारसी शब्दांना संपूर्ण अर्धचंद्र देणे बखरकारांना जमले नाही. तरी या साहित्याला प्रेरणा देणारे व आदर्शवत् वाटणारे ग्रंथ संस्कृत भाषेतच असल्याने बखरींच्या भाषा-पद्धतीवर पुराणे, महाभारत, रामायण आणि प्रसंगी महाकाव्ये यांचा ठसा उमटलेला आढळतो.

बखर-समकालीन नाना फडणवीस यांच्या आत्मचरित्रावरही हा ठसा उमटलेला आहे. बखरींच्या संदर्भात आत्मचरित्राचा विचार करण्याचे वस्तुतः कारण नाही. तथापि युगधर्माचा प्रभाव साहित्यावर कसा पडतो याचे दिग्दर्शन करण्याच्या हेतूने या आत्म-चरित्राच्या प्रारंभीचा काही भाग उद्धृत करण्यात येत आहे :

> 'श्री सांबसदाशिवाय नमः ॥ जो सांबशिव असा आहे कीं, सत्त्वस्वरूप म्हणजे असे चित्स्वरूप प्रकाश अवस्थात्रय जागृत काळीं त्यास विश्व, स्वप्नकाशीं तैजस, सुषुप्तिकाळीं प्राज्ञ असे जास म्हणतात. तो एकच आत्मा उपाधिभेदेंकरून नाना प्रकारें भासतो. पाय नसतां चालतो. डोळे नसतां पाहातो. हात नसतां ऐकतो. कान नसतां ऐकतो. सर्वान्तर्यामी व्यापक हें कशावरून ?....व्यापकते-व्यतिरिक्त कसें घडेल ? असा आत्मा त्यासच आपणांस विसरून आनंदस्वरूप सोडून दुःखातील सुख भोगण्याची इच्छा धरतो. हेच त्या आत्म्याची माया. सत्य म्हणता नये. तिचें स्वरूप अनिर्वचनीय. सत्त्व, रज, तमोगुणी तिजपासून अहंकार. आकाश, वायु, तेज, उदक, पृथ्वी पंच महाभूतें.... "[५१]

आत्मचरित्राची ही भाषा प्राचीन गद्याच्या पंडिती वळणाशी जुळणारी आहे. तथापि, प्रारंभीच भागवताच्या एका श्लोकाचा अनुवाद लेखकाने केल्यासारखा वाटतो.[५२] पेशवेकालीन विचारवंतांवर पुराणांचा परिणाम कसा झाला होता याचे प्रत्यंतर वरील उताऱ्यावरून येण्यासारखे आहे.[५३]

१७. कोणत्याही काळात समाजाने युगसापेक्ष नवीन मूल्यांचा स्वीकार केला तरी वैचारिक परिवर्तनाबरोबरच भाषेचे स्वरूप लगेच बदलते असे नाही. नव्या विचारांचा प्रसार भाषेच्याच द्वारे व्हावयाचा असल्याने लोकव्यवहारात व साहित्य-ग्रंथांत प्रचलित असलेल्या भाषेच्या आधाराने नव्या विचारांचा प्रसार होत असतो. मराठी बखर या सर्वसाधारण नियमास अपवाद मानण्याचे कारण नाही. पुराणोक्त-धर्मांची प्रेरणा या साहित्याच्या मुळाशी असली तरी तत्कालीन पंडिती वळणाच्या भाषेचा बखरकारांनी प्रथम अवलंब केला. शास्त्री-पंडितांनी प्रशस्त केलेली मराठी गद्याची परंपरा बखरींच्या उदयापूर्वी आणि नंतरही प्रचलित होती. लोककथेचा घाट आणि पंडिती वळण यांच्या समन्वयातून उदयास आलेले कथात्मक साहित्यही बखरींच्या पूर्वी अस्तित्वात होते. बखरकारांनी प्रारंभकाळात या दोन्ही परंपरांतील भाषेच्या स्वरूपाचा स्वीकार केला. भाषा आणि कथाप्रधान रचना या दोन्ही बाबतींत अगदी 'नूतन सृष्टी' निर्माण करण्याचे कारण प्रारंभी तरी बखरकारांना पडले नाही.

कारण, पंडिती गद्य आणि कथाप्रधान साहित्य बखरींच्या पूर्वी विकसित अवस्थेत होते. कालांतराने विविध लेखकांनी आपापले व्यक्तिमत्त्व आणि शैली यांना अनुसरून भाषा-पद्धतीत अनेक रंग भरले. कथाप्रधान शैली आणि पांडित्य यांचा उचित समन्वय बखरींच्या भाषेत अशा रीतीने रूढ झाला.

कथात्मकता आणि पांडित्य यांचे प्रमाण मात्र नेहमीच सम राहिले असे नाही. लेखकाची प्रवृत्ती आणि व्यक्तिमत्त्व यांच्या अनुसंधानाने कधी कथात्मकतेचा तर कधी पांडित्याचा वरचष्मा बखरींच्या शैलीत आढळून येतो. पांडित्यात केवळ शास्त्रग्रंथांचा समावेश होत नसून संस्कृत काव्यनाटकादिकांच्या त्यासंगाचाही अंतर्भाव केला पाहिजे. स्थूल मानाने सांगावयाचे झाल्यास पेशवेकालीन बखरीत पांडित्य प्रभावी ठरले आहे तर तत्पूर्वीच्या बखरसाहित्यात कथात्मकता प्रभावी झाली आहे. पुराणांची तर्जनी आधारास घेऊन पाऊल टाकणारे शिवपूर्वकालीन वळण, पुराणांची मध्यमिका धरून मार्गक्रमण करणारे शिवकालीन साहित्य आणि शास्त्री-पंडितांच्या लोडास लोड लावून बसणारे पेशवेकालीन साहित्य ही बखरसाहित्याची त्रिविध दर्शने म्हणता येतील.

१८. महिकावतीच्या बखरीचा घाट कथाप्रधान, फार तर पौराणिक आख्यानांच्या धर्तीचा असे म्हणता येईल. पांडित्य आणि कथात्मकता यांचा उचित समतोल सभासदाच्या बखरीत आढळतो. भाऊसाहेबांच्या बखरीत मात्र एकीकडे पांडित्याचा प्रकर्ष आहे तर दुसरीकडे मराठी गद्याच्या विकासातील सर्व अवस्थांचा आविष्कार झालेला आहे. श्रीपतिभट्टाने प्रवर्तित केलेली पंडिती परंपरा, लोककथा आणि पुराणे यांत आढळणारी अद्भुतता आणि या सर्वांच्या जोडीस धर्मरक्षणेच्या प्रेरणेतून निर्माण होणारी ओजस्विता या विशेषांचा मनोज्ञ संगम भाऊसाहेबांच्या बखरीत दिसून येतो.

भाऊसाहेबांचे सैन्य महाराष्ट्रातून दिल्लीच्या रोखाने निघाले असता वाटेवर आढळणाऱ्या स्थळांचा केवळ वर्तमानकाळ सांगून बखरकार मोकळा होत नाही. त्या त्या स्थळांशी संबंधित असलेल्या पौराणिक कथाही त्याला आठवतात. या कथाही तो साक्षेपाने सांगतो. ढवळपूर सोडून भाऊसाहेबांचे सैन्य 'आगरियाच्या रोखाने' कूच करू लागले तरी बखरकार मागेच रेंगाळतो आणि ढवळपुरच्या मुचकुंदतीर्थाचे माहात्म्य सांगतो. एखादे पौराणिक क्षेत्र माहात्म्य सांगावे त्याप्रमाणे बखरकार या क्षेत्राची माहिती देतो. मुचकुंदाला ब्रह्महत्येचा दोष कसा लागला आणि त्या दोषापासून त्याची मुक्तता कशी झाली याचे आख्यान बखरीत (पृ. १०२-१०३) येते. पानिपतचे युद्ध म्हणजे कुरुक्षेत्री झालेला प्रतिकौरव-पांडव-संगरच ही बखरकाराची भावना असल्याने रोहिल्याकडून वाटाघाटीस आलेला चेतराम पाहताच बखरकारास महाभारत आठवते. तो लिहितो :

> 'कौरव-पांडव यांस गृहकलह लागला. ते समयीं भगवान श्रीकृष्ण परमात्मा यानें आपले अंगे येऊन याच वटवृक्षाखालीं शिष्टाई केली. देखील दुर्योधन यानें

उत्तर केले की, सुईचे अग्रींची मृत्तिका प्राप्त व्हावयाची नाहीं. साक्षात् भगवान् याची शिष्टाई या स्थळीं सिद्धीस गेली नाहीं.' (पृ. ५९).

कित्येक स्थळी पंडिती परंपरेतील टीकाभाष्य पद्धतीही बखरकाराने उचलली आहे : 'अंतर्वेद म्हणायास कारण कीं, यमुना व भागीरथी या दोहोंच्या मध्यभागीं पके चाळीस कोसांची मर्यादा. यानामें अंतर्वेद' (पृ. ६१) त्याच प्रमाणे, 'शुक्रताल म्हणावयास कारण कीं शुकाचार्य स्वामींनी परिक्षिती राजास भागवतश्रवण करविलें होतें तें हें स्थळ आणि ते स्थळीं परिक्षिती राजास शापनळें तक्षकदंश होऊन मरण पावला' (पृ. ४८). अशा प्रकारची कित्येक भाष्ये या बखरीत आढळतील.

अद्भुत रस ही लोककथा आणि पुराणे यांचीच मिरास आहे असे समजण्याचे कारण नाही. या रसाचा यथायोग्य मान भाऊसाहेबांच्या बखरीत राखण्यात आला आहे. बखरकाराने दिलेल्या सुजाउद्दौलाच्या जन्मकथेत लोककथा आणि पुराणे यांतून येणाऱ्या अद्भुताचे मिश्रण आढळेल. सुत-शौनकादिकांचे संवाद पुराणात असतात, तद्वत नारोशंकर आणि इतर उपस्थित यांच्या संवादातून ही अद्भुत कथा विस्तार पावली आहे. भक्तिबळ आणि दैवीचमत्कार यामुळे सुजाउद्दौला जन्मास आला असा या कथेचा सारांश आहे. पुत्रप्राप्ती व्हावी म्हणून मन्सूर अलीने (सुजाउद्दौलाच्या बापाने) ब्राह्मण आणि वैरागी यांना अनुष्ठानास बसविले. या भक्तीने परमेश्वर प्रसन्न झाला. त्याने मन्सूर अलीस वर दिला. या वराच्या योगाने झालेली पुत्रप्राप्ती म्हणजे हा सुजाउद्दौला असे नारोशंकर आपल्या सहप्रवाशांस सांगतो. त्यावर कोणीतरी प्रश्न करतो : 'म्लेंछांना भक्तिबळ कसे ?' त्यावर नारोशंकर उत्तर देतो :

> 'भक्तपणा काही पाहावयास लागत नाहीं. दैत्यकुळीं प्रल्हाद जाहला कीं नाहीं? राक्षस कुलीं विभीषण जाहला कीं नाहीं? तसें अविधासी मतलब नाही' (पृ. ५८-६०),

जीविताची तमा न बाळगता रणांगणावर लढणाऱ्या पुरुषांप्रमाणेच बाणेदार स्त्रियांचीही दखल भाऊसाहेबांच्या बखरीत घेण्यात आली आहे. मल्हारराव शिंदे रणांगणावरून माघार घेण्याच्या तयारीत असताना त्याची पत्नी गौतमीबाई पतीचा धिक्कार करतेच. त्याला धर्मशास्त्र सुनावण्यासदेखील ती कचरत नाही :

> 'तुम्ही आपलें विण्णवयाचें स्वकर्म करीत असतां तरी सहजच वाचावयाची आस्था धरावी. वाटा तरी शूराचा उचलिला आहे. बाण सतीचें घेतलें आहे तें सांभाळावें. असेंच धर्मशास्त्र आहें' (पृ. ८६).

बळवंतराव मेहेंदळे यांच्या स्त्रीनेदेखील असाच बाणेदारपणा दाखविला आहे : युद्धास जातेसमयी निरवानिरव करून बळवंतराव डेऱ्याबाहेर पडतात तेव्हा त्यांच्या डोळ्यात पाणी असते –

> 'तों बळवंतराव यांची स्त्री महापतिव्रता होती. तिणें जाबसाल केला कीं,

उत्तम आहे. शतवर्षांत केव्हा तरी मरण आहेच. हें जाणोन आज्ञा स्वामी सेवेंत अशा समारंभाने थोर तिर्थस्नान झाल्यास इहलोकीं कीर्ति होऊन अंती परलोकीं स्वर्गप्राप्ती आहे. मृत्यूची क्षीत कशास करावी ? म्हणोन समाधान करोन बोलती जाहली कीं, तुम्ही लौकिक करून गेला तरी मीहि वाचणार नाहीं. तुमची सांगातीण होईन म्हणोन बोलिली ' (पृ. १२३).

दुर्दैवाने असा प्रसंग आला तेव्हा या वीरस्त्रीने भाऊसाहेवांच्या मनधरणीस न जुमानता आपल्या एकुलत्या एक मुलास भाऊसाहेवांच्या ओटीत घालून सहगमन केले.

अद्‌भुत, रौद्र, वीर आणि करुण या रसांचे अवतरण या वखरीत अनेक स्थळी झाले आहे. प्रभावी रसाविष्कारावरोबरच धारदार भाषा हाही या वखरीचा एक महत्त्वाचा विशेष आहे. अशा अनेक विशेषांमुळे वखर-साहित्यात भाऊसाहेवांच्या वखरीचे स्थान असाधारण ठरते.

' पूर्णतेचा परमोत्कर्ष हा पतनारंभ ठरतो ' असे ' बी ' कवींचे एक वचन आहे. वखरसाहित्याच्या संदर्भात हे वचन यथार्थ ठरले आहे. साहित्य-गुण, परंपरेचे विकसित स्वरूप आणि इतिहासकथन या सर्वच दृष्टींनी भाऊसाहेवांची वखर अत्यंत समृद्ध आहे. या वखरीनंतर मात्र या साहित्यास उतरती कळा लागल्याचे दिसून येते. या अपकर्षाचा कालपरिस्थितीशी जवळचा संबंध आहे. मराठ्यांची देशनिष्ठा आणि स्वातंत्र्यभक्ती यांचा परमोत्कर्ष पानिपतच्या संग्रामात आढळतो. परकीयांच्या आक्रमणापासून आपल्या देशाचे रक्षण करण्याची जिद्द या युद्धाच्या निमित्ताने मराठ्यांनी प्रकट केली. आपल्या राज्यावर हे आक्रमण झालेले नसले तरी या देशावर हे आक्रमण असून ते थोपविले पाहिजे या जाणिवेने भाऊसाहेवांनी प्रबल शत्रूला धडक दिली. भाऊसाहेवांची ही झेप त्या काळच्या कित्येक मातवर मुत्सद्यांना उमगली नाही. ज्यांना उमगली त्यांना ती झेपली नाही. झेपण्याचे सामर्थ्य ज्यांच्यात होते त्यांना संकुचित स्वार्थाने नादान करून सोडले होते. ' एवढी भरारी मारणे योग्य नव्हे ' असा पोक्त सल्ला देऊन ते तटस्थ राहिले. देशनिष्ठा व स्वातंत्र्यभक्ती त्या काळात सार्वत्रिक असती तर या देशाच्या इतिहासाला निराळे वळण लागले असते.

पानिपतच्या संग्रामात लाख चुका झाल्या असतील. परंतु, लाख मोलाची एक प्रेरणा या संगराच्या मुळाशी होती. ती म्हणजे आसेतुहिमाचल हे एक राष्ट्र आहे. या राष्ट्राचे संरक्षण करणे इतरांप्रमाणे मराठ्यांचेही कर्तव्य आहे. थोरल्या माधवरावांनी पानिपतचा आघात धुऊन काढला असला तरी स्वातंत्र्यनिष्ठा आणि एकराष्ट्रीयत्व यांना या लढाईच्या प्रसंगी जे तडे गेले ते त्यांना सांधता आले नाहीत. या युद्धापासून जो ' सवतासुभा ' सुरू झाला तो वाढतच गेला. स्वतंत्र सुभेदारी वाढली की मध्यवर्ती सत्ता

दुबळी होते आणि या सत्तेच्या नावाने नांदणारे सुभेही नंतर कोलमडून पडतात हे भयानक सत्य हा नंतरच्या इतिहासाने शिकवलेला धडा आहे. पानिपतच्या युद्धाच्या सुमारास मराठ्यांच्या सत्तेला लागलेला सवत्या सुभ्याचा क्षयरोग स्वराज्याचा अंत करूनच शांत झाला.

१९. या इतिहासाचा परिणाम बखर-साहित्यावर झाला आहे. पानिपतच्या युद्धानंतर बखरलेखन थांबले नसले तरी निर्मितीची प्रेरणाच मुळात मंदावल्या कारणाने पुष्कळशा बखरींना केवळ पारंपरिक स्वरूप आले. [असेच दुर्भाग्य मराठी पोवाडयांच्याही नशिबी आले.] त्यातून धनवंतांच्या व मानवंतांच्या बखरी रचण्यात आल्या. 'हरिवंशाच्या बखरी' सारखी वंशचरित्रे लिहिण्यात येऊ लागली. ब्रिटिश सत्तेचे गोडवे गाऊनही मराठ्यांच्या पराक्रमावर हक्क सांगणाऱ्या 'भोसलवंशचरित्रा' सारख्या बखरीही रचण्यात आल्या. हे साहित्य अगोदरच्या बखरींच्या तुलनेने फिके वाटते. स्वराज्य आणि स्वधर्म यांच्यासंबंधीच्या भावनांनाच समाजात ओहोटी लागल्याने साहित्यात त्याचे पडसाद उमटणे अपरिहार्य होते. अंतरीचा जिव्हाळा हा साहित्याचा आत्मा असतो. हा आत्माच मलिन झाल्याकारणाने उत्तरकालीन बखरसाहित्यास निर्जीव अहवाल आणि निष्प्राण अनुकरण यांचे स्वरूप आले. पेशव्यांची बखर, पेशवाईअखेरची अखबार, शके १७३८ सालातील हकीकत यांसारखे साहित्य अशाच अनुकरणबुद्धीने लिहिण्यात आले आहे.

बखरसाहित्य हे धर्मरक्षणाच्या प्रेरणेतून उदयास आले होते हे सिद्ध करणारा हा अभावरूप आणि खेदजनक पुरावा म्हटला पाहिजे.

२०. इतिहास-लेखन हे एक शास्त्र आहे. या शास्त्रासंबंधीच्या आपल्या आजच्या कल्पना पाश्चात्य राष्ट्रांतील एतद्विषयक धारणांवर आधारलेल्या आहेत. त्यामुळे इतिहास-ग्रंथांचे मूल्यमापन आपण या धारणांस अनुसरून आज करीत असतो. आजच्या इतिहास-ग्रंथांविषयीची मूल्ये बखरसाहित्याकडून अपेक्षिणे न्यायसंगत ठरणार नाही. या साहित्याला इतिहासाचे प्रामाण्य मुळीच नाही असे नाही. परंतु ज्या धारणांवर बखरलेखन आधारलेले आहे त्या समजून घेणे अगत्याचे आहे. ज्या प्रेरणेतून बखरी निर्माण झाल्या ती प्रेरणाही लक्षात घेतली पाहिजे. शिवाय, साहित्याचा एक प्रकार या नात्याने बखरी रचण्यात आल्या आहेत, ही बाबही दृष्टिआड करावी अशी नाही. भारतात ब्रिटिश सत्ता रूढ होण्यापूर्वी जीवनाच्या प्रत्येक अंगोपांगांचा विचार धर्म-भावनेतून होत असे, हे ध्यानी बाळगून या साहित्यातून आलेले इतिहासकथन लक्षात घेतले पाहिजे. असे झाले तरच इतिहास-प्रामाण्याच्या दृष्टीने बखरींचा विस्तार झाला असे म्हणता येईल.

इतिहाससंबंधीच्या आजच्या कल्पना केवळ ध्यानात ठेवून आपण बखरसाहित्याचा अभ्यास करू लागलो तर पुरातन इतिहास समजून घेण्यास असा अभ्यास फलद्रूप ठरेलच याची शाश्वती देता येणार नाही. बखरींनी इतिहास टाळला आहे

असे नाही. बखरींनी सत्यापलाप केला नाही, त्याचप्रमाणे फारसी अखबारनवीसांसारखी राजप्रशस्तीचीच केवळ भूमिका बखरकारांनी घेतलेली नाही. विशिष्ट प्रेरणा आणि परंपरा यांच्या अनुसंधानाने बखरकारांनी इतिहास-लेखन केले आहे. धर्मरक्षणाची प्रेरणा हे या लेखनाचे उगम-स्थान आहे. या प्रेरणेच्या अनुषंगाने या साहित्यात इतिहास-लेखन आले आहे. या लेखनात कठोर सत्यलेखन आहे, पण ते तटस्थपणे केलेले नाही. वास्तवाला आदर्शाचे रूप कसे देता येईल आणि आदर्शभूत वास्तव टिकविता कसे येईल या दृष्टिकोणातून या साहित्याचे लेखन झाले आहे, असे आढळून येईल. बखरकारांचा दृष्टिकोन लक्षात घेऊन या साहित्यातील इतिहासाचा विचार झाला पाहिजे. या लेखकांना निष्प्राण इतिहास सांगावयाचा नव्हता. कलंकित इतिहास कसा पुसावा व उज्ज्वल इतिहास कसा जगावा हे सूत्र या रचनांतून आढळेल. निष्कृष्ट प्रतीच्या साहित्यात या वैशिष्ट्याचे दर्शन घडले नाही तरी श्रेष्ठ कलाकृती या विशेषांनी भारलेल्या आढळतील.

मराठी गद्याच्या या वैभवशाली परंपरेचे अध्ययन प्रेरणा आणि पार्श्वभूमी यांच्यासह झाले पाहिजे. तसे झाले तर इतिहासप्रामाण्याच्या दृष्टीने देखील हे साहित्य मोलाने उणे भरणार नाही याची खात्री वाटते. 'एक अस्सल कागद बखरींच्या बहुमताला हाणून पाडण्यास बस्स आहे' अशा आशयाचे इतिहासाचार्य राजवाडे यांचे मत आता तपासूनच घ्यावे लागेल.

२१. इतिहास-पुराणांचें बखरकारांनी स्वीकारलेले आदर्श साहित्याच्या विकास-कालात एवढे प्रभावी ठरते की, या आदर्शाचा परिणाम पद्यसाहित्यावरही झालेला आढळून येतो. बखरसाहित्याच्या निर्मितिकाळातच रामायण-महाभारतादि ग्रंथांवर अनेक कवींनी आख्याने लिहिलेली आढळतात. संत एकनाथांचे 'भावार्थ-रामायण,' कृष्णदास मुद्गलाचे 'रामायण-युद्धकांड' विष्णुदास नामा आणि मुक्तेश्वर यांची महाभारतावरील रचना यांसारखी पंडिती परंपरेतील लहान-मोठी काव्ये हे सर्व एकाच बदलत्या युगाचे अद्‌भूत वाटतात. तशी आख्यानकाव्यास संत नामदेवांनी सुरवात केलेली असली तरी मराठी आख्यानकविता आणि बखरी यांनी एकाच काळात उत्कर्ष-बिंदू गाठावा हे अर्थपूर्ण वाटते. यास योगायोग म्हणता येणार नाही. युगधर्म हेच या योगा-योगाचें समर्थक उत्तर ठरते. धर्मरक्षणाचे आवश्यक अंग या दृष्टीने स्वराज्याची स्थापना झाल्यावर त्याचा विस्तार आणि संरक्षण करण्यासाठी मराठी समाज ज्या काळात आपले सर्वस्व पणास लावीत होता त्याच काळात मराठी काव्यालाही निराळे वळण लागावे हा त्या युगधर्माचाच प्रभाव म्हटला पाहिजे. साहित्य आणि समाजजीवन यांचे अन्योन्य संबंध जिव्हाळ्याचे असतात हे सिद्ध करणाराच हा पुरावा म्हटला पाहिजे. साहित्यातील प्रवाहांचे निरीक्षण सांस्कृतिक परंपरेचा मागोवा घेऊन केले असता साहित्यातील अंतःप्रवाहांची संगती लावता येते हे मराठी आख्यानकाव्याच्या आधारानेही स्पष्ट होते. 'प्राचीन मराठी काव्य समाजविमुख होते' या मताचा आता फेरविचार आवश्यक आहे,

हेही वरील विवरणावरून ध्यानात येईल.

२२. मराठी गद्याला प्रारंभ झाला शालिवाहनाच्या १० व्या शतकात. श्रीपतिभट्ट विरचित 'ज्योतिषरत्नमाला' आज तरी मराठी भाषेतला आणि गद्यसाहित्याचा पहिला ग्रंथ ठरतो. या कालापासून ते प्राचीन कालखंडाच्या अंतापर्यंत म्हणजे शके १७४० पावेतो झालेला मराठी गद्याचा इतिहास तीन परंपरांनी घडविलेला आहे :

१. टीका-भाष्यात्मक पंडिती परंपरा,
२. कथात्मक साहित्य, आणि
३. पौराणिक परंपरेतून उदयास आलेले बखरसाहित्य.

प्रत्येक परंपरेचा अभ्यास मागील प्रकरणात येऊन गेला असून या परंपरांच्या मुळाशी असलेल्या निर्मिति-प्रेरणांचा परामर्शदेखील त्या त्या स्थळी घेण्यात आला आहे. मराठी गद्याच्या क्षेत्रात विशिष्ट काळात केवळ एकच परंपरा अस्तित्वात होती असे विवेचनाच्या सोयीसाठी केलेल्या या वर्गीकरणातून ध्वनित होत नाही. साहित्यप्रकाराला स्वतःचा आकृतिबंध असतो तसाच त्याला विशिष्ट प्रकृतिधर्मही असतो. त्याचप्रमाणे साहित्यिकाचाही काही स्वभावधर्म हा असतोच. काही साहित्यिक साहित्याच्या रूढ प्रवाहाशी समरस होतात, तर कित्येकांना तसे करणे मानवत नाही. असा साहित्यिक नव्या वाटा निर्माण करण्याचा प्रयत्न स्वतःच्या पिंड-प्रकृतीनुसार करीत असतो. या प्रयत्नातून साहित्यात निराळे प्रवाह आणि नवे घाट उदयास येत असतात. प्रत्येक काळात नव्याजुन्या प्रवाहांचे सहजीवन अस्तित्वात असतेच. मराठी गद्याच्या या त्रिविध परंपरा तीन भिन्न कालखंडांत नांदत होत्या, असा गैरसमज होऊ नये म्हणून हे विवरण केले आहे.

प्राचीन पद्यसाहित्यातील प्रत्येक प्रवाहाला त्याची अशी निर्मितिप्रेरणा आहे म्हणूनच प्रत्येकास निराळा घाटदेखील. विशिष्ट कालपरिस्थितीस अनुसरून त्या त्या परंपरेला सामाजिक प्रयोजनही आहे. त्यामुळे कोणता एक साहित्यप्रवाह श्रेष्ठ वा कनिष्ठ, पुरोगामी अथवा प्रतिगामी असा पंक्तिप्रपंच करण्याचे कारण नाही. साहित्यातील कोणतीही प्रवृत्ती कितीही पुरोगामी मानली तरी अशा प्रवृत्तीच्या मुळाशी असलेले सामाजिक संदर्भ अर्थहीन होतात. तेव्हा या प्रवृत्तीवर आधारलेला साहित्यप्रवाह रूढीत रूपांतरित होतो. त्यामुळे साहित्यातील एखाद्या प्रवाहाने समाजाची प्रगती झाली अथवा अन्य प्रवाहामुळे ती खुंटली असे विधान करणे धाडसाचे ठरते.

२३. मराठी गद्याच्या या तिन्ही परंपरा विशिष्ट काळात निरनिराळ्या जाणिवांतून उदयास आल्या आहेत. संस्कृत भाषेत असलेले ज्ञान सामान्यांपर्यंत पोहोचवावे या उद्देशाने पंडिती वळणाचे मराठी गद्य अस्तित्वात आले. धर्मप्रसाराचे साधन या दृष्टीने लोककथांवर झालेल्या संस्कारांतून कथात्मक साहित्याच्या गद्य परंपरेची निर्मिती झाली. बखर साहित्य तसे कथाप्रधानच. परंतु या साहित्याची निर्मिती वेगळ्या प्रेरणांतून

झाल्याने या साहित्याचा घाट बदलला; तसेच उद्दिष्टदेखील. महाराष्ट्र यवनाक्रांत झाल्यानंतर स्वधर्मपालनाइतकेच स्वधर्माचे परधर्मापासून रक्षण महत्त्वाचे ठरले. परधर्मीय शासनाच्या योगाने पंगू आणि निष्प्रभ झालेल्या समाजात जागृती करण्यासाठी ही प्रेरणा उपयुक्त होती. 'धर्माची वाट मोडून अधर्मास शीग चढते तेव्हा धर्मरक्षणार्थ भगवान युगायुगाचे ठायी अवतार घेतो' ही श्रद्धा गीता, पुराणे आणि संतसाहित्य यांनी अगोदरच जोपासलेली होती. या संस्कारांतूनच बखरवाङ्मयाचा उदय झाला. पुराणोक्त धर्मात बखरकारांना नव्या युगधर्माचे स्वरूप आढळले. त्यामुळे बखरसाहित्यावर पुराणांचे संस्कार अनेक प्रकारांनी झालेले दिसून येतात. बखरकारांनी गद्याच्या माध्यमाचा आश्रय केलेला असला तरी पुराणे व भारत-रामायण या ग्रंथांशी ते एवढे एकरूप झाले होते की, त्यांच्या लेखनात या साहित्याचे संस्कार पदोपदी आढळतात. म्हणूनच बखरसाहित्यास 'मराठी गद्याची पौराणिक परंपरा' हे नाव देण्यात आले आहे. या साहित्यास हे अभिधान साजूनही दिसते.

आज प्रचलित असलेल्या बखरींच्या वर्गीकरणात 'उपदेशपर' असा एक वर्ग आढळतो. या वर्गातील साहित्य 'राजनीतिपर प्रबंधात' समाविष्ट करावे असे यापूर्वी सूचित करण्यात आले आहे. तथापि, या वर्गात मोडणारे 'आज्ञापत्र' हे प्रकरण स्वतंत्रपणे विचार करावा अशा योग्यतेचे आहे. या प्रकरणाच्या पाठीशी पौराणिक परंपरा आहेच. तथापि, विशिष्ट काळाने निर्माण केलेल्या गरजेतून आज्ञापत्राची रचना झालेली असल्याने पुढील प्रकरणी या प्रकरणाचा अधिक विचार करण्याचे योजिले आहे.

□

टीपा

१. **रा.प्र**, ३४९.
२. **तत्रैव**, ४.
३. 'बखरींची निर्मिती इतिहास-लेखनाच्या भूमिकेतून झाली हे निर्विवाद होय'– **हेब**, ३०.
४. **रा.प्र**, ३४८.
५. **तत्रैव**, २.
६. **मोब**, ११.
७. 'दखनी कवीने गाइलेला शिवप्रताप'– **मराठवाडा**, दिवाळी अंक १९६१. या लेखात प्रस्तुत लेखकाने यासंबंधी सविस्तर विवेचन केले आहे.

८. **सभा**, १.
९. **तत्रैव**, ११०.
१०. **सप्त**, १.
११, **भाइ**, शके १८३६, १८२.
१२. राजवाडे, **मराठ्यांच्या इतिहासाची साधने**, खंड १५, ७८-८०.
१३. **ज्ञानकोश** खंड ५; Katre S. M., Indian Textual Criticism, p.6&7. उस्मानिया विद्यापीठाच्या हस्तलिखित संग्रहात चामडयावर लिहिलेले लेख आहेत.
१४. **हेब**, ३३, ३७.
१५. **राप्र** ३१४ : समकालीनांनी लिहिलेल्या, कर्णोपकर्णी ऐकलेल्या आणि पूर्वीच्या बखरींची जशीच्या तशी नोंद करून व त्यात फरक करुन वाढविलेल्या अशा तीन वर्गांचा उल्लेख राजवाडे यांनी केला आहे.
१६. चरित्रात्मक, प्रसंगात्मक, घराण्यांचे इतिहास, विशिष्ट काळातील इतिहास, आत्मचरित्रात्मक, प्रसंगात्मक, विशिष्ट पक्षाची बाजू घेऊन केलेले विवरण, भाषांतरित, स्थलवर्णनात्मक आदी १४ वर्ग हेरवाडकरांनी मानले आहेत-**हेब**, १८.
१७. **भाइ**, श. १८३३, १४२.
१८. **मब**, १९.
१९. **लीळाचरित्र** (एकांक) २९.
२०. **भाइ**, श. १८३७, १२६.
२१. **मब**, २९. हा भाग शके १३७० मध्ये रचण्यात आलेला आहे. अन्यग्रही पुराणांचे उल्लेख संमतीसाठी आले आहेत. पहा : **मब** ६,७, ५२, ५९, ६८ इ.
२२. **सप्त**: १ व २.
२३. **मब**, ५३.
२४. 'लिखित' या प्रकरणी शिवरायासंबंधी समर्थ लिहितात :
तीर्थ क्षेत्रें ते मोडिली । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट जाली सकळ पृथ्वी आंदळी । धर्म गेला ॥ देव धर्म गोब्राह्मण । करावेया संरक्षण । हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ॥ या भूमंडळाचे ठायीं । धर्मरक्षी ऐसा नाही । महाराष्ट्रधर्म राहिला काहीं । तुम्हां कारणें ॥ -- **समर्थहृदय**, २१९.
२५. **सप्त**, ८३.
२६. **तत्रैव**, १५३.
२७. 'हे मनुष्य कर्म नव्हे, राजा अवतारीच होता' **सभा**- १९.
'नानासाहेब व भाऊसाहेब अवतारी पुरुष.' **भाब**- १४८.
२८. 'सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वन्तराणिच ।
वंशानुचरितं चैव पुराणं पंचलक्षणम् ॥ **मात्स्य**, ५३.
२९. ३४. **विष्णु**. ४-२४.

३०. **भाग** ९-१४ ते २३.

३१. **मात्स्य** १२ ते ५०; २७० ते २७२

*Pergikar F. E. The Purana Text of the Dynasties of Kaliage (1913)

३२. **महाराष्ट्रीय ज्ञानकोश**, विभाग ३, पृ. ५२८.

३३. **राप्र**, २२२.

३४. **वायु** १-१- २१ ते २७.

३५. भाग. १-१-४ ते १३.

३६. 'तुम्ही पुरातन राज्यातील माहितगार लोक आहा तरि इस्तकविल पासून चरित्र लेहून देणें' **सभा.** १.

'तुम्ही कृतकर्मे सेवक तीर्थरुप कैलासवासी स्वामी कर्नाटक प्रान्ती गेले; तुम्हांवरि हा राज्यकारभार दिधला असतां तुम्ही यथोचित राज्याभिवृद्धी केली. तुम्हास राज्यकार्यें नीतिमर्यादा अवगतच आहेत.' **आज्ञा**, ६८.

३७. **सभा**, ११०.

३८. महिकावतीच्या बखरीत आलेली फलश्रुती अशी आहे :

जे एकभावें आइकती । त्यांची पापे विलया जाती । वंशउप्तत्ति आइकता ॥
पुण्यपावन होती । निपुत्रिकास संतती । नेत्र अंधास येती । अज्ञातभ्रांति फिटे ॥
मब. ५२.

'हे कथा श्रवण, मनन, पठन केली असतां सर्व विघ्ने दूर होऊन पुण्य व यश प्राप्त होईल' **सप्त**, ३६२. पहा. **विष्णुपुराण** ४-१३३.

३९. **सभा**, २९ व १९.

४०. **सप्त**, ३३४.

४१. **सभा**, ४०.

४२. 'पृथ्वीचे अधिपति ते आपला धर्म आपण रक्षून त्यांची सेवा करणें त्या अर्थी त्या धर्मास विरुद्ध दाखवू नये....रावणाचे घरिं देवांनीं काल प्रतीक्षा करून जसें म्हटलें तसें चालले', **सप्त.** ४७.

४३. **राच.** ९०.

४४. **सप्त.** २८७.

४५. **मल.** ५३. **सभा.** २, ३, २०, 'मलिकंबरास संकठ पडला. ते समयिं घोडयाखाले उतरोन भीमेस नमस्कार केला. ते कम जाहाली. कुल लष्कर उताराने पार गेलें. जातांच भीमेस पूर चालिला. **मोब.** ८.

४६. **विष्णू.** ५-१ ते ८, **भाग.** १०-४-९२. 'अरे अफजलखाना नीचा आजपासून एकविसावे दिवशीं तुझें शिर कापून तुझे लष्कर अवघा संहार करुन नव कोटि चामुंडास तृप्त करिते'-सभा.८.

४७. **विष्णु**. ५–२३. १० ते १३.

४८. 'राजियाचे देहावसान जाले ते दिवशी पृथ्वीकंप जाहाला. गगनि धूमकेतु उदेला, उल्कापात आकाशिंहून जाला. रात्री जोड इंद्रधनुष्यें निघाली. अष्ट दिशा दिग्दाह होऊन गेल्या. श्री शंभु महादेवीं तळ्याचे उदक रक्तमय जालें. अशी अरिष्टें जाहाली.' **समा**. १०९, पहा. **सप्त**. ३६२.

४९. **समा**, १७.

५०. **चित्र**, ९३.

५१. **ऐत्रा**, १७३;

५२. **माग**, ३२. ७– १६.

५३. पुढच्या प्रकरणात आलेल्या काही पत्रे हा निष्कर्ष दृढ करणारी आहेत.

□

५. आज्ञापत्र : पौराणिक परंपरेचा वेगळा आविष्कार

१. प्राचीन मराठी वाङ्मयातील राजनीतिपर साहित्य २. आज्ञापत्र आणि सप्तांग राज्य ३. भारतीय परंपरेतील राजा ४. धर्मदंड आणि राजदंड ५. आरमारी बळाचे महत्त्व ६. पौराणिक परंपरेतील पुनर्निर्मिती [परिशिष्ट : छत्रपती शिवाजी यांचे मालोजी घोरपडे यास पत्र.]

१. 'आज्ञापत्र' या राजनीतिविषयक प्रकरणासंबंधी आजवर बरीच चर्चा झाली आहे. या गद्य-प्रकरणाने अनेक संशोधक-संपादकांना आकृष्ट केले आहे. कोणत्याही गद्य प्रकरणास लाभले नसतील एवढे संपादक या प्रकरणाच्या संपादित आवृत्तीच्या सिध्दयर्थ पुढे आले आहेत.[1] आज्ञापत्राची अनेक संपादित संस्करणे झालेली असूनही त्याचा सर्वांगीण अभ्यास झाला आहे, असा निर्वाळा देता येत नाही. या संस्करणांतून प्रामुख्याने चर्चा आली आहे, ती आज्ञापत्राचा काळ आणि कर्ता यांसंबंधी. कित्येक संस्करणांत भाषेच्या स्वरूपाचा विचार झाला आहे तर काही संपादित आवृत्त्यांच्या प्रस्तावनेतून 'आज्ञापत्रा'त ग्रथित करण्यात आलेली राजनीती शिवाजी महाराजांचीच आहे, असा निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला आहे. तदनुसार हे प्रकरण शिवकालातच रचण्यात आले, असा निर्वाळा देण्यात आला आहे.

आज्ञापत्राविषयीच्या चर्चेत भर घालणे हे या प्रकरणाचे उद्दिष्ट नाही. आजवरच्या अभ्यासकांच्या नजरेतून सुटलेला आणि प्राचीन मराठी गद्याची परंपरा आणि विकास यांच्याशी संबद्ध असलेला एक विशेष स्पष्ट करण्यासाठी हा भाग लिहिण्यात येत आहे. 'आज्ञापत्रा'चा प्रारंभ कोणत्याही बखरीप्रमाणे झालेला असला तरी चरित्र-आख्यानपर बखरींचे कोणतेही विशेष या प्रकरणात आढळत नाहीत. म्हणूनच या प्रकरणाचा समावेश फार तर राजनीतिपर प्रबंधात करावा, असे मागील प्रकरणाच्या प्रारंभी नमूद करण्यात आले आहे.

या प्रबंधाची निर्मिती मात्र पौराणिक परंपरेतून झाली आहे. स्वराज्योत्तर

सामाजिक जीवनाच्या गरजेतून ही रचना झालेली असल्याने पौराणिक परंपरेतील गद्याचा एक निराळा आविष्कार या नात्याने 'आज्ञापत्रा'ला प्राचीन मराठी गद्याच्या विकासात महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे.

'आज्ञापत्रा'ची पहिली दोन प्रकरणे काळ आणि व्यक्ती यांच्या उल्लेखांमुळे बरीच गुंतागुंतीची ठरतात. पहिल्या प्रकरणात आलेल्या कालोल्लेखास अनुसरून आज्ञापत्राचा लेखनकाल १९ नोव्हेंबर १७१५ ठरतो. या दोन प्रकरणांतील 'स्वामी', 'मातोश्री' आणि 'राजकुमार' यांचे उल्लेख या लेखनकालाशी संबद्ध असलेल्या इतिहासाशी सुसंगत नाहीत. शिवाय पुढची ३ ते ९ ही सात प्रकरणे लक्षात घेता पहिली दोन प्रकरणे रचनादृष्ट्या 'अगान्तुक' वाटतात. त्यामुळे मूळ आज्ञापत्र ३ ते ९ या सात प्रकरणांवर आधारलेले आहे, असे गृहीत धरून या सात प्रकरणांचाच परामर्श घेणे श्रेयस्कर ठरते. ही सात प्रकरणे कोणी रचली या गदारोळात न पडता आज्ञापत्र कसे घडविण्यात आले आहे याचा मागोवा घेणेच अधिक लाभप्रद ठरणारे आहे.

मराठ्यांच्या राजवटीत राजनीतिशास्त्रावर लिहिण्यात आलेली पुढील प्रकरणे आजवर उपलब्ध झाली आहेत.

१. **आज्ञापत्र.**

२. '**बुधभूषणम्**' : छत्रपती संभाजी महाराजांच्या नावावर असलेला संस्कृत ग्रंथ.

३. **नारायण व्यवहार शिक्षा** : शके १७११ त सवाई माधवराव पेशवे यांच्या शिक्षणार्थ रचलेले मराठी प्रकरण.

४. मल्हाररामराव चिटणीसकृत '**राजनीति**' आणि

५. **मेस्तके** : परंपरेने चालत आलेली रचना. शके १७४५ तली एक प्रत उपलब्ध.

या पाचांपैकी मल्हाररामराव चिटणीसकृत 'राजनीति' हा ग्रंथ माझ्या पहाण्यात आला नाही. मेस्तके वेगवेगळ्या विषयांवर वेळोवेळी रचलेली आढळतात. शासकीय व्यवहाराचा अनुभव असलेल्यांनी करून ठेवलेल्या टिपणांची ही ओबीबद्ध संस्करणे आहेत. त्यांना निश्चित असा घाट नाही. वंशावळी, शकावली यांच्याप्रमाणेच राजनीतिपर तत्त्वांची टिपणे करून ठेवण्याच्या प्रवृत्तीतूनच ही मेस्तके रचण्यात आलेली दिसतात. तीन प्रकरणांवर आधारलेले 'नारायण व्यवहार शिक्षा' हे प्रकरण राज्यकर्त्यांच्या ठिकाणी कोणते गुण असावेत व राज्यव्यवहार करताना कोणती दक्षता त्यांनी घ्यावी याचे पुराणादिकांच्या आधाराने केलेले विवरण आहे. राज्यकर्त्यांच्या नव्या पिढीसाठी तयार केलेला तो एक वस्तुपाठ आहे, असे म्हणता येईल. 'बुधभूषणम्' या संस्कृत ग्रंथाचे केवळ ३ अध्याय प्रसिद्ध झाले आहेत. पहिला आणि तिसरा या दोन अध्यायांत केवळ पांडित्यप्रदर्शन असून दुसऱ्या अध्यायात मात्र राजनीतीचे निरूपण

आले आहे. पुराणांतून आलेल्या राजधर्माच्या विवरणांचेच संकलन या अध्यायात आले आहे. रचनेत पारंपरिकता अधिक आहे.

२. या सामग्रीत 'आज्ञापत्र' स्वतःच्या अंगभूत वैशिष्ट्यांमुळे वेगळे पडते आणि उठूनही दिसते. 'आज्ञापत्रा'तील विवेचन प्राचीन राजनीतिपर ग्रंथ आणि पुराणांतून येणारे राजधर्मनिरूपण यांच्या आधाराने करण्यात आलेले असले तरी लेखनात राज्यकारभाराचा प्रदीर्घ अनुभव आणि वस्तुनिष्ठ दृष्टी यांचा प्रत्यय येतो. त्यामुळे प्राचीन परंपरागत ज्ञानाचे संकलन न ठरता आज्ञापत्र ही एक प्रकारची प्रातिभ पुनर्निर्मिती ठरते. राजनीतिविषयक तत्त्वांचे सखोल ज्ञान, प्रत्यक्ष राज्यकारभाराचा अनुभव, वास्तव परिस्थितीचे भान आणि एकंदरीत मूळ प्रश्नांकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोण इत्यादी विशेषांना प्रतिभासंपन्नतेची जोड लाभल्यामुळे आज्ञापत्राला स्वतःचा असा एक आकृतिबंध लाभला आहे. प्राचीन गद्याचा एका वेगळ्या प्रेरणेतून झालेला हा आविष्कार साहित्यगुणांनीदेखील नटलेला आहे. या प्रकरणाच्या विविध विशेषांची ओळख करून घेणे म्हणूनच अगत्याचे ठरते.

'आज्ञापत्र' प्रथम लक्ष वेधून घेते ते त्यातील विषयांच्या मांडणीमुळे. सात प्रकरणांतून आलेले विषय प्राचीन राज्यनीतिशास्त्रात वर्णिलेल्या राज्याच्या सप्तांगांशी जुळणारे आहेत. राजनीतिविषयक सर्व ग्रंथांत राज्याची सात अंगे सांगण्यात आली आहेत[२] :

१. स्वामी (राजा), २. अमात्य, ३. सुहृद, ४. कोश, ५. राष्ट्र, ६. दुर्ग आणि ७. बल (सैन्य).

'शुक्रनीतीत' तर या सप्तांगावर सुंदर रूपक करण्यात आले आहे : 'अमात्य हे राजाचे **डोळे**, सुहृद हे **कर्ण**, कोश हे **मुख**, दुर्गराष्ट्र हे **हातपाय** आणि बल (सैन्य) हे **मन**' असा हा षडंगयुक्त राजपुरुष या ग्रंथाने उभा केला आहे.[३] 'आज्ञापत्रात' या सप्तांगांचे वर्णन पुढीलप्रमाणे येते :

१. **स्वामी (राजा)** : पहिली दोन प्रकरणे व प्रकरण ३.
२. **अमात्य** : हुजुरातीच्या निमित्ताने प्रकरण ४.
३. **सुहृद** : धावते उल्लेख प्रकरण ४
४. **कोश** : हुजुरात, गडकोट या प्रकरणांतून व साहुकाराच्या निमित्ताने प्रकरण ५.
५. **राष्ट्र** : पृथ्वीपालन कसे करावे याचे उल्लेख प्रसंगोपात सर्वच प्रकरणांतून आलेले आहेत. तरीही वतनदार अणि वृत्ति यांच्या निमित्ताने प्रकरण ६ व ७
६. **दुर्ग** : हे अंग महत्त्वाचे असल्याने त्यावर स्वतंत्र प्रकरण ८.
७. **बल (सैन्य)** : सैन्यासंबंधीचे उल्लेख निरनिराळ्या संदर्भांत आले असले तरी स्वतंत्र प्रकरण आरमाराचे प्रकरण ९.

राज्याभिषेकानंतर शिवछत्रपतींनी अष्टप्रधानांचे केलेले खातेवाटप राजा व इतर ६ अंगे यांचा परस्परसंबंध दर्शविणारे आहे.[४]

या सात अंगांत राजा सर्वश्रेष्ठ असून इतर ६ अंगे त्याच्या आधीन असतात. राजाचा धर्म कोणता हे विशद करण्यासाठी 'आज्ञापत्राची' निर्मिती झाली आहे. 'आज्ञापत्रातील' राजधर्म अथवा 'नृपकर्तव्ये' योग्य रीतीने समजून घ्यावयाची असतील तर भारतीय परंपरेतील 'राजा' या संस्थेशी संलग्न असलेल्या धारणा लक्षात घेतल्या पाहिजेत 'आज्ञापत्रातील' विवेचन या धारणा गृहीत धरून झालेले आहे म्हणून भारतीय परंपरेतील 'राजा' त्याचे स्वरूप आणि कर्तव्य यांचा मागोवा घेतला पाहिजे.

३. आजच्या युगात राजा ही संस्था कालबाह्य झाली आहे. आपण लोकशाही तत्त्वप्रणाली स्वीकारली ती पाश्चात्य देशांत घडलेल्या राज्यशास्त्रविषयक विचारांस अनुसरून. पाश्चात्य देशांत राजांच्या अनिर्बंध अधिकारास आव्हान देऊन लोकांचे सार्वभौमत्व स्वीकारणारी लोकशाही अस्तित्वात आली. राजांची अनिर्बंध सत्ता हे पाश्चिमात्य राष्ट्रांतील एक ऐतिहासिक सत्य आहे. 'मीच राज्य आहे.' (I am the State) या धारणेने राज्य करणारे आणि 'हम करेसो कायदा' या वृत्तीने राज्यकारभार चालविणारे राजे पाश्चात्य राष्ट्रांत दीर्घकाल नांदत होते. अठराव्या शतकाच्या शेवटी शेवटी झालेल्या विचारजागृतीतून 'लोकशाही' शासनप्रणाली उद्भवली व ती आता स्थिरावली आहे. तुलनात्मक दृष्ट्या विचार केला असता भारतातील राज्यनीतिशास्त्रविषयक विचारांना किमान दोन हजार वर्षांची परंपरा आहे. वेदोपनिषदे यांचा काळ जमेस धरला नाही तरी इसवी सनाच्या पूर्वी किमान चौथ्या शतकापासून या देशात राजनीतिशास्त्रविषयक ग्रंथ आढळतात. काळाच्या ओघात तपशिलात काही फरक पडले असले तरी मूलभूत तत्त्वे मात्र दीर्घकाळ अपरिवर्तित स्वरूपात कायम होती.[५] या तत्त्वांचा केंद्रबिंदू आहे राजा. या राजालाही 'धर्म' आहे. राजधर्माचे पालन करणे हे त्याचे प्रधान कर्तव्य असून प्रजेचे परिपालन हा श्रेष्ठ राजधर्म मानण्यात येतो. 'धर्माने प्रजापालन करणाऱ्या राजाला सहस्त्र अश्वमेध केल्याचे पुण्य लाभते' असे महाभारत (आश्रमवासिक पर्व,७-२३) सांगते. राजधर्माचे पालन न करणाऱ्या राजाला देहदंडाची शिक्षा सांगितलेली आहे. ती केवळ पुराणात न राहता वेगवेगळ्या निमित्ताने अमलातही आलेली आहे.

राजधर्माचे स्वरूप राजसंस्थेच्या उत्पत्तीशी निगडित आहे. यजुर्वेद, अथर्ववेद. ऐतरेय ब्राह्मण, शतपथ ब्राह्मण, बृहदारण्यकोपनिषद आणि इतर राजनीतिपर ग्रंथ आणि पुराणे यांच्या आधाराने राजसंस्थेच्या उदयविकासाचे स्वरूप पुढीलप्रमाणे मांडता येईल :

> 'ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली. नंतर त्याने चार वर्णांसह मानव उत्पन्न केला. मानवी समाजाच्या व्यवहारातून ब्रह्मदेवाच्या असे निदर्शनास आले की, या समाजाचा व्यवहार 'बळी तो कान पिळो' या न्यायाने चाललेला आहे.

समाजातले दुर्बल घटक बलवान घटकांच्या बरोबरीने वागण्यास समर्थ ठरावेत या हेतूने ब्रह्मदेवाने 'धर्म' निर्माण केला. धर्मपालन करणारा समाज विश्वविकासास पूरक अशा पद्धतीने वागावा या हेतूने ब्रह्मदेवानें दंड निर्माण केला. हा दंड धारण करतो तो राजा. ब्रह्मात्मज आणि ब्रह्मतेजोयुक्त दंड राजासाठी देवाने निर्माण केला (मनु ७–१४) 'दंडाच्या योगाने लोक स्वधर्मतत्पर राहतात' (शुक्र. २३). 'दंड हेच धर्माचे परम आश्रयस्थान आहे' (शुक्र ४८). 'दंडाच्या अभावी समाजात 'मात्स्यन्याय' नांदेल आणि मोठे मासे लहान माशांना खाऊन टाकतात, तशी मानवमात्रांची अवस्था होईल' (महाः शांति. १५–३०). हे लक्षात घेऊन धर्मशास्त्रानुसार दंडाचे प्रणयन करणारी राजनीती अस्तित्वात आली.[६]

धर्मात्मज दंड धारण करण्यापूर्वी राजाला राज्याभिषेक व्हावयाचा असतो. राज्याभिषेक ही अनेक यज्ञांची मालिका आहे.[७] या यज्ञांच्या योगाने होऊ घातलेला राजा समाजातल्या सर्व थरांशी प्रतिज्ञाबद्ध होत असतो. ही प्रतिज्ञा प्रजेच्या रक्षणाची आणि धर्मपालनाची असते. 'मी सर्वव्यापी व्हावे. नंतर माझ्यावर राज्याभिषेक व्हावा' ही राज्याभिषेकापूर्वीची प्रार्थना राजा आणि राष्ट्र यांच्या एकरूपतेची निदर्शक आहे. धर्म-दंड धारण करणारा राजा ही व्यक्ती नसते, ते राष्ट्राचे मूर्तिमंत प्रतीक असते.

४. राष्ट्र ही संकल्पना आणि राष्ट्रवाद आपण पाश्चिमात्य राष्ट्राकडून घेतला ही प्रचलित समजूत एक अर्धसत्य आहे.* कारण राज्याभिषेकाच्या वेळी राजाचे निरनिराळ्या उदकांच्या योगाने अभिसिंचन होत असे. त्यात राष्ट्र ही धारणा स्पष्टपणे आली आहे. शतपथब्राह्मणात (५–३–४–१ ते ६) चढत्या लाटेच्या पाण्याने राजाचे अभिसिंचन करताना पुढील मंत्र म्हणावयाचा असतो, असे सांगण्यात आले आहे :

तं गृहणामि वृष्ण ऊर्मिरसि राष्ट्रदा राष्ट्रं मे देहि स्वाहा।
वृष्ण ऊर्मिरसि राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै देहीति ॥

ऐतरेय ब्राह्मणात देखील (पंचम पंचक, अध्याय २) दधि-दुग्ध-वनस्पतिमिश्रित उदकाने राजाचे अभिसिंचन करताना पुढील मंत्र म्हणावा असा निर्देश आहे :

इमा राष्ट्रस्य वर्धनीरिमा राष्ट्रभृतोऽमृता....

"दही वगैरे पदार्थ मिसळलेली ही उदकें राष्ट्राची सर्वतोपरी अभिवृद्धी करणारी आहेत"[८]

राजा आणि त्याची कर्तव्ये यांच्यासंबंधीचे 'आज्ञापत्रातील विवरण या पार्श्व-भूमीवर अभ्यासले तरच त्याची यथायोग्य संगती लागते. या दृष्टिकोनातून पुढील वचने लक्षात घ्यावीत :

१) "या प्रजेचे करुणेस्तव ईश्वरे संपूर्ण कृपानुग्रहे आपणांस राज्य दिधले आहे" – **आज्ञा. ७०.**

२) ईश्वर सर्व जनांचा गुरु. सर्वांचे कल्याणाकल्याणाचा इंदु नृपति कल्पिला आहे; तो सगुण असला तरी बहुतांचे कल्याण. अत येव 'राजा कालस्य कारणम्' या करितां राजेलोकी बहुत सगुण असावे लागते" – **आज्ञा** पृ–८१.

३) "अधर्म प्रवृत्ति मोडून धर्माभिवृद्धि करून शाश्वत लोकाश्रयी होणें ही नृपकार्येच होत"[९]— **आज्ञा**. ८४.

वर दिलेली सांस्कृतिक पार्श्वभूमी लक्षात घेतली असताना आज्ञापत्रातील प्रकरण ३ व ४ यांत आलेल्या राजधर्माचा बोध योग्य रीतीने होतो. 'राजाने युद्धाव्यतिरिक स्वतःच्या रक्षणाविषयी जागरूक असले पाहिजे' (पृ.७०) हा विचार कौटिल्याचे अर्थशास्त्र (१–१७) कार्मादकीय नीतिसार (७–२२०) मात्स्यपुराण (२१९–१०), मनु (७–२१७-२०) अशा अनेक ग्रंथांतून आला आहे. आज्ञापत्रात आलेली राजाची दिनचर्या अग्निपुराणादि ग्रंथांतून जवळपास सारख्याच स्वरूपात आठळते 'राजेलोकास विनोदाचे एकंदर व्यसन नसावे' (पृ ७४) हे आज्ञापत्रातील वचन मात्स्य पुराणातून उद्धृत केल्यासारखे वाटते.[१०]

"राजा म्हणजे पृथ्वीचा उपभोगशून्य स्वामी" हे गडकऱ्यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या तोंडी घातलेले उद्गार राजनीतिशास्त्राच्या दृष्टीनेदेखील समर्पक ठरतात. राजाच्या एकंदरीत व्यक्तिमत्वासंबंधी हाच दृष्टिकोन आज्ञापत्रात प्रकट झालेला आहे. राजानंतरचे राज्यांग म्हणजे **अमात्य**. कौटिल्याप्रमाणेच आज्ञापत्रातही प्रधान आणि अमात्य वेगळे मानलेले दिसतात. बहुतेक शास्त्रकारांनी राजाची व प्रधानाची लक्षणे सारखीच दिली आहेत. कारण, पृथ्वीपालनात राजाच्या बरोबरीने प्रधानास राजकार्य करावयाचे असते. प्रसंगी राजाला योग्य मार्गाला लावण्याची विकट जबाबदारीही प्रधानास पार पाडाची लागते. या दृष्टीने 'आज्ञापत्रा'तील पुढील विचार लक्ष वेधून घेणारे आहेत.

> "प्रधान म्हणजे नृपसत्ताप्रसारक; प्रधान म्हणजे धर्मसंरक्षणाचे अध्यक्ष; प्रधान म्हणजे राजमदजनित अन्यायसागराची मर्यादा,.... किंबहुना प्रधान म्हणजे यहलोकीं राज्यकृत्यसंपादनामुळें नृपाची विश्रांती; धर्मपरिपालनामुळे परलोकपंथिची दीपिका"[११] – **आज्ञा** ८५.

सुहृद या राज्यांगाचे विवेचन प्रकरण ३ व ४ यांत प्रसंगोपात्त आले आहे. सुहृद हा प्रधानाइतकाच जवळचा असला तरी त्याने राज्यकारभारात मात्र हस्तक्षेप करू नये, ही अपेक्षा व्यक्त झाली आहे.

> '....किंबहुना येकदोन साच मनुष्य, भिडेचे, विचारवंत प्रामाणिक सूज्ञ यैसे नित्य सहवासी बागवावे. त्यांणी वरचेवर पडले अंमराविषयीं सावध करीत असावें. त्यांसी यैसी परिच्छिन्न आज्ञा करावी' – **आज्ञा**. ८१.

अशा सुज्ञांनी दिलेल्या सल्ल्याचा वीट मानू नये अथवा दाखविलेल्या दोषांचा रागही धरू नये, असेही आज्ञापत्रकार सांगतात.[१२] सुहृद् या अंगाचे विवरण अगदी सूत्ररूपाने व सावधपणे आज्ञापत्रकार करतात याचे मूळ राजनीतिशास्त्रातच असावे. या शास्त्रानुसार कोणीच मूलतः शत्रु वा मित्र नसतो :

नास्ति जात्या रिपुर्नाम मित्रं वापि न विद्यते
सामर्थ्ययोगाजनाय ते मित्राणि रिपवस्तथा ॥ महा शांति ॥ १४०-५१

स्वतः शिवाजी महाराजांचे अरिमित्रविषयक धोरण राजनीतिशास्त्रास धरून राहिले आहे. छत्रपतींनी भागानगरीहून मालोजी घोरपडे यास लिहिलेल्या पत्रात हे धोरण योग्य रीतीने प्रकट झाले आहे. हे समग्र पत्र परिशिष्टात देण्यात आले आहे. या पत्रावरून शिवाजी महाराज राजनीतिशास्त्रात किती निपुण होते याची कल्पना तर येतेच पण, त्यावरोबरच आज्ञापत्राचे कर्तृत्व स्वतः शिवाजी महाराजांचे होते असे मानण्याकडे मनाचा कल होतो.

५. हे मत दृढावते आज्ञापत्राचे शेवटचे प्रकरण अभ्यासल्यानंतर. **बल म्हणजे सैन्य** या राज्यांगाशी संबंधित असलेला विचार प्रकरण ३, ४ आणि ८ प्रकरणांत तर आलेला आहेच, शिवाय याच राज्यांगाशी संबंधित असलेल्या शेवटच्या आरमारविषयक प्रकरणात तो विस्ताराने आला आहे. आज्ञापत्रकारांनी आरमार हे स्वतंत्र राज्यांग मानले आहे. भारतातील राजेलोकांत आरमाराचे महत्त्व ओळखणारा पहिला राजा छत्रपती शिवाजी महाराज.

> " आरमार म्हणजे स्वतंत्र येक राज्यांगच आहे. जैसें ज्यांस अश्वबळ त्याची पृथ्वी प्रजा आहे तद्वतच ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र. या करितां आरमार अवश्यमेव करावें– " **आज्ञा** पृ. ११४.

आरमाराची ही महती लक्षात घेऊन छत्रपती शिवरायांनी अत्यंत बिकट परिस्थितीत हे 'राज्यांग' उभारले. प्रचंड प्रदेश व्यापून असलेल्या मोगलांनादेखील आरमार वाढविण्याचे धाडस झाले नाही. त्यांनी प्रसंगपरत्वे इंग्रज, फ्रेंच अथवा पोर्तुगीज यांच्या आरमारांची मदत घेतली. शिवछत्रपतींनी मात्र स्वतःचे आरमार उभे केले. १६५९ साली मराठा आरमाराची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. १६६४ ला सुवर्ण दुर्गाची पायाभरणी झाली. याच वर्षी झालेल्या सावनूरच्या आरमारी लढाईचे नेतृत्व स्वतः शिवाजी महाराजांनी आपल्याकडे घेतले होते. मराठ्यांच्या वाढत्या आरमारी शक्तीची दहशत पोर्तुगीजांनी घेतली होती. या बळापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी पोर्तुगीजांनी मराठ्यांशी तह केला. हा पाच कलमी तह ५ डिसेंबर १६६७ ला पूर्णपणे अमलात आला. या तहाचे दुःख पोर्तुगीजांना एक निराळ्या कारणासाठी झाले : मोगल, आणि विजापूरचा आदिलशहा यांच्या बरोबरीची तिसरी सत्ता म्हणून मराठ्यांना या तहाने अप्रत्यक्ष मान्यता (Recognition) मिळाली याची

खंत पोर्तुगालच्या तत्कालीन व्हाइसरॉयने व्यक्त केली आहे.

इंग्रज आणि डच यांच्यात १६६७-६८ साली झालेल्या आरमारी युद्धाने आरमाराचे महत्त्व आणि सामर्थ्य प्रथम जगाच्या नजरेत भरले. शिवछत्रपतींनी या समकालीन घटनेची नोंद योग्य प्रकारे घेतलेली दिसते. आरमारी बळ वाढविण्याच्या प्रयत्नांत खंड पडला नाही. या बळाचे संरक्षण असल्याकारणाने १६७० साली मराठ्यांनी दुबईच्या इमामाशी व्यापारी करार केला. मराठ्यांच्या जहाजांना समुद्रातील वाहतूक हे पोर्तुगीज सत्तेला फार मोठे आव्हान होते. कारण, तत्कालपर्यंत भारतीय किनाऱ्यावर ती एकमेव सागरी सत्ता होती. १६७४ साली शिवाजी महाराजांना राज्याभिषेक झाला त्यावेळी मराठ्यांच्या आरमारात ५७ लढाऊ जहाजे आणि पाच हजार नौसैनिक होते.

शत्रूवर दहशत बसावी आणि आपल्या आरमारी सत्तेचेही प्रदर्शन व्हावे या हेतूने छत्रपतींनी वेळोवेळी आरमारी संचलनही पश्चिम किनाऱ्यावरून करविले. अशी संचलने (March Past) १६६०, १६६५, १६७० आणि १६७४ या वर्षांत झाल्याची नोंद आढळते.

शिवाजी महाराजांच्या या कर्तृत्वाच्या पार्श्वभूमीवर 'आज्ञापत्राचे' शेवटचे प्रकरण अभ्यासिले असता या 'राज्यांगाची' विस्ताराने माहिती देणारे 'आज्ञापत्रकार' शिवाजी महाराजांखेरीज अन्य कोणी नसावे असेच वाटू लागते.

६. भारतीय राजनीतिशास्त्रानुसार मानण्यात आलेल्या राज्याच्या सात अंगांपैकी राजा, सुहृद, अमात्य आणि बल यांचा विचार आज्ञापत्रात कोणत्या प्रकारे झाला आहे याचे विवरण वर देण्यात आले आहे. कोश, राष्ट्र आणि दुर्ग या उर्वरित तीन अंगाचाही परामर्श या राजनीतिपर प्रकरणात राजनीतिशास्त्रानुसार करण्यात आला आहे हे अभ्यासकांच्या निदर्शनास येईलच. आज्ञापत्रातील विवेचन भारतीय राजनीतिशास्त्रावर कसे आधारलेले आहे हे दर्शविण्यासाठी चार अंगांचाच परामर्श घेण्यात आला आहे. आज्ञापत्राने प्राचीनांचे ऋण कोणत्या प्रमाणात घेतले हे सिद्ध करण्यासाठी हे विवेचन आलेले नाही. आज्ञापत्राच्या लेखकाने-मग तो लेखक कोणीही असो-प्राचीन भारतीय राजनीतिशास्त्र आत्मसात केलेले होते व हे परंपरागत ज्ञान स्वतःच्या अनुभवाच्या मुशीत ओतून त्याने या शास्त्राची कालसापेक्ष पुनर्निर्मिती केली होती, हे आतापर्यंतच्या विवेचनावरून स्पष्ट व्हावे. कौटिल्याचे अर्थशास्त्र, महाभारत, अनेक पुराणे व राजनीतिपर अन्य ग्रंथ यांतील प्रतिपादनाशी आज्ञापत्राचे कित्येक स्थळी दिसून येणारे साधर्म्य हा आज्ञापत्राच्या लेखकाने आत्मसात केलेल्या ज्ञानाचा परिपाक आहे. आज्ञापत्रात केवळ पुरातन माहितीचे संकलन नाही. स्वराज्याच्या काळास आवश्यक असलेल्या 'नूतन सृष्टीची' निर्मितीही या लेखकाने आपल्या प्रज्ञेने केली आहे. ही निर्मिती प्राचीन शास्त्रांच्या पायावर उभारलेली आहे.

स्वतःचे ज्ञान, अनुभव आणि कर्तृत्व यांवर आज्ञापत्रकाराचा एवढा विश्वास आहे की, फार थोडी स्थळे वगळली तर, प्राचीन ग्रंथांची प्रमाणे उद्धृत करण्याचा प्रयत्नही त्याने केलेला नाही. नवनिर्मितीच्या–फार तर पुनर्निर्मिती म्हणू या–प्रक्रियेमुळे 'आज्ञापत्र' हे प्राचीन ग्रंथातील माहितीचे संकलन न ठरता त्यास स्वतंत्र प्रत्ययकारी निर्मितीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. शास्त्रग्रंथास शोभून दिसेल अशी सूत्रात्मक भाषा योजूनही विवरणात दुर्बोधता आली नाही याचे श्रेय या प्रज्ञावंताच्या भाषाप्रभुत्वाकडे जाते.

स्वराज्याच्या काळात राज्य आणि राजनीती यासंबंधीचे ज्ञान राजकर्ते आणि जनता या दोहोंसही आवश्यक असते. जनतेची राज्याविषयीची निष्ठा आणि राज्यकर्त्यांचे जनतेसंबंधीचे कर्तव्य यांना उजाळा देण्यासाठी अशा ज्ञानाचा प्रसार उपकारक ठरतो. समाजाच्या या गरजेपोटी 'आज्ञापत्राची' निर्मिती झालेली असून प्राचीन मराठी गद्याचा एका वेगळ्या परंपरेतून घडलेला हा आविष्कार असाधारण महत्त्वाचा ठरतो.

□

टीपा

१. आज्ञापत्र मराठी वाचकांच्या प्रथम निदर्शनास आले ते 'विविधज्ञानविस्तार' या मासिकातून. या मासिकात या प्रकरणाचो दोन संस्करणे अनुक्रमे १८७५–७६ आणि १८९०–९१ या वर्षांत प्रसिद्ध झाली. पुढे १९२५ त विविधज्ञानविस्तार पुस्तकमालेत हे प्रकरण स्वतंत्रपणे प्रसिद्ध झाले. १९२९ साली डॉ. श्री. व्यं. पुणतांबेकर यांनी या प्रकरणाचा इंग्रजी अनुवाद प्रस्तावनेसह 'A Royal Edict on the Principles of State Policy and Administration' या नावाने प्रसिद्ध केला. बावडा दप्तरमध्ये हेच प्रकरण १९३७ त पुन्हा छापण्यात आले. १९३९ पासून १९७० पर्यंत आज्ञापत्राच्या अनेक आवृत्त्या निरनिराळ्या संपादकांनी प्रसिद्ध केल्या. त्यात शं. ना. जोशी (कॉटिनेन्टल, पुणे, १९६०), प्रा. श्री. ना. बनहट्टी (सुविचार, पुणे, २ आ. १९६५), रा. चिं. ढेरे (व्होरा –) या संपादकांनी संपादित केलेल्या आवृत्त्या लक्षणीय ठरतात.

२. स्वाम्यमात्य सृहृत्कोशराष्ट्र दुर्गबलानिच
सप्ताङ्गमुच्यते राज्यं तत्र मूर्धा नृपः स्मृतः ॥ **शुक्र**-१–६५.

३. **शुक्रनीति**, १–६२.

४. वाड, मावजी आणि पारसनीस यांनी संपादिलेल्या **सनदा व पत्रे** (१९१३) या संग्रहात अष्टप्रधानांचे खातेवाटप आले आहे. ' कानून जाब्ता ' या सदरात छत्रपतींचे आज्ञापत्र आले असून ते राज्याभिषेक शके १, आनंदसंवत्सरे, ज्येष्ठ व. १३ भोमवासर या दिवशी जाहीर करण्यात आले आहे.

५. Kane P. V., History of Dharma Shastra, Vol. III P. 15.

६. **बृहदारण्यकोपनिषद्** अध्याय १, ब्राह्मण ४, मंत्र ११; **छांदोग्योपनिषद** खंड १०, अ. ५, मं. ५.

* अथर्ववेदात (१२-१-१ ते ६३) ६३ ऋचांचे एक भूमिसूक्त आले आहे. या सूक्तात राष्ट्रकल्पनेचे मूळ आढळेल. वाणगीसाठी काही ऋचांचा अनुवाद पुढे देण्यात येत आहे :

सत्य, ऋत, उग्र (क्षात्र) दीक्षा ब्रह्म, यज्ञ ही तत्त्वे पृथ्वीला धारण करणारी आहेत. आमच्या भूतकाळाचे आणि भविष्यकाळाचे रक्षण करणारी ही भूमी आमच्यासाठी विस्तृत प्रकाश आणि स्थान निर्माण करो ! [१]

जो आमचा द्वेष करतो, सेनेच्या योगाने जो आमच्यावर आक्रमण करतो, जो मनाने व शस्त्राने आम्हाला दास करू इच्छितो, आमचे मनोरथ पूर्ण करणारे हे भूमे, अशांचा तू नाश कर. [५४].

विश्वाला उत्पन्न करणारी वनस्पतींची माता, सर्वांना आश्रय देणारी, धर्माने धारण झालेली, कल्याणकारी, सुख देणारी मातृभूमी आम्ही तिची नेहमी सेवा करतो [१७].

विविध प्रकारची वाणी बोलणारे. नाना प्रकारचे धर्म आचरण करणारे एका घरात राहिल्यासारखे वागणारे जन धारण करणारी, ध्रुवासारखी स्थिर ही भूमी दूध देणाऱ्या गाईप्रमाणे माझ्यासाठी धनाच्या सहस्रधारा धारण करो ! [४७]

७. **शतपथब्राह्मण** १३-२-९-२ ते ५.

या यज्ञास ' रजहविस ' म्हटले आहे. हा बारा दिवसांचा विधी असतो. राजा अहवनीय अग्नी घेऊन सेनापति व पुरोहित यांच्या घरी जातो व नंतर **स्वतःच्या घरी** ' इंद्रसव ' करतो. राणीच्या प्रासादात ' अदितीसव ' होतो. वरुणसव **सुमाच्या** घरी; **ग्रामणीच्या** घरी मरुत्सव, **क्षत्राच्या** घरी ' सवितृसवन ' अश्विनी देवांचे सवन **सारथ्याच्या** घरी, महसूल वसूल करणारा – **भागदुघा** याच्या घरी पुषन्-सवन ', ' **गोवितर्क** (पारधी), **अक्षवाप** (भटक्या जमातीचे प्रतीक) ' रुद्रसव ', **पालागल** (हेर, राजदूत) यांच्या निमित्ताने तुपाचे सवन रस्त्यावर, **परित्यक्ता राणीसाठी** नैऋतीस हवन असे हे विधी झाल्यानंतर राज्याभिषेकाने पूर्णाहुती होते. राज्याभिषेकानंतर राजा धृतव्रत होतो व त्याला दंड धारण करता येतो. तत्पूर्वी तो ' राष्ट्रं मे देहि ' अशी प्रार्थना करतो. (मला

राष्ट्र द्या) आणि जनतेच्या वतीने ' राष्ट्रं ते दत्तम् ' (राष्ट्र तुझ्या स्वाधीन केले आहे) असे राजास सांगण्यात येते. ' **हा आता तुमचा राजा** ' असे पुरोहित नंतर घोषित करतो. (आम्हा ब्राह्मणांचा राजा मात्र सोम आहे, अशी घोषणाही पाठोपाठ होते)

८. **ऐतरेय ब्राह्मण** (भाग शेवटचा) अनुवाद सोमयाजी धुंडीराज शास्त्री बापट, पृ. ४०१.

९. अप्रवीतोहि मात्स्यन्यायमुद्भावयति । बलीयानवलं हि ग्रसते दण्डधराभावे । तेन गुप्ताः प्रभवन्तीति । – **कौटिल्य का अर्थशास्त्र** पृ. १६.

१०. **मात्स्यपुराण** ९८–२४.

११. इ.स. १७५४ त प्रतलेखन झालेल्या एका मेस्तकात राजा व प्रधान यांची लक्षणे पुढीलप्रमाणे देण्यात आली आहेत :

राजा जाणावा विष्णुप्रतिमा । पालणधर्म त्याचा महिमा
तेणें जिंकोनि क्रोधकामा । नीतिधर्म भजावे ॥
लक्ष कोटी स्वार्थ टाकीजे । परंतु राजनीति प्रतिपालिजे
.... राजा पाळी तै धर्म चाले । अन्यथा वेदशास्त्र वांया गेलें
अधर्मकारक लोक जाले । राजसत्ता ॥

प्रधान – नीतिमार्गाची प्रकाशवती दीपिका ॥
....ऐसें राजश्रियेचें आवरण । नीतिधर्माचें प्रगटीकरण
ते मजम् जाण भूषण । मुख्य सभेचे ॥
....ऐसें सकळासि नीति सूत्र । ते मजमू जाणावी पवित्र
सकलार्थ पिके क्षेत्र । भूभुजांचें ॥

१२. नृपस्य ते हि सुहृदास्ते एव गुरव मताः
ये एनमुत्पथगमनं वारयनर्थनिवारिताः ॥
–**कामंतकीय नीतिसार** ४–४५.

□

परिशिष्ट

शिवाजी महाराज यांचे मालोजी घोरपडे यांस पत्र

[कै. वा. सी. बेंद्रे यांनी संपादित केलेल्या ' महाराष्ट्रेतिहासाची साधने ' खंड २ (पृ. १६७–१६९) या ग्रंथात हे पत्र देण्यात आले आहे. कै. बेंद्रे यांनी ' १६७८ नंतर ' असा या पत्राचा काळ दिला आहे. पत्राच्या मजकुरावरून हे

पत्र भागानगरीहून पाठविण्यात आले आहे असे दिसून येते. शिवछत्रपतींचा मुक्काम भागानगरीत १६७६ च्या फेब्रुवारी-मार्चपासून जूनपर्यंत होता. त्यावरून हे पत्र त्याच काळातले म्हणजे १६७६ (मार्च ते जून) सालात लिहिलेले आहे, असा निष्कर्ष निघतो.]

॥ श्री महादेव ॥

राजेश्री मालोजीराव घोरपडे यांसी ॥ छ ॥ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री शिवाजी राजे जोहार –उपरि– पूर्वी निजामशाहीतून आमचे बाप कैलासवासी महाराज इभराईम आदिलशहा पादशहाच्या कारकीर्दीत इकडे आले. त्यास इभराईम आदिलशाहाने पादशाही कारबाराचा मदार महाराजांचे शिरी टाकिला. तेव्हा महाराजाने असा विचार केला कीं, पातशाही मदार आपल्या हातांत आले असतां आधीं तों आपले जातीचे लोक मराठे यांला हातीं धरून सरदारकी करून पोटे भरतात ते पातशाही वजीर करावें. पातशाही कामे यांकडून करऊन नामोश होय, इज्जती थोर पावेल तें करावें म्हणून तुमचे बाप बाजी घोरपडे सरदारकी करून होते ते आणून पातशाहास भेटऊन पातशाही वजीर केले. त्या दिवसापासून बापाच्या हातें व तुमच्या हातें पातशाहीची कामे होत आली. पातशाहांनी तुमचे चालविलें. ऐशा तीन पिढया पातशाहाच्या, दोनी पिढया तुमच्या जाल्या; ऐशियास महाराजानें तुमच्या बापास इतकें बरें केलें हें स्मरण न धरून जेव्हां काही महाराजास्त दस्त करून मुस्तफाखानाचे हातीं दिल्हे. त्या दिवसापासून तुमच्या घराणियाचा आमच्या घराणियाचा दावा वाढत चालिला. तो कित्येक झगडियांत तुम्ही आमचे लोक मारिलें व आम्ही तुमचे लोक मारिलें. आदिकरून तुमचे बाप बाजी घोरपडे त्यांला आमचे लोकीं झगडियांत मारिले ऐसा दावा परस्पर चालिला होता. ऐशियास सांप्रती राजकारण वर्तमान तरी : दक्षिणेचे पातशाहा तीन : निजामशाहा, आदिलशाहा, कुतुबशाहा. त्यांमध्ये निजामशाही पातशाही बुडाली. ते समई निजामशाही उमदे वजीर होते, त्यांणी आदिलशाही दरगाहासी रुजुवाती करून आपणांस रोजगारास जागा केले. हाली आदिलशाही बहलोल खान पठाणीं घेतली. पातशाहा लहान लेकरू, नांवमात्र ते आपल्या कैदेत ठेविलें आहेत आणि तख्त व छत्र व विजापुरचा कोट पठाणाने कबज केला आहे काही गुदारून मिळाला नाहीं. ऐशियास दक्षणचे पातशाहीस पठाण जाला हें गोष्टी बरी नव्हे. पठाण बळावला म्हणज एक उपरि एक कुल दक्षिणीयांचीं घरे बुडवील, कोणहास तगो देणार नाही; ऐसें आम्ही समजोन हजरत कुतुबशाहा पादशाहा यांसी पहिलेपासून रुजुवात राखिली होती. त्यावरून सांप्रत हजरत कुतुबशाहीनी मेहरबानी करून हुजूरां-भेटीस येणें म्हणून दस्तखत मुबारक व हस्तपंजियानसी फर्मान सादर केला. त्यावरून आम्ही हजरत कुतुबशाहाची भेटी घेतली. भेटीचे समई पातशाही अदब आहे कीं, शिरमोई धरावी, तसलीम करावी. परंतु, आम्ही आपणांवर छत्र धरिले असे, ही गोष्ट

कुतुबशाहास मान्य होऊन शिरमोई धरणें व तसलीम करणें हें माफ केले. पादशाहा तिकडून आले, आम्ही इकडून गेलो. पादशाहांनी बहुत इज्जती होऊन गळ्यास गळा लावून भेटले, आम्हास हातीं धरून नेऊन जवळि बैसविलें. किती एक मेहेरबानी जाहीर केली. आम्हीही ऐसी रुजुवात करू नये तैसी केली. आणि कुतुबशाहाचा व आपला घरीं बरेपणा करून घेतला.

या उपरि राजकारणाविषई हजरत कुतुबशाहींनी म्हादण्णापंतास व आम्हास एकत्रित करून ऐसा तह केला कीं, जो कांही उभयवर्गी तह द्यावा तो आपण कबूल करावाच ऐसा कुल मनसबा व मदार आम्हावरि टाकिला आहे कीं, आपली पादशाही जितकी वाढवूं ये तितकी वाढवावी. पठाणाची नेस्तनाबूत करणें. दक्षणची पातशाही आम्हा दक्षणियीच्या हातीं राहे ते करावें म्हणून. त्यास हा मनसबा ये प्रसंगी आमचे हातांत आल्या उपरि आम्ही काय विचार केला कीं, जे काही आपले जातीचे मराठे लोक आहेती ते आपल्या करांत घेऊन कुतुबशाहासी त्याची रुजुवात करावी. दौलत देवावी. त्याचे हाते पादशाही काम घेऊन पादशाहाची पादशाही दराज करावी आणि तुम्हा लोकांच्या दौलती चालेत, घरें राहेत तें करावें. आपल्या जातीच्या मराठिया लोकांचे बरें करावें, हे आपणास उचित आहे, ऐसे मनावरि आणून, तुमचा आमचा दावा वडिलांपासून वाढत आला होता तो आम्ही मनातून काढून टाकून निष्कपट होऊन तुम्ही मराठे लोक, कामाचे, तुमचे बरे करावे ऐसें मनीं धरून हजरत कुतुबशाहाच्या कौलाचा फर्मान घेऊन पाठविला आहे. तरि तुम्ही कुलीन, आमचा भरोसा मानून देखन पत्र हर एक उपायें पठाणापासून निघोन मजल दरमजल भागानगरास आम्हा पासी येणें. त्यास तुम्ही तर स्वार होऊन मजल दरमजल यालच ! परंतु, आपला कुली खुलासा ने खस्तमुदा व इतबारी हेजीब सत्वर पुढे पाठवून देणें कीं, तुम्हांहून चार दिवस पुढे आम्हापासी यावे, ऐसा पाठवून देणें. म्हणजे हजरत कुतुबशाहास आम्ही अर्ज करून दौलतेचें नेमस्त करून, कौलाचा फर्मान दस्त पंजे मुबारक घेऊन फर्मान व लुगडी मेहताब तुम्हास पाठवून देऊन, ते घेऊन येऊन आमचे हस्तें हजरत कुतुबशाहास भेटणें. ए प्रसंगीं तुमचे दौलतेचे काम मजबूत करून देतों कीं, पुढें बहुत बरे केलें ऐसे तुम्ही आठवावें, तुमचे पुत्रपौत्र आठवीत, व दौलत थोर होए व हजरत कुतुबशाहाचें काम तुमचे हातें होऊन ये, ऐसा समय असे !

ऐशियास तुम्ही कदाचित् ऐसा विचार कराल कीं, आदिलशाहीचे आपण दो पिढीचे वजीर. आणि आतां विजापूरकरांकडून कुतुबशाहाकडे राजियाचे बोले कैसें जावे? तरी जे समई खवासखान धरिला, विजापूरचा कोट पठाणें घेतला, विजापूरचा पातशहा धाकटा आहे त्यास कैदेत ठेविले. तेच समयी पादशाही बुडाली ! विजापूर पठाणाचे हातास गेले. आतां आदिलशाही कैची ? आणि तुम्ही तेथें उगीच आदिलशाही आहे म्हणोन गुंतून राहिले आहां. जरी पठाणाची चाकरी करोन राहीं म्हणाल, तरी पठाण काही तुम्हांस थोर दौलत देणार नाहीं. आणि पठाणास तरी, हजरती कुतुबशाहा व

आम्ही तमाम दखणी मिळोन चालोन वुडवीतच आहो. तुम्ही मराठे लोक आपलेच आहा, तुमचें गोमटें व्हावे म्हणून पष्टच तुम्हास लिहिले असे. जें काय पठाण तुम्हास देतो त्याची दुगणी आम्ही कुतुबशाहापासून तुम्हांस देववीतच असो किंवा त्याहून अधिक होऊन येईल तरी देऊनच. सर्व प्रकारे गोमटें करून.

एविसीं आम्हापासून अंतर पडे तरी, व मागील दावियाचा किंतु आम्ही मनातून टाकिला एविसीं, आम्हांस श्रीदेवीची आण असे. तुम्ही निःसंदेह होऊन येणें. हेजीव आपला पुढें पाठवणें. त्या हातीं आम्हासी घरोवियानें वरें वर्तावें. मागील दावियाचा किंतु मनांतून टाकिला ऐसे आपला आराध्य व कुलस्वामी असेल त्याचा शपथ लिहून पत्र हेजिबाहांती पुढें पाठवून देणें. आम्ही सर्व प्रकारें तुमचें गोमटें करावयासी अंतर पडो नेदऊन. बहुत काय लिहिणे—

(शिक्का) मर्यादेयं विराजते ।
(शिक्का) प्रतिपच्चन्द्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववन्दिता
शाहसूतो शिवस्येषा मुद्रा भद्राय राजते ॥

□

६. पत्रसाहित्य

१. कागदपत्र आणि पत्रव्यवहार २. स्वराज्य देवब्राह्मणांचे विश्रामस्थान ३. पेशवेकुळात पुराणांचा व्यासंग ४. राज्यशासन आणि धर्मशासन ५. सीतेप्रमाणे 'गंगेवर' ही अग्निदिव्याचा प्रसंग ! ६. पत्रांतून घडणारे व्यक्तिदर्शन ७. सत्तास्पर्धेचे बळी ८. सामान्यांचे असामान्य शौर्य ९. वीरांगनादेखील आघाडीवर १०. पत्रातील भाषेचे दुहेरी वळण ११. पत्रसाहित्यातील 'विश्वरूप-दर्शन' १२. समाज-जीवनाचे प्रतिबिंब.

१. प्राचीन मराठी गद्याचे स्वरूप समजून घेण्यासाठी आणखी एका साहित्यप्रकाराचा परामर्श घेतला पाहिजे : तो प्रकार म्हणजे पत्रसाहित्य. निरनिराळ्या व्यक्तींनी केलेल्या पत्रव्यवहारास साहित्याची प्रतिष्ठा अद्यापही मिळालेली नाही. पाश्चिमात्य राष्ट्रांत पत्रसाहित्य महत्त्वाचे गणले जाते. मराठी वाङ्मयात अद्याप या साहित्याचे मूल्य प्रस्थापित व्हावयाचे आहे. लोकमान्य टिळकांचे एक चरित्रकार साहित्याचार्य न. चिं. केळकर यांनी या साधनाचे महत्त्व ओळखून टिळक-चरित्राच्या खंडांतून लोकमान्यांना आलेली व त्यांनी लिहिलेली पत्रे परिशिष्टांत दिली आहेत. 'श्यामकांताची पत्रे' हा मराठी भाषेतला उल्लेखनीय पत्रसंग्रह आहे. अस्सल ऐतिहासिक साधनांचे संशोधन आणि संकलन करणाऱ्या इतिहास संशोधकांनी ऐतिहासिक कागदांबरोबरच ऐतिहासिक व्यक्तींची व त्यांच्या संपर्कात आलेल्या इतरांची पत्रे संकलित केली आहेत. या साधनांच्या आधारे काही संशोधकांनी केवळ पत्रांचे संग्रहदेखील संपादित केले आहे. तरीही या पत्रसाहित्यास अद्यापही स्वतंत्र अभ्यासाचे साधन या नात्याने आवश्यक ते महत्त्व आलेले नाही.

प्राचीन मराठी साहित्यापुरतेच बोलावयाचे झाल्यास हे पत्रवाङ्मय बरेच अफाट आहे. कित्येक पत्रे साहित्यगुणांनी नटलेली आहेत, तर कित्येकांतून तत्कालीन राजकीय,

सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा बोध होतो. व्यक्तिदर्शन घडविण्याचे सामर्थ्य असलेली अनेक पत्रे आढळतील. त्याचप्रमाणे समकालीन घटना मूर्तिमंत उभ्या करण्याचे कसवही काही पत्रांतून दिसून येईल. समकालीन इतिहासातले तुटलेले धागे-दोरे सांधणारी काही पत्रे निदर्शनास येतील त्याचप्रमाणे प्रचलित युगधर्माचे निर्देश करणारे लेखदेखील या सामग्रीत आढळतील. इतिहासाचे साधन या दृष्टीने या पत्रांचे महत्त्व तर वादातीत आहेच. गद्यसाहित्याच्या विकासाचे दिग्दर्शनही कित्येक पत्रांतून होते. म्हणूनच या साहित्याचा परामर्श घेतल्याविना प्राचीन मराठी गद्याच्या अभ्यासास पूर्णता येणार नाही.

केवळ प्रकाशित पत्रवाङ्मयाचाच विचार करावयाचा मनात आणले तरी ही सामग्री एवढी अफाट आहे की, तिचा संपूर्ण मागोवा घेता येणे शक्य नाही. तो एक स्वतंत्र संशोधनाचा आणि ग्रंथाचा विषय ठरतो. तथापि, विषयास पूर्णता आणण्याच्या दृष्टीने या साहित्याची अगदी धावती तोंड-ओळख करून देण्याचा प्रयत्न करण्याचे योजिले आहे.

२. बखर साहित्याचे समालोचन करताना धर्मरक्षणाची प्रेरणा हे या साहित्याचे निर्मिति-प्रयोजन असल्याचे सप्रमाण प्रस्थापित करण्यात आले आहे. ही प्रेरणा पुराणांचा घाट घेऊन गद्यरूपात प्रकट झाल्याचे विवेचनही या प्रकरणी आले आहे. स्वराज्य आणि धर्मरक्षण यांची एकरूपता हा केवळ चरित्र-आख्यानपर बखरींचे लेखन करणारांचा ध्येयवाद होता, असे समजण्याचे कारण नाही. ती युगधर्माची प्रेरणा होती असे काही पत्रे अभ्यासली असता निदर्शनास येईल.

स्वराज्याच्या सत्त्वपरीक्षेच्या काळात छत्रपती राजाराम कर्नाटक प्रांती राहून राज्यकारभार पहात असताना रामचंद्रपंत अमात्य महाराष्ट्रात राहून छत्रपतींच्या वतीने शासन-व्यवस्था पहात असत. डिचोलीकर देसाई मोगलांचा पक्ष सोडून स्वराज्यास मिळाले. त्यांनी छत्रपतींना दिलेले निवेदन अमात्यास पाठविण्यात आले. या निवेदनातला काही भाग असा :

> " ....आपला बाप नारबा सूर्यराउ यांणी विचार केला. महाराज स्वामी कर्नाटक प्रांती आहेती. फौजा पाठवून मोगलास मारून काढीत आहेती. **स्वामींचे राज्य देवाब्राह्मणांचे विश्रामस्थान** म्हणून आपण स्वामीचे पायापाशी येकनिष्ठ होऊन जाऊन स्वामीस विनंती करोन आपले वतनाचे विले करून घेऊन सेवा करून दाखउन...."

हे पत्र शके १६१३ मधील असून शिवचरित्र साहित्याच्या आठव्या खंडात प्रसिद्ध झाले आहे.[1] याच काळात खंडो बल्लाळ यांनी छत्रपतीच्या वतीने बाजी सर्जेराव देशमुख यास पाठविलेले पुढील पत्रदेखील या ध्येयवादाची साक्ष देणारे आहे :

> " **हें महाराष्ट्र राज्य आहे** तुम्ही या राज्याची पोटतिडिकी धरिता तरि ये

प्रांते जितकी राजकारणें आहेत त्यांची चाळणा करून आपण जमाव करून आपण सावध राहोन स्वामिकार्य दृष्टीस पडेल तें मनास आणून हस्तगत करून ठेवणे, हुजूर लेहून पाठविणें....

तरि तुम्ही आपली खातरनिशा राखोन स्वामींच्या पायाशीं एकनिष्ठता करून स्वामिकार्य साध्य होय ते गोष्ट करणें. गनिमाचा हिसाब काय आहे ? गनिमाला तुम्ही लोकीं केला आहे. ते तुम्हीच लोक या राज्याची पोटतिडिक धरिता तेव्हा औरंगजेबाचा हिसाब धरीत नाहीं.... औरंगजेबाने महाराष्ट्र लोक आहेती त्यास मुसलमान करावें ऐसें केलें आहे.... ईश्वर करितो तरि फत्तेच आहे.... लिहिल्याप्रमाणे हिंमती धरणें. "[२]

छत्रपती राजाराम यांनी पाठविलेल्या आणखी एका पत्रात याच ध्येयवादाची पुनरुक्ती आढळते :

"तुम्ही या देवब्राह्मणांच्या राज्याची अभिवृद्धी करावी आपला नामोश करून घ्यावा या गोष्टीची उमेद धरिली आहे.... **हे राज्य तुम्हां लोकांचे आहे.**"[३]

स्वराज्य साम्राज्याच्या दिशेने वाटचाल करीत असतानाही समाजात 'हिंदुपदपातशाहीची' धारणा जागृत होती. वसईच्या लढाईच्या निमित्ताने झालेला पत्रव्यवहार पेशवे दप्तराच्या १६ व्या खंडात आला आहे. या खंडातील कित्येक पत्रे या ध्येयवादाचा पुनरुच्चार करणारी आहेत. वसईच्या हिंदूंच्या वतीने पेशव्यांना सादर केलेल्या निवेदनात (२१-२-१७३५) पुढील विनंती आली आहे :

".... नंतर हिंदू धर्म राहात नाहीं. याकरिता देवब्राह्मण स्थापन करून **हिंदूधर्म** रक्षणा होऊन येश स्वामींचे पदरी पडे यैसा समय हाती आहे-**तेथें धर्मस्थापन** झालें पाहिजे. "[४]

या मोहिमेचा यशस्वी शेवट झाल्यानंतर चिमाजी अप्पास लिहिण्यात आलेल्या एका पत्रात (२५-५-१७३९) पुढील मजकूर आढळतो :

"...वसई फत्ते केली यापेक्षा श्रीकृपे महत्कार्यें होऊन **हिंदूराज्याचे संस्थापन** स्वामींचे हातून होतील.... वसई प्रसंग म्हणाल तरी हस्तगत होईल यैसा भरवसा कोणासही नव्हता.... स्वामीचा पराक्रम गगन भेदून गेला...."[५]

धर्मसंस्थापनेच्या पाठोपाठ अवतारांची कल्पना अपरिहार्यपणे येते. चरित्र-आख्यानपर बखरीतदेखील ही कल्पना आली असून तिचे विवेचन अगोदर येऊन गेले आहे. वसईच्या युद्धाशी धर्मसंस्थापना संलग्न होती, तशीच या युद्धाचे यश हे अवतारी पुरुषांचे कार्य होय अशी प्रतिक्रियाही अनेक पत्रांतून व्यक्त झाली आहे.[६]

स्वराज्यास आधारभूत असलेला ध्येयवाद अगदी शेवटच्या काळातदेखील समाजाच्या स्मरणात होता असे तंजाऊरच्या भोसले घराण्याच्या वतीने इंग्रजांना सादर

करण्यात आलेल्या निवेदनात पुढील उल्लेख आढळतात. हे निवेदन इ.स. १७८७च्या पूर्वीचे असावे.

> " पूर्वी म्लेंच्छाचे प्राबल्य होऊन प्रलयकाली पाणी येऊन सर्व प्रपंच बुडून गल्यासारखे सकल देशही म्लेंच्छ यांनीं आक्रमून सर्वत्राचा नाश करून सकल धर्महि बुडविलें. त्यापूर्वी व त्या म्लेंच्छाक्रांतांत देखील आमचे हिंदुराज्य आम्हांस कायम होऊन चालिलें.... यांपैकीं महाराज राजेश्री शिवाजी राजे क्षेत्रपति दिल्लीचे दावेदार म्हणून प्रसिद्ध अत्यंत शूर बहुत प्रबल होऊन तैशा म्लेंच्छाक्रांतादेखील **हिंदूधर्म स्थापून** मूर्धन्ये कडून बहुत देशास अधिकारी होऊन ह्या प्रांतावर राज्यभार करीत होते. " [७]

बखरकारांनी अवलंबिलेला ध्येयवाद तत्कालीन सामाजिक भावनेचाच प्रतिध्वनी होता असे वरील पत्रे अभ्यासिली असता निदर्शनास येईल.

३. बखर साहित्याचे विवेचन करताना या वाङ्मय-प्रकारावर झालेल्या पुराणांच्या संस्कारांचे विवरण येऊन गेले आहे. पुराणोक्त धर्माचा पगडा तत्कालीन जनमानसावर होता असा निष्कर्षही या संदर्भात देण्यात आला आहे. पत्रसाहित्यातदेखील या निष्कर्षास पोषक असे आधार सापडतात. पेशव्यांच्या घराण्यात पुराणसाहित्याचे अध्ययन आस्थेने होत असे, असे पेशवे दप्तरात समाविष्ट असलेल्या कित्येक पत्रांवरून आढळून येते. नानासाहेब पेशवे यांची आजी राधाबाई हीस पत्र लिहिणाऱ्या संभाजी जाधवाने त्यांना आदिपर्वाची एक प्रत पाठविली असून ती सावकाशीने परत करावी असे लिहिले आहे.[८] नानासाहेब पेशवे यांच्या आज्ञेवरून ब्रह्मवैवर्त पुराणाचा शोध अनेक ठिकाणी घेण्यात आल्याचे नारोशंकर एका पत्राद्वारे कळवितो. (इ. स. १७५८) रघुनाथराव दादा यांना पाठविलेल्या एका पत्रात लष्करातून पोथ्या आणल्याचा उल्लेख आहे. दुसऱ्या एका पत्रात रामायणाची नक्कल होत असल्याची माहिती आहे. अंताजी नारायण याने लिहिलेल्या दुसऱ्या एका पत्रात पद्मपुराणाच्या सरकारात व इतरत्र असलेल्या पृष्ठसंख्येची नोंद करण्यात आली आहे. पानिपतवर पराक्रमाची शर्थ करणाऱ्या सदाशिवराव भाऊंचे एक पत्र त्यांच्या पुराणाध्ययनाची साक्ष देणारे आहे :

> " ....पोथ्या पाठविल्या त्या पावल्या. महाभारताच्या पोथ्यांप्रमाणे विराट पर्व राजश्री विश्वासराव याजवळ आहे म्हणून लिहिले. परंतु मना आणता येथें त्याजपासी नाहीं. वास्तव त्याचा शोध करून कोणी येईल त्याजबरोबर मजबूदीनें बांधून पाठविणें.... हरिवंशाची तीस पत्रे तीर्थस्वरूप राजेश्री नानासाहेबसमागमें आहेत ती पुणियास येतील. आलियाउपरि ती तीस पत्रे विराटपर्वाच्या पोथीत बांधून पाठविणें... " [९]

१७५० च्या सुमारास लिहिलेल्या या पत्रावरून पेशवेकालीन योद्धयांचे तरवारीप्रमाणेच महाभारत व पुराणे यांवर प्रेम होते असा अंदाज बांधणे चुकीचे ठरणार नाही.

४. राज्यशासन आणि धर्मशासन यांचे संबंध मराठ्यांच्या राजवटीत कोणत्या स्वरूपाचे होते याची माहिती देणारी अनेक पत्रे निरनिराळ्या संग्रहांतून आढळतात. प्रशासन अपराध्यांना तत्कालीन कायदेकानूप्रमाणे योग्य ती शिक्षा करीत असले तरी त्यातून निर्माण होणारे धार्मिक गुंते मात्र क्षेत्रस्थ धर्मपीठांनी धर्मशास्त्रानुसार सोडवावेत अशी शासनाची अपेक्षा असे. शासनानेच पुढाकार घेऊन कित्येक प्रकरणे धर्मपीठांकडे पाठविल्याची माहिती निरनिराळ्या पत्रांवरून मिळते. शके १६५६ त संभाजी आंग्रे यांनी असेच एक प्रकरण कराडच्या ब्रह्मवृंदाकडे सोपविले होते. प्रकरण बलत्काराचे. कायद्याने अपराध्यास देहदंडाची शिक्षा झाली. परंतु समाजाने बलत्कारीत स्त्रीस वाळीत टाकले—

> " येशो पुरुषोत्तम पळसुरा वास्तव्य मौजे धोपेश्वर ता॥ राजापूर याची स्त्री बेनाम सावित्री आपल्या माहेरास जात होती. मार्गी मलिक अब्दुल्ला मुसलमान याणें बलात्कार करून अकर्म केले. हे वृत्त बायको मजकूरीनें आपले घरास येऊन स्वमुखें लोकांस सांगितलें. याची हकीकत हुजूर जंजीरे विजयदुर्गाचे मुक्कामी लेहून आली. त्यावरून मलिक मजकुरास आणून गर्दन मारिली. हाली बायको मजकुरीने येऊन विनंती केली कीं, आपणावरि त्याने बलात्कार केला. पुढें साहेब धर्मसंस्थापक आहेत. आपणास प्रायश्चित्त होऊन कुर्तीत सरती होऊन यथायुक्त विचार मनास आणितां महाक्षेत्र प्रसिध व समस्त शिष्ट महाक्षेत्री व संमतात योग ब्राह्मण यांचे संमतें प्रायश्चित्त देऊन कृतीस अधिकार व पंग्तीपावन व्हावया ब्राह्मणाचा विचार आहे असे म्हणउन हें पत्र तुम्हांस लिहिले आहे.[१०]

अशाच प्रकारचे पत्र पेशव्यांचे न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांना धर्मनिर्णयार्थ पाठविण्यात आले होते असे रामशास्त्र्यांनी दिलेल्या उत्तरावरून अनुमित होते. हे पत्र जेष्ठ शु. ५, शके १७०२ (७ जून १७८०) या दिवशीं रामशास्त्री यांनी लिहिलेले आहे—

> ' महादेवभट जोशी मौजे कड जळगाव पो. शेवगाव यानी विनंती केली की आपल्या बायकोने आपला दायाद ब्राह्मण विठ्ठल जोसी यांसि माझ्याकरवीं जीवें मारिलें सा॥ मी व माझे दायाद बहिष्कृत आहोत. मजला न कळतां माझे बायकोनें दुष्टकर्म केले. स्वामींनी कृपा करून आम्हां सर्वांस दोषरूप प्रायश्चित्त घेण्याची आज्ञा केली पाहिजे. म्हणौन ऐशास महादेव भट जोसी यांचे बायकोने बुद्धीपूर्वक विठ्ठल जोसी यासी जीवें मारविलें यास्तव तिजला पायाश्चित्त द्वादशाह पूर्वोत्तरान सहित संकल्प करावा. मग काशीयात्रा, रामेश्वर-यात्रा करून स्वग्रामीं येऊन उशरांगें करावीं. इचा प्रायश्चित्ताचा संकल्प केल्यानंतर महादेव भट जोसी व त्याचे दायादांस संसर्गानुरूप प्रायश्चित्त देऊन शुद्ध

करावें—"[११]

५. स्वतःचा काहीही अपराध नसताना सीतेलादेखील अग्निदिव्य करावे लागले. आधुनिक काळातल्या एका 'गंगेवर 'देखील असाच प्रसंग आला. त्याची माहिती देणारे हे पत्र (शके १७०८) :

" ....यमा बिन तुकमाळी याची स्नुषा गंगी शेतातून आपल्या घरास येत होती. त्यास मार्गी साका अतार हा तिजला झोंबला. तेंव्हा तिनें गलबला व महावाद्यें केलीं. तत्समईं मार्गाने वाटसरू जात होता. त्यानें गलबला श्रवण होताच तोहि तेथें आला. आणि अतार पळू लागला....तदनंतर माळीयानें तिजला वेगळे ठेविलें....चौकशी बदला जाले वर्तमान लेहून घेतलें. माळिण इनें सांगितलें की, आतार पद्रास झोंबला. व्यभिचार कर्म घडलें नाहीं....परंतु संशय निवारण व्हावयास पाहिजे....दिव्य पंचराञिचें नेमिलें. क्रियापत्र लेहून घेतलें आणि श्रावण शुद्ध पंचमीस दिव्य केलें. गंगी माळीण दिव्यातून खरी जाहलियावरून गंगीचा सन्मान केला.... "[१२]

ऐतिहासिक कागदपत्रांत अनेक प्रकार आढळतात. शासकीय पत्रव्यवहार, निवाडे, महजर, कौलनामे, वाटपपत्रे, शुद्धिपत्रे, दानपत्रे, बक्षीसपत्रे असे कितीतरी प्रकार सांगता येतील. शासनाशी संबंधित असलेल्या कागदपत्रांचे ७८ प्रकार असल्याची नोंद इतिहासाचार्य राजवाडे यांनी दिली आहे. याव्यतिरिक्त, कौटुंबिक पत्रव्यवहार, आश्रितांनी लिहिलेली पत्रे, युद्धाच्या आघाडीवरील वार्तापत्रे, राजकीय डावपेचांचे दिग्दर्शन करणारी, प्रत्यक्षाप्रत्यक्षरीत्या ऐतिहासिक व्यक्ती आणि त्यांचे स्वभाव वर्णन करणारी अशी कितीतरी मोलाची सामग्री प्रकाशित संग्रहांतून आढळून येते. सांप्रदायिकांचा पत्रव्यवहार हाही एक निराळा वर्ग या सामग्रीचा करता येतो.

अनेक लेखकांनी लिहिलेले हे कागद, शैली आणि विषय या दोहोंच्या बाबतीत विविधता व वैचित्र्य दर्शविणारे आहेत. यात पत्रलेखकाचे मनोगत आहे, राजकीय डावपेचांची चर्चा आहे, क्रूरनीतीचे पवित्रे आहेत, प्रसंगांची वर्णने आहेत तशीच युद्धांचीही. या साधनात मानवी स्वभावाचे अनेक नमुने आढळतील. वैयक्तिक जीवनातील आणि रणांगणावरील संघर्षातील पेचप्रसंग निदर्शनास येतील. प्रसंगपरत्वे अध्यात्म विवरण आले आहे तसेच क्रिया-शपथ आणि प्रतिज्ञा यांच्या घोषणाही आढळतील. प्रत्येक पत्राची भाषा निराळी, शैली वेगळी आणि घाटही स्वतंत्र. धर्मकारण, राजकारण, समाजजीवन यांचे दर्शन घडविणारी ही साधने महाराष्ट्राच्या समाजेतिहासाचे अत्यंत विश्वसनीय व अव्वल दर्जाचे साधन ठरते.[१३]

६. या साहित्याचा अत्यंत मनोवेधक भाग आहे व्यक्तींच्या भावना आणि स्वभावधर्म यांचे दर्शन घडविणाऱ्या पत्रांचा. त्यावेळच्या राजकारणात असलेल्या अनेक लहानथोर व्यक्तींचे स्वभाव आणि भावना प्रसंगांच्या अनुरोधाने अनेक पत्रांतून व्यक्त

झाल्या आहेत. अशा पत्रातून अनेक व्यक्तींची जिवंत चित्रे आपल्यासमोर उभी राहतात. त्याचप्रमाणे अनेक प्रसंग साक्षात् घडत असल्याचा प्रत्यय येतो.

अहमदनगरच्या किल्ल्यातून महाराणी येसूबाई यांनी चिंचवडच्या देवांना लिहिलेले हे पत्र पहा.[१४] छत्रपती संभाजी महाराजांच्या वधानंतर छोट्या शाहूसह महाराणी येसूबाई यांना औरंगजेबांच्या छावणीत ठेवण्यात आले होते. महाराणी येसूबाईसाहेबांना नंतर अहमदनगर येथे पाठविण्यात आले होते. नगरच्या निवासासंबंधी त्यांनी लिहिलेले हे पत्र :

'बहुत दिवस झाले. स्वामींनी आशीर्वादपत्र पाठवून बालकाचा परामर्श घेतला नाहीं. याकरितां चितास स्वस्थता होत नाहीं. तें एक देव जाणे. तरी स्वामींनी येणाऱ्या मनुष्याबरोबरी प्रतिक्षणीं आशीर्वादपत्र पाठवित गेले पाहिजे. विशेष आमचें वर्तमान तरी स्वामीपासीं सत्यच लेखन केलें पाहिजे. चिरंजीव दाजी तो पृथ्वीपतीसमागमें गेले. आम्हांस सार्वभौमाची आज्ञा जाली कीं, अहमदनगरास जावें. आज्ञेप्रमाणें आम्हांस अहमदनगरास घेऊन आले. येथें आलियावरी आज पाच मास जाले. परंतु खर्चाची बहुत तंगाई जाली. काय निमित्त तरि सार्वभौम दूर गेले. आमचा तनखा जो दिल्हा तेथें ताप्रांनी व हरिभक्तांनीं व काही काळाने करून प्रतिकूल जाली त्यामुळें येणें राहिलें. येथें अहमदनगरीं साहुकाराचे पाच-सात सहस्र ब्रह्मस्व जालें. आतां कोणी देत नाहीं. मागिलियाच पैकियास तगादे लाविले आहेत. त्यामुळें बहुत कष्टी होतों. तो दुःखसागर स्वामीस काय म्हणउन सांगावा....न जाणों. स्वामीच्या सेवेसि रायाजी जाधव पाठविला असे. तरी, महाराज कैलासवासी गेल्या तागाईत आपणांवरि हा कसाला प्राप्त जाला. **इंगळास ओळंबे लागले.** बरें, होणार भविष्य त्यास प्रयत्न काय आहे ? आतां एक स्वामीव्यतिरिक्त आणिक कोणाचा भरवंसा या समयास नाहीं. येक स्वामीच क्लेशपरिहार करतील. इतरांच्यानें कांही होणें नाहीं. तरी सारांश गोष्टीची कीं, ब्रह्मस्वापासून मुक्त केलियानें बहुत कीर्ति स्वामीची आहे. आणि पाऊसपाणी जालियावरी स्वामी ज्यापासून देववितील त्यास प्रविष्ट करू. परंतु हा समय आम्हांवरी कठिण पडला आहे. आपले कोणी येथे प्रतिपक्षी नाहीं. यैसा प्रसंग प्राप्त जाला आहे. याचें निवारण करणार स्वामी आहेत. माझी उपेक्षा न केली पाहिजे....विशेष लिहावें तरी आपण अज्ञान मूढ. असे लिहिता येत नाहीं. त्याहिवरि आपणाजवळि कोणही शाहाणा कारकून नाहीं. अवाक्षरीं क्षमा केली पाहिजे.... "[१४]

या पत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेतली म्हणजे काळजाला घरे पडल्यावाचून रहात नाहींत. 'विशेष लिहावें तरी आपण अज्ञान' असे महाराणीसाहेबांनी लिहिले असले तरी, या शब्दांत असलेले कारुण्य माणसाचे अंतःकरणात सहज भेदून जाते.

७. स्वराज्यावरील निष्ठा जेव्हा ओसरते तेव्हा देशाच्या रक्षणासाठी उपयोगी यणाऱ्या शक्तींना अनिष्ट वळण लागते आणि या ना त्या कारणाने सत्ता आपल्या हाती ठेवण्याची कारस्थाने होऊ लागतात. व्यक्तींचे माहात्म्य वाढते किंवा वाढविले जाते आणि देशाच्या कल्याणाचे केंद्र काही व्यक्ती वा व्यक्तिसमूह यांच्याभोवती असल्याचा आभास निर्माण केला जातो. सत्तास्पर्धा एकदा सुरू झाली म्हणजे ती कोणत्या थराला जाईल याचा अंदाज कोणीच बांधू शकत नाही. अशा काळात प्यादे आणि फर्जी यांच्या स्थानांची अदलाबदल होते. सद्‌गुण मातीमोल ठरतात आणि कवडी मोलाच्या व्यक्ती सिंहासनास विळखा घालून बसतात. इतिहास हा पुनरावृत्त होणारा असतो. त्यामुळे अशा घटना केवळ इतिहासकाळातच घडतात असे समजून निश्चिंत राहण्याचे कारण नसते. मराठ्यांचे राज्य-नव्हे, साम्राज्य-अस्तास जाण्याच्या काळात हेच घडले. उभ्या महाराष्ट्रालाच नव्हे तर (मराठ्यांची जरब या काळात भारतभर पसरलेली असल्याने) साऱ्या देशाला या कारस्थानाचे विपरीत परिणाम भोगावे लागले. अशाच एका प्रसंगाच्या निमित्ताने बारभाईंच्या कारस्थानाची माहिती पेशव्यांच्या दरबारी असलेल्या निजामाच्या वकिलाने कळविली आहे. ही माहिती देणाऱ्या विस्तृत पत्राचा आवश्यक भाग पुढे देण्यात येत आहे :

'सखाराम भगवंत यांसी व फडनीसासी प्राचीन द्वेष व परस्परें चित्तशुद्धता नव्हती. वैकुंठवासी माधवराव यांनी आपले उत्क्रमण समईं पंत मा॥ शाहणे व अजमुद्देकार याकरितां मदारुलमहामी सांगून नारायणराव यांस सखारामपंतांचे स्वाधीन केलें. सखारामपंतांनी नव महिन्यांत पन्नास-साठ लाख रुपये खजाना करून ऐंसी लाख रुपये कर्ज बाजीराव याजपासून सावकारी देणें होतें तें फैसल केलें रघुनाथराव यांसहि वै. माधवराव यांनी मुक्त केलें होतें व इतिफाकानें वर्तणूक करावी हे वसीयत होती. याकरितां रघुनाथरावांचे मनोरक्षण करून कारभार करीत होते. याची असाध्यता दुसरे कारभारी हरिपंत व फडणीस मंडळीस जाहाली व नारायणरावाचे बुधीस विपर्यास घालून रघुनाथरावास पुन्हा कैद करविलें. त्याजमुळें नारायणराव मारले गेले व पंतप्रधानांच्या दौलतीचा पाया खचला. त्याउपरि रघुनाथराव सदर मुख्तार जाले. याची असाध्यता सखाराम भगवंत व फडनीस व हरिपंत वगैरे समग्रास जाली. याकरितां समदुःखी होऊन परस्परास ऐक्यता केली व हजुराचा आश्रय करून, पंतप्रधानाची दौलत कायम करून श्रीमंत माधवराव पंतप्रधान याची दौलत स्थापिली. परंतु, कारभाराचे ईर्षेकरितां परस्परें हरयेकास चित्तशुधि राहिली नाही. हरपंतांनी फौजेचे कामाची सरबराई करून लोकांस इजाफे करुय सिपाही लोक आपले ममतेत आणिले व माळी यखत्यारी राजश्री व बाळाजीपंत नानाकडे. यास्तव सखारामपंतास असाध्यता जाली व हरपंताची व सखारामपंताची ज्यानी दुष्मनीप्रमाणें द्वेष वाढला. परस्परें काबू पाहू लागले....सखारामपंताचा संप्रदाय दुष्मणास आपले

अंकित करून थोडीसी जरब दाखवावी, सर्वस्वे त्याचा नाश न करावा. याकरितां बाळाजीपंतास राखिलें...."

परंतु हे धोरण बापूच्या जिवावर बेतले. कारण, महादजी शिंदे यास पाच लक्ष रुपये रोख आणि अखेरचा किल्ला देऊन नानाने त्यास आपलेसे केले आणि सखाराम-बापूस कैद केले. ज्या माणसाने अवघ्या नऊ महिन्यांत कित्येक दिवसांचे लाख रुपयांचे कर्ज निवारण करण्याइतकी कर्तबगारी दाखविली त्या माणसास केवळ राजकारण साधले नाही या 'घोर' अपराधासाठी मरेपर्यंत अंधाऱ्या कोठडीत जीवन कंठावे लागले. बापूच्या बंदिवासासंबंधाने हा पत्रलेखक पुढे लिहितो :

" काही दिवस पंत म॥ सिंहगडावर कैदेत होते. त्याउपरि कोकणात प्रताप-गडावर एक वर्षपर्यंत ठेविलें. तेथील आब हवा सखारामपंतास मानली व कारपरदानांनी केलें. परंतु, जिवंत सखारामपंत आहे, काही उपायेकरून सुटला तरि अनर्थ करील. याविषयी चिंता व हृद्रोग रात्रंदिवस होता. याकरितां कोकणांत रायगड म्हणून किला रघुनाथराव गजरे बाळाजीपंतांचे शालक प्रथम-संबंधीं त्यांचे स्वाधीन आहे व त्या गडावर वासुदेव भट कर्वे व बाळा दीक्षित कोण्ही शिष्ट ब्राह्मण यास ठेविलें होतें. त्यांनी परलोकप्रयाण केले व रायगडास कैद केल्यास सत्वरच स्वर्गास मनुष्य जाते, स्वर्गाचा मार्ग हे स्थळ जाणून.... रायगडावर कैदेत ठेविलें. पायात बेडी अहोरात्र. कोठडीस कुलूप. सेवेत दोघे माणसे; एक शूद्र आंधळा व बहिरा, एक ब्राह्मण मुका. सीतलोदकें स्नान व भक्षावयास जखिन्याचे मोठे तांदूळ. दिवसेंदिवस क्षीण प्रकृती होती. श्रावण त्रयोदशी गुरुवारीं सखारामपंतीं परलोक प्रस्थान करून शरीरत्याग रायगडीचे किल्ल्यावर केला. "[१५]

हे पत्र शके १७०३ चे आहे. बारभाईच्या कारस्थानाचे बारकावे या पत्रात उत्तम रीतीने व्यक्त झाले आहेत. सत्तेचा लोभ आणि स्वार्थ कर्तबगार व्यक्तींनादेखील कोणत्या थरावर नेऊ शकतात, याचे दिग्दर्शन या पत्राच्या आधारे होण्यासारखे आहे. राहूग्रस्त मार्तंड किंवा अस्तमानीचा सूर्य यांसारखे सखारामबापूंचे शेवटचे दिवस या पत्रात आले आहेत.

८. या उलट, स्वराज्याच्या काळातील काही आगळ्या व्यक्तिमत्त्वांचे दर्शन घडविणारी व्यक्तिचित्रेही पत्रसाहित्याने जपून ठेवली आहेत. माहिमच्या लढाईचे वृत्त चिमाजी आप्पास कळविणारे शंकरजी केशव याने लिहिलेले एक पत्र पेशवे दप्त-राच्या १६ व्या खंडात आले आहे, ते लक्ष वेधून घेणारे आहे. पत्र युद्धाच्या आघाडी-वरून लिहिलेले आहे. पत्र-लेखकाचा भाऊ लढाईत मारला गेला. त्याचे शव समोर पडलेले. त्याची उत्तरक्रिया करण्यापूर्वी हा शिपाई प्रथम धन्याला वार्तापत्र लिहितो. हेदेखील एक आगळेच शौर्य मानले पाहिजे. 'झाल्या आघाताने खचून स्वामी-कार्यात

अंतर पडणार नाही' असे आश्वासनही आपल्या धन्यास तो याही परिस्थितीत देतो, हे विशेष :

> "....मोर्चे धरून लोक जुजो लागले. त्यास तीर्थरूप दादा गाचे मोर्चियावरि अडीच हजारे माणूस चालोन आले....फिरंगी नीटच दादाचे मोर्चियावरि आला. त्यास यार्णी मोर्चा सोडिला नाहीं. त्यास जवळि मोर्चेयामध्ये मुरतकर अरब होते त्यार्णी शकटभेद करून फिरंगियास भेटले. दादा व....यैसे पडिले.... तीर्थरूप दादा पडिले म्हणोन आपण काही आब टाकून स्वामीकार्यास अंतर करितो यैसे नाही. स्वामीचें पुण्य समर्थ आहे, त्यास फिरंगियाचा हिसाब करीत नाही. यावरि हर कोठे येथे अगर जंजिरे आरनालियास येईलच. आलियावरि ठेचगा देतच आहोंत."[१६]

असामान्य माणसांच्या सामान्य कृतींची सुद्धा नोंद इतिहासात होत असते. परंतु सामान्यांनी दाखविलेले असामान्यत्व शोधावे तेव्हाच निदर्शनास येते. अशाच सामान्य माणसांनी दाखविलेल्या असामान्यत्वामुळेच मराठ्यांचा जरीपटका मानाने डौलत राहिला. स्वराज्याविषयी आणि स्वराज्याच्या नेतृत्वाविषयी निःसीम भक्ती जोवर सामान्यांच्या अंतःकरणात जागती होती तोवर जरीपटका अजिंक्य ठरला. हाताच्या चिंध्या आणि छातीची चाळणी होईपर्यंत ध्वजावरची मूठ या वीरांनी सैल होऊ दिली नाही. अशा खंबीर मुठीतच स्वराज्याचे बलस्थान होते, या बाबतीत स्त्रियांनीदेखील पुरुषांच्या बरोबरीने, क्वचित् 'काकणभर' अधिक पराक्रम गाजविला आहे. याबाबत लक्ष्मीबाई आंग्रे या वीरमातेची व वीरपत्नीची काही पत्रे बरीच उद्‌बोधक वाटतात. पहिल्या बाजीरावाच्या काळात जंजिऱ्याच्या आरमारी लढाईचे नेतृत्व करणाऱ्या या रणदेवतेने लिहिलेली पत्रे वाचली म्हणजे तिचे शौर्य आणि स्थितप्रज्ञवृत्ती यांच्यापुढे माणूस सहजच नतमस्तक होतो.

९. जंजिरा आणि सिद्दी हे शिवछत्रपतीच्या काळापासूनचे मराठ्यांच्या राज्याचे पोटशूळच. त्यातून कधी निजाम, तर कधी इंग्रज आणि काही प्रसंगी कोल्हापूरकर-देखील सिद्दीचे पाठीराखे बनत. त्यामुळे ऐन पोटात जडलेला हा रोग बळावत असे. इ. स. १७२९ च्या सुमारास या रोगाने अशीच उचल खाल्ली आणि स्वतः शाहू महाराजांनी सिद्दीचा बंदोबस्त करण्याची आज्ञा दिली. सिद्दीशी दोन हात करावयाचे म्हणजे आरमार सज्ज पाहिजे. सेखोजी आंग्रे याने याबाबत भरपूर तयारी केली. एका बाजूने वाटाघाटीही चालू राहिल्या. या कालावधीत सेखोजी आंग्रे निधन पावला. त्याच्या मृत्यूबद्दल शोक आणि सांत्वन करणारे पत्र पहिल्या बाजीरावाने सेखोजीची आई लक्ष्मीबाई हीस पाठविले. सांत्वनपर पत्रास या मातेने दिलेले उत्तर असे :

> "चिरंजिवांनी परमपदवास केल्यानु अन्वयें समाधान विशई लेख केला व लोकांची समाधानें करावीं इत्यादिक लेहून पाठविलें. यैशास होणार प्रसंग ते

समई ते होतच आहे. ते गोष्टीचा खेद अवलंबिलियानें निधी काय? दुखाचें परिमार्जन करून पूर्वीपासून लौकिक संपादन केला आहे. त्याचें संरक्षण करावें हाच स्वधर्म आहे. यास्तव पुत्रशोक दुःख अपहरून तमाम किल्लोकिला व मुलकामधें जागजागा जमाव आहेत त्यांस समाधानपत्रे पाठवोन अवलियांचे मनोधारण केलें असे. आपण चिंता न करावी....येथील आरमारही तयार करविलें आहे."[१७]

हे पत्र ३-९-१७३३ या दिवशी लिहिलेले. यानंतर दोनच दिवसांनी लिहिलेल्या एका पत्रात याच लक्ष्मीबाईंनी मोर्चे आणि मारे कसे चालले आहेत यासंबंधी माहिती दिली आहे. ९-९ १७३३ च्या पत्रात मात्र या माऊलीच्या दुःखाचा बांध थोडाफार सुटल्यासारखा वाटतो. बाजीरावास लिहिलेल्या पत्रात तिचा संयम तेवढा राहिला नाही. तरीही भविष्यकाळासंबंधीचा उद्दाम विश्वास या पत्रात व्यक्त झाला आहे. ती लिहिते :

'चिरंजीव संभाजी आंग्रे यास भेटीस रवाना करावें. उभयपक्षीं भेटी गोष्टी होऊन पहिल्याप्रमाणें किंबहुना ततोप्यधिक परम सौरस्य चालून पुढे मनसुबियाचा विचार होऊन शत्रू पादाक्रांत करावे या अन्वयें विशदपूर्वक लेख केला. यैशास कैलासवासी सरखेल यामागें तुम्ही चौथे पुत्र चारी दिशाधिपती पूर्वील यशकीर्तीची अभिवृद्धि दिनप्रतिदिनीं होऊन शत्रू पराङ्मुख होतील. यैसें निश्चयात्मक मानून गत शोकाचे अपहरण करून संतोषरूप होतों. त्यांत श्रीने अकस्मात् मोठासा घाला घातला. केवळ दुःखाचे पर्वत प्राप्त जाले. भवितव्यानुसार होणार तें जाहालें. कैलासवासी तुम्हां वडिल होते. हरयेक लेकूरपण तुमचें चालवीत होते. तो वडिलपणाचा टिळा तुम्हांस आहे. भलतेसे लळे चिरंजीवांचे पाळावे उचित आहे. वरकड तुम्ही उभयताही एकचित्त असोन शत्रू पादाक्रांत करून लोकोत्तर कीर्ति उत्तम संपादून घ्यावी हेच श्रीजवळ अहर्निश इच्छित असो."[१८]

या लहानशा पत्रात भावना किती विविध आहेत. पुत्राच्या निधनाने पतीच्या स्वर्गवासाचे दुःख ताजे होते. तरी हताश न होता राहिलेल्या पुत्रांसही बाजीरावाच्या वसंगळी घालून लक्ष्मीबाई शत्रूस पादाक्रांत करण्याची स्वप्ने पाहते. पराक्रमी स्त्री-पुरुषांच्या अशा कितीतरी स्वभावरेखा पत्रसाहित्यात विखुरलेल्या आढळतील.

१०. अशी पत्रे वाचताना एक शंका मनाला स्पर्श करून जाते : 'बखरी सजविल्या' असा शब्दप्रयोग पुष्कळदा कानावर पडतो. ही सहजस्फूर्त आणि ओजस्वी पत्रे वाचताना शंका येते : खरोखरच बखरकारांना आपले लेखन प्रयत्नपूर्वक 'सजवावे' लागले असेल काय? पराक्रमाने भारलेल्या वातावरणात वावरणारे लेखक आणि इतरही अनेक लोक पराक्रम जगत होते. या कलमबहाद्दरांपैकी कित्येकांचे हात

समशेरीलाही लागले असतील. अशा वातावरणात वाल्मीकीच्या शोकाने श्लोकरूप धारण करावे अथवा अर्थाने ज्ञानेश्वरांच्या बोलाची वाट पहावी, त्याप्रमाणे या लेखकांची वाणी प्रकट झाली तीच अर्थालंकाचे सौंदर्य घेऊनच.

पत्रसाहित्याच्या भाषेच्या स्वरूपात मात्र एक मनोरंजक संगती आढळते. राज्यकारभारविषयक पत्रे फारसीबहुल आहेत, तर इतर पत्रे भाषेच्या दृष्टीने वेगळी पडतात. शिवकालापासून पेशवेकालापर्यंतच्या कालावधीत मराठी भाषेच्या स्वरूपासंबंधी विद्वानांनी व्यक्त केलेल्या मतांचा पुनर्विचार त्यामुळे आवश्यक ठरतो. एकच पत्रलेखक राजकारणासंबंधी लिहितो तेव्हा त्याची भाषा निराळ्या वळणांनी धावते, तर तोच लेखक प्रापंचिक वा अन्य बाबींसंबंधी कथन करतो तेव्हा त्याची भाषा संस्कृताचे वळण घेऊन प्रकट होते. 'पुणे अखबार' या ग्रंथातून उद्धृत केलेले पुढील दोन उतारे या वैशिष्ट्याची साक्ष देतील :

पेशव्यांच्या दरबारी असलेला निजामाचा वकील हैबतराव गोपाल याने लिहिलेले पहिले पत्र राजकारणविषयक असून दुसरे वैयक्तिक प्रश्न धन्याच्या कानावर घालणारे आहे :

> "मगर या बोलण्याचे मसलातीत जिवाजी रघुनाथ व गोविंदराव भगवंत यास हरगीज शरीक न करावा. हरसुरत हे दोघे शरीक मसलत जाहाले तरी गोविंदराव फार तरार आहे. हुजुरीहून इरषाद जाहाला त्याचा जबाब रावजीस बोलू न देता आपण हजरत करीषा करून बोलेल....ज्या चालीत हुजूरचा नफा व पंतप्रधानाचे दौलतीचा बंदोबस्त त्या चालीवर आम्ही चालतो. येक खावंदाची नौकरी व हुजूरची फिदवियन आम्हांस मंजूर आहेत...इप्तदापासून फिदवीस कावूच्या लोकांची बेइमानी ठाऊक आहेत व हूजूरतर ऐना जहानुमा आहेत. हरयेक उमदा व गरीब सर्वांची चाल रोशन आहे. याप्रमाणें फिदवीने अर्ज केला हे तकसीर माफ व्हावी. हे उमेद व फिदवीचा ओहदा खबरसाईचा याकरितां जुरत करून अर्ज केला...."[१९]

हाच लेखक स्वतःच्या वैयक्तिक अडचणी आपल्या धन्यापुढे मांडतो त्यावेळी त्याची भाषा फारसी वळण टाळते :

> 'खेड व बीड प्रांतीं दीड मण किंवा सवा मण, मापो सोळा-वीस पायल्यांची धारणा व सासवड व पुण्यात पाच-सहा पायल्या. त्रिगुण अंतर पडते. खर्च भारी. इतके समुदायाचा निर्वाह होणे कठिण. परंतु चार वर्षे समाप्त होऊन पाचवें लागलें. लेकी, सुना व बंधूची भेट नाहीं....वर्षास एक महिना घरास जावयाची परवानगी जाहलियास फार उपयोगी. परंतु गतवर्षी स्वामींनी यजमानास अर्ज केला. त्यांनी आज्ञा दिली नाहीं. पुन्हा विनंती किमर्थ करावी ? सेवा म्हणिजे शरीराचा विक्रय. त्यास उपाय काय ? सारांश, यजमानाचे अन्न

भक्षून त्याचे सेवेत एकनिष्ठ राहिल्यास सर्व सुख व भूषण आहे. या निश्चयावर येक सेवा मुख्य करून इतर सुखें त्याचे योगें जाणून निश्चित व संतोषवृत्ति आहे. सविस्तरें वर्तमान स्वामीस विदित आहेच. पुन्हा ध्यानारूढ व्हावें याकरितां विनंति लिहिली आहे. "२०

हैबतराव गोपाळ निजामाच्या इलाक्यात राहणारा म्हणून त्याची भाषा फारसीमय आहे असे मानावे तर त्याच्या दुसऱ्या पत्रातील संस्कृतप्रचुर भाषेची संगती लागत नाही. भाषा व्यक्तिपरत्वे व कालपरत्वे बदलत असते, कालाच्या ओघात काही परिवर्तनेही घडतात, हे सामान्यपणे खरे असले तरी एका कालखंडातील भाषा स्थूल-मानाने सारखी असते आणि एकाच लेखकाच्या भाषेत तर बदल घडतच नाही. हैबतराव गोपाळ याच्या दोन पत्रांतील भाषेच्या विभिन्नतेचा अर्थ एवढाच की, दरबारी व तत्सदृश पत्रव्यवहारात योजण्यात येणाऱ्या भाषेचा डौल यावनी शब्दांनी भारदस्त करण्याची प्रवृत्ती असावी. तसा संबंध नसल्यास लेखकाच्या कुवतीप्रमाणे फारसीमिश्र अथवा संस्कृतप्रचुर भाषेचा उपयोग होत असावा. उभयपक्षी, अपवाद मात्र गृहीत धरावे लागतात. तसे नसते तर सौंधच्या राजाने पहिल्या बाजीरावास लिहिलेल्या पुढील पत्रास एखाद्या संस्कृत पंडिताने केलेल्या लेखाचे स्वरूप आले नसते :

"त्यानंतर गोसावियांनी परिपूर्ण दया करून प्रेषिलें पत्र प्रविष्ट होऊन परम हर्षायमान जाहलों. पत्रार्थ जे आमचे सर्वाभिमान आपणांस पावले आहे म्हणोन. तरि गोसावियासि अति बंधुत्वादि सौजन्य व्रत गोसावियोस सहज स्वाभाविकच. आतां हे गुणप्रकाश होवे याकरितां आम्ही केवळ आर्तांचे अनाथ होऊन गोसाव्याचे गुणावलोकन प्रभा आम्हांवरि विराजमान होऊन....आमचे सुख-दुःखाची परामर्ष करवाऊन आमचे आर्तत्व दूर करून साभिमानून पुढें आमची स्थापना करावयाची तैसेंच आचंद्रार्क उधार करावयाचे याची ममत्व अभिप्राउ पत्रीं व हेजीब मशारनिल्हेचे मुखवचन आपुलें वाक्य यैसें म्हणून प्रेषिलें. यास ये समये आम्ही सर्वस्वें रिक्त होऊन गोसावियास शैशवरूपीं ओटींत पडलों आहोंत....गोसावी आमचे साभिमान अंगीकार केलें यास 'न भवति पुन-रुक्तिर्भाषितं सज्जनानाम्' यैसें नीती रीती स्ववाक्यें सिद्धांत करावयास गोसावी सत्यसंकल्प आहा." २१

११. मराठी पत्र साहित्य म्हणजे एका अर्थाने विश्वरूप-दर्शनच म्हणावे लागेल. कृमीकीटकांपासू ते श्रेष्ठ अशा धनुर्धरापर्यंत सर्वांचाच अंतर्भाव विश्वरूपात अर्जुनाला दिसून आला. त्याप्रमाणेच अगदी सनदी कागदापासून ते साहित्यगुणाने अलंकृत झालेल्या लेखापर्यंत नानाविध सामग्री या साहित्यात आढळेल. एका अर्थाने या साहित्यास कल्पवृक्षही म्हणावयास हरकत नाही. ज्याची जी दृष्टी असेल त्यास आपापल्या अवलोकांप्रमाणे फलप्राप्ती अवश्य होईल. मात्र या फलप्राप्तीसाठी तप

बरेच करावे लागते. शंभरात एखादा कागद आपणास महत्त्वाचा असा आढळण्याची शक्यता असते. परंतु ९९ कागद वाचल्यानंतर १०० वा कागद चांगला निघतो यात शंका नाही. या विस्तारात नाना रसांचे सागर नसले तरी सरोवरे मात्र आहेत. मानवी स्वभावाची कितीतरी विविध चित्रे यांत सापडतील. पराक्रमाच्या, हर्ष-विषादाच्या लहरी अंतःकरणात उत्पन्न व्हाव्यात असे कितीतरी जलाशय आणि शीतल वात या साहित्यातून वाहताना जाणवतील. समाजकारण, राजकारण, धर्मकारण, विशेषकारण अशी अनेक 'कारणे' या पत्रसमूहात दिसून येतील, अर्थात् दृष्टी असेल त्यांनाच.

१२. कोणत्याही विशिष्ट कारणातून निर्माण झालेली प्राचीन गद्याची परंपरा पत्रसाहित्यात आढळणार नाही. तरीही भिन्न काळात भिन्न पात्रांतून मराठी गद्य कसे प्रवाही बनले होते याची साधारण कल्पना पत्रसाहित्याच्या या ओझरत्या परिचयावरून यावी. अनेक लेखकांनी निरनिराळ्या काळांत लिहिलेल्या पत्रसाहित्यात पेशवेकालीन पत्रे अधिक आढळतात. पेशवे दप्तराचे साक्षेपी संशोधन ब्रिटिश राजवटीच्या काळात झाले हेही त्याचे एक कारण असू शकेल. शिवकालीन कागदपत्रांचे प्रमाण त्यामानाने कमी असून उपलब्ध कागद तक्सीमनामे, वतनदारीची कागदपत्रे, कौलनामे अशाच स्वरूपाचे आहेत. शिवपूर्वकालीन कागदपत्रे त्यामानाने कमी आहेत. ही सामग्री अभ्यासताना त्या त्या काळातील सामाजिक जीवन, धार्मिक चालीरीती, इत्यादिकांसंबंधी कल्पना करता येते. बखरसाहित्यात दिसून येणारे वास्तव आणि आदर्श समकालीन जीवनातून आलेले आहेत हेही या निमित्ताने ध्यानात येते. बखरकारांची धर्मविषयक भावना, त्यांना पुराणवाङ्मयापासून मिळालेली प्रेरणा आणि त्यांनी पुरस्कारिलेला धर्मरक्षणविषयक ध्येयवाद हे सर्व विखुरलेल्या स्वरूपात प्रत्यक्षाप्रत्यक्षरीत्या पत्रसाहित्यातून आढळतील. म्हणजे एका अर्थाने स्वराज्याच्या उदयकालापासून ते स्वराज्याच्या अंतापर्यंतच्या कालखंडात वावरणारा सुबुद्ध वर्ग ज्या आशाआकांक्षांनी भरलेला होता त्याचेच चित्रण बखरकारांनी केले आहे असे दिसून येते. पत्रसाहित्याच्या या ओझरत्या परिचयावरून काढलेला हा निष्कर्ष निराधार ठरू नये.

समाजातील महत्त्वाकांक्षी आणि कर्तबगार व्यक्तींच्या समजुतींना आणि विचारांना ग्रंथलेखनाच्या एका विशिष्ट परंपरेत बखरलेखकांनी बसविले आहे. समाजात अंकुरित झालेल्या स्फुल्लिंगांना प्रज्वलित करण्याचे कार्य बखरकारांनी केले असून उत्तरकालीनांना स्फूर्तिप्रद वाटेल अशी सामग्री त्यांनी निर्माण करून ठेवली आहे. मूळ जीवनातीलच धग थंडावली तेव्हा बखर साहित्यातील स्फूर्तिप्रदता ओसरून या साहित्याला केवळ पारंपरिक स्वरूप प्राप्त झाले. महाराष्ट्राच्या आणि बखरसाहित्याच्याही जीवनातील हे चढ-उतार अभ्यासण्याला पत्रसाहित्याचा बराच उपयोग होऊ शकतो.

□

टीपा

१. **भाइत्रं**, वर्ष २३, अंक ४.

२. सरदेसाई गो. स. व इतर (सं.), **ऐतिहासिक पत्रव्यवहार**, पृ. ४३.

३. दीक्षित-खोबरेकर (सं.), **मराठेकालीन प्रसिद्ध कवींची हस्ताक्षरयुक्त पत्रें**, पृ. ६२.

४. **पेशवेदप्तर**, खंड १६, पृ. १३३.

५. **तत्रैव**, पृ. १३६.

६. " देवा ब्राह्मणांची संस्थापना करावयासाठींच स्वामींचा अवतार आहे. " " ज्या गोष्टी घडावयाच्या त्या घडोन आल्या तस्मात् स्वामी उभयेता परब्रह्म व कलयुगामध्यें अवतारच आहेत. ऐसी कार्यें मनुष्यापासून व्हावी यैसें नव्हे. तपस्वी आहेत त्यासच स्वामींची स्वरूपे कळली आहेत....गौळियास श्रीकृष्ण मनुष्यच दिसत होता. "

पेशवेदप्तर, खंड १६, पृ. अनुक्रमे १३१, १३३.

७. **भाइत्रं**., वर्ष १२, अंक २.

८. **पेशवे दप्तरातून निवडलेले कागद**, खंड १८, पत्रक्रमांक ७८ ते ८१.

९. **पेशवे दप्तरातून निवडलेले कागद**, खंड १८, क्रमांक ८४.

१०. **भाइ.**, शके १८३७, पृ. ८३-८४.

११. **मराठेकालीन प्रसिद्ध कवींची हस्ताक्षरयुक्त पत्रें**, पृ. २९४-२९८.

१२. **भाइ.**, शके १८३७, पृ ९७.

१३. धार्मिक श्रद्धेवर आधारलेल्या अनेक कथा बखरसाहित्यात आढळतात. या किती विश्वसनीय मानावयाच्या हा आजचा प्रश्न आहे. परंतु या साहित्याचे लेखन झाले त्या काळात त्या समाजात रूढ होत्या. राज्यकर्तेदेखील अशा श्रद्धांचा मान राखीत असत. देवादिकांच्या उत्सवासाठी दिलेली इनामे व इतर उत्पन्न, साधुसंतांच्या समाधींचे उत्सव चालविण्यासाठी करून देण्यात आलेले उत्पन्न हे या श्रद्धेतूनच राजकीय पातळीवर घडले आहे.

फोंड्याच्या एका पिरास छत्रपती संभाजी महाराजांनी केलेल्या नवसाचा एक कागद उपलब्ध आहे. फोंड्याच्या लढाईच्या वेळी हा नवस करण्यात आलेला होता. या लढाईत संभाजी महाराजांनी पोर्तुगीजांवर विजय मिळविला. त्यानंतर कवि कलश यांनी या पिराच्या उत्सवासाठी उत्पन्न करून दिल्याचा शके १६०५ मधील कागद उपलब्ध आहे. ही घटना जेधे शकावलीतही नमूद करण्यात आली आहे —**भाइत्रं**, वर्ष २३, अंक ६,

१४. **भाइ**, शके १८३७, पृ. २९८, २९९.

१५. **पुणे अखबार**, खंड १, पृष्ठे २४५–८.
१६. **पेशवे दप्तर**, खंड १६, पृ. ८६.
१७. **तत्रैव**, खंड ३, पृ. ७०–७१.
१८. **तत्रैव**, पृ. ७४.
१९. **पुणे अखबार**, खंड १, पृ. ११०.
२०. **तत्रैव**, पृ. ७१.
२१. **पेशवे दप्तर**, खं. १७, पृ. ७.

७. समारोप

१. साहित्य-निर्मितीच्या प्रेरणा आणि साहित्याचा घाट २. साहित्य-प्रवाहांचे उगमस्थान : पंडिती परंपरा ३. कथात्मक साहित्याची प्रेरणा ४. युगपुरुषांचे चरित्र आख्यान ५. आज्ञापत्र आणि पत्र साहित्य ६. गद्य साहित्यातील भाषेचे स्वरूप ७. गद्य सारस्वताची वैभवशाली परंपरा.

भिन्न भिन्न प्रेरणांतून उदयास आलेली आणि विभिन्न घाट धारण करून विकास पावलेली मराठी गद्याची निर्मिती आणि या साहित्याचे स्वरूप विशद करताना या साहित्याच्या विविध परंपरांचे विवेचन गेल्या सहा प्रकरणांतून करण्यात आले आहे. मराठी साहित्याचा अभ्यास सामग्र्याने व्हावयास पाहिजे हे खरे असले तरी साहित्य-प्रवाहांचे विश्लेषण करताना प्रत्येक प्रवाहाचा स्वतंत्रपणे विचार करावा लागतो. एका प्रवाहाचा दुसऱ्याशी संबंध असतोच असे नाही. किंवा एका कालखंडातील साहित्यात एकच प्रवाह असतो असेही नाही. साहित्यनिर्मिती अखंडपणे होत असते. धार्मिक, राजकीय आणि इतरही नैमित्तिक कारणांनी रूढ प्रवाहास निरनिराळी वळणे मिळतात. एखादा असामान्य साहित्यिक देखील रूढ प्रवाहास आपल्या कर्तृत्वाच्या योगाने निराळे वळण देत असतो. निर्मितीच्या प्रेरणांत बदल झाला म्हणजेही कधी साहित्याचा आशय तर कधी घाट बदलत असतो. एकाच काळात या भिन्न प्रवृत्तींचे अस्तित्व असंभवनीय नसते.

मराठी गद्यातील भिन्न प्रवाहांचे विश्लेषण करताना विशिष्ट काळात साहित्याने वेगळे वळण का घेतले, गद्य साहित्याला निराळा घाट का प्राप्त झाला, या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. प्राचीन गद्याचे अशा स्वरूपात होणारे हे पहिलेच विवेचन होय, हे या ठिकाणी नम्रपणे नमूद केले पाहिजे.

१. समाजजीवनात हवा जाणिवांनी केवळ गद्य सारस्वतासच आकार दिला

आणि प्राचीन पद्यवाङ्मय मात्र या जाणिवांपासून सर्वस्वी अलिप्त राहिले असा या प्रतिपादनाचा अर्थ घेऊ नये. कोणत्याही काळातील गद्य वा पद्य साहित्य त्या त्या काळातील समाजजीवनापासून पूर्णपणे अलिप्त राहू शकत नाही. समकालीन जीवनाचे प्रतिबिंब कमी-अधिक प्रमाणात साहित्यात उमटतच असते. त्याचप्रमाणे साहित्याचा तोल कोणताही नवा प्रवाह संपूर्णपणे नवा असा नसतोच. तो रूढ प्रवाहातूनच विकसित होत असतो. आशय आणि अभिव्यक्ती यांच्या नाविन्यामुळे तो नवा प्रवाह या नावाने ओळखला जातो एवढेच.

प्रस्तुत अभ्यासात गद्यसाहित्यातील विविध प्रवाहांचे विवेचन करताना आवश्यक त्या ठिकाणी काव्यातील समांतर प्रवृत्तींचाही निर्देश करण्यात आला आहे. समकालीन समाजस्थितीचा काव्यप्रांतावर परिणाम झाला नाही असे नाही. साहित्यात सांप्रदायिकत्व निर्माण झाले म्हणजे मात्र त्यांवर कालगतीचा परिणाम फारसा होत नसतो. 'सांप्रदायिकत्व' या संज्ञेचा मर्यादित अर्थ या स्थळी अभिप्रेत आहे. विशिष्ट पंथ अथवा विचारसरणी यांचे बंधन स्वीकारून केवळ पूर्वसूरींचेच अनुकरण करणारी साहित्यनिर्मिती होऊ लागली म्हणजे साहित्यातील नवनिर्मिती थांबते आणि साहित्यप्रवाहांचा संकोच होतो. परंपरेवरील निष्ठेमुळे अथवा साहित्य-निर्मात्याच्या बौद्धिक मर्यादांच्या योगाने "अगतिक" झालेली साहित्य-निर्मिती विशिष्ट परिघातूनच भ्रमण करू लागते. समाजजीवनातून निर्माण होणारे प्रश्न अशा साहित्यावर परिणाम करण्यास असमर्थ ठरतात. संतसाहित्य आणि पंडिती काव्य या दोन्ही परंपरांत आणि गद्याच्या क्षेत्रातही अशा सांप्रदायिकत्वाची वाण नाही. आवर्ताचा छेद करून नव्या युगाचे प्रवर्तन करणारे, कालसापेक्ष युगधर्माची जाणीव साहित्याच्या द्वारे साकार करणारे युगपुरुष गद्य आणि पद्य या दोन्ही क्षेत्रांत होऊन गेले आहेत. काही नव्या प्रेरणा गद्याचा घाट घेऊन प्रकट झाल्या, तर काहींना काव्याचे माध्यम अनुकूल वाटले. महानुभाव पंथाला आपले तत्त्वज्ञान आणि युगपुरुषांची चरित्रे ग्रथित करण्यासाठी गद्य अनुरूप वाटले तर पद्याच्या माध्यमातून भागवत अथवा वारकरी संप्रदायाने आपल्या विचारसरणीचा प्रसार केला.

संस्कृत भाषेत असलेली विद्या प्राकृतांना प्राप्त व्हावी, या हेतूने रचण्यात आलेल्या 'ज्योतिषरत्नमाले'वरील मराठी टीकेने गद्यसारस्वताचा प्रारंभ झाला. 'इये मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळ व्हावा' या प्रेरणेने ज्ञानदेवांनी भावार्थदीपिका आकारास आणली, ज्ञानदेवांचे कार्य केवळ एका काव्यग्रंथाची निर्मिती करण्यापुरतेच मर्यादित नव्हते. ज्ञानेश्वरीच्या रूपाने भागवतधर्माची पायाभरणी करताना ज्ञानदेवांनी युगसापेक्ष धर्माचे निरुपणही या ग्रंथात केले आहे. भागवतधर्माच्या प्रवर्तनास काव्याचे माध्यम ज्ञानदेवांना अनुकूल वाटले. परंतु तत्पूर्वी महानुभाव पंथाचे प्रवर्तन करणाऱ्यांना मात्र गद्याचे माध्यम प्रशस्त वाटले. या पंथाची 'श्रुती-स्मृती' गद्यातून निबद्ध झाली आहे.

एखादी प्रेरणा कार्यरूप घेऊनच प्रकट होते, तर विशिष्ट प्रेरणा गद्याचा घाट घेऊन आविष्कृत होते, अशा स्वरूपाचे अनुमान कसे चुकीचे ठरते हे वरील विवेचनावरून ध्यानात येईल. आणखी एक उदाहरण या संदर्भात देता येईल. धर्मप्रसाराची प्रेरणा गद्य व पद्य या दोन्ही माध्यमांतून प्रकट झाली, त्याचप्रमाणे प्राचीन काव्यातून अभिव्यक्त झाली आहे. धर्मग्लानी आली असताना धर्माच्या आणि साधुसंतांच्या रक्षणार्थ भगवान अवतार घेतो ही धारणा नाथांचे भागवत आणि इतर स्फुट प्रकरणे यांतून सूचित झालेली असली तरी त्यांच्या 'भावार्थरामायणात' नाथांना लागलेला धर्मरक्षणाचा ध्यास उत्कटत्वाने अभिव्यक्त झाला आहे. उत्तरकालीन रामकथा आणि भारती-आख्याने यांतूनही या धारणेचे पडसाद उमटले आहेत. बखर साहित्यासही हीच जाणीव प्रेरक ठरली असून ती साहित्याचा निराळा आकृतिबंध घेऊन प्रकट झाली आहे.

सांप्रदायिक स्वरूपाचे साहित्य सर्व काळी आणि साहित्याच्या सर्व क्षेत्रांत असते त्याचप्रमाणे नव्या जाणिवा प्रकट होताना गद्य व पद्य या दोन्ही माध्यमांचा आश्रय साहित्यिक करीत असतात, हे वरील विवेचनावरून ध्यानात येईल. आपल्या प्रकृतिधर्मास अनुसरून साहित्यिक माध्यमाची निवड करीत असतो असे म्हणता येईल. वैद्यकादि शास्त्रीय ग्रंथ गद्याप्रमाणेच पद्यातही आढळतात. संतचरित्रे व आख्यानपर रचना प्रामुख्याने पद्यातून झालेली असली तरी या विषयावरील गद्य ग्रंथ अगदीच दुर्मिळ आहेत असे नाही. पंचीकरण हा विषय दासोपंतांनी 'पासोडी' या ग्रंथात पद्यरूपाने मांडला तर याच विषयावरील शिवरामस्वामींची रचना गद्यातून आढळते. विशिष्ट विषयाचे विवरण गद्यातून व विशिष्ट विषय पद्यातून ग्रथित करण्यात यावेत असा निरपवाद दंडक प्राचीन मराठी वाङ्मयात आढळून येत नाही.

जी गोष्ट विषयाची तीच सामाजिक जाणिवांच्या प्रकटीकरणाची. ऐन स्वराज्यात वावरणारे संत 'बुडती हे जन देखवे न डोळां' या कळवळ्याने समाजाला उपदेश करीत होते. भक्तीच्या निमित्ताने हमामा, ठुमरीसारखे खेळ आवडीने गातही होते. परंतु स्वराज्याच्या रंगलेल्या खेळांकडे लक्ष देण्याची गरज त्यांना भासली नाही. रामकृष्णादिकांना आवडीने गाणारांना शिवरायांचा पवाडा गावा असेही वाटले नाही. (अपवाद समर्थांचा). रामकथेवर रचना करणारा व आचार्यांच्या ग्रंथांचे निरूपण करणारा निरंजन माधव राजकारणात दीर्घकाल वावरलेला असूनही स्वराज्यात झालेल्या धर्मरक्षणाच्या कार्याबद्दल तो मूक आहे. या साहित्यिकांनी स्वीकारलेल्या जीवन-मूल्यांच्या दृष्टीने या तात्कालिक व भौतिक घटनांना महत्व नसेलही. बखरकारांना नेमके हेच महत्त्वाचे वाटले. समकालीन इतिहास धर्मरक्षणाच्या दिशेने वाटचाल करीत आहे असा साक्षात्कार त्यांना झाला आणि त्यातून एका नव्या साहित्यप्रकाराचा उदय झाला.

२. 'जग कसे आहे हे तत्त्वज्ञ सांगतात; ते कसे असावे हे ठरविणे आमचे

कर्तव्य आहे' अशा आशयाचे मार्क्सचे एक वचन आहे. साहित्यनिर्मितीचे स्वरूप कोणत्या प्रकारचे एवढेच गद्यसाहित्याच्या संदर्भात स्पष्ट करणे या लेखनाचे उद्दिष्ट आहे. साहित्याचे मूल्यमापन या लेखनात अभिप्रेत नाही. प्राचीन गद्याच्या निर्मितीच्या मुळाशी असलेल्या प्रेरणा आणि गद्यसाहित्याची परंपरा यांचा मागोवा या दृष्टिकोनातून घेण्यात आला आहे.

हा मागोवा घेत असताना पंडिती परंपरेतील गद्याचे विवरण विस्ताराने आले आहे. या विस्ताराला कारणे मात्र बलवत्तर आहेत. एकतर ही परंपरा मराठी साहित्याच्या प्रारंभकाळापासून ते या कालखंडाच्या अंतापर्यंत सातत्याने आढळते. गद्याची दुसरी कोणतीच परंपरा एवढी दीर्घकाळ टिकली नाही. दुसरे कारण म्हणजे या परंपरेने इतर अनेक परंपरांना जन्म दिला आहे. अन्य परंपरांचे उगमस्थान या नात्याने पंडिती परंपरेचा विचार विस्ताराने करणे क्रमप्राप्त होते. कथाप्रधान साहित्य व पौराणिक परंपरा या दोहोंनी या परंपरेचे ऋण घेऊनच आपले संसार थाटले. त्याचप्रमाणे महानुभाव व महानुभावेतर अशा दोन्ही पंथांनी पंडिती परंपरेचे भरण-पोषण केलेले असल्यामुळेही पंडिती परंपरेचा विचार विस्ताराने करावा लागला. दीर्घ कालखंड आणि उभय संप्रदाय यांच्याशी पंडिती परंपरेचा संबंध येत असल्याने या परंपरेचा कालशः व प्रवाहानुरोधानेच विचार करण्यात आला आहे. साहित्यनिर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचे कालखंड तीन ठरतात :

(१) प्रारंभापासून ते शके १२०० पर्यंतचा,
(२) शके १२०० ते १४०० या दोन शतकांचा आणि
(३) शके १५०० ते शके १७४० पर्यंतचा.

प्रवाहानुसार केलेल्या विवेचनात

(१) टीकाभाष्यात्मक ग्रंथ,
(२) स्वतंत्र रचना आणि
(३) धर्मप्रसाराच्या निमित्ताने झालेली निर्मिती

असे तीन प्रकार येतात. उपरोक्त तिन्ही कालखंडांत आढळून येणारे हे तीन प्रवाह आणि त्यांच्या उत्पत्तीची मीमांसा दुसऱ्या प्रकरणात करण्यात आली आहे.

३. कथात्मक साहित्य तसे पुरातन. प्राचीन वाङ्मयात समग्र कालखंडात वेगवेगळ्या रूपांत कथात्मक वाङ्मयाचे अस्तित्व जाणवते. मौखिक परंपरेने चालत आलेल्या लोककथांचे काही संग्रह लेखनिविष्ट होऊन प्रकाशित झाले आहेत. परंतु लिखित साहित्यात लोककथांचा प्रवेश झाला तो विशिष्ट संस्कार घेऊन. धार्मिक वा अन्य हेतूंनी झालेल्या संस्कारांतून रूढ झालेल्या कथांचे स्वरूप आणि त्यांचे प्रयोजन विशद करण्याचा प्रयत्न तिसऱ्या प्रकरणात झाला आहे. नीतिकथा, व्रतकथा, पौराणिक कथा आणि आख्याने यांचे धावते समालोचन करून महानुभाव पंथातील कथात्मक वाङ्मयाचे स्वरूप आणि महती यांची मीमांसा करण्यात आली आहे. प्रेरणेचाच केवळ

विचार केला तर पंडिती परंपरेतील महानुभावीय गद्य आणि चरित्र-ग्रंथातील कथात्मक साहित्य यांत भेद नाही. घाट निराळे आहेत, परंतु प्रेरणा अभिन्न आहे. धर्मप्रसाराच्या प्रेरणेतून निर्माण झालेले महानुभाव पंथीयांचे कथात्मक साहित्य जैन परंपरेतील धर्मकथा, चरित्रकथा आणि पुराणे यांचे आदर्श पुढे ठेवून मराठीत रचण्यात आले आहे. भक्तिपर मराठी काव्याच्या पंक्तीत सहज बसणारे अपवादात्मक गद्य प्रकरणही या प्रकरणाच्या शेवटी विचारात घेण्यात आले आहे. इतिहासेतर सांप्रदायिक बखरींची गणनादेखील भक्तिपर साहित्यात करावी असा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

४. कथात्मक साहित्याचा एक निराळा प्रकार या नात्याने बखरवाङ्मयाचा परामर्श घेण्यात आला आहे. या साहित्यात कथा असल्या तरी अन्य कथात्मक साहित्यापेक्षा बखरसाहित्याचा घाट वेगळा आहे. तशीच त्याच्या निर्मितीची प्रेरणाही भिन्न आहे. त्यामुळे या प्रकरणाचा स्वतंत्रपणे अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरले. या साहित्याच्या स्वरूपावर पुराणवाङ्मयाचे गाढ संस्कार झालेले असल्याने 'मराठी गद्याची पौराणिक परंपरा' या नावाने तिचा नामनिर्देश करण्यात आला आहे. आज बखर या नावाने संबोधले जाणारे सर्व साहित्य निर्मितिप्रेरणा आणि आकृतिबंध यांच्या दृष्टीने समान लेखता येत नाही. या साहित्याचे वर्तमानकालीन वर्गीकरण लक्षात घेऊन 'चरित्रआख्यानपर' असलेली रचना हेच खरे बखरसाहित्य असल्याचा निर्वाळा देण्यात आला आहे. याच संदर्भात बखर या शब्दाची व्युत्पत्तीही शोधण्याचा प्रयत्न झाला असून काही नव्या उपपत्तीही सुचविण्यात आल्या आहेत.

बखरसाहित्यास 'पौराणिक परंपरेतील साहित्य' असे नाव देण्याचे कारण महत्त्वाचे आहे. पुराणवाङ्मयाचे पंचविधलक्षण शास्त्रकारांनी सांगितले आहे. या लक्षणांपैकी वंशानुचरित या लक्षणाचा बखरसाहित्याशी निकटचा संबंध पोहोचतो. पौराणिक परंपरेस आणि पुराणोक्त धर्मास पोषक आणि पूरक अशा प्रकारचे साहित्य आपण निर्माण करीत आहोत, याची जाणीव बखरकारांत दिसून येते. धर्मरक्षण ही या साहित्याच्या निर्मितीच्या मुळाशी असलेली प्रेरणा. ही प्रेरणा स्वतःच्या कर्तृत्वाने साकार करणाऱ्या धर्मपुरुषांचे चरित्र-आख्यानकथन हे या साहित्याचे विषय. पुराणवाङ्मयाचे आदर्श पुढे ठेवून ही रचना सादर झालेली असल्याने बखर साहित्यात पुराणांतले कितीतरी विशेष उतरले आहेत. स्वराज्याच्या वाढत्या आकांक्षेने या साहित्याला चहर आला आणि स्वराज्यनिष्ठा ओसरू लागताच हे साहित्यदेखील क्षीणतेज होत होत नामशेष झाले. बखरसाहित्य आणि त्याचा आकृतिबंध यांचे सोपपत्तिक विवेचन या अभ्यासाद्वारे प्रथमच होत आहे हे नम्रपणे नमूद करावेसे वाटते.

५. "आज्ञापत्राची" गणना आजवर बखरीतच करण्यात येत असे. प्राचीन गद्यवाङ्मयात केवळ भाषेच्याच दृष्टीने 'आज्ञापत्रास' महत्त्वाचे स्थान आहे, असा आजवरचा समज होता. मीही 'पंडिती परंपरेतील राजनीतिपर प्रबंध' एवढीच या प्रकरणाची दखल प्रथम घेतली होती. प्राचीन भारतीय राजनीतिशास्त्राच्या अध्ययना-

नंतर मात्र या मताचा फेरविचार आवश्यक ठरला. या प्रकरणाची केवळ भाषाच नव्हे तर प्रतिपाद्य आणि आकृतिबंध यांनाही प्रेरणा आणि परंपरा यांच्या दृष्टीने असाधारण महत्त्व आहे. 'मराठ्यांची राजनीती' हे या प्रकरणास देण्यात येणारे दुसरे नावही अपर्याप्त ठरते. वस्तुतः 'आज्ञापत्र' हा भारतीय राजनीतिशास्त्राचा शिवकाळाशी संवादी असलेला एक आविष्कार आहे. प्राचीन राजनीतिशास्त्र आणि पुराणादिकांतून आलेले राजधर्माचे निरूपण यांच्या पार्श्वभूमीवरच 'आज्ञापत्रा'चे योग्य रीतीने आकलन होऊ शकते. पाचव्या प्रकरणात आज्ञापत्राचा उलगडा करण्यात आला आहे तो या पार्श्वभूमीवर. आज्ञापत्राच्या कर्त्याने पुरातन तत्त्वप्रणालींचे केवळ संकलन केलेले नसून भारतीय राजनीतिशास्त्राची मूलभूत तत्त्वे ध्यानात ठेवून, शिवकालीन राजकारणास उपयुक्त ठरेल अशा स्वरूपात राजनीतिशास्त्राची मांडणी स्वतंत्र प्रज्ञेने केली आहे.

ही निर्मिती काळाची निकड लक्षात घेऊन झाली आहे हे उघड आहे. राजनीतिशास्त्राची पुनर्निर्मिती करीत असताना आज्ञापत्राच्या कर्त्याने या निर्मितीस साजून दिसेल अशी सूत्रात्मक भाषा योजली आहे. त्यामुळे या रचनेस एक वेगळा आकृतिबंध प्राप्त झाला आहे. साहित्यकृतीचे स्वरूप आणि आकृतिबंध सामाजिक गरजेतून निश्चित होत असतात, या अभ्यासाच्या मध्यवर्ती सूत्रास पुष्टिप्रद असेच 'आज्ञापत्राचे' स्वरूप आहे. आज्ञापत्राचा कर्ता राजनीतिशास्त्रात निपुण आहे तसाच तो एक थोर भाषाप्रभूही आहे हे या निमित्ताने निदर्शनास येते.

ऐतिहासिक कागदपत्र आणि पत्रव्यवहार हा प्रकार तसा बखर साहित्यास पूरक. या पत्रव्यवहाराच्या मुळाशी कोणतीही एक प्रेरणा असण्याचे कारण नाही. तशी ही जाणीवपूर्वक झालेली साहित्यनिर्मिती आहे, असेही म्हणता येणार नाही. तथापि, इतिहासकालीन सामाजिक, राजकीय आणि धार्मिक प्रवाह समजून घेण्याच्या दृष्टीने या साधनांचे महत्त्व फार मोठे आहे. इतिहासाचे एक अव्वल दर्जाचे साधन या दृष्टीने कागदपत्र आणि पत्रव्यवहार यांची विश्वसनीयता वादातीत आहेच. बखरसाहित्याच्या प्रेरणांना पूरक अशी माहिती या साधनांतून उपलब्ध होते, ही त्याची विशेष महत्ती. या साधनांचा परिचय सहाव्या प्रकरणात संक्षेपाने करून देण्यात आला आहे तो याच उद्देशाने. ही साधने विविध तशीच विपुल आहेत. या सर्वांचाच परामर्श घेता येणे शक्य नव्हते, म्हणून बखरसाहित्याच्या विशेषांस पोषक अशी पत्रे प्रथम देण्यात आली आहेत. समकालीन व्यक्तींनी अनुभवलेले ऐतिहासिक प्रसंग वाचताना निराळाच प्रत्यय येतो. अशी काही प्रत्ययकारी पत्रेही या प्रकरणात देण्यात आली आहेत. ऐतिहासिक व्यक्तींच्या भावभावना व्यक्त करणाऱ्या काही पत्रांचा समावेशही या प्रकरणी करण्यात आला आहे. एकच व्यक्ती भिन्न प्रयोजनाच्या निमित्ताने वेगवेगळी भाषा कशी योजते याचाही एक नमुना या ६ व्या प्रकरणात आढळेल.

६. भाषेच्या दृष्टीने सर्वच प्राचीन गद्यसाहित्य अभ्यासण्याजोगे आहे. त्यातूनही आकृतिबंधपरत्वे भाषेने घेतलेली निरनिराळी वळणे विशेषेकरून ध्यानी बाळगण्यासारखी

आहेत. टीका-भाष्यात्मक गद्य लिहिणारांची भाषा संस्कृत-वळणाची असणे स्वाभाविक वाटते. शब्दाला प्रतिसाद देण्याची भाष्यकारांची रीत आणि संस्कृत भाषेतील वाक्यपद्धतीच्या धर्तीवर केलेली वाक्यरचना हे विशेष पंडिती वळणाच्या मराठी ग्रंथांत आढळतात. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे टीका-भाष्यपर मराठी ग्रंथांची भाषा दीर्घकाळ एकसारखी राहिलेली आहे. या कालावधीतील अन्य ग्रंथांतील भाषेत बरेच परिवर्तन झालेले दिसत असले तरी हे पंडिती वळण मात्र एखाद्या पुराणपुरुषाप्रमाणे अविचलित राहिलेले आहे.

महानुभावांच्या गद्यग्रंथांतील भाषेचे स्वरूप मात्र द्विविध आहे. शास्त्रग्रंथांत भाषेचे पंडिती वळण आढळते तर चरित्रग्रंथांची भाषा मात्र लोककथांची. भाषा व व्यावहारिक बोली यांचे संस्कार घेऊन मिरवताना दिसते. महाराष्ट्राचा यावनी सत्तेशी संपर्क आल्यानंतर मराठी भाषेवर राज्यकर्त्यांच्या फारसी भाषेचे संस्कार होऊ लागले. कालांतराने हे संस्कार एवढे दृढावले की यावनीच्या दरबारात मराठी नामशेष होते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. ऐतिहासिक कागदपत्रात भाषेच्या या स्वरूपाचे सम्यक्दर्शन घडते. गद्याची पंडिती परंपरा आणि बऱ्याच अंशाने पौराणिक परंपरा मात्र फारसी भाषेच्या संस्कारापासून अलिप्त राहिली. याचा अर्थ प्राचीन साहित्यकारांनी भाषेचे स्वरूप शुद्ध राखण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केलेला होता असा होतो. प्राचीन गद्य या ना त्या स्वरूपात धर्माशी संबंधित असल्याकारणाने धर्मरक्षणाची भावना भाषेची शुद्ध स्वरूपात जोपासना करण्यास कारणीभूत ठरली, असाच निष्कर्ष काढावा लागतो.

टीकाभाष्यात्मक ग्रंथ आणि कथात्मक साहित्य या वाङ्मय-प्रकारांतील भाषा अगदी साधी, सुटसुटीत व केवलवाक्यांनी युक्त अशी आहे. दोन वा तीन शब्दांची वाक्यरचना मोठ्या प्रमाणात आढळते. केवळ क्रियापदात समग्र वाक्यार्थ साठविण्याची लकबही या भाषेत आढळते. संस्कृत भाषेतील सती-सप्तमी व " सतःषष्ठी " सारखे प्रयोगही या भाषेत दिसून येतात. विशेषण-विशेष्य यांची समान विभक्ती योजण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात दिसून येतात. या वैशिष्ट्यांमुळे प्राचीन गद्याच्या भाषेला एकप्रकारचे अकृत्रिम सौंदर्य लाभले आहे.

बखरसाहित्यातील भाषेचे स्वरूप मात्र थोडे निराळे आहे. बखरीत यावनी शब्दांना मज्जाव नाही. परंतु, समकालीन कागदपत्रांच्या तुलनेने यावनी शब्दांचे प्रमाण बखरीत कमी आहे. पंडिती वळणाची भाषा योग्य प्रसंगी बखरीतून येते. अपरिहार्य असेल तेव्हाच यावनी शब्द योजणाऱ्या बखरकारांच्या वाणीवर पुराणवाङ्मयाद्दतकाच संस्कृत महाकाव्यांचाही संस्कार झालेला आहे. त्यामुळे बखरसाहित्यातील भाषा बरीच पल्लेदार, लयबद्ध आणि मिश्र वाक्यसंयुक्त अशी झाली आहे. साहित्याच्या निर्मितीच्या मुळाशी असलेल्या प्रेरणा साहित्यकृतीच्या सर्वांगावर कसा प्रभाव गाजवतात याचे प्रत्यंतर बखरींच्या भाषाशैलीवरून येते.

७. प्राचीन मराठी गद्याचा साद्यंत इतिहास लिहिणे हे या अभ्यासाचे उद्दिष्ट नाही. त्या चप्रमाणे या साहित्याचे मूल्यमापन हाही हेतू या लेखनाच्या मुळाशी नाही. साहित्य–निर्मितीच्या मुळाशी असलेल्या विविध प्रेरणा, या निर्मितीस लाभलेले आकृतिबंध, साहित्याचे स्वरूप आणि साहित्याच्या क्षेत्रातील प्रवृत्ती आणि अंतःप्रवाह यांचे दिग्दर्शन करण्याचा हा एक प्रयत्न आहे. साहित्याच्या आकलनास आणि यथार्थ मूल्यमापनास या बाबींचा अभ्यास उपकारक ठरतो, या धारणेने हा प्रपंच केला आहे.

साहित्यात दिसून येणारा कोणताही प्रवाह केवळ योगायोगाने उदय पावत नाही; तसाच तो अकारण लुप्तही होत नाही. नवा प्रवाह, नव्या प्रवृत्ती, नवे आकृतिबंध कोणत्या ना कोणत्या निमित्त-कारणाने जन्माला येतात. नव्या जाणिवांचे प्रकटीकरण करण्याच्या धडपडीतून हे वेगळेपण आकाराला येत असते. ही प्रक्रिया कधी रूढ साहित्याला नवा आशय देऊन जाते, तर कधी नवा घाट या धडपडीतून साकार होतो. समकालीन सामाजिक जीवन आणि सामाजिक जाणिवा प्रामुख्याने नव्या प्रवाहांच्या प्रेरक ठरतात. गद्यसाहित्यातील वेगवेगळे आकृतिबंध उदयास येत असताना कोणकोणत्या प्रवृत्ती त्यास कारणीभूत ठरल्या याचे दिग्दर्शन निरनिराळ्या आकृतिबंधांच्या विवेचनात येऊन गेले आहे. साहित्य आणि समाजजीवन यांचे संबंध कोणत्या प्रकारचे असावेत या प्रश्नाची चर्चा प्रस्तुत अभ्यासाच्या दृष्टीने अप्रस्तुत ठरते. गद्यसाहित्याच्या निर्मितीच्या मुळाशी असलेल्या प्रेरणा, या साहित्याची परंपरा आणि त्याचे स्वरूप विशद करणे हे लेखनाचे उद्दिष्ट असल्याने मूल्यमापनाशी संबंधित असलेल्या बाबींचा विचार करण्यात आलेला नाही.

प्राचीन मराठी गद्य-साहित्याच्या कालखंडातील सामाजिक जीवन एकंदरीत धर्मभावनेशी निगडित होते. निरनिराळे पंथ आणि संप्रदाय, धार्मिक आचार आणि विचार यांचा प्रसार करण्याची प्रवृत्ती साहित्यास प्रेरक ठरली आहे. काल परिस्थितीच्या ओघात धर्मरक्षणाचीही आवश्यकता निर्माण झाली आणि या भावनेतूनही साहित्यनिर्मिती होऊ लागली. महानुभाव आणि वारकरी या पंथाचे साहित्य धर्मप्रसाराच्या उद्दिष्टातून उदयास आले, तर पौराणिक परंपरेतील साहित्यास धर्मरक्षणाचा ध्येयवाद प्रेरक ठरला. पंडित कवींच्या साहित्यात धर्मप्रसाराची भावना प्रबळ नसली तरी भक्तिचरण म्हणजे एका परीने धर्मभावनेचाच परिपोष या साहित्याने केला असे आढळून येईल. धर्मप्रसार आणि धर्मरक्षण या प्रेरणांतून निर्माण झालेल्या साहित्याचे आकृतिबंधही निराळे आहेत. सबंध कालखंडास व्यापून असलेली तिसरी प्रेरणा आहे ज्ञानप्रसाराची. संस्कृत भाषेतील ज्ञान टीकाभाष्यांच्या रूपात वा स्वतंत्रपणे मराठी वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य पंडिती परंपरेतील साहित्याने केले आहे.

प्राचीन मराठी गद्य या त्रिविध प्रेरणांनी घडविले आहे. गद्य साहित्यातील निरनिराळे आकृतिबंधदेखील याच प्रेरणांनी निश्चित केले आहेत. बदलत्या सामाजिक गरजा आणि साहित्यातील आकृतिबंध परस्परावलंबी असल्याचे निदर्शनास येते.

प्राचीन मराठी काव्याच्या तुलनेने गद्यसाहित्याचा विस्तार वेताचा असला तरी उपेक्षणीय खास नाही. बदलती परिस्थिती आणि समाजजीवन यांच्या अनुसंधानाने गद्य साहित्याने वेगवेगळी वळणे घेतली आहेत. समाजेतिहासाच्या दृष्टीने अर्थपूर्ण ठरणारे गद्यसाहित्यातील प्रवाह साहित्यगुणांच्या बाबतीतही समृद्ध आहेत.

प्राचीन गद्याची वैभवशाली परंपरा आणि या साहित्याचे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप अभ्यासकांच्या निदर्शनास आणून देण्याचा हा एक नम्र प्रयत्न आहे. या क्षेत्रातल्या अधिक अभ्यास आणि संशोधनास तो प्रेरक ठरावा, ही अपेक्षा आहे.

□

प्रमुख आधार-ग्रंथ

अग्निपुराण, गुरुमंडल प्रकाशन. कलकत्ता, १९५७.

अभिलाषितार्थ चिंतामणि : (मानसोल्लास) सोमेश्वरकृत, म्हैसूरप्रत, १९२६.

उपाध्ये आ. ने., **कुवलयमाला**, सिंधी जैन विद्यापीठ, मुंबई १९५९.

ऐतरेय ब्राह्मण (भाग शेवटचा) अनुवाद : सोमयाजी धुंडीराजशास्त्री बापट, पुणे.

कर्वे चिं. ग. **लोकसाहित्यमाला** (पुष्प १ ते ४) महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती, पुणे. (१–१९५६; २–१९५७; ३–१९५९; ४–१९६०)

कामान्दकीय नीतिसार : व्यंकटेश मुद्रणालय, मुंबई, शके १८१३.

कौटिलीय अर्थशास्त्रम्, चोखाम्बा विद्याभवन, वाराणसी, १९६२.

कंगले र. पं., **प्राचीन भारतीय राजनीति**, मौज प्रकाशन, मुंबई, १९६९.

कुंटे भा. ग. (सं.), **संशोधनासाठी निवडलेले कागद** (वर्णनात्मक सूचि) [खंड १ विभाग १–१९७८; विभाग २, १९७९] महाराष्ट्र शासन, मुंबई.

कुलकर्णी श्री. रं. (सं.), **रसकौमोदि**, मराठवाडा साहित्य परिषद, हैदराबाद, १९५७.

कुलकर्णी श्री. रं. (सं.), **सुगमबोध**, उस्मानिया विद्यापीठ प्रकाशन, हैदराबाद.

कोलते वि. भि. (सं.), **श्रीगोविंदप्रभुचरित्र**, अरुण प्रकाशन, मलकापूर, १९६०.

कोलते वि. भि. (सं), **अन्वयस्थळ**, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक १०६.

गर्गे स. मा., **करवीर रियासत**, गो. य. राणे प्रकाशन, पुणे, १९६८.

गुप्त माताप्रसाद (सं.), **राउलवेल और उसकी भाषा**, मित्र प्रकाशन, इलाहाबाद, १९५८.

गोगटे रावजी गोपाळ (सं.), **विवेकसार ऊर्फ मननग्रंथ**, राजवाडे संशोधन मंदिर, धुळे, १९३८.

ग्रामोपाध्ये गं. ब., **पेशवे दप्तरातील मराठी भाषेचे स्वरूप**, नेलेंकर, पुणे.

ग्रामोपाध्ये गं. ब., **बखर वाङमय** (अभ्यासाची साधने), मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९५५.

चांदोरकर गो. का. (सं.), **विजयनगरचा विध्वंस** (राक्षसतागडीची लढाई), भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, शके १८३६.

छांदोग्योपनिषद, गोरखपूर प्रत.

जोशी र. मु. (सं.), **सनपुरीची बखर**, दप्तरे दिवानी, हैदराबाद, १९५०.

जोशी र. मु. (सं.), रघुनाथ यादव विरचित **पानिपतची बखर**, मराठवाडा साहित्य परिषद, हैदराबाद १९५५.

वा. क. ५४७७ २६४२७ ग्रंथालय

(जोशी र. मु. (सं.), **पुणे अखबार** [भाग १ ते २, अनुक्रमे १९५३, १९५४, १९५६] अभिलेख कार्यालय, हैदराबाद.

जोशी लक्ष्मणशास्त्री (सं.), **राजवाडे लेखसंग्रह**, साहित्य अकादमी, दिल्ली, १९५८.

जोशी शं. ना. (सं.), **बखर भाऊसाहेबांची**, अनाथ विद्यार्थी गृह, पुणे, १९७१.

जैन जगदीशचंद्र, **प्राकृत साहित्य का इतिहास**, चौखांबा विद्याभवन, वाराणसी, १९६१.

जैन हिरालाल (सं.), **करकण्डुचरित्र**, दिगंबर जैन ग्रंथमाला, कारंजा, १९३४.

तुळपुळे शं. गो., **यादवकालीन मराठी भाषा**. दुसरी आवृत्ती १९७३.

तुळपुळे शं. गो., **महानुभाव पंथ आणि त्याचे वाङ्मय.**

तुळपुळे शं. गो. (सं.), **लीळाचरित्र** (एकांक), सुविचार प्रकाशन, नागपूर, १९६४.

तुळपुळे शं. गो. (सं.), **लीळाचरित्र**, (उत्तरार्ध) सुविचार प्रकाशन, नागपूर, १९६६.

तुळपुळे शं. गो. (सं.), **दृष्टांतपाठ**, सुविचार प्रकाशन, नागपूर, १९६६.

तुळपुळे शं. गो. (सं.), **प्राचीन मराठी कोरीव लेख**, पुणे विद्यापीठ, १९६३.

दीक्षित मो. गं. (सं.), **मराठेकालीन प्रसिद्ध व्यक्तींची हस्ताक्षरयुक्त पत्रे**, महाराष्ट्र शासन, मुंबई १९६९.

देशपांडे य. खु., **महानुभावीय मराठी वाङ्मय**, यवतमाळ, शके १९४७.

देशपांडे वा. ना. (सं.), **स्मृतिस्थळ**, सरस्वती प्रकाशन, यवतमाळ, १९३९.

नेने ह. ना. (सं.), **आचारस्थळ**, नागपूर, शके १८५९.

नेने ह. ना. (सं.), **लक्षणरत्नाकर**, नागपूर, १९३७.

पठाण यू. म. (सं.), **बखर भाऊसाहेबांची**, सुरस ग्रंथमाला, सोलापूर, १९५९.

पद्मपुराण, गुरुमंडळ प्रकाशन, कलकत्ता, १९५७.

पवार अप्पासाहेब (सं.), **ताराबाईकालीन कागदपत्रे** (खंड १ व २), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९६९.

पंचीकरण, शिवरामस्वामीकृत, राजवाडे संशोधन मंदिर, धुळे, शके १८३८.

पंचीकृतविवेक, गरीबनाथकृत, राजवाडे संशोधन मंदिर, धुळे, शके १८४७.

पुणे पेठ कैफियत, मद्रास, १९५६.

पेशवे दप्तर, खंड ३, ९, १६, १७, १८, १९३१.

पानसे मु. ग. (सं.), **ज्योतिषरत्नमाला**, श्रीपतिभट्टकृत, डेक्कन कॉलेज, पुणे, १९५७.

पिसुर्लेकर पांडुरंग (सं.), **पोर्तुगीज दप्तर** (खंड २ रा), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७४.

प्रियव्रत वाचस्पति, **वेदोंका राष्ट्रीय गीत**, गुरुकुल हरद्वार, सं. २०१२.

प्रियोळकर अ. का. **महाराष्ट्र भाषेचे व्याकरण**, मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९५४.

प्रियोळकर अ. का. **महानुभाव इतिहास प्रकर्ण**, मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९६५.

वनहट्टी श्री. ना, **आज्ञापत्र**. सुविचार प्रकाशन, (२ आ.) १९६५.

बृहदारण्यकोपनिषद, गोरखपूर प्रत.

वंडेलू शांताराम (सं.). **क्रिस्तपुराण**, प्रसाद प्रकाशन, पुणे १९५६.

वावर सरोजिनी, **लोकसाहित्य : भाषा आणि संस्कृति**, लोकसाहित्य समिती, पुणे, १९६३.

वावर सरोजिनी (सं.). **मराठी लोककथा**, पुणे विद्यापीठ, १९५७.

वेंद्रे वा. सी. (सं.), **महाराष्ट्रेतिहासाची साधने** (भाग २ रा).

वेंद्रे वा. सी., **गडकोट आणि दुर्ग यांची वास्तु**, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १९६५.

ब्राह्मपुराण, गुरुमंडळ प्रकाशन, कलकत्ता, १९५२.

भावे वि. ल., **महाराष्ट्र सारस्वत** (पुरवणी – शं. गो. तुळपुळे), शके १८८५.

भोसलेवंशचरित्र, सरस्वती महाल, तंजाऊर, १९५१.

भोसले व पेशवे यांचा बखर, मद्रास, १९५१.

भागवत दुर्गा, **लोकसाहित्याची रूपरेखा**, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १९५६.

मनुस्मृति (अनुवाद : मुकुंद गणेश मिरजकर), चित्रशाळा, पुणे, शके १८४९.

महाभारत, गोरखपूर प्रत.

महादिक कृष्णस्वामी (सं.), **शरभेंद्र वैद्यरत्नावलिः**, सरस्वतीमहाल ग्रंथालय, तंजाऊर, १९५३.

महादिक कृष्णस्वामी, (सं.) उतके गोविंदराजकृत **नाट्यशास्त्रसंग्रह**, सरस्वती महाल ग्रंथालय, १९५३.

मात्स्यपुराण, संस्कृत संस्थान, वरेली १९७०.

मोने मो. स., **मराठी व्याकरणकार आणि व्याकरण प्रबंधकार**, चित्रशाळा प्रेस, पुणे, १९२६.

राजवाडे वि. का. (सं.), श्रीपति भट्टविरचित **ज्योतिषरत्नमाला**, भारत इतिहास संशोधक मंडळ, शके १८३६.

राजवाडे वि. का., **महाराष्ट्रीय सारस्वत** (ग्रंथ ४ था), भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, शके १८३७.

राजवाडे वि. का., **मराठयांच्या इतिहासाची साधने** (खंड ४) चित्रशाळा प्रेस, पुणे, शके १८४५.

राजवाडे वि. का. (सं.) **महिकावतीची ऊर्फ माहिमची बखर**, चित्रशाळा प्रेस, पुणे, शके १८४६.

वाकसकर स. वि. (सं.), **श्रीशिवछत्रपतीची ९१ कलमी बखर**, दत्ताजी त्रिमल वाकेनवीसकृत, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६२.

वायुपुराण, संस्कृतिसंस्थान, बरेली, १२६७.
विष्णुपुराण, संस्कृतिसंस्थान, बरेली, १९६७.
वैद्य प. ल. (सं.), **बौद्ध आगमार्थ संग्रह** पुणे, शके १८७८.
शतपथ ब्राह्मण (१) बर्लिन प्रत. इ. स. १८५५.
(२) मॅक्समूलरसंपादित, मोतीलाल बनारसीदास, बनारस, १९६३.
शुक्रनीति : व्यंकटेश्वर प्रेस, मुंबई, शके १८७०.
शिवचरित्र साहित्य (खंड ८) भारत इतिहास संशोधक मंडळ, वर्ष २३, अंक २.
श्रीचक्रधरोक्त सूत्रपाठ, महानुभाव परिषद, नागपूर, १९५९.
श्रीमद्भागवत महापुराणम्, श्रीगीता प्रेस, गोरखपूर.
शेजवलकर त्र्यं. शं., **श्रीशिवछत्रपति**, मराठा मंदिर, मुंबई, १९६४.
सरदेसाई गो. स., **ऐतिहासिक पत्रबोध**, केशव भिकाजी ढवळे, १९३९.
साने का. ना. (सं.), **पेशव्यांची बखर**, सोवनीकृत, मॉर्डन बुक डेपो, पुणे, शके १८३७.
साने का. ना. (सं.), **थोरले शाहूमहाराज यांचे चरित्र**, (चिटणीसकृत), १९१५.
साने का. ना. (सं.), **शककर्ते श्रीशिवाजी महाराज यांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र**, पुणे, १९२४.
साने का. ना. (सं.), **छत्रपति संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांचे चरित्र**, १९१५.
सिद्दीकी अब्दुल मजिद (सं.), **अलीनामा**, हैदराबाद, १९५९.
हेरवाडकर र. वि., **मराठी बखर**, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९५७.
Ghoshal V. N., A History of Indian Political Ideas, London, Oxford University, 1966. (Second Edition)
Kane P. V., History of Dharmashastra Vol. III, Bhandarkar Oriental Research Inst. Poona, 1946.
Katre S. M., Indian Textual Criticism, Karnatak Publishing House, Bombay, 1941.
Kunte B. G. (Ed.), Illustrative Modi Documents, Govt. of Maharastra, 1978.
Malgaonkar Manohar, Kanhoji Angre, Asia Publishing House, Bombay, 1959.
Wad G. C. and Others (Ed.), Sanads and Letters, Bombay, 1973.

याखेरीज अनेक नियतकालिकांचे आधार घेण्यात आले आहेत. त्या त्या स्थळी त्या नियकालिकांचे उल्लेख करण्यात आले आहेत. □

निर्देश सूची

'९१ कलमी बखर' ९३, १०१, १०६, १०७.
'१७३८ सालची हकीगत' ९३, ११४.

अक्कोळे ३५.
अखबारनवीस आणि बखरकार ८९.
'अग्निपुराण' १०१.
अथर्ववेद १२४.
अद्भुताचे आकर्षण ६४
'अध्यात्मविद्या विद्यानाम्' ५.
अनंतानुचर ४०, ४१.
अनेराज वास २५, २९, ३१.
अफजलखान १०५.
'अमरकोश' ५१.
अमृतराय ४६.
'अर्जदास्त' ५६.
अर्थनिर्णयाचे महानुभावीय शास्त्र ३२.
अली आदिलशहा ८९.
'अलीनामा' ८९, ९०.
अव्वल इंग्रजी आमदानीतील ग्रांथिक भाषा ५२.
अंताजी नारायण १३८.
'आचार स्थळ' ३१.
'आदिपर्व' १३८.
आदिलशहा ९०, १३२.
आनंदीबाई ९८.
आरमारी बळाचे महत्त्व १२७.
'आज्ञापत्र' ९३, ९४, १०४, ११७, १२०-१३१, १५१, १५२, १५५, १५६.
आज्ञापत्र आणि पत्रसाहित्य १५५.
आज्ञापत्र आणि सप्तांग राज्य १२३.
आंग्रे लक्ष्मीबाई १४४, १४५.
आंग्रे संभाजी १३९, १४५.
'इतिहास-प्रकर्ण' ७७, ७८.
इस्लामी आक्रमणाची द्विविध प्रतिक्रिया ३.
उतके गोविंदाचार्य ४७.
'उद्धवगीता' ४९.
उपदेशपर साहित्य ९३, ९४.
उपाध्ये अ. ना. ६७.
'ऋग्वेद' ५६.
'ऋद्धिपूर-वर्णन' ४९.
एकनाथ ५, ९, २१, ३६, ३७, ५६, ११५, १५३.
'एकनाथी भागवत' २१
'ऐतरेयब्राह्मण' १२४, १२५.
ऐतिहासिक कागदपत्र आणि पत्रव्यवहार १३५.
'ऐतिहासिक प्रस्तावना' १२.
औरंगजेब १०५, १३७.
कथात्मक साहित्याची प्रेरणा १५४.
कथात्मक साहित्याची विविध वळणे ८२.
कथात्मक साहित्याचे महानुभावीय वर्गीकरण ७४.

'कथासरित्सागर' ६६.
'करकण्डुचरित्र' ६७.
'करणप्रकाश' २२, २३.
कर्वे चिं. ग. ७१.
कर्वे वासुदेवभट १४३.
'कादंबरी' १०९.
कुतुबशहा १३२, १३३, १३४.
कुलकर्णी श्री. मा. ४१.
'कुवलयमाला' १६, ६७.
कृष्णदास मुद्गल ११५.
केतकर श्री. व्यं. ९७, १०१.
केशवस्वामी भागानगरकर ३९.
केशवाचार्य ९९.
केशोवास (केशिराजवास) २५, २८, २९, ३०, ३१.
केळकर न. चिं. १३५.
'कैवल्यदीपिका' ५१, ५२.
कोलते वि. भि. १७, ७०.
कौटिल्याचे अर्थशास्त्र ९४, १२६, १२८.
'कौल' ५६.
'कौस्तुभपुराण' ९६, ९८.
'क्रिस्तपुराण' १३, ३६, ३७, ३८, ४४.
खरे वासुदेवशास्त्री ८७.
'खडर्याच्या लढाईचो बखर' ९३.
खंडो बल्लाळ १३६.
गजरे रघुनाथराव १४३.
गद्य सारस्वताची वैभवशाली परंपरा १५८
गद्य साहित्याची उपेक्षा २.
गद्य साहित्याचे सातत्य १५.
गद्य साहित्याचे सुवर्णयुग ३५.
गद्य साहित्याच्या इवल्याशा रोपाचा विस्तार ८.
गद्य साहित्याच्या प्रेरणा ५३.
गद्य साहित्याला आलेला बहर २३.
गद्याचा समाजजीवनाशी ऋणानुबंध २.
गरीबनाथ ४०.
गागाभट्ट १०९.
गायकवाड मुकुंदराव २६.
'गीतगोविंद' ४९.
'गीतापदबोधिनी' ५२.
गुणकीर्ती ३५.
गुणाढ्य ६६.
'गुरुचरित्र' ४६.
गोगटे गोपाळ रावजी २१, ४१.
गोडे प. कृ. ४२.
गोविंदप्रभु ८०, ८१.
'गोविंदप्रभुचरित्र' ७४, ७५, ७६, ७७, ८१.
गोविंदराव भगवंत १४६.
गौतमीबाई ११२.
ग्रामोपाध्ये गं. व. ९४.
ग्रांथिक भाषेचे शुद्ध स्वरूप ५६.
घोरपडे मालोजी १२०, १२७, १३१, १३२.
चक्रधर : पहा श्रीचक्रधर
चरित्र-आख्यानपर बखरवाङ्मय ९३.
चरित्रग्रंथांची प्रेरणा ७६.
चरित्रग्रंथांची भाषा ७५.
चरित्रपर कथा-आख्याने ७४.
चिटणीस मल्हार रामराव ९०, ९१, ९६ ९९, १०५, १०७, १२२.
चित्रगुप्त १०९.
चिपळूणकर विष्णुशास्त्री ८७.
चिमाजी अप्पा १३७, १४३.
चोरघडे वामन ६९.
'चौउपण्ण महापुरिस चरितम्' ७९.
चौपदी/चौपद्या ३३, ३४.

चौपद्यांवरील भाष्य ३३.
छत्रपती शिवाजी : पहा शिवाजी महाराज
छत्रपती शिवाजी यांचे मालोजी घोरपडे यांस पत्र १३१.
'जयरामस्वामी वडगावकर यांची बखर' ८१, ८२, ९३.
जाधव रायाजी १४१.
जाधव संभाजी १३८.
जिवाजी रघुनाथ १४६.
'जीवक' (मासिक) २५.
'जेधे शकावली' ९५.
जैन ग्रंथांची मराठी परंपरा ३४.
जैन परंपरेचा कथात्मक आदर्श ७९.
'ज्योतिषरत्नमाला' ५, ८, १२, १३, १४, १५, १६, १७, १९, २०, २२ ४५, ६९, ११६, १५२.
जोशी महादेवभट १३९.
जोसी विठ्ठल १३९.
टिळकचरित्र १३५.
टिळक लोकमान्य १३५.
टीपग्रंथ ४९, ७९.
डिचोलीकर देसाई १३६.
तुळपुळे शं. गो. १, ४९, ५१.
तुळोजीराजे ४७.
तेराव्या शतकातले पंचतंत्र ७०.
तेलुगू ग्रंथाचा मराठी अवतार ३८.
'तोफ्तुलहिंद' ४५.
'त्रिषष्ठीशलाकापुरुषचरित्र' ७९.
'त्रिसठ्ठी महापुरिस गुणालंकार' ७९.
'थोरले शाहूमहाराज यांचे चरित्र' ९६.
दत्तराज मराठे ४९.
दत्ताजी वाकेनवीस ९१.
'दशवैकालिक' ८०.
दामोदर पंडित ३३, ४४. ४५.
'दास विश्रामधाम' ३९.
दासोपंत ४६, १५३.
दिलेलखान १०५.
दृष्टान्तकथा ७२.
'दृष्टान्तपाठ' २८, ३०, ७१, ७२.
देव शंकर श्रीकृष्ण ८७.
देवेंद्र ६७.
देशपांडे अ. ना. ११.
देशपांडे य. खु. १.
देशमुख सर्जेराव १३६.
'द्वात्रिंशल्लक्षण' ३२.
धर्मदंड आणि राजदंड १२५.
'धर्ममूलं इदं सर्वं' ४.
धर्मरक्षण : बखरींची प्रेरणा १०२.
धर्मरक्षणाची कालसापेक्ष जाणीव ९९.
धर्मरक्षणाची प्रेरणा ३६.
धर्मस्थापनेचे नर : तेही ईश्वरी अवतार १००.
धर्मामृत' ३५.
धर्मावतारांच्या पराक्रमाच्या गाथा १०८.
धावडशीकर ब्रह्मेंद्रस्वामी यांची बखर ८१.
'धिकोटीकरण' १७, २१.
'ध्रुवमानसकरण' १७, २१.
नरेंद्र ४६.
'नवभारत' (मासिक) १९.
नवे प्रवाह आणि जुनी परंपर ६.
नाईक वी. व्ही. १४.
नागदेव / नागदेवाचार्य ३१, ७४, ७८, ८०.
नागदेवाचार्य-चरित्र : पहा 'स्मृतिस्थळ'
'नाट्यशास्त्र' (भरतमुनींचे) ४६.
नाट्यशास्त्रसंग्रह ४७, ४९.
नाना फडणवीस ११०, १४२.
नानासाहेब (पेशवे) १०७, १३८.

नामदेव ३३, ११५.
नायकोबा ९९.
नारबा सूर्यराउ १३६.
'नारायण व्यवहार शिक्षा' ९३, ९४, १२२.
नारायणराव पेशवे १५२.
नारोशंकर ११२, १३८
निजामशहा १०, १३२.
निरंजन माधव ५१, १५३.
निरंजनस्वामी कराडकर ८०, ८२.
निरंजनस्वामी कराडकर यांचा चरित्रग्रंथ ८०.
नीतिकथा ८२.
नृत्याचे शास्त्रोक्त विवरण ४६.
नेने ह. ना. ३२, ६९.
नेमिनाथ ७९.
पत्रसाहित्यातील 'विश्वरूप-दर्शन' १४७.
पत्रसाहित्यातील शैली व विषय यांची विविधता १४०.
पत्रसाहित्यातील समाजजीवनाचे प्रतिबिंब १४८.
पत्रातील भाषेचे दुहेरी वळण १४५.
पत्रातून घडणारे व्यक्तिदर्शन १४०.
'पद्मपुराण' १०१, १३८.
'परमहंसकथा' ३५.
पर्गिटर १०१.
पहिला गद्यग्रंथ : 'ज्योतिषरत्नमाला' १६–१९ – स्वरूप, १९, – प्रेरणा २१ – उत्तरकालीन ग्रंथावर झालेला परिणाम २१.
'पंचतंत्र' २०, ६३, ६७, ६९, ७०, ७१.
'पंचदशी' ४०.
'पंचवार्तिक' ३२, ५३.
'पंचीकरण' ३९, ४०.
'पंचीकृत विवेक' ४०.
'पंचोपाख्यान' ७०.
पंडित भीष्माचार्य ३२, ४९, ५०.
'पंडिताराध्य-चरित्र' १६.
पंडिती मराठी गद्य परंपरेतील भाषेचे वैशिष्ट्य ५१.
पानसे मु. ग. १७, १८, १९.
'पानिपतची बखर' ९३.
'पारोडी' १५३.
पांगारकर ल. रा. १, ५१.
पांडित्य आणि कथात्मकता यांचा समन्वय ११०.
पुजदेकर हरिराज ४९.
'पुणे अखबार' ९३, ९४, १४६.
पुराणवाङ्मयाचा ठसा १०३.
पुराणे आणि बखरी ९७.
पुष्पदंत ७९.
'पेशवाई अखेरची अखबार' ११४.
पेशवे कुळात पुराणांचा व्यासंग १३८.
'पेशव्यांची बखर' ११४.
पोतदार द. वा. ३८, ६९, ७०.
पौराणिक परंपरेतील पुनर्निर्मिती १२८.
'प्रकरणवश' २९.
प्रतिलोम टीकापद्धती ३१, ३२.
प्रसंगवर्णनपर बखरवाङ्मय ९३, ९५.
प्राकृत भाषा आणि संस्कृत ज्ञान ५.
प्राचीन गद्याची कालमर्यादा २.
'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' १.
प्राचीन मराठी वाङ्मयातील राजनीतिपर साहित्य १२१.
फादर स्टिफेन ३७.
बखर : चरित्र–आख्यान ९०, ९५.
बखर वाङ्मयाचे वर्गीकरण ९३.

बखर शब्दाची व्युत्पत्ती ९१.
बखरकारांची भाषा व शैली १०८.
बखरकारांचे विशिष्ट नवे ध्येय व बखरीचा नवा घाट १०७.
बखरसाहित्य : संशोधन आणि संपादन ८७.
बखरसाहित्य : सांप्रदायिक व भक्तिपर ९३.
बखरसाहित्याचा उत्कर्ष : 'भाऊसाहेबांची बखर' १११.
बखरीतील वंशावळी १०१.
बखरींचे इतिहासप्रामाण्य ११४.
'बत्तीस लक्षणी टीप' २८, ३२, ५०, ७४.
बळवंतराव मेहेंदळे ११२.
बाजी घोरपडे १३२.
बाजीराव (थोरले) १४२, १४४, १४५.
बाणभट्ट १०९.
बारभाईंचे कारस्थान १४२.
'बालबोधिनी' ३२.
बाळा दीक्षित १४३.
बाळाजीपंत नाना १४२, १४३.
'बी' ११३.
बुकराय २५.
'बुधभूषणम्' १२२.
बृहत्कथामंजिरी ६६.
'बृहदारण्यकोपनिषद' १२४.
बेंद्रे वा. सी. १२, १३१.
बोधभाषा नि पंथभाषा २४.
ब्रह्मवैवर्त पुराण १३८.
'ब्रह्मोत्तरखंड' ९८.
'ब्राह्मपुराण' १०१, १०३.
भट ९७.
भरतमुनी ४६.
'भविष्योत्तर पुराण' ९८.
भाऊसाहेब पेशवे १०७, १०८, १११, ११३.
'भाऊसाहेबांची बखर' ८६, ९५, १०७, १११, ११२, ११३.
भागवत दुर्गा ६९.
'भागवतपुराण' १०१, १०४.
भारत इतिहास संशोधक मंडळ ८८.
भारतीय परंपरेतील राजा १२४.
'भावार्थदीपिका' : पहा ज्ञानेश्वरी
'भावार्थ रामायण' ११५, १५३.
भावे वि. ल. (सारस्वतकार) १, ३५, ५१, ६९.
भीष्माचार्य : पहा पंडित भीष्माचार्य.
भोसले राजे शरफोजी ४२.
भोसले राजे श्रीशंभुसिंग ४३.
'भोसलेवंश चरित्र' १०१, १०७, ११४.
मननग्रंथ : पहा विवेकसार.
'मनुस्मृति' १२६.
मन्सूर अली ११२.
मराठी कथांची प्राकृत परंपरा ६६.
मराठी गद्याच्या इतिहासातील त्रिविध प्रेरणांचे सहजीवन ११६.
मराठी गद्याच्या विविध प्रेरणा ११.
मराठी पंचतंत्र ६९.
'मराठी वाङ्मयाचा इतिहास' (खंड २ भाग १) १२.
मराठी साहित्याचा प्रारंभ १४.
मलिक अबदुल्ला १३९.
महाडिक रावसाहेब ४३.
महानुभाव चरित्रपर कथा-आख्याने ७४.
महानुभाव पंथाचे श्रुति-स्मृति-वाङ्मय २८.
महानुभावीयांचे गद्य साहित्य २४.

'महाभारत' ७३, ८२, ९४, ९८. ११५, १२४, १२८.
'महाराष्ट्र सारस्वत' १, ३५.
महाराष्ट्र साहित्य परिषद ११, १२.
'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' ५२, ६९.
महाराष्ट्राचा इस्लामी संस्कृतीशी संबंध ३.
महाराष्ट्राची संगीत परंपरा ४६.
'महाराष्ट्रेतिहासाची साधने' १२, १३१.
'महावाक्य' ३०.
'महिकावतीची बखर' ९५, ९८, १०१, १०३, १०४, १०७, १११.
'मात्स्यपुराण' १०१, १०६, १२६.
माधवराव (थोरले) ११३, १४२.
मार्क्स १५४.
मार्हींभट्ट २५, ७५, ७६, ७७, ७८.
मुकुंदराज ५, ९, २१, २४, ३९.
मुक्तेश्वर २१, ३६, ७४, ११५.
'मेस्तके' १२२.
मोरेश्वर ५१.
यजुर्वेद १२४.
यमा विन तुकामाळी १४०.
यक्षगान ४९.
यक्षगानप्रबंध ४८.
युगधर्म आणि प्राचीन काव्य ११५.
युगपुरुषांचे चरित्र-आख्यान १५५.
येशो पुरुषोत्तम १३९.
येसूबाई १४१.
रघुनाथराव ९८, १३८, १४२.
रत्नप्रभ ७९.
'रत्नमाला-स्तोत्र' ३१.
'रसकौमोदि' २५.
'रसरत्नदीप' १३, २७, २८.
'रसरत्नदीपा' त आलेल्या वंशावळी २७.
'रसराजलक्ष्मी' २५, २६.
'रससिंधू' २५.
रंभामंजिरी १६.
'राजनीति' १२२.
'राजव्यवहारकोश' १०९.
राजाराम १०६, १३६, १३७.
राजवाडे (इतिहासाचार्य) वि. का. ९, १२, १६, १७, १९, २२, २७, ५६, ७३, ८७, ८९, ९८, १०२, ११५, १४०.
राजवाडे संशोधन मंडळ ३८.
राज्यशासन आणि धर्मशासन १३९
राधावाई १३८.
रामचंद्रपंत आमात्य १३६.
रामदास २७, ३६, ४६, ५६, ८१, ८७, ९९.
रामदासी मठ ३९
रामदेवराव यादव ४६.
रामशास्त्री प्रभुणे १३९
'रामायण' ७३, ८२, ९८, ११५. १३८.
रामायण-महाभारतातील कथा-आख्याने ७३.
'रामायण - युद्धकांड' ११५.
राक्षसातगडीची बखर ९३, ९५.
'रुक्मिणीस्वयंवर' ४६.
'लघुवाक्यवृत्ती' ५१.
'लक्षणरत्नाकर' २५, २८, २९, ३२, ७४.
'लापिका' २९, ३१.
'लीळाचरित्र' ९, १५, २२, २३, २५, २८, ३०, ३१, ६३, ६६, ६७, ६९, ७१, ७४, ७५, ७७, ७८, ७९, ८०, ८१.
लीळाचरित्रातील दृष्टान्तकथा ७१.

लोकसाहित्याची उपेक्षा ६९.
लोकसाहित्याची परंपरा ६३.
'लोकसाहित्याची रूपरेखा' ६९.
'वचनसंबंध' २९, ३१.
'वछाहरण' ३३.
'वंशानुचरित' ११.
वार्तापत्रे ९३ ९४.
'वायुपुराण' १०१, १०४.
वाल्मीकी १४६.
विदर्भ संशोधन मंडळ ४१.
विद्यारण्य ४०.
विठ्ठल २७.
विठ्ठल गलंड २५, २६, २८.
'विराटपर्व' १३८
'विवेकसार' ऊर्फ 'मननग्रंथ' ३८, ३९, ४४.
'विवेकसिंधु' ५, ३९.
विश्वासराव १३८.
विष्णुदास नामा ११५.
'विष्णुपुराण' १००, १०१, १०६.
विष्णुशर्मा ७०.
वीरांगनांचे पत्रसाहित्य १४४
वेदान्तपर स्वतंत्र ग्रंथ ३९.
'वेदान्तप्रक्रिया' ४१.
वैद्य गायकवाड २५.
वैद्यक व इतर शास्त्रावरील ग्रंथ ४२.
वैद्यकग्रंथ २५.
'वैद्यरत्नावली' ४२, ४३.
'वैद्यवल्लभसंहिता' २५.
व्रतकथा ७२, ८२.
व्यंकोजी राजे ४८.
व्यास १०४.
शकावली : एक परंपरा ९.
'शकावली मराठे राजे यांची' १०२.
शतपथब्राह्मण १२४, १२५.
शहाजान बादशहा ४४.
शहाजी महाराज १०५.
शंकर केशवजी १४३.
शंकराचार्य ३८, ५०, ९८, ९९.
शार्ङ्गदेव ४६, ४७.
शार्ङ्गधर पुजदेकर ५१.
शालिहोत्र ४३, ४४.
शास्ताखान १०५.
शाहू महाराज १०५, १४४.
शिलालेख आणि लोकवाङ्मय १३.
'शिवदिग्विजय' १०९.
'शिवप्रताप' १०१.
शिवरामस्वामी ३९, १५३.
शिवाजी महाराज / शिवाजी राजे / शिवछत्रपती १०, ४८, ८९, ९९, १००, १०५, १०६, १०९, १२४, १२७, १२८, १३१, १३२, १३८, १५३.
'शिवाजी महाराज यांचे चिकित्सक चरित्र' (पूर्वार्ध) १२.
'शिशुपालवध' १०५.
मल्हारराव शिंदे ११२.
महादजी शिंदे १४३.
शीलांक ७९.
'शुक्रनीति' १२३.
शेडगावकर यांची बखर' १०१.
'श्यामकान्ताची पत्रे' १३५.
श्रीकृष्ण ८०, १०५, १०६, १११.
श्रीचक्रधर २३, २८, २९, ३०, ३१, ७१, ७२, ७७, ७८, ८०, ८१, ९८.
श्रीचक्रधरसूत्रे आणि दृष्टान्तपाठ २९.
श्रीधर ४६.
श्रीपतिभट्ट ५, ८, ९, १२, १४, १७, १८, १९, २१, २५, २७, १११.

सगनभाऊ ४६,
सखाराम भगवंत १४२,
सखारामपंत १३२,
सखारामबापू १४३
सत्तास्पर्धेचे बळी (पत्रवाङ्मयातून दिसणारे) १४२.
सदाशिवभाऊ १३८
'सनपुरीची बखर' ९५.
'सप्तप्रकरणात्मक चरित्र' ९०, ९३, १०४, १०६.
'सप्तादि खंड' ९८.
सभासद कृष्णाजी अनंत ९०, ९१, ९६.
सभासदी बखर / सभासदाची बखर ९०, ९३, १०४, १०६, १०७, १११.
समाजजीवन आणि साहित्याचे वळण ६.
सरस्वतिमहाल ग्रंथालय ४३, ४७.
सवाई माधवराव पेशवे १२२.
'संगीतदर्पण' ४४, ४५, ४६.
'संगीतरत्नाकर' ४६, ४७.
संगीतशास्त्रावरील पहिला ग्रंथ ४४.
'संगीत सारामृत' ४७.
संभाजी महाराज १२२, १२६, १४१
संस्कारित लोकसाहित्य ६५.
सांप्रदायिक व भक्तिपर बखरवाङ्मय ९३.
सामान्यांचे असामान्य शौर्य १४३.
साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा आणि साहित्याचा घाट १५१.
साहित्यप्रवाहांचे उगमस्थान १५३.
साहित्याचा समाजजीवनाशी संबंध ८६.
साहित्यातील प्रवाह आणि सामाजिक जाणीव ११६.
'सिद्धान्तसूत्रे' २५, २९.
सिंघण यादव ४६
'सुगमबोध' ४०, ४१.
सुजाउद्दौला ११२,
'सूत्रपाठ' २८.
सेखोजी १४४.
'स्मृतिस्थळ' ७४, ७७.
स्वराज्य देवाब्राह्मणांचे विश्रामस्थान १३६.
'स्वात्मनंदप्रकाश' ५१.
'हनुमंतस्वामींची बखर' ८१, ८२, ९३.
हरिपंत १४२
हरिभद्र ७९.
'हरिवंश' १३८.
'हरिवंशाची बखर' ११४.
'हितोपदेश' २५, ६९.
हेमचंद्रसुरी ७९.
हेरवाडकर र. वि. ८२, ९३.
हैवतराव गोपाळ १४६, १४७.
हैबती ४६.
'होळकरांची थैली' ९३.
क्षेमेंद्र ६६.
क्षीणतेज बखरसाहित्य ११४.
'ज्ञानप्रबोध' ४९.
ज्ञानेश्वर ५, ९, २१, २४, ६६, १४६, १५२.
'ज्ञानेश्वरी' ९२, १५२.

□

पहिल्या आवृत्तीसंबंधी काही अभिप्राय

" .... महानुभावीय ग्रंथकारांच्या गद्य लेखनावरोबरच अन्य गद्य लेखकांच्या लेखनाचा विचार डॉ. कुलकर्णी यांनी बारकाईने केलेला असल्यामुळे मराठी गद्य म्हणजे महानुभावीय गद्य ही कल्पना आता खोटी ठरली आहे....

....प्राचीन मराठी गद्याचा विचार करताना धर्मरक्षणाच्या प्रेरणेने पुराणोक्त धर्माचा प्रचार करणारे साहित्य मराठी गद्याची पौराणिक प्रेरणा म्हणून मानावे असे डॉ. कुलकर्णी यांनी सप्रमाण विवेचिले आहे. या परंपरेत त्यांनी बखरसाहित्य समाविष्ट केले आहे. या ग्रंथातील ' बखरसाहित्या 'विषयीचे प्रकरण म्हणजे डॉ. कुलकर्णी यांच्या व्यासंगाचे, स्वतंत्र प्रज्ञेचे प्रतीक होय....अगदी वेगळाच दृष्टिकोण स्वीकारल्यामुळे बखर साहित्यावर नवा प्रकाश पडला आहे, हे निःसंशय !

प्राचीन गद्याच्या निर्मितीचे स्वरूप, निर्मितीच्या मुळाशी असलेल्या विविध प्रेरणा हया गद्यसाहित्यातील प्रवृत्ती आणि अंतःप्रवाहांचे दिग्दर्शन करणाऱ्या डॉ. श्रीधरराव कुलकर्णी यांचा प्रयत्न यशस्वी झाला आहे. त्यामुळे उपेक्षित अशा प्राचीन गद्याच्या अभ्यासाला एक नवी दिशा मिळत आहे. अत्यंत परिश्रमपूर्वक सिद्ध केलेल्या या ग्रंथामागे डॉ. कुलकर्णी यांची संशोधक अनाग्रही वृत्ती, वाङ्मयविषयक सुजाण दृष्टी असलेले व्यक्तिमत्त्व आहे हे फार महत्त्वाचे. " --**डॉ. मालचंद्र फडके**, ' वीणा ', मे १९७२.

" प्राचीन मराठी गद्यातील प्रेरणा आणि परंपरा ह्यांचा शोध घेण्याची कांक्षा अंतरी धारण करणारा डॉ. कुलकर्णी यांचा प्रस्तुत वैचारिक ग्रंथ मराठी भाषेच्या अभ्यासकास संशोधनाची व तदनुषंगिक विचारणेची एक नवी दिशा दाखवील. "

—**माधव मनोहर** ' नवशक्ति ' १–३–७०

" ....डॉ. कुलकर्णी यांचे या ग्रंथातील पुराव्याने मान्य होणारे श्रेय म्हणजे ' बखर ' या शब्दाची व मराठी बखरीच्या लेखनपद्धतीची त्यांनी केलेली चिकित्सा होय.... बखरीतील चरित्रपरता, आख्यानपरता व पौराणिक धाटणी यांचे प्राचीन मराठी पंडिती गद्याच्या परंपरेशी असलेले नाते व लागेबांधेही त्यांनी व्यवस्थितपणे उकलून दाखविले आहेत. "— **आलोचना**, नोव्हेंबर १९७०.

डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांचे प्रकाशित वाङ्मय

ग्रंथ

१. **तेलंगणातील अरे-मराठा समाज : भाषा आणि संस्कृती,** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८७.

२. **नाथांचा भागवत धर्म** (पीएच्. डी. प्रबंध) एकनाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद, १९५८.

३. **प्राचीन मराठी गद्य : प्रेरणा आणि परंपरा,** सिंधू पब्लिकेशन्स, मुंबई, १९७५; दुसरी आवृत्ती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९१.

४. **नवरात्र संपले** (एका स्वातंत्र्य सैनिकाचे आत्मकथन) सिंधू पब्लिकेशन्स, मुंबई, १९७३.

५. **काव्य आणि कविता** ('मुकदमा शेर-ओ-शायरी' या अल्ताफ हुसेन हाली यांच्या ग्रंथाचा अनुवाद) साहित्य अकादमी, दिल्ली, १९७१.

६. **रक्ताभिषेक** (१८५७ च्या स्वातंत्र्य समराच्या पार्श्वभूमीवर आधारित शोरापूरचे संस्थानाधिपती व्यंकटप्पा नायक यांच्या जीवनावरील नाटक.)

संपादित ग्रंथ व शोध-पुस्तिका

१. **अद्वैतामृत :** (निरंजन माधवकृत वेदान्तविषयक टीका. भाष्य प्रकरण ग्रंथ) मराठी स्वाध्याय संशोधन पत्रिका, अंक ३ रा, १९६८.

२. **उत्तरगीता :** (श्री ज्ञानदेवकृत-काव्य) मराठवाडा साहित्य परिषद, हैदराबाद, १९५७.

३. **उस्मानिया विद्यापीठातील मराठी हस्तलिखित ग्रंथांची वर्णनात्मक सूची** (सहकार्याने) मराठी विभाग, उस्मानिया विद्यापीठ हीरक महोत्सव प्रकाशन, १९७९.

४. **कपिलगीतोक्त 'पंचमुद्रा'** (श्री ज्ञानदेवकृत-योगसाधनपर प्रकरण ग्रंथ) मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९६८.

५. **चंद्रावळी-आख्यान** (महानुभाव कवी गोपाळदासकृत) मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश, हैदराबाद, १९६०.

६. **नेमिनाथ भवांतर** (जैन परंपरेतील एक वैशिष्ट्यपूर्ण लोककाव्य) मराठी स्वाध्याय संशोधन पत्रिका, अंक ४ था, १९६९.

७. **बखर ब्राह्मणी बादशाहीची** (बहमनी घराण्याची बखर) मराठी स्वाध्याय संशोधन पत्रिका, अंक ७ वा, १९७२.

८. **भावार्थ रामायण, खंड १ व २,** (श्री संत एकनाथकृत) सहकार्याने, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई १९८०,

९. **रसकौमोदि** (विठ्ठल गलंड विरचित–रसवैद्यक आयुर्वेद शास्त्रावरील शके १२२२ मधील ग्रंथ. मराठीतील कालोल्लेखित प्राचीनतम हस्तलिखिताचे. [शके १४५६] संपादन.)

१०. **राजयोग** (संतकृत राजयोगावरील अभंगाचे संकलन) मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९७०.

११. **सुगमबोध** (अनंतानुचर विरचित– 'तत्त्वमसि' वा महावाक्यावरील टीका-भाष्य ग्रंथ) मराठी विभाग, उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद, १९७१.

१२. **संगीत-दर्पण** (दामोदर पंडित विरचित, या ग्रंथावरील अज्ञात भाष्यकारांची प्राचीन मराठी ग्रंथ टीका, मूळ संस्कृत श्लोकांसह.)

१३. **हैदराबाद राज्याचे विसर्जन** (श्री. दिगंबरराव बिंदू यांचे आत्मचरित्र, याचे संपादन.) श्री. दिगंबरराव बिंदू स्मारक समिती, हैदराबाद, १९६८.

□

शुद्धिपत्र

पृ. क्र.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१	८	विविध	त्रिविध
१	९	महाराट्र	महाराष्ट्र
४	२०	व्वक्तिगत	व्यक्तिगत
५	४	भाषांनील	भाषेतील
५	२०	ग्रंयाच्या	ग्रंथाच्या
५	२४	साम्राज्ञी	रूम्राज्ञी
६	५	उद्देशान	उद्देशाने
९	७	मुकुदराज, ज्ञानश्वर	मुकुंदराज, ज्ञानेश्वर
९	१८	खडित	खंडित
१३	६	ग्रंथभाषा	पंथभाषा
१३	१०	पंथाची	ग्रंथांची
१३	१४	ग्रंथ परंपरा	संगीत परंपरा
१३	१६	आमदानीतील भाषा	आमदानीतील ग्रांथिक भाषा
१५	२४	संघंध	संबंध
१६	१५	परातनत्व	पुरातनत्व
३८	२२	प्रमुख	प्रभुत्व
४६	११	शाङ्गदेव	शाङ्गंदेव
४६	खालून २	अथव	अथवा
४६	खालून १	उदाहरणा	उदाहरण
४७	३	तरा	तरी
४७	७	तुळोजीच्यी	तुळोजीच्या
४८	९	शिल्ये	शिल्पे
४८	खालून १	ा	या
५४	२१	वेद्यक	वैद्यक
५५	१९	आध्यात्म	अध्यात्म
५५	२३	अध्यात्मः	अध्यात्म
६४	खालून ३	मनस्ते	मनसो
६६	खालून ५	क्षेमेद्राची	क्षेमेंद्राची

पृ. क्र.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
७३	खालून ३	यि	या
७३	खालून २	मिळवलो	मिळवले
७४	२०	अथवः	अथवा
७९	४	संदेहनिवृत्ती,	संदेहनिवृत्ती.
८०	१७	महाभा तर	महानुभावेतर
८०	१७	आठळत	आढळत
८०	२०	गद्यग्रंथ	गद्यग्रंथ
९६	२४	बखर	वरवर
९८	१०	मराठी रामायण–	रामायण–
१००	खालून ६	अहोत	आहोत
१०१	खालून २	विदवानांनीही	विद्वानांनीही
१०५	१३	दिलेरखानाची	दिलेलखानाची
१११	२	शली	शैली
११२	२१	अविधासी	अविंधासी
११५	२	भृमिका	भूमिका
१२६	२२	पाडाची	पाडावी
१२८	१९	सुहृद	सुहृद
१३२	१	यते	येते
१३८	४	गल्यासारखे	गेल्यासारखे
१५३	खालून ५	दृष्ठीने	दृष्टीने

REFBK-0026427

प्रादे. ग्रंथ उपक्रम
क्र. ४१२०
२५१२८
२८।९।९७



मेहता
पब्लिशिंग
हाऊस